# विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि शोध वर्तनांचा अभ्यास

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेंतर्गत ग्रंथालय आणि
माहितीशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**सौ. कल्पना दिपक जाधव**

मार्गदर्शक

**डॉ. राजेंद्र कुंभार**


**ऑक्टोबर 2017**

# प्रतिज्ञापत्र

मी, **सौ. कल्पना दिपक जाधव** प्रतिज्ञापुर्वक नमूद करते की, **''विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि शोध वर्तनांचा अभ्यास''** या विषयावरील शोधप्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर करीत आहे. हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तेथे संदर्भांची यथायोग्य नोंद केलेली आहे.

हा शोध प्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवीकरिता अगर परीक्षेकरिता सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे (सौ. कल्पना दिपक जाधव)

तारीख : संशोधक

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **“विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि शोध वर्तनांचा अभ्यास”** हा शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे सादर करण्यात आला आहे. हा शोध प्रबंध सौ. कल्पना दिपक जाधव यांनी, माझ्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले संशोधन कार्य आहे.

माझ्या माहिती व विश्वासानुसार संबंधित संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीकरिता किंवा परीक्षेकरिता वापरले नाही.

मार्गदर्शक

**( डॉ. राजेंद्र कुंभार )**
प्राध्यापक
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

ठिकाण : पुणे
तारीख :

# ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनासाठी मला अनेक व्यक्तींनी सहाय्य केले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे उचित ठरेल. प्रथम माझे मार्गदर्शक गुरुवर्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी स्वत:चा अमूल्य वेळ खर्च करून प्रोत्साहन देऊन वेळकाळाचे बंधन न ठेवता निरपेक्षपणे, कर्तव्यबुद्धीने व चिकित्सकपणे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

'विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनांचा अभ्यास' या संशोधन प्रकल्पाचे लेखन करताना अनेकांचे सहकार्य लाभले. त्यांचे ऋण मानणे तितकेच महत्त्वाचे आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिपक टिळक यांनी माझ्या संशोधनाची रूपरेषा याविषयी स्पष्टपणे मत मांडून संशोधनाला योग्य दिशा दिली. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. धनिष्ठा खंदारे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. सदानंद बनसोडे यांनी दिलेल्या योगदानामुळे मी त्यांचे ऋण मानणे हे मी माझे कर्तव्य मानते.

सिंबायोसिस लॉ स्कूलच्या प्राचार्या डॉ. शशिकला गुरपुर व प्राध्यापक डॉ. आत्माराम शेळके यांनी वेळोवेळी माझे मनोधैर्य वाढवून प्रोत्साहन दिले. माझ्या ग्रंथालयाच्या सहकाऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

श्री. अशोक कुडले यांनी संगणकीय एडिटिंगचे काम उत्तमपणे, थोड्या वेळात व बिनचूकपणे पार पाडले. त्याबद्दल त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रसंगी कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकारून, धीर देऊन मला हा प्रबंध पूर्ण करण्यास प्रोत्साहित करणारे माझे पती व दोन्ही मुले यांची मी आभारी आहे. तसेच माझ्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या मला या कार्यात सहकार्य मिळाले म्हणून मी त्यांचीही ऋणी आहे.

याशिवाय ज्या ज्ञात व अज्ञात व्यक्तीचे मला संशोधन कार्य करताना सहकार्य लाभले आहे त्यांची मी ऋणी आहे.

**संशोधक विद्यार्थी**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | i |
| | प्रतिज्ञापत्र | ii |
| | प्रमाणपत्र | iii |
| | ऋणनिर्देश | iv |
| | अनुक्रमणिका | v |
| | तक्त्यांची यादी | xi |
| | आलेखांची यादी | xii |
| | आकृत्यांची यादी | xiii |
| | संक्षिप्त सूची | xiv |
| **प्रकरण** 1 | **प्रस्तावना** | **1 - 22** |
| | 1.1 विषय प्रवेश | 1 |
| | 1.2 संशोधन समस्या | 4 |
| | 1.3 समस्या विधान | 6 |
| | 1.4 सदर संशोधनाची आवश्यकता | 6 |
| | 1.5 संशोधनाची उद्दिष्टे | 8 |
| | 1.6 संशोधनाची गृहीतके | 9 |
| | 1.7 सदर संशोधनाची व्याप्ती | 9 |
| | 1.8 मर्यादा | 9 |
| | 1.9 संशोधन पद्धती | 10 |
| | 1.10 लक्ष्यगट | 10 |
| | 1.11 माहिती संकलन | 11 |
| | 1.12 प्रश्नावलीचे वितरण | 11 |
| | 1.13 पथदर्शक सर्वेक्षण (Pilot Survey ) | 12 |

| | | |
|---|---|---|
| | 1.14 माहितीचे विश्लेषण | 13 |
| | 1.15 या संशोधनात वारंवार वापरलेल्या निवडक तांत्रिक संज्ञांचे स्पष्टीकरण | 13 |
| | 1.15.1 माहिती | 13 |
| | 1.15.2 माहिती वर्तणूक | 14 |
| | 1.15.3 माहितीची गरज | 14 |
| | 1.15.4 माहितीचा शोध | 15 |
| | 1.15.5 माहिती शोध वर्तणूक | 15 |
| | 1.16 प्रकरणांची रूपरेषा | 16 |
| | समारोप | 18 |
| **प्रकरण 2** | **विधी शिक्षण, विधी ग्रंथालये आणि माहिती शोध वर्तन एक दृष्टिक्षेप** | **23 - 79** |
| | 2.1 विधी शिक्षण | 23 |
| | 2.1.1 प्रस्तावना | 23 |
| | 2.1.2 कायदा (Law) | 23 |
| | 2.1.3 विधी शिक्षणाची गरज | 24 |
| | 2.1.4 विधी शिक्षणाचा इतिहास | 25 |
| | 2.1.5 ब्रिटिश काळातील विधी शिक्षण | 27 |
| | 2.1.6 मुस्लीम काळातील विधी शिक्षण | 30 |
| | 2.1.7 विधी शिक्षण : समस्या व त्यांचा संबंध | 32 |
| | 2.1.8 भारतातील विधी शिक्षण | 33 |
| | 2.1.9 स्वतंत्र भारतात विधी शिक्षण | 34 |
| | 2.1.10 भारतातील विधी शिक्षणाची सद्यस्थिती | 35 |
| | 2.1.10.1 भारतातील विधी विद्यापीठे | 37 |
| | 2.1.11 विधी शिक्षणात सुधारणा | 38 |
| | 2.1.12 विधी शिक्षण सुधारण्यासाठी आयोग | 39 |

| | | |
|---|---|---|
| | 2.1.13 विधी शिक्षणावर राष्ट्रीय ज्ञान आयोगाचा अहवाल | 39 |
| | समारोप | 40 |
| | 2.2 विधी ग्रंथालये | 41 |
| | 2.2.1 प्रस्तावना | 41 |
| | 2.2.2 विधी ग्रंथालयांची भूमिका | 41 |
| | 2.2.3 विविध प्रकारची विधी ग्रंथालये | 42 |
| | 2.2.4 विधी ग्रंथालयाची भूमिका | 45 |
| | 2.2.5 विधी ग्रंथालयातील माहिती साधने | 50 |
| | 2.2.6 विधी ग्रंथालयातील ऑनलाइन माहिती साधने | 55 |
| | 2.2.7 ऑनलाइन मोफत उपलब्ध असणारी निवडक विधी साधने | 58 |
| | 2.2.8 विधी ग्रंथालय पद्धती | 59 |
| | 2.2.9 विधी ग्रंथालय अर्थसहाय्य | 60 |
| | 2.2.10 विधी ग्रंथालयांचे भवितव्य | 61 |
| | 2.2.11 भारतातील विधी ग्रंथालये | 62 |
| | 2.2.12 भारतातील विधी ग्रंथपालनाची सद्यस्थिती | 63 |
| | 2.2.13 भारतातील नामांकित पहिल्या पंधरा क्रमांकाची विधी महाविद्यालये | 64 |
| | 2.2.14 विधी ग्रंथालयांचे आधुनिकीकरण | 69 |
| | 2.2.14.1 प्रस्तावना | 69 |
| | 2.2.14.2 पारंपरिक विधी ग्रंथालये | 69 |
| | 2.2.14.3 ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वापर (ICT) | 70 |
| | 2.2.14.4 पारंपरिक ग्रंथालयाचे स्वरूप | 71 |
| | 2.2.14.5 माहिती तंत्रज्ञान युगातील ग्रंथालयांची स्थिती | 71 |
| | 2.2.14.6 ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणावर परिणाम करणारे घटक | 72 |
| | समारोप | 73 |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण 3** | **साहित्याचा आढावा** | **80 - 205** |
| | 3.1 प्रस्तावना | 80 |
| | 3.2 माहिती व माहिती शोध | 82 |
| | 3.3 माहितीची गरज आणि माहिती शोध वर्तन | 89 |
| | 3.4 माहितीचा वापर आणि माहिती शोध वर्तन | 98 |
| | 3.5 विधी विषयातील माहिती शोध वर्तन | 102 |
| | 3.6 विधी ग्रंथालय व माहिती शोध वर्तन | 122 |
| | 3.7 विविध विषयांतील उपभोक्त्यांचे माहिती शोध वर्तन | 131 |
| | 3.8 माहितीची साधने आणि माहिती शोध वर्तन | 142 |
| | 3.9 डिजिटल युगातील माहिती शोध वर्तन | 149 |
| | 3.10 माहिती शोध वर्तनाच्या प्रतिकृती | 163 |
| | समारोप | 174 |
| **प्रकरण 4** | **माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन** | **206 - 258** |
| | 4.1 प्रस्तावना | 206 |
| | 4.2 विभाग अ : विद्यार्थ्यांची सर्वसामान्य माहिती | 207 |
| | ● सर्वसाधारण माहिती | 207 |
| | 4.3 विभाग ब : ग्रंथालयाच्या सेवा आणि वापर | 209 |
| | ● प्रतिसादकांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह | 209 |
| | ● विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेटीची वारंवारिता | 210 |
| | ● पारंपारिक आणि ई–ग्रंथालय अशा दोन्ही प्रकारच्या ग्रंथालयांना भेट देणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या | 212 |
| | ● ग्रंथालयांना (पारंपारिक तसेच ई–ग्रंथालय)दररोज भेट देणारे विद्यार्थी | 213 |
| | ● ग्रंथालयाला भेट देण्याचा हेतू | 215 |

| | | |
|---|---|---|
| | ● संगणक आधारित सेवा वापरण्याचे हेतू | 217 |
| | ● इतर ग्रंथालयांचा वापर | 218 |
| | ● विद्यार्थ्यांची ग्रंथसंग्रहाबाबतची मते | 219 |
| | ● ग्रंथालय सेवांची माहिती आणि वापर | 221 |
| | ● नवीन वाचन साहित्य माहीत होण्याची साधने/मार्ग | 224 |
| | ● ग्रंथालय तालिकेचा वापर | 226 |
| | ● ग्रंथालयातील ग्रंथ शोधण्यासाठी वापरले जाणारे तालिकेशिवायचे पर्याय | 227 |
| | ● वाचन साहित्य मिळविण्याचे ग्रंथालयांव्यतिरिक्त मार्ग | 227 |
| | ● ग्रंथालय सेवकांचे सहकार्यांचे हेतू | 229 |
| | 4.4 विभाग क : उपभोक्त्यांची माहितीची गरज | 230 |
| | ● विधी विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजाची वर्गवारी आणि प्राधान्यक्रम | 230 |
| | ● माहितीची गरज भागविण्यासाठी वापरली जाणारी साधने व त्यांचा प्राधान्यक्रम | 233 |
| | ● माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाची क्षमता | 235 |
| | ● माहितीच्या गरजा आणि त्यांच्या पूर्तीची माध्यमे | 237 |
| | 4.5 विभाग ड : माहिती शोध वर्तणूक | 239 |
| | ● माहिती संकलनासाठी आठवड्याला खर्च होणारा वेळ | 239 |
| | ● माहिती शोधवर्तनावर परिणाम करणारे घटक | 240 |
| | ● अनौपचारिक माहिती साधने वापरण्याची कारणे | 241 |
| | ● अनौपचारिक माहिती साधनाचा वापर | 243 |
| | ● माहिती शोधण्यातील समस्या | 244 |

| | | |
|---|---|---|
| | 4.6 विभाग इ : माहिती शोध वर्तनावर माहिती तंत्रज्ञानाचा पडणारा प्रभाव | 248 |
| | • माहिती शोधण्याचे प्रशिक्षण | 248 |
| | • माहिती संकलन करण्यासाठी कौशल्याची/प्रशिक्षणाची गरज | 248 |
| | • इंटरनेटचा वापर करण्याची वारंवारिता | 250 |
| | • इंटरनेट वापराचे हेतू | 250 |
| | • इंटरनेट सुविधेच्या उपयोगाचे ठिकाण | 251 |
| | • इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबद्दलची जागरूकता | 252 |
| | • इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांची उपयुक्तता वाढविणारी वैशिष्ट्ये | 253 |
| | • न्यायालयीन निकाल किंवा विधीविषयक लेख शोधण्यासाठी | 255 |
| | विधीविषयक डेटाबेसचा वापर | 258 |
| | • तंत्रज्ञानधिष्ठित ग्रंथालयाच्या सेवांबाबतचे मत | |
| **प्रकरण 5** | **निष्कर्ष आणि शिफारशी** | **259 - 277** |
| | 5.1 प्रस्तावना | 259 |
| | 5.2 निष्कर्ष | 259 |
| | 5.3 शिफारशी | 267 |
| | 5.4 भविष्यवेध | 276 |
| | समारोप | 276 |
| **परिशिष्ट 1** | **प्रश्नावली** | **278 - 289** |
| **परिशिष्ट 2** | List of Law Colleges Under Savitribai Phule Pune University, Pune | **290 - 291** |
| | List of Law Colleges Under Symbiosis International University, Pune | **292** |
| | List of Law Colleges Under Deemed Universities, Pune | **292** |
| **परिशिष्ट 3** | Bar Council of India's Circular regarding Library Facilities | **293 - 294** |
| | **संदर्भ ग्रंथसूची** | **295 - 331** |

## माहिती संकलन तक्त्यांची यादी


| तक्ता क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 2.1 | भारतातील विधी विद्यापीठे | 37 |
| 2.2 | भारतातील पहिल्या पंधरा क्रमांकातील विधी महाविद्यालयातील माहितीची छापील आणि इलेक्ट्रॉनिक संसाधने दर्शविणारा तक्ता | 65 |
| 4.1 | सर्वसाधारण माहिती | 208 |
| 4.2 | अंतिम वर्षाची वयोमर्यादा | 208 |
| 4.3 | पारंपारिक आणि ई–ग्रंथालयांना भेट देणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या | 212 |
| 4.4 | ग्रंथालय भेटीचा हेतू | 215 |
| 4.5 | संगणक आधारित सेवा वापरण्याचे हेतू | 217 |
| 4.6 | इतर ग्रंथालयांना भेट | 218 |
| 4.7 | ग्रंथालय सेवांची माहिती आणि वापर | 221 |
| 4.8 | ग्रंथालय तालिकेचे पर्यायी मार्ग | 227 |
| 4.9 | वाचन साहित्य मिळविण्यासाठीचे ग्रंथालयाव्यतिरिक्तचे मार्ग | 228 |
| 4.10 | माहितीच्या गरजांची वर्गवारी आणि प्राधान्यक्रम | 230 – 231 |
| 4.11 | वापरण्यात येणाऱ्या साधनांचा प्राधान्यक्रम | 233 – 234 |
| 4.12 | माहितीच्या गरजा आणि त्यांच्या पूर्तीची माध्यमे | 237 |
| 4.13 | माहिती संकलित करण्यासाठी आठवड्याला खर्च होणारा वेळ | 239 |
| 4.14 | माहिती शोध वर्तनावर परिणाम करणारे घटक | 240 |
| 4.15 | अनौपचारिक माहिती साधने वापरण्याची कारणे | 241 |
| 4.16 | अनौपचारिक माहिती साधनांचा वापर | 243 |
| 4.17 | माहिती शोधण्यातील समस्या | 244 – 245 |
| 4.18 | इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबद्दलची जागरूकता | 253 |
| 4.19 | इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांची उपयुक्तता वाढविणारी वैशिष्ट्ये | 254 |
| 4.20 | विधी डेटाबेसचा प्राधान्यक्रम | 256 |

# आलेखांची यादी


| आलेख क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 4.1 | प्रतिसादकांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह | 209 |
| 4.2 | विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेटीची वारंवारिता | 211 |
| 4.3 | ग्रंथालयात दररोज व्यतीत होणारा सरासरी वेळ | 213 |
| 4.4 | वापरली जाणारी इतर ग्रंथालये | 219 |
| 4.5 | ग्रंथ संग्रहाविषयी मत | 220 |
| 4.6 | नवीन वाचन साहित्य माहीत होण्याची साधने/मार्ग | 225 |
| 4.7 | ग्रंथालय तालिकेचा वापर | 226 |
| 4.8 | ग्रंथालय सेवकांच्या सहकार्याचे हेतू | 229 |
| 4.9 | माहितीच्या गरजा पूर्ण न होण्याची कारणे | 236 |
| 4.10 | माहिती संकलन करण्यासाठी कौशल्याची/प्रशिक्षणाची गरज | 249 |
| 4.11 | इंटरनेटचा वापर करण्याची वारंवारिता | 250 |
| 4.12 | इंटरनेट वापराचे हेतू | 251 |
| 4.13 | इंटरनेट सुविधेच्या उपयोगाचे ठिकाण | 252 |

# आकृत्यांची यादी


| आलेख क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 3.1 | Wilson's Information - Seeking Behaviour Model | 167 |
| 3.2 | Dervin's Sense - Making Triangle | 168 |
| 3.3 | Dervin's Sense-making Model Re-drawn | 168 |
| 3.4 | A Process Model based on Ellis's Characteristics | 169 |
| 3.5 | A Comparison of Ellis's and Kuhlthau's Frameworks | 172 |
| 3.6 | The Information-seeking of Professionals Model (Leckie) | 174 |

# संक्षिप्त सूची

| | |
|---|---|
| AALL | American Association of Law Libraries |
| ADR | Alternative Dispute Resolution |
| ADRJ | Australasian Dispute Resolution Journal |
| AIR | All India Reporter |
| ALA | American Library Association |
| ARIC | Asia Regional Integration Center |
| ARL | Association of Research Libraries |
| BCI | Bar Council of India |
| CLA | Corporate Law Adviser |
| DESIDOC | Defense Scientific Information and Documentation Centre |
| DSNLU | Damodaram Sanjivyya National Law University |
| DUI | Driving Under the Influence |
| ICAR | Indian Council of Agricultural Research |
| ICFAI | Institute of Chartered Financial Analysts of India |
| ICT | Information Communication Technology |
| ILI | Indian Law Institute |
| ILL | Inter Library Loan |
| ILS | Indian Law Society |
| IT | Information Technology |
| JUDIS | Judgement Information System |
| KSLU | Karnataka State Law University |
| LII | Legal Information Institute |
| MARC | Machine Readable catalogue |
| NALSAR | National Academy of Legal Studies and Research |
| NASSDOC | National Social Science Documentation Centre |
| NIALS | Nigerian Institute of Advanced Legal Studies |

| | |
|---|---|
| NISCAIR | National Institute of Science Communication and Information Resources |
| NKC | National Knowledge Commission |
| NLSIU | National Law School of India University |
| NLU | National Law University |
| NUALS- | National University of Advanced Legal Studies |
| NUJD | National University of Judicial Sciences |
| OPAC | Online Public Access Catalogue |
| RFID | Radio Frequency Identification |
| SCC | Supreme Court Cases |
| SENDOC | Small Enterprises National Documentation Centre |
| SPSS | Statistical Package for Social Scientist |
| TNALU | Tamil Nadu Dr Ambedkar Law University |
| UGC | University Grant Commission |
| WWW | World Wide Web |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## 1.1 विषय प्रवेश :

माहिती ही एक अतिशय परिचित संकल्पना आहे. प्रत्येकाला माहितीची आवश्यकता असते. जसे व्यवस्थापक, प्रशासक, न्यायाधीश, वकील, वैज्ञानिक, शिक्षक, विद्यार्थी इत्यादी. प्रत्येक व्यक्तीची माहितीची गरज व माहिती शोधवर्तन हे भिन्न असते.

समाजाच्या विकासासाठी माहिती महत्त्वाची आहे. ज्ञाननिर्मितीसाठी माहिती आवश्यक आहे. माहिती ही संकल्पना आणि संप्रेषण या समांतर आहेत आणि बहुतांश वेळा समानार्थीपणे वापरले जाते. माहिती संप्रेषणाद्वारे सक्रिय होते आणि संप्रेषणाद्वारे माहितीचे हस्तांतरण होते. माहिती आणि संप्रेषण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रत्येकाच्या वैयक्तिक दृष्टिकोनातून पाहिल्यास दोन्हीचा वापर करण्याचा उद्देश एकच आहे.

माहितीची साधने अतिशय वेगाने विकसित होत आहेत आणि वाढत आहेत. या वृद्धीसाठी माहिती साधनांचा अधिकाअधिक संख्येने वाढता वापर आणि त्यांची दैनंदिन वापरक्षमता अशी कारणे असू शकतात. मुद्रित स्वरूपातील माहिती आणि तसेच ऑनलाइन संशोधन नियतकालिके यांची संख्या झपाट्याने वाढत आहे व त्यामुळेच ग्रंथपालांना ''मिडलवेअर अर्थात मध्यस्थाचे'' स्थान प्राप्त झाले आहे. Jones (2009) याच प्रकारे, इंटरनेटच्या वाढत्या विकासामुळे सन 1990 ते 2001 या कालावधीत इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील संशोधन माहिती साधनासाठी ग्रंथालयाचे अंदाजपत्रक सुमारे चार पटीने वाढलेले आहे. Association of Research Libraries (2008) माहिती संकलित करणे, तिचे योग्य व्यवस्थापन आणि तसेच योग्य वितरण याचा आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात मोलाचा वाटा आहे आणि हे जगभरात सर्वविदित झाले आहे. आणि त्यामुळेच ''माहितीधिष्ठित समाज'' हा वाक्यप्रचार उदयास आलेला आहे. जगाच्या विकासासाठी माहिती फार महत्त्वाची आहे. याची वाच्यता सन 2003 मध्ये

जिनिव्हा आणि 2005 मध्ये टुनिस येथे संपन्न झालेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेत झालेली आहे. Obasanjo (2005) माहिती साधनाच्या विकासामुळे वेगवेगळ्या लोकांच्या गटांत माहितीची गरज आणि वर्तणूक यात वृद्धी होत आहे आणि फरक पडत आहे.

आपले जग अधिकांश माहितीवर आधारित आणि माहितीशी सूत्रबद्ध होत आहे. या कारणांमुळे माहितीचा बदल आणि माहितीची देवाणघेवाण यांचा वेग आणि दर सतत वाढत आहे. तंत्रज्ञानातील विकास आणि मानवी व तांत्रिक विकासासाठी माहितीचे वाढते महत्त्व याला कारणीभूत आहे. आपण माहितीधिष्ठित समाजात राहतो. अशा समाजात अधिकाधिक लोकांनी अधिकाधिक माहितीचा वापर करायला हवा, याला तंत्रज्ञानाची साथ लाभायला हवी आणि त्यामुळेच येथे माहितीची मागणी आणि माहितीची निर्मिती होत असते. जेथे फार मोठ्या प्रमाणात माहितीची साधने उपलब्ध आहेत तेथे उपभोक्त्यांना माहिती वापरताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जसे की, मोठ्या प्रमाणात माहितीची हाताळणी, नव्या स्वरूपाची माहिती आणि माहिती वापरण्यासाठीची नवी उपकरणे इत्यादीबाबतच्या समस्या. Naukwe (2004) विधी अभ्यासक्रमाला प्रवेश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये शहरी आणि ग्रामीण क्षेत्रातून आलेल्यांचा समावेश असतो. त्यांना इलेक्ट्रॉनिक माहितीची साधने वापरण्याचे किमान शून्य ते नगण्य अनुभव असतो. माहितीचा डोंगर जलदगतीने उभा होत असल्याने अभ्यास व संशोधनात विद्यार्थ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. Kajagbola (2004) माहितीच्या विस्तृत व्यापक उपलब्धतेमुळे माहितीच्या व्यवस्थापनाची, तिच्या उपयोगाची आणि कार्यक्षमपणे हाताळण्याची गरज निर्माण होते. या विस्तृत माहितीचा योग्य व सर्वतोपरी वापर करण्यासाठी विधी विषयाचे विद्यार्थी आपल्या स्वतःच्या माहितीच्या गरजा जाणून माहितीचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

माहिती शोध वर्तणुकीची व्याख्या करावयाची झाल्यास प्रत्येक व्यक्तीची व्यक्तिगत उपयोगासाठी विकासासाठी आणि ज्ञानार्जनासाठी माहिती गोळा करण्याची आणि माहितीचा विनिमय करण्याचे प्रकार आणि पद्धती म्हणजे माहिती शोध वर्तणूक होय. यामुळे असे दिसून येते की, माहिती संकलित करण्याचे आणि माहिती साधनांच्या उपयोगासाठी उपलब्ध विविध

पद्धतींमुळे प्रत्येक व्यक्तीची माहिती शोध वर्तणूक ठरत आहे. Fairer Wessels (1990) kakai et al. (2004) यांनी याप्रकारे माहितीच्या साधनांच्या उपयोगाची आणि माहिती गोळा करण्याच्या पद्धतीला लोकांच्या माहितीच्या शोधाचे आणि उपभोगाचे तंत्र असा संदर्भ दिला आहे. प्रत्येक व्यक्तीची माहिती शोध वर्तणूक भिन्न असल्यामुळे व्यक्तीची माहिती गोळा करण्याची पद्धत व अभ्यासक्षेत्रातील विशिष्ट गटातील त्यासाठीचे घटक यांचा शोध घेणे गरजेचे ठरते. कोणत्याही शैक्षणिक क्षेत्रात माहिती एक मोलाचे साधन आहे आणि त्यामुळेच माहितीचे संपादन आणि वापर अपरिहार्य ठरतो. त्यामुळेच माहितीचा शोध ही प्रक्रिया विधी विद्यार्थ्यांसाठी मूलभूत आणि कौशल्याची ठरू लागली आहे. विधी विद्यार्थ्यांना माहिती शोधताना काही समस्यांना सामोरे जावे लागते.

Sing and Satija (2008) यांनी स्पष्ट केले आहे की, ''माहितीची निर्मिती अथवा संचय करणे हे आता आव्हान नाही, परंतु लोकांना योग्य माहिती वापरण्यास मिळणे हे मोठे आव्हान आहे. संस्थेच्या कार्यात, व्यवस्थापनात माहिती एक क्लिष्ट स्त्रोत आहे. व्यवस्थापकीय कामामध्ये नियोजन, संघटन, नेतृत्व नियंत्रण यासाठी संबंधित माहितीची वेळेला होणारी उपलब्धता महत्त्वाची आहे.''

ग्रंथालय व माहितीशास्त्रज्ञांनी माहितीच्या गरजा समजून घेण्यासाठी त्याचा वापर, शैक्षणिक क्षेत्रातील वापरकर्त्यांचे माहिती शोधवर्तन, ग्रंथालय शोधवर्तनाचा वापर यासाठी बराच अभ्यास केला आहे.

प्रस्तुत प्रबंधामागील प्रेरणा अशी आहे की, विधी विद्यार्थी माहिती साधनाचा वापर कसा करतात याचा शोध घेणे आणि त्यांची माहितीची गरज, वर्तन व त्यातील अडथळे यांचा अभ्यास करणे. Wilson (2000) असे प्रतिपादन करतात की, ''माहिती शोध वर्तनात हेतुपुर्वक माहिती शोधली जाते. काही ध्येय पूर्ण करण्याच्या गरजांचा परिणाम म्हणून शोध प्रक्रियेत वैयक्तिकरित्या मुद्रित किंवा संगणक आधारित प्रणालीसह संवाद साधू शकतो.''

विधी विद्यार्थ्यांच्या माहितीशोध वर्तणुकीचा अभ्यास करण्याच्या हेतूने संबंधित संशोधन हाती घेण्यात आले आहे.

## 1.2 संशोधन समस्या :

विधी अभ्यासक्रमाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमितपणे माहिती शोधण्यासाठी त्याची पुनर्प्राप्ती, वापर आणि प्रसारण करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. ही कौशल्ये विधी व्यावसायिकांकडे असणे अपरिहार्य आहे. त्यांना भविष्यात व्यवसाय अथवा विधीच्या कोणत्याही क्षेत्रात आपले वर्चस्व स्थापित करावयाचे असल्यास मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या माहितीतून कौशल्याने माहिती प्राप्त करणे आवश्यक असते.

विधी ग्रंथालयातील माहिती शोधताना विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपलब्ध संसाधनांचा परिपूर्ण वापर करीत नाहीत. माहितीची साधने, संसाधने वापरण्याच्या कौशल्याच्या अभावामुळे हे होऊ शकते असे संशोधकांच्यादेखील निरीक्षणास आले. विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी त्यांना लागणाऱ्या मुख्य माहितीच्या पुनर्प्राप्ती साधनांशी परिचित झाले नव्हते. विद्यार्थ्यांना त्यामुळे आवश्यक माहितीची पुनर्प्राप्ती प्रभावीपणे होऊ शकत नाही. विधी ग्रंथालयातील विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी नियमितपणे त्यांना आवश्यक असणारी माहिती शोधण्यासाठी क्रमिक ग्रंथांना अधिक प्राधान्य देतात. ते वाचनकक्षाचा वापरही गृहपाठ करण्यासाठीच करतात.

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही उपलब्ध विधी स्वरूपातील साहित्यातून माहिती शोधण्यात कुशल असावे. माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे माहितीसंग्रह आणि ती वापरण्याचे मार्ग बदलले आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या साहाय्याने माहिती मिळविण्यासाठीच्या कौशल्यांची गरज भासली. विधी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध साधने कुठे उपलब्ध आहेत हे अवगत नाही. त्यामुळे अभ्यासासाठी, शोधप्रकल्पासाठी, संशोधनासाठी ते योग्य साधनांचा शोध घेण्यात अपयशी ठरत आहेत. त्यामुळे समस्या अशी आहे की, विद्यार्थ्यांकडे योग्य माहिती साधने शोधण्याचे कौशल्य नसल्यामुळे त्यांचा महत्त्वाचा वेळ वाया जातो. विद्यार्थ्यांना केस लॉ, कायदे आणि अभ्यासू घडामोडीबद्दलचे लिखाण, साधने शोधण्यात समस्या येत असतात. त्यांचे मूलभूत मुद्रित साधनांबाबतचे मर्यादित ज्ञान हे त्याचे कारण असू शकते.

शैक्षणिक ग्रंथ मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही स्वरूपात निर्मित होत आहेत. परंतु अशा साधनांचा वापर करणे त्यांना कठीण वाटते. त्यामुळे ते वाचन साहित्यातील काही साधनांना दुर्लक्षित करतात तर काहींना नको तितके प्राधान्य देत असतात.

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आत्मसात करण्याच्या पद्धती यांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, बहुतांश विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी बऱ्याच साधनांचा उपयोग करीत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या दुर्लक्षित माहिती शोध वर्तणुकीचे कारण लक्षात घेता त्याबाबत सखोल संशोधन करणे गरजेचे वाटले.

सदर अभ्यासानुसार विधी ग्रंथालयातील उपलब्ध विधी साधने, संसाधने यांचा वापर करण्याच्या संदर्भात विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करून हे अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, अभिमत आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठाला संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयांतील विधी विद्यार्थ्यांकडून हे अपेक्षित आहे की, इतर माहिती साधनांच्या समवेत त्यांच्या महाविद्यालय ग्रंथालयाचा एक प्रमुख माहिती साधन म्हणून पुरेपूर वापर करावा. परंतु निदर्शनातून आणि विद्यार्थ्यांच्या, विशेषतः विधी विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि आत्मसात करण्याच्या पद्धतींचा अभ्यास केला असता असे लक्षात आले आहे की, विद्यार्थी बहुतांश साधनांचा उपयोग करीत नाहीत. विद्यार्थ्यांची दुर्लक्षित माहिती शोध वर्तणूक यांचे मूळ कारण लक्षात घेता त्याबाबत सखोल संशोधन करणे गरजेचे ठरते, म्हणूनच या अभ्यासाची पार्श्वभूमी ही या शोध प्रकल्पाची मुख्य कारणे आणि ध्येय स्पष्ट करते.

Callister (2003) Bowman (2008) Jones (2009) woxland (1989) असे स्पष्ट करतात की, विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून लक्षात आले की, वकिलांचे विधी संशोधन कौशल्य फार खराब आहे. 1902 मध्ये एका विधी संशोधन साहित्य परिषदेमध्ये आयोगाचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डीमेट यांनी नमूद केले की, ''विधीचे असहाय्य विद्यार्थी अगदी वकीलदेखील ग्रंथालयामध्ये अधिकारी शोधण्यासाठी जातात.'' एकशे चौदा वर्षांनंतरही या विधानाचा युक्तिवाद केला जाऊ शकतो. हे विधान अजून (विशेषतः डिजिटल विधी ग्रंथालयासंबंधित वापर) खरे आहे. Bowman (2008) विधीचा सराव करण्यासाठी विधी संशोधनाला फार महत्त्व आहे हे सत्य आहे यात कोणताही वाद नाही. Woxland (1989)

प्राध्यापक व ग्रंथपाल यांनी स्पष्ट केले की, वकिलाचे विधी संशोधन हे अनेक कार्यांपैकी एक आवश्यक कार्य आहे. Meyer (2009), Jones (2009) नोकरी मिळविण्यासाठी, स्पर्धात्मक वातावरणात टिकून राहण्यासाठी विधी पदवीधर विद्यार्थ्यांमध्ये माहिती मिळविण्याचे कौशल्य असणे अत्यंत गरजेचे आहे. तथापि, नवीन पदवीधर विद्यार्थी सहसा या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात. Woxland (1989) हार्डवर्ड लॉ स्कूलचे डीन क्रिस्टोफर कोलंबस लॉगडेल म्हणतात, ''विधी अभ्यासासाठी विधी शाळेची ग्रंथालये 'प्रयोगशाळा' म्हणून पुनर्प्रस्थापित करणे जरूरी आहे.''

## 1.3 समस्या विधान :

एलएल.बी. 5 व्या वर्षाचा अभ्यास करणारे विद्यार्थी माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या वाचन साहित्याला प्राधान्य देतात, माहिती कोठून शोधतात, विधी ग्रंथालय वापरताना त्यांना कोणत्या समस्या जाणवतात, तसेच ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाचा विधी विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनावर कोणता परिणाम झाला याचा शोध घेण्यासाठी सदर संशोधन हाती घेतले आहे.

## 1.4 सदर संशोधनाची आवश्यकता :

समाजातील प्रत्येक व्यक्ती कायद्याच्या ज्ञानात जितकी ज्ञानी, समजदार, विचारी, चांगल्या-वाईटाची जाण असलेली तितक्या प्रमाणात समाजाची प्रगती होते. हे तत्त्व सर्व देशांमध्ये मान्य झाले आहे. समाजाला सुसंस्कृत करण्याबरोबर कायद्याच्या माहिती संदर्भात व्यक्तीस पारंगत करणे केव्हाही हितकारक आहे.

ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांना कोणत्या प्रकारच्या माहिती सेवांची आवश्यकता आहे आणि कोणत्या प्रकारच्या सेवा अस्तित्वात आहेत, यामधील अंतर कमी करण्यासाठी माहितीच्या गरजांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे माहितीच्या उपभोक्त्यांचाही अभ्यास करणे गरजेचे आहे. उपभोक्त्यांना कोणती माहिती प्रणाली आवश्यक आहे हे निश्चितपणे ओळखणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचा आराखडा प्रभावशाली करण्यासाठी ग्रंथालय सेवा, साधने, उपभोक्ते इत्यादींच्या अभ्यासाचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे. विधी ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांचे

माहिती शोध वर्तन आणि माहिती शोध कौशल्ये यांचा शोध घेणे हे विधी माहिती व्यावसायिकांसाठी फार महत्त्वाचे आहे. विधी ग्रंथालयाचा उपभोक्ता हा विशेष प्रकारचा उपभोक्ता आहे. आजचा विधी विषयाचा विद्यार्थी हा उद्याचा कायदा घडविणारा, तो अंमलात आणणारा आहे. तो माहिती संबंधात जितका साक्षर तितकाच तो ज्ञानासंदर्भात प्रभावशाली होऊ शकतो. देशातील कायदेतज्ज्ञ जितक्या सहजतेने कायद्याची अंमलबजावणी करतील तितका कायदा सशक्त होतो. विधी विद्यार्थी जितका सक्षम तितका कायदा हा सक्षम होईल, त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होईल आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळू शकेल. देशाची सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती सुधारेल, देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देश प्रगतिपथावर जाईल. म्हणून विधीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आज योग्य माहिती वेळेत उपलब्ध करण्याची गरज आहे. वकिलीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या उपभोक्त्यांना प्रगतिपथावर नेण्यासाठी आजची माहिती केंद्र प्रयत्न करीत आहेत परंतु त्याच्यापुढे आज फार मोठी आव्हाने उभी आहेत.

विधी शिक्षणावर राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या एका समूहाने काम केले. त्याचे अध्यक्ष राव, (2006) यांनी आपल्या अहवालात म्हणाले आहे की, “अनेक विधी महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठांमध्ये चांगले शिक्षण देण्यात येत आहे. तरीसुद्धा देशाच्या बहुसंख्य विधी शिक्षण संस्थांमधील विधी शिक्षणाची गुणवत्ता आणखी सुधारणे आवश्यक आहे व ते हे सर्वात मोठे आव्हान आहे. हे कार्य विद्यमान नियामक संरचनेतील सुधारणांसह विविध उपाययोजनांसह लागू आहे. अभ्यासक्रमाच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रीत करणे विधी सेवांची सध्याची मागणी, सक्षम शिक्षकांची भरती करणे, संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे, राज्याला आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करून आर्थिक मदत करणे, विशेषतः उत्तम प्रतीचे ग्रंथालय उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. विधी शिक्षणासंदर्भात राष्ट्रीय धोरणाची पूर्तता करण्यासाठी राष्ट्रीय ज्ञान आयोगाने म्हटले आहे की, विधी ग्रंथालयाचे संसाधने, सेवा आणि कार्यक्षमतेचे बारकाईने परीक्षण करणे आवश्यक आहे. कारण विधी ग्रंथालय विधी व्यवसाय/शिक्षणाचा कणा आहे.”

विधी विद्यार्थ्यांनी छापील आणि इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही प्रकारच्या वाचन साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे. विशेषतः या विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्याचा प्रभावी वापर करावा यासाठी विधी ग्रंथपालांना प्रशिक्षक आणि संसाधने उपलब्ध करणारा अशी दोन्ही कार्ये करावी लागतात. ग्रंथालय संसाधनाचा वापर, कार्यक्षमता आणि गुणवत्ता अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता आहे. शैक्षणिक कायदे, ग्रंथालय प्रणालीची कार्यक्षमता, परिणामकारकता आणि उपभोक्ता समाधान सुधारण्याच्या पद्धती शोधण्याची आवश्यकता आहे. वरील बाबींबरोबरच खालील बाबींचे मूल्यांकन करण्यासाठी विधी विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे.

- उपभोक्त्यांच्या माहितीच्या गरजा, त्यांचा ग्रंथालयाकडूनच्या अपेक्षा, त्यांचा माहितीविषयक दृष्टिकोन त्यांचा माहिती साधनांमधील प्राधान्यक्रम.
- उपभोक्त्यांची माहिती शोध साधने, त्यांचा या साधनांचा प्राधान्यक्रम आणि उपभोक्ते विशिष्ट माहिती साधने व माहिती शोध साधने का वापरतात किंवा का वापरत नाहीत याचा अभ्यास करणे.

देशभरातील विद्यापीठांनी उच्च शिक्षण शिकविण्यास सुरुवात केली. त्यांच्याशी संबंधित विधी विभागाद्वारे राष्ट्रीय विधी विभाग स्थापन करण्यात आले आणि 1987 मध्ये बंगलोर येथे नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया विद्यापीठाची स्थापना झाली.

बार कॉन्सिल ऑफ इंडियाने (2016) च्या आपल्या परिपत्रकात विधी ग्रंथालयात अनिवार्य असणारी साधने व संसाधने नमूद केली आहेत. प्रस्तुत साधने, संसाधने यांचा उत्तम प्रकारे वापर करण्यासाठी सध्याच्या विद्यार्थ्यांच्या माहिती शोध, वापर, माहिती शोधवर्तन समस्या इत्यादींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## 1.5 संशोधनाची उद्दिष्टे :

कोणतेही संशोधन हे निश्चित अशा उद्दिष्टाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. यथार्थ उद्दिष्टांची नोंद केली असता संशोधनाची दिशा स्पष्ट होते.

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि माहिती शोध वर्तनांचा

अभ्यास करताना प्रस्तुत संशोधनाचा केंद्रबिंदू म्हणून खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत :

१) विधी विद्यार्थ्यांच्या माहितीविषयक गरजा जाणून घेणे.

२) या विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करणे.

३) सदर विद्यार्थ्यांना माहिती शोधण्यामध्ये येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

४) सदर अभ्यासाच्या निष्कर्षावर आधारित सूचना करणे.

## 1.6 संशोधनाची गृहीतके :

- अभ्यासलेल्या विधी ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह समृद्ध आहे.
- एलएल.बी. च्या अंतिम सत्रात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती शोधण्यामध्ये अडचणी येत नाहीत.

## 1.7 सदर संशोधनाची व्याप्ती :

संबंधित अभ्यासाची व्याप्ती खालील विधी ग्रंथालयापुरतीच मर्यादित आहे :

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणारी विधी महाविद्यालये.
- सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठांतर्गत येणारी विधी महाविद्यालये.
- भारती विद्यापीठ या अभिमत विद्यापीठांतर्गत येणारे विधी महाविद्यालय.

  वरील निर्देशित केलेल्या विद्यापीठांना संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयात पाच वर्षाचा एलएल.बी. अभ्यासक्रमास असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपुरताच हा अभ्यास आहे. पाचव्या वर्षी प्रवेश घेतलेल्या म्हणजेच अंतिम सत्र 9 व 10 ला प्रवेश घेतलेल्या विधी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासापुरतीच या अभ्यासाची व्याप्ती आहे.

## 1.8 मर्यादा :

प्रस्तुत अभ्यासामध्ये पदव्युत्तर (LLM) अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि तीन वर्षाचा अभ्यासक्रम (III year LLB) करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास सदर प्रबंधामध्ये करण्यात आला नाही. संबंधित महाविद्यालयांमध्ये डिप्लोमाचा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

## 1.9 संशोधन पद्धती :

संशोधनासाठी आवश्यक माहिती गोळा करण्यासाठी विविध पद्धती वापरल्या जातात. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. वर्णनात्मक संशोधन पद्धतीवरील पाहणी तंत्राचा माहिती संकलनासाठी वापर करण्यात आला आहे. पाहणी तंत्रात वापरल्या जाणाऱ्या प्रश्नावली या साधनाचा माहिती संकलनासाठी उपयोग केला आहे. मागील झालेल्या अभ्यासावर आधारित तसेच विधी क्षेत्रातील तज्ज्ञांशी सल्लामसलत करून प्रश्नावली तयार करण्यात आली. उपभोक्त्यांची निवड करण्यासाठी सेन्सस (census) पद्धतीचा वापर करण्यात आला. म्हणजेच पाच वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षातील म्हणजेच सत्र 9 आणि 10 मध्ये शिकणाऱ्या 24 विधी महाविद्यालयांतील (परिशिष्ट क्र.2 मध्ये विधी महाविद्यालयांची यादी जोडली आहे) 1681 विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली. त्यापैकी 1455 विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. म्हणजेच प्रतिसादाचे प्रमाण 86.55% आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक प्रश्नांची तर्कसंगत यादी करून ती विद्यार्थ्यांना वितरीत करून भरून घेण्यात आली. माहितीचे सादरीकरण व विश्लेषण करण्यासाठी सारणी आलेख तसेच सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे. माहितीचे विश्लेषण करीत असताना एस.पी.एस.एस. या सॉफ्टवेअरचा उपयोग करण्यात आला आहे. सदर संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे सविस्तर वर्णन खाली दिले आहे.

## 1.10 लक्ष्यगट :

सदर अभ्यासासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आणि भारती विद्यापीठ या अभिमत विद्यापीठामधील विधी महाविद्यालयाचा अभ्यास करण्यात आला. प्रस्तुत तीन विद्यापीठांना संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयांचा समावेश करण्यात आला, लक्ष्यगट फार मोठा असल्याने एलएल.बी. च्या 5 वर्षाचा अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षास असणाऱ्या तीनही विद्यापीठांतील विधी महाविद्यालयांतील उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रश्नावली देण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत एकूण 20 विधी महाविद्यालयांचा समावेश होतो. या सर्व महाविद्यालयांमध्ये पाचव्या वर्षाचा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण

संख्या 922 आहे. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाला संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयांची संख्या 3 आहे. सदर महाविद्यालयांमध्ये पाचव्या वर्षाचा अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 645 आहे.

भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाशी संलग्न असणारे न्यू लॉ कॉलेजचा समावेश करण्यात आला आहे. तेथील एलएल. बी. च्या पाचव्या वर्षाची एकूण विद्यार्थी संख्या 330 आहे. या सर्व विद्यापीठांतील विधी महाविद्यालयांची एकत्रित संख्या 24 आहे. सदर संशोधनासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी निवडलेल्या विधी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची हजेरीपटावरील एकूण संख्या 1897 होती. परीक्षेच्या कालावधीमध्ये माहितीचे संकलन केले असल्याकारणाने विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रश्नावलींना प्रतिसाद प्राप्त झाला. प्रत्यक्षात एकूण 1681 विद्यार्थी उपस्थित असल्याने त्यांना प्रश्नावलीचे वितरण करण्यात आले. त्यातील 1455 प्रश्नावलींना प्रतिसाद प्राप्त झाला. त्याची एकूण टक्केवारी 86.55% आहे.

## 1.11 माहिती संकलन :

माहिती संकलन प्रक्रिया ही संशोधनाच्या एकूण आयोजनातील एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. माहिती संकलन करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा आणि पाहणी या तंत्राचा वापर करण्यात आला. प्रश्नावली वैयक्तिकरित्या महाविद्यालयांना भेटी देऊन वितरित व संकलित करण्यात आल्या. सदर सर्वेक्षण प्रश्नावलीच्या माध्यमातून हाती घेण्यात आले आहे. प्रश्नावली तयार करीत असताना मुक्त व रचनात्मक असे दोन्ही स्वरूपातील प्रश्न अंतर्भूत केले जातील याची काळजी घेण्यात आली. अभ्यासकाने आपला हेतू साध्य करण्यासाठी बहुपर्यायी प्रश्न प्रश्नावलीत घेण्यात आले. बहुपर्यायी प्रश्नाची निवड केल्याने उत्तरदात्यांना प्रतिसाद देणे सोपे जाते व प्रतिसादाचा दर वाढतो.

## 1.12 प्रश्नावलीचे वितरण :

प्रश्नावलीचे वितरण करण्यासाठी संबंधित महाविद्यालयातील प्राचार्यांची पूर्वपरवानगी घेण्यात आली. महाविद्यालयातील वर्गामधून, ग्रंथालयातून, ग्रंथपाल वा प्राध्यापकांच्या माध्यमातून प्रश्नावलीचे वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांना जेथे प्रश्नावली भरणे शक्य होते तेथे त्यांच्या सोयीप्रमाणे भरून घेण्यात आल्या. अशा प्रकारे पूर्ण प्रतिसाद प्राप्त झालेल्या प्रश्नावली अवलोकनासाठी वापरण्यात आल्या.

## 1.13 पथदर्शक सर्वेक्षण (Pilot Survey ) :

सदर प्रकल्पाचा पथदर्शक अभ्यास संशोधकाने सहा महिने अगोदर केला. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाशी संलग्न विधी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना लक्ष करून पथदर्शक अभ्यास करण्यात आला. पथदर्शक अभ्यासाचा भाग म्हणून प्रश्नावली सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील विधी महाविद्यालयातील पुणे व नॉयडा या संस्थांतील विद्यार्थ्यांकडून पूर्वचाचणीसाठी अनुक्रमे 50 व 25 प्रश्नावली वितरित करण्यात आल्या. त्यासाठी पुढील उद्दिष्टे नियोजित करण्यात आली होती :

- माहितीच्या उपभोक्त्यांना प्रश्न सहजपणे समजतात की नाही, त्यांना प्रतिसाद देण्यासाठी कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते.
- प्रश्न संरचित, सोप्या भाषेत आणि शब्दरचना स्वयंस्पष्ट आहेत का?
- नमूद करण्यात आलेले प्रश्न अर्थपूर्ण आणि संबंधित आहेत का?

प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन केल्यानंतर काही प्रश्नांमध्ये त्यातील शब्द आणि शब्दरचनेमध्ये बदल करण्यात आले. जसे की, प्रश्नावली भरण्यास उपभोक्त्यांना अधिक वेळ द्यावा लागत असल्याने काही प्रश्नांचे एकत्रिकरण करण्यात आले. जसे की, प्रश्न क्र. 2, 3 मध्ये मुद्रित ग्रंथालय आणि ई–ग्रंथालयाबाबतचे प्रश्न एकत्रित केले. प्रश्न क्र. ८ मध्ये सेवांची माहिती आणि वापरांचे प्रश्न एकत्रित केले तसेच प्रश्न क्र. 17 मध्ये बदल करून दोन प्रश्नांचा एक प्रश्न करण्यात आला. प्रश्नावली भरण्यास उपभोक्त्यांना अधिक वेळ लागत असल्याने सदर प्रश्नांचे एकत्रिकरण करण्यात आले. त्याद्वारे प्रश्नावलीची लांबी कमी करण्यात आली. संरचित भाषेतील प्रश्नांबरोबर विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यास कमी वेळ लागावा या उद्देशाने अधिक बहुपर्यायी प्रश्न देण्यात आले. मूळ प्रश्नावलीतील एकूण 15 प्रश्नांमध्ये बदल करण्यात आले. पथदर्शक अभ्यासाद्वारे सुधारित प्रश्नावली तयार केली. या सुधारीत प्रश्नावलीद्वारे (परिशिष्ट क्र.1) सदर संशोधनासाठी माहिती संकलित केली आहे.

## 1.14 माहितीचे विश्लेषण :

संकलित करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण केले आहे. विश्लेषण करण्यासाठी एस.पी.एस.एस. (स्टॅटिस्टिकल पॅकेज फॉर सोशल साइंटिस्ट) सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला. प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाचे विश्लेषण हे संख्या व टक्केवारी याद्वारे करण्यात आले आहे. विश्लेषित माहिती तक्ते, आलेख याद्वारे सादर केली आहे. विश्लेषित माहितीचे तर्कशुद्ध असे अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

## 1.15 या संशोधनात वारंवार वापरलेल्या निवडक तांत्रिक संज्ञांचे स्पष्टीकरण

### 1.15.1 माहिती :

Uttor (1999) यांनी माहितीची व्याख्या नियोजन, निर्णय घेणे आणि कोणत्याही कार्यक्रमाचे मूल्यांकन यातील माहितीचे मूल्य अशी केली आहे. ते पुढे म्हणतात, निर्णय घेण्यास मदत करण्यासाठी डेटावर काही प्रक्रिया केल्या जातात. ज्या प्रक्रिया उपभोक्त्यांच्या शंकांची मग त्या ध्वनिमुद्रित, सारांशरूपातील किंवा साध्या गोळा केलेल्या असोत, त्या उत्तरे देण्यासाठी सक्षम असतात. ग्रंथ, नियतकालिके, सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील सर्व प्रकारचा दस्तऐवज, मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यासाठी प्रकाशित केलेला किंवा अप्रकाशित आणि प्रतिबंधित किंवा अप्रकाशित आणि प्रतिबंधित किंवा गोपनीय स्वरूपाचा संशोधन प्रबंधाचा निष्कर्ष जो सहकाऱ्यांना अहवाल ग्रंथातील लेख आणि प्रकाशित गोष्टींच्या रूपात उपलब्ध करून दिला जातो. या व्याख्येतून हे निदर्शनास येते की, व्यक्तीला जीवन जगण्यासाठी माहिती ही महत्त्वाची आहे. अभ्यासकाने असा निष्कर्ष काढला की, व्यक्तीला दैनंदिन कामासाठी माहितीची निकड असते. मग ती कामे राजकीय, सामाजिक, आर्थिक अथवा शैक्षणिक क्षेत्रातील असोत. Ingwersen (1995) यांनी माहितीची तयार करणाऱ्याच्या आकलनात्मक रचनेतील परिणामातील बदल आणि उलट प्रकारे माहिती म्हणजे अशी काहीतरी रचना जिचे आकलन झाल्यावर ग्राही व्यक्तीच्या ज्ञानाची स्थिती बदलू शकते. Eskola (1998). Dervin and Nilan (1986) यांच्या मते, माहिती म्हणजे मानवांनी तयार केलेले ज्याची गरज विद्यार्थ्यांना अभ्यासादरम्यान शिक्षणाच्या संदर्भात विषयांचा अर्थ तयार करताना लागते.

### 1.15.2 माहिती वर्तणूक :

संशोधकांनी माहिती वर्तणुकीसाठी वेगवेगळ्या व्याख्या दिलेल्या आहेत. काहींनी त्याची व्याख्या माहिती वर्तणूक या साधारण प्रतिकृतीवर Wilson (1997) विकसित केली आहे व त्याचा आधार घेतला आहे. तेथे त्यांनी मांडले की माहिती वर्तणूक या साधारण प्रतिकृतीत किमान तीन घटक असायलाच हवेत :

- माहितीची गरज आणि भाग पाडणारी कारणे म्हणजेच असे घटक ज्यामुळे व्यक्तींना माहितीची गरज भासली आहे असे वाटते.
- असे घटक जे गरज भासली आहे असे वाटत असताना व्यक्तीची प्रतिक्रिया ठरवितात.
- त्या प्रतिक्रियेतील प्रक्रिया किंवा कृत्ये.

Taylor (1991) यांच्या मते, माहिती म्हणजे वातावरणातील माहितीचा उपयोगातील एखाद्या घटकांचे उत्पादन होय. त्यांच्या मते हे घटक पुढीलप्रमाणे आहेत :

गृहीतके यापूर्वी शिकलेले किंवा अज्ञात कामाशी निगडित आणि जाणीव असलेल्या ठराविक लोकांनी बनविलेले, एखाद्या महत्त्वाच्या वाटणाऱ्या समस्येचा प्रकार आणि त्याचे स्वरूप जे या लोकांचे वैशिष्ट्य असते, एका वैशिष्ट्यपूर्ण वातावरणातील संधी आणि मर्यादा ज्यात अशा प्रकारच्या लोकांचा कोणताही गट किंवा उपगट आपापले कार्य करत असतो किंवा संचार करत असतो आणि जाणीव ठेवून किंवा जाणीव नसताना त्यामुळे समस्या सुटतील किंवा त्याला उत्तर आहे. अशी गृहीतके अगदी योग्य प्रकारे सांगावयाचे झाल्यास समस्येवरील निराकरण आणि अशी सर्व घटके जी माहितीला त्या संदर्भात उपयोगी आणि महत्त्वपूर्ण बनवितात. या व्याख्येचा आधार घेऊन त्यांनी असा निष्कर्ष काढला की, वेगवेगळ्या लोकांच्या गटांची माहितीमुळे वर्तणूक वेगवेगळी असते. Thorsteindottir (2001) यांनी माहिती वर्तणूक या विषयाशी संबंधित वेगळी संकल्पना पुढे मांडली, त्यांनी म्हटले आहे की, माहिती वर्तणूक ही एक गुंतागुंतीची संकल्पना आहे, ज्यामुळे माहितीमुळे वर्तणूक ही संकल्पना अतिशय किचकट बनते.

### 1.15.3 माहितीची गरज :

यात माहितीचे शास्त्र समजावे लागेल. माहिती उपलब्ध नसलेल्या एखाद्या बाबीची

अस्पष्ट माहिती करून घेणे आणि या प्रकारे माहितीचा शोध घेऊन अशी माहिती शोधून काढणे ज्यामुळे विषय समजण्यात आणि त्याचा अर्थ लावण्यात मदत होत असा प्रवास Kuhlthau (1993) ही एक ज्ञानाची विचित्र स्थिती होय. Belkin, Brooks and Oddy (1982) किंवा हे एखाद्या व्यक्तीच्या विशिष्ट स्थितीत तारतम्याने निर्णय घेण्याच्या वेळी उपयोगी असलेल्या ज्ञानातील तफावत होय Dervin and Nilan (1986) कोणत्याही व्यक्तीला माहितीची गरज भासण्यासाठी त्यामागे काहीतरी हेतू असणे आवश्यक असते Willson (1997).

### 1.15.4 माहितीचा शोध :

माहितीचा शोध म्हणजे अशी प्रक्रिया की ज्यामध्ये माहितीचा शोध घेणाऱ्यांची गरज असते. किंवा त्यांना 'व्यक्तिगत माहिती रचना' असेही संबोधित करू शकतो, जसे एखाद्या व्यक्तीची आकलनक्षमता, तिचे किंवा त्याचे ज्ञान, एखाद्या समस्येबाबत किंवा कार्यध्येयाबाबत कौशल्ये, माहिती प्रणालीबाबतचे ज्ञान आणि कसब आणि माहितीचा शोध घेण्यासाठी लागणारे ज्ञान आणि कौशल्य होय. माहितीचा उपयोग ज्यामुळे गरज भागल्याचे समाधान मिळते असा एखादा संदेश ओळखण्यात होतो. Wright and Guy (1997) यांच्यानुसार भासलेली गरज भागविण्यासाठी हा कार्यक्रम प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे राबविला जात असतो. lkoja-odongo (2002) Andersen (2000) यांनी माहितीचा शोध यावर संशोधनात व्यक्तींना गरज भासत असलेले साहित्य ते कसे शोधतात यावर एक वेगळा विचार मांडला आहे.

### 1.15.5 माहिती शोध वर्तणूक :

व्यक्तिगत उपयोगासाठी, ज्ञानवृद्धीसाठी आणि विकासासाठी प्रत्येक व्यक्ती ज्याप्रकारे माहिती संकलित करते आणि तिचा छडा लावतो त्या प्रकाराला माहिती शोध वर्तणूक असे संबोधित केले जाऊ शकते. Faire-Wessels (1990) Kakai et al. (2004) यांनी या प्रकाराला माहिती कशी शोधतात व त्याचा कसा उपभोग घेतात असे संबोधिले आहे. Kakai et al. (2004) यांच्या असे निदर्शनास आले की, बहुतांश वेळी विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तणुकीत प्रत्यक्ष आणि हेतूपूर्वक माहिती असते कारण त्यांना अभ्यासक्रमातील स्वाध्याय परीक्षेत स्पर्धा करावयाची असते, सेमिनार–चर्चासत्रे–व्याख्याने किंवा वर्गातील गप्पागोष्टी यासाठी तयारी

करावी लागते किंवा अंतिम वर्षात शोध प्रकल्प लिहावा लागतो. Fister (1992) यांच्या मते, स्नातकपूर्व विद्यार्थी तरबेज असतात. परंतु संशोधनाची प्रक्रिया त्यांना जाचक वाटते. Fister यांनी स्पष्ट केले आहे की, हे विद्यार्थी मूलभूत माहिती शोध कौशल्ये शिकत नाहीत. आणि ते संशोधनासाठी काहीतरी कसेतरी या तत्त्वावरील पद्धती उपयोगात आणतात. त्यामुळे त्यांच्या माहितीविषयक गरजा भागविण्यासाठी कर्तृत्व उपयोगी पडत नाही. Wilson (1996) यांच्या प्रतिकृतीत असे नमूद केले आहे की, माहिती शोध प्रक्रियेत काही समस्या निर्माण होतात. Taylor (1990) यांनीसुद्धा नमूद केले आहे की, माहिती साधनांशी सुसंवाद साधल्यानंतर उपभोक्त्याला कोणती माहिती हवी आहे आणि प्रत्यक्षात उपलब्ध असलेली माहिती यांचा ताळमेळ लागत नाही. याला कारण माहिती शोध प्रक्रियेत काही उणीवा असू शकतात. जसे, उपभोक्त्याला स्वतःला कोणती माहिती हवी आहे याबाबत जाणीव नसणे, संग्रहाची कमतरता अशा अनेक समस्यांमुळे स्नातकपूर्व विद्यार्थ्यांना माहितीचा शोध घेताना अडचणी येऊ शकतात. Mellon (1986) यांनी असे मत मांडले आहे. उपभोक्त्यांचा ग्रंथालयाबाबतचा समज आणि त्यातील उपक्रम यांचा समावेश असेल.

## 1.16 प्रकरणांची रूपरेषा :

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करताना संशोधनाच्या संकलित माहितीचे उद्दिष्टपूर्तीनुसार सादरीकरण करण्यासाठी सदर संशोधन अहवालाची पाच प्रकरणांत विभागणी केली आहे. त्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे आहें :

**प्रकरण पहिले :**

सदर प्रकरणात प्रथमतः प्रस्तावना देण्यात आली आहे. माहिती साधनाच्या विकासामुळे वेगवेगळ्या लोकांमध्ये माहितीची गरज आणि वर्तन यात तत्सम वृद्धी आणि फरक झालेला विशद केलेला आहे. संशोधनाची समस्या प्रस्तुत करून त्याची गरज व आवश्यकता नमूद केली आहे. संशोधनाची उद्दिष्टे ही व्यापक स्वरूपाची असून संशोधनातून ठोस निष्कर्षापर्यंत जाण्यासाठी उपयोगी असणारी अशी ठेवली आहेत. संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, गृहितके, वापरण्यात आलेली

संशोधन पद्धती यात समाविष्ट करण्यात आली आहेत. सदर प्रकल्पामध्ये वेळोवेळी वापरण्यात येणाऱ्या माहिती संज्ञांची थोडक्यात ओळख करण्यात आली आहे.

**प्रकरण दुसरे :**

सदर प्रकरणात स्वातंत्र्यपूर्वीचे, ब्रिटिशकालीन आणि स्वातंत्र्यानंतरचे विधी शिक्षण यावर प्रकर्षाने प्रकाश टाकण्यात आला आहे. विधी शिक्षणाची सद्यस्थिती व ते सुधारण्यासाठीचे आयोग याबाबतचे विवेचन या प्रकरणात केले आहे. विधी ग्रंथालयांचे प्रकार, विधी ग्रंथालयांची विशेष माहिती साधने, विधी ग्रंथालयांचे आधुनिकीकरण, विधी ग्रंथपालांची भूमिका व ग्रंथालयाचे भवितव्य या संदर्भातही सदर प्रकरणात चर्चा केली आहे. माहिती शोध वर्तनाच्या निवडक प्रतिकृतींची ओळख प्रस्तुत प्रकरणात करण्यात आली आहे.

**प्रकरण तिसरे :**

यामध्ये संशोधकाने संशोधनाला बळकटी देण्यासाठी संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यास शोध निबंध संशोधन साहित्याचा अंतर्भाव सदर प्रकरणात करण्यात आला आहे. संदर्भ ग्रंथ, नियतकालिकांमधील संशोधनपर लेख, संबंधित विषयातील पीएच.डी. प्रबंध, परिषदांचे अहवाल. इत्यादी विषयावर (Thematic) आढावा या प्रकरणात सादर केला आहे.

**प्रकरण चौथे**

संकलित माहितीचे तपशीलवार विश्लेषण व अर्थनिर्वचन सदर प्रकरणात सादर करण्यात आले आहे. त्यासाठी तक्ता, आलेख (बार चार्ट, पाय चार्ट) यांच्या साहाय्याने माहितीचे सादरीकरण करण्यात आले आहे.

**प्रकरण पाचवे :**

सदर प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहेत. त्यावर आधारित शिफारशी या प्रकरणात देण्यात आल्या आहेत. तसेच पुढील संशोधनाच्या दिशा सुनिश्चित केल्या आहेत.

## 1.17 सारांश :

विधी विद्यार्थी त्यांच्या माहितीच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी माहिती कशी शोधतात, माहिती शोधण्यामध्ये त्यांना काय अडचणी येतात हे सदर संशोधनात अभ्यासले आहे. ग्रंथपालाच्या भूमिकेत कालानुरूप बदल झाला आहे. अनेक संशोधकांनी, मान्यवरांनी माहितीला दिलेले अनन्यसाधारण महत्त्व याचा आढावा घेण्यात आला आहे. संशोधन करण्यास कारणीभूत असणारी समस्या, गरज, उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती यात नमूद केल्या आहेत. माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करताना ज्या संज्ञा वारंवार प्रकल्पामध्ये वापरल्या आहेत याचा थोडक्यात गोषवारा देण्यात आला आहे. प्रस्तुत केलेल्या संशोधन अभ्यासाची कार्यप्रणाली या प्रकरणात स्पष्ट केली आहे.

## संदर्भ सूची :


1. Bar Council of India Circular 1 dated 2016. Ref : LE : Circular No : 1/2016. Retrieved from http://www.barcouncilofindia.org/wp-content/uploads/2010/05/LE-Circular-No.-1-of-2016-dated-17.2.2016-1.pdf

2. Belkin, N. J., Oddy, R. and Brooks. (1982). Ask for Information Retrieval: Part 1, Background and Theory. *Journal of Documentation, 38*(2), 61-71. Retrieved from http://surface.syr.edu/cgi/viewcontent.cgi?article=1150&context=istpub

3. Bowman, B. J. (2008). Researching across the Curriculum: The road must continue beyond the First Year. *Oklahoma Law Review ,61*(3), 503-559. Retrieved from http://digitalcommons.law.ou.edu/cgi/viewcontent.cgi?article=1178&context=olr

4. Callister. P. D. (2003). Beyond Training: Law Librarianship's Quest for the Pedagogy of Legal Research Education. *Law Library Journal, 95*(1), 7-45. Retrieved from https://mospace.umsystem.edu/xmlui/bitstream/handle/10355/9050/CallisterBeyTraLaw.pdf?sequence=1

5. Dervin, B. and Nilan, M. (1986). Information needs and users. *Annual Review of information Science and technology, 21,* 3-33. Retrieved from http://tefkos.comminfo.rutgers.edu/Courses/612/Articles/zennezdervinnilan86arist.pdf

6. Eskola, E. L. (1998). University Students; information seeking in a changing learning environment – How are students, information needs, seeking and use affected by new Teaching methods? *Information Research, 4*(2). Retrieved from http://www.informationr.net/ir/4-2/isic/eeskola.html

7. Fairer - Wessels, F. A. (1990). Basic community information needs of urban black women in Mamelodi, Pretoria, South Africa, South African. *Journal of Library and Information Science*, *58*(4). Retrieved from http://www.africabib.org/rec.php?RID=W00074084

8. Fister, B. (1992). The research process of undergraduate students. *Journal of Academic Librarianship*, *18*(3), 163-169. Retrieved from http://homepages.gac.edu/~fister/JAL1992.html

9. Ingwersen, P. (1995). Information and information science. In A. Kent (Ed.), *Encyclopedia of Library and Information Science* (Vol. 56, pp. 137-174), New York : Marcel Dekker Inc.

10. Jones, J. M. (2009). Not just key numbers and keywords anymore: How users interface design affects legal research. *Law Library Journal*, *101* (1), 7-30. Retrieved from http://scholarship.law.cornell.edu/cgi/viewcontent.cgi?article=1120&context=lsrp_papers

11. Kajogbola, D. O. (2004). The Impact of information Technology on the Negerian Economy: A study of Manufacturing and Services Sectors in The South Western and South Eastern Zones of Nigeria. Nairobi, Kenya. *African Technology Policy Studies Network*, Retrieved from http://atpsnet.org/wp-content/uploads/2017/05/working_paper_series_39.pdf

12. Kakai, J.M., Ikoja – Odongo, R. and Kigongo – Bukeny, I. M. N. (2004). A study of the informatioin seeking behaviour of undergraduate students of Makerere University, Uganda. *World Libraries*, *14*(1), 544-564. Retrieved from https://www.google.co.in/url?sa=t&rct=j&q=&esrc=s&source=web&cd=1&ved=0ahUKEwjWp4-hi8XVAhUDro8KHbOQBUoQFggnMAA&url=http%3A%2F%2Fwww.dspace.mak.ac.ug%2Fbitstream%2Fhandle%2F10570%2F5499%2Fkakai-infoseeking-Uganda.pdf%3Fsequence%3D1&usg=AFQjCNHO5CPH-SuUBYzVaCKyTJh11MmJXA

13. Kyrillidou, M. and Bland, L. (2008). *Association of Research Libraries Statistics.* Washington, dc. pp. 152. Retrieved from http://files.eric.ed.gov/fulltext/ED507072.pdf

14. Kuhlthau, C.C. (1993). A principle of Uncertainty for information seeking. *Journal of Documentation*, *49*(4), 339-355. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/eb026918

15. Mellon, C. A. (1986). Library anxiety: A grounded theory and its development. *College and Research Libraries, 47*(2), 160 – 165 Retrieved from http://crl.acrl.org/index.php/crl/article/viewFile/14195/15641

16. Ndukwe, E. C. A. (2004). Information and communication technology science and Medicine in the 21st century Nigeria. A paper delivered at a *landmark public lecture event* held by the College of Medicine University of Nigeria. Retrieved from http://www.ncc.gov.ng/archived/speeches/ICT%20Science%20and%20Medicine%20in%20the%2021st%20Century%20Nigeria.pdf

17. Obasanjo, O. N. (2005). Speech at world summit of the information society 16th November, *Press Release* Tunis, Tunisia. Retrieved from http://www.itu.int/net/wsis/tunis/newsroom/highlights/16nov.html

18. Singh, K. P. and Satija, M. (2008). Information seeking strategies of Agricultural scientists working in the ICAR instituations in India. *DESIDOC journal of Library and information Technology*, 28(3), 37-45. Retrieved from http://publications.drdo.gov.in/ojs/index.php/djlit/article/view/175

19. Taylor, R. S. (1991). Information use environment, In B. Dervin (Ed.) *Progress in Communication Sciences, 10,* 217-225, NJ: Ablex, Norwood, Retrieved from http://hib510week9.pbworks.com/w/page/36541079/Taylor%20-%20Information%20Use%20Environments

20. Taylor, D. C. (1990). Undergraduates use of periodicals: implication for libraries reference work. *Reference librarian,* 27/28, 51-65. Retrieved from http://www.tandfonline.com/doi/abs/10.1300/J120v12n27_05

21. Thorsteindottir, G. (2001). Information seeking behavior of distance learning student's. *Information Research, 6*(2). Retrieved from http://www.informationr.net/ir/6-2/ws7.html

22. Uttor, J. (1999). The Role of Law Libraries in a democratic culture. *A paper presented in the 1999 NLA National Conference and AGM*. Aug. 15th- 20th 1999.

23. Wilson, T. D. (2000). Human information behavior. *Informing science*, *3*(2), 49-56. Retrieved from https://pdfs.semanticscholar.org/f393/bbfdac03c71f567887513c0e2687df8cd412.pdf

24. Wilson, T. D. (1997). Information behavior: An interdisciplinary perspective. *Information Processing and Management, 33*(4). 551 – 572. Retrieved from http://www.informationr.net/tdw/publ/papers/1997IP&M.pdf

25. Woxland, T. A. (1989). Why can't Johnny research? Or it all started with Christopher Columbus Longdell. *Law Library Journal 81,* 451- 461. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj81&div=45&g_sent=1&collection=journals

26. Wright, M. and Guy, L. (1997). Where do I find it and what do i do with it; Practical problem solving in the data library. Retrieved from http://dphs.dacc.wisc.edu/types/data_reference.html

# प्रकरण दुसरे

# विधी शिक्षण, विधी ग्रंथालये आणि माहिती शोध वर्तन एक दृष्टिक्षेप

## 2.1 विधी शिक्षण

**2.1.1 प्रस्तावना** :

शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या, समूहाच्या व राष्ट्राच्या विकासास मदत होते. त्यामुळे समाजाच्या विकासास मदत होते. विधी शिक्षणामुळे मनुष्याला कायद्याचे पालन करण्याचे शहाणपण येते.

विधी शिक्षण हे मूलत: बहुउद्देशीय शिक्षण आहे हे शिस्तबद्ध शिक्षण आहे. या शिक्षणाला बळकटी देण्यासाठी मानवी संसाधने विकसित करणे आवश्यक आहे. या शिक्षणातून सक्षम वकिलाचा विकास होईल आणि त्याच्याद्वारे सामाजिक व राष्ट्रीय विकास होईल. Kulashreshtha (2002) विधी शिक्षणाला प्राधान्य देणे हे नेहमीच सर्वोत्कृष्ट व्यवसाय म्हणून मानले गेले आहे. सामान्य शिक्षणाचा एक भाग म्हणून विधी शिक्षणाकडे वेगळे पाहता येणार नाही. आज विधी शिक्षणामुळे समाजाची राजकीय व आर्थिकदृष्ठ्या प्रगती होण्यासाठी प्रेरणा मिळते. आज विधी शिक्षण विधी महाविद्यालयांमध्ये व अनेक विकसित विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहे. Singh (1999) भारतामध्ये 1999 मध्ये लिगल एज्युकेशन इंडिया नावाची एक परिषद आयोजित केली होती. ती परिषद ऑल इंडिया लॉ टीचर्स काँग्रेसद्वारे आयोजित केली होती. त्यामध्ये 21 व्या शतकातील समस्या आणि संभाव्यता यावर चर्चा झाली.

**2.1.2 कायदा (Law) :**

विधी ग्रंथालयातील उपभोक्त्याच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करताना कायदा म्हणजे काय? हे पाहणे आवश्यक आहे. सर्वसामान्यपणे कायदा म्हणजे काय तर समुदायाने किंवा देशाद्वारे लागू केलेले नियम म्हणजे कायदा होय. हे नियम अधिनियमित केलेले असतात. ही एक प्रणाली आहे. कायदा एक मजकूर आधारित शिस्त आहे.

**कायद्याच्या व्याख्या :**

Maxwell and Schafer (2008) यांच्या मते, विधी क्षेत्रात जगामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात पाठ्याधारित स्रोत आहेत.

Sing (2011) यांनी कायदेसंदर्भात स्पष्ट केले की, सर्व नियमांची रचना यात करताना आणि एखाद्या विशिष्ट समुदायाच्या राज्यातील किंवा इतर गटांद्वारे अधिकार, कायदे याची अंमलबजावणी केली जाते.

Garner and Black in Blacks Law Dictionary (2004) यांनी कायद्याला परिगणित केले आहे. तिची न्यायालये मतभेद सोडविण्यासाठी न्यायालयीन पूर्वनियोजित विधीविषयक तत्त्वे, नियम आणि सिद्धांताचा वापर करतात.

Farlex Free Dictionary (2014) – सामान्य कायदे म्हणजे न्यायाधीशांकडून न्यायालयाद्वारा ते निर्मित केले जातात. दीर्घ कालावधीत न्यायाधीशांनी तयार केलेले ते नियम आहेत.

### 2.1.3 विधी शिक्षणाची गरज :

विधी ज्ञानाची गरज ही संविधानिक संदर्भात जरूरी ठरते. देशातील प्रत्येक नागरिक मग तो श्रीमंत असो अथवा गरीब, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा मानकरी ठरतो. अर्थातच कायद्याचे उल्लंघन न करणे व दुसऱ्या व्यक्तीच्या विधीविषयक अधिकारांची जाणीव ठेवणे हे त्याचे कर्तव्य ठरते. परंतु अशा परिस्थितीत, धार्मिक अंधश्रद्धा, गुलामगिरीची मानसिकता यांचा पगडा भारतीय समाजमनावरून अजून दूर न झाल्यामुळे, जनता संविधानात नमूद अधिकाराचा फायदा स्वतःसाठी व समाजासाठी करून घेऊ शकत नाही. भारतीय लोकशाहीची न्यायसंस्था हा एक मोठा आधारस्तंभ आहे. परंतु जनतेचा त्यावरील विश्वास हळूहळू कमी होत आहे. याच कारणांसाठी विधी शिक्षण अत्यंत जरूरी वाटते. न्यायव्यवस्था व तिची कार्यप्रणाली याचे ज्ञान लोकांना असणे आज काळाची गरज झालेली आहे. न्यायसंस्थेशी निगडित अव्यवस्थेची जाणीव लोकांना करून देणे आज आवश्यक झालेले आहे. जिल्हा बार असोसिएशन या कामात मदत करीत आहे.

इंग्रजी साम्राज्याने न्यायव्यवस्थेची बांधणी त्यांचे साम्राज्य मजबूत करण्यासाठी केली होती. त्यात स्थानिक भारतीयांना न्याय देण्याची भूमिका नव्हती. इंग्रजांनी याच न्यायप्रणालीमार्फत देशभक्तांना देशद्रोही ठरवून तुरूंगात डांबले. असाच काहीसा अनुभव थोड्याफार फरकाने स्वातंत्र्यानंतरही आणीबाणीच्या काळात आला. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर झेंडा बदलला, राष्ट्रगीत बदलले पण न्यायव्यवस्था मात्र बदलली नाही. तिचे हवे तसे स्वदेशीकरण झाले नाही. आजही आपण इंग्रजांच्या कायद्यांच्या धर्तीवरच वाटचाल करीत आहोत.

**2.1.4 विधी शिक्षणाचा इतिहास :**

भारतात कायद्याची पाळेमुळे पुरातन रुढींवर आधारित आहेत. आर्यन संस्कृतीपासून ती अस्तित्वात आहेत. विधी शिक्षणाच्या प्रारंभाबद्दल विविध मते आहेत. मनू हा वकिलाला संबोधताना विप्र (ब्राह्मण) म्हणतो (Manu VIII 169). परंतु हे अशक्य असू शकते कारण विप्र हा सभ्य (Jury) च्या सदस्यालासुध्दा संबोधले असू शकते. Kane (1984) नमूद करतात, त्याला मानधन देऊन एखाद्या पक्षाचे प्रतिनिधित्व करण्याचे काम सोपविले गेले असेल त्यासाठी त्याला मानधन मिळत असे.

Jayswal (2011) यांच्या मते, भारतात मनुस्मृतीच्या काळापासून व्यावसायिक वकील अस्तित्वात होते. Kane मात्र Jayswal यांच्या मताशी सहमत नाहीत. त्यांच्या मते, असे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत, ज्याने हे सिद्ध होईल की भारतात तेव्हा व्यावसायिक वकील होते. ते नमूद करतात की, त्या काळी राजाच्या दरबारात लोकांचे प्रतिनिधित्व करणारे विधीतज्ज्ञ असू शकतात. परंतु राजावर त्यांचे मत बंधनकारक नव्हते. धर्मशास्त्रात व विधी पद्धतीत निपुण असलेलेच प्रतिनिधित्व करू शकत होते. या पात्रता नसलेल्यास व तरीही पैसे घेणाऱ्यास राजा शिक्षापात्र मानून शिक्षा देत असे.

इंग्रजांच्या काळात जेव्हा त्यांनी प्रगत नवीन विधी प्रणालीची सुरुवात करण्याचा घाट घातला तेव्हा भारतीय विद्वानांनी भारताची पुरातन विधी प्रणाली खूप प्रगल्भ व प्रगत होती असा दावा केला. इंग्रज सरकारने विधी शिक्षणाला सहमती दिली व Bhavani (1962) एलफिन्स्टन विधी महाविद्यालय मुंबईत 1866 साली स्थापन झाले व बॉम्बे विद्यापीठ 1956 मध्ये अस्तित्वात

आले. एलफिन्स्टन विधी महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाला संलग्न आहे. Ludo (1986) पूर्वी धर्मशास्त्राच्या काळात विधी विद्वान नसावेत. त्या काळी भारतात ऋषी असले पाहिजेत, जे वैदिक शास्त्रात निपुण होते. त्याचा भार वैदिक संहितेवर व तत्संबंधी ग्रंथ, पुराणे, जसे– ब्राह्मणा (Brahmana), आरण्यका (Aranyaka), उपनिषद (Upanishad), स्तोत्रसूत्र (Stotrsutra), गृह्यसूत्र (Grhyasutra), धर्मसूत्र (Dharmgsutra) यावर होता. तेव्हा धर्मशास्त्र व विधी तज्ज्ञ नव्हते, पण परिस्थिती बदलली. धर्मांवरील पुस्तके वैदिक शाळेच्या पगड्यातून वेगळी झाली. काही धर्मपंडित धर्मशास्त्रावर भर देऊ लागले.

Schmittneener (1986) भारतात जेव्हा पहिले ब्रिटिश कोर्ट मुंबईत 1672 साली Governor Gerald Angier ने स्थापन केले तेव्हा व्यावसायिक अस्तित्वात होते असे पुरावे आढळतात. गव्हर्नरने ॲटर्नी जनरल म्हणून जॉर्ज विल्कॉक्सला नेमले. त्यांना कायद्याचे उत्तम ज्ञान होते.

Hindu Law जो पश्चिमेला 18 व्या शतकात अवगत झाला तेव्हा जरी आजच्यासारखे विधी शिक्षण नव्हते तरीही ते ब्राह्मिक (Brahmic) पद्धतीत उपलब्ध होते. त्या काळी विधी शिक्षणाचे महत्त्व हे केवळ विधी कार्यवाहीचे ज्ञान असणाऱ्याला दावा चालविण्याची परवानगी होती व तो वादी–प्रतिवादीची केस मांडू शकत होता इथपर्यंत होते. प्राचीन राजे धर्मशास्त्राच्या आधारे राज्य करीत व कायदा करीत. ब्रिटिश राज्य भारतात येईपर्यंत मनु, याज्ञवल्क्य (Manu, Yajna Volkya) व इतर ह्यांनी केलेल्या कायद्याचे पालन केले जाई.

Koul (1999), "21 व्या शतकात भारतीय विधी शिक्षणामधील समस्या आणि भविष्यातील संभावना" या विषयावर अखिल भारतीय विधी शिक्षक कॉँग्रेसतर्फे एक परिषद 1999 मध्ये आयोजित करण्यात आली होती. संपादकीय समितीने असे मत व्यक्त केले की, आज 84 विद्यापीठे विधी शाखेत पदवी प्रदान करत आहेत. सुमारे 913 विधी महाविद्यालये देशात आहेत आणि प्रत्येक वर्षी तीन लाख विधी स्नातक विधी पदवीधर होतात. भारत हा जगामध्ये वकील लोकसंख्येत अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकांवर आहे व तरीही भारतीय लोकांच्या विधीविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशा संख्येने वकील नाहीत असे मानले जाते.

### 2.1.5 ब्रिटिश काळात विधी शिक्षण :

वकिली व्यवसायाची प्राचीन भारतात प्रचलित अभिरूची होते, प्रथम ब्रिटिश न्यायालय हे राज्यपाल जेराल्ड अंगियरकडून 1662 साली बॉम्बेमध्ये स्थापन करण्यात आल्याने Gupta (2000) वकिली व्यवसायाच्या तरतुदी तेव्हा विधी प्रणालीचा त्यांच्यावर परिणाम होता. Britisher courts of Records, मद्रास, बॉम्बे आणि कलकत्ता ते राजे जॉर्जच्या सनदेने 24 सप्टेंबर 1726 रोजी सुरू झालेले Qyer court Terminer and Goal Delivery या गोष्टीवर प्रकाश टाकतात. की, वकील पक्षकारांचे प्रतिनिधत्व कोर्टात करीत होते व पक्षकारांना विधीविषयक सल्ला देत होते. वकिली व्यवसायही 1773 मध्ये जोमात होता. जेव्हा सनद व पेटंट पत्राने रेग्युलेटिंग ॲक्ट अस्तित्वात आला. सर्वोच्च न्यायालय फोर्ट विल्यम, बंगालमध्ये 26 मार्च 1774 ला स्थापन झाले. त्यात तरतुदी घालण्यात आल्या. ज्याचे नाव फोर्ट विल्यम, बंगालच्या रेकॉर्डवर असेल त्यांनाच न्यायालयात उपस्थित राहून कामकाज व वकिली व्यवसाय करण्याचा अधिकार व पक्षकारांतर्फे केस लढण्याचा अधिकार प्रदान केला जाऊन तो अधिकार निव्वळ काही विशेष कारणाशिवाय रद्द होणार नाही; या वकिलांशिवाय इतर कोणीही सर्वोच्च न्यायालयात लढू शकणार नाही, त्यांना पक्षकारांचे प्रतिनिधित्वसुद्धा करता येणार नाही अशी तरतूद होती

विधी प्रणालीच्या या विवेचनावरून असे दिसते की, वकील हे इंग्लिश अथवा आयरिश होते. भारतीय वकिलांना कोर्टात केस लढण्याची परवानगी नव्हती. जेव्हा बॉम्बे व मद्रासमध्ये उच्च न्यायालये स्थापित झाली व त्याच पद्धतीने वकिलांची नोंदणी केली तेव्हा व्यवसाय सुधारला.

ब्रिटिश रेकॉर्डप्रमाणे मोगल कोर्टात प्रतिनिधित्व करणारे वकील हे कंपनीच्या कोर्टात व्यवसाय करीत व त्यांना बंगाल रेग्युलेशन VII of 1693 या कायद्याने कंपनीच्या कोर्टात वकिली व्यवसाय करण्यास अधिकच प्रोत्साहन मिळाले. बंगाल रेग्युलेशनमुळे वकील व प्लीडर्सची दिवाणी कोर्टात नेमण्याची कारवाई सुरळीत झाली. बंगाल, बिहार व ओरिसामध्ये ही न्यायालये होती. Sudder Diwani Adalat ला प्लीडर्सची यादी तयार करणे व त्याच प्लीडर्सना कंपनी कोर्टात उभे राहण्याची परवानगी देणे हा अधिकार दिला गेला व मानधन देण्याचे मापदंड ठराविले गेले. मालमत्तेच्या मूल्यावर मानधन अवलंबून असे व त्याची टक्केवारी ठरलेली असे. फक्त हिंदू वा मुसलमान यांचीच प्लीडर म्हणून यादीत नोंद होत असे.

बंगाल रेग्युलेशन XII of 1833 मुळे तर वकिली व्यवसायात महत्त्वाची प्रगती झाली व वकिली व्यवसायाला प्रतिष्ठा लाभली. कोणीही आवश्यक शिक्षण पात्रता असल्यास Sudder Dewani Adalat मध्ये प्लीडर म्हणून नोंदीकृत होऊ लागला. त्यात जात, पात, धर्म, राष्ट्र याची बाधा राहिली नव्हती. पुढे लिगल प्रॅक्टिशनर ॲक्ट, 1846 मुळे तीन महत्त्वाचे बदल घडून आले.

1) प्लीडरला लागणारी शिक्षणपात्रता, चांगले चरित्र असणाऱ्या व Sudder courts नी दाखला दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्लीडर म्हणून काम करणे शक्य झाले होते.
2) भारतातील Majesty's courts मध्ये व्यवसाय करणाऱ्या सर्व ॲटर्नी व बॅरिस्टर्सना sudders court मध्ये त्या कोर्टाच्या नियमाप्रमाणे व भाषेप्रमाणे भाग घेता येत होता.
3) प्लीडर्सना आपल्या पक्षकारांशी फीसंबंधी करार करता येत होता.

या कायद्याचा परिणाम Madras code खाली काम करणाऱ्या वकिलांवर झाला नाही. द लिगल प्रॅक्टिशनर ॲक्ट, 1853 ने सर्वोच्च न्यायालयामध्ये काम करणाऱ्या ॲटर्नी व बॅरिस्टर्सना ईस्ट इंडिया कंपनी कोर्ट मध्ये त्यांच्या भाषेच्या नियमाप्रमाणे व इतर नियमांचे पालन करून प्लीडर म्हणून काम करण्याची परवानगी दिली गेली होती. प्लीडरना फक्त त्यांच्या पक्षकारांच्या सुनावणीव्यतिरिक्त कोर्टात हजेरी लावणे जरूरी नव्हते. थोडक्यात म्हणजे, ॲटर्नी व बॅरिस्टर्सना कंपनी कोर्टमध्ये व्यवसाय करणे शक्य झाले होते, तसेच भारतीय विधी व्यावसायिकांना सर्वोच्च न्यायालयामध्ये व्यवसाय करता येत होता. मात्र British Crown ने कंपनीकडून प्रशासन हाती घेतले व भारत सरकार कायदा, 1858 पारित झाला. भारतीय उच्च न्यायालय कायदा, 1862 हा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने पारित केला. त्या कायद्याप्रमाणे Superme courts, Sudhar Diwany व Sudder Nizamt Adalat च्या पेटंट पत्रानुसार उच्च न्यायालय स्थापन झाले. Clause of the letters Patent 1865 ने High Court in Calcutta मध्ये वकील व ॲटर्नीला मान्यता देऊन व नोंदणी करून पक्षकारांसाठी उच्च न्यायालयामध्ये त्यांच्या नियमानुसार काम करण्याची परवानगी दिली. पेटंट पत्रानुसार बॉम्बे व मद्रास उच्च न्यायालयालादेखील तसेच आदेश व अधिकार दिले गेले.

द लिगल प्रॅक्टिशनर ॲक्ट, 1879 काही प्रमाणात आजही प्रचलित आहे परंतु तो काही

श्रेणीच्या लोकांसाठीच होता. ॲडव्होकेट ॲक्ट, 1961 वकिली व्यवसायात काही सुधारणा व कायद्याचे एकत्रीकरण करण्याच्या उद्देशाने पास केला होता व काही राज्यातच लागू होता.

औपचारिक विधी शिक्षण पद्धती भारतात 1855 मध्ये अस्तित्वात आली. Markose (1986) पहिली Professorship of Law Government एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये 1855 साली सुरू झाली. विधी शिक्षण हे विधी प्रणालीला सहाय्यभूत किंवा पूरक मानले जात होते. ब्रिटिश कायदे हे इंग्लिशमध्ये असत. कोणीही भारतीय इंग्लिश शिकल्यास कायदा शिकू शकत होता व तो वकिली व्यवसाय करण्यास पात्र समजला जात होता. बॉम्बे व मद्रास ही विद्यापीठे विधी शिक्षणासाठी B.L. पदवी 1857 पासून प्रदान करू लागल्या. त्यावेळी कला महाविद्यालयांशी कायद्याचे वर्ग जोडलेले होते, ते त्याचा भाग होता. त्या काळात व्यवसायास लागणाऱ्या कौशल्यांची गरज नव्हती. जर एखाद्याची विधी व्यवसायात उच्च कामगिरी करण्याची इच्छा असल्यास तो इंग्लंडला जाऊन Inns court मध्ये दाखल होऊ शकत होता. परंतु त्यासाठी त्याची पैशाची ऐपत असणे आवश्यक होते. एका शतकापर्यंत 1857 ते 1957 पर्यंत विधी शिक्षण हे साचेबंद होते. आवश्यक विषय व्याख्यानांच्या माध्यमातून शिकविले जात. कोर्स दोन वर्षांचा असे. या काळातही उत्तर भारतातील विद्यापीठांनी काही पर्यायी विषय व प्रशिक्षणाचा (Tutorial) प्रयोग सुरू केला. 1958 पासून अनेक विद्यापीठांनी तीन वर्षाचा अभ्यासक्रम चालू केला. शासकीय विधी विद्यालय 1860 पासून मुंबई विद्यापीठांशी संलग्न आहे. त्याची स्थापना 1855 मध्ये झाली. आशिया खंडातील हे सर्वांत जुने विधी विद्यालय आहे. सरकारी विधी महाविद्यालयाला वारसाने लाभलेला व कायद्याचे वंशज मिळालेले विद्वतेचे भांडार आहे. या विधी महाविद्यालयाला डॉ. बी. आर. आंबेडकर, लोकमान्य टिळक, नानी पालखीवाला तसेच इतर मान्यवर यांना मार्गदर्शन करण्याचा बहुमान मिळाला आहे.

''मुंबई विद्यापीठाची स्थापना 1857 मध्ये लॉर्ड एलफिन्स्टन यांनी केली होती. त्यांचे कार्य म्हणजे कला, कायदा, औषध आणि अभियांत्रिकी क्षेत्रात परीक्षण आणि पदवी बहाल करणे हे आहे हंटर (1885). इ.स. 1923 मध्ये इंडियन लॉ सोसायटी (आय.एल.एस.) विधी महाविद्यालयाची स्थापना झाली. हे भारतातील पहिल्या दहा विधी महाविद्यालयांपैकी एक आहे.

4 मार्च 1923 मध्ये कायद्याच्या अनेक विद्वान लोकांच्या प्रयत्नांनी याची सुरुवात झाली. 1955 मध्ये स्थापना करण्यात आलेली महाविद्यालये भारतातील सर्वांत जुन्या विधी महाविद्यालयांमध्ये गणली जातात. 1929 मध्ये मद्रास विद्यापीठाचे एका आयोगाच्या शिफारशीवरून संस्थाची पाहणी करून सरकारने शैक्षणिक वर्ष 1931-32 पासून महाविद्यालयामधील अर्धवेळ अभ्यासक्रमाचे रूपांतर पूर्णवेळ अभ्यासक्रमात केले.

### 2.1.6 मुस्लीम काळातील विधी शिक्षण :

हिंदू राज्ये पूर्णतः नष्ट झाली आणि भारतामध्ये मुस्लीम सत्ता अधिक मजबूत झाली. मुस्लीम सामाजिक प्रणाली त्यांच्या इस्लाम धर्मावर अवलंबून आहे. इस्लाम न्यायतत्त्व शास्त्र व कायदा हा कुराणावर आधारित आहे. शरीया (Sharia) हा त्याचा स्रोत आहे. त्यामुळे तो अक्षय आहे. Qurn a Sunna ह्या दोघांमधून काढलेला कायदा आहे. Saran (1526 – 1656) न्यायतत्त्वावर वेगवेगळ्या शाखा ह्यानंतर आल्या, ज्यात भांडणे होती. मुसलमानी कायदाप्रणाली ही प्राचीन काळी कमी गुंतागुंतीची होती व शहरातच अवगत होती. औपचारिक मीमांसा व प्रत्यक्ष कृतीत फरक होता. बादशाह हा सर्वेसर्वा असे. त्याला न्यायदानाचे अमर्याद सामर्थ्य होते. तो सर्व समाजातील, समुदायातील भांडण, तंटे यांना न्याय देऊ शकत होता. परंतु ही औपचारिक मीमांसा होती. प्रत्यक्ष कृतीत त्याचे सामर्थ्य मर्यादित होते. कारण धार्मिक व सामुदायिक वादविवादात पक्षांना धार्मिक व सामुदायिक न्यायालयातून लढण्याची परवानगी होती.याव्यतिरिक्त खेडेगावातील पंचायतींमध्ये पूर्वीचे न्यायदानाचे कार्य पार पाडण्याची क्षमता होती व ती अबाधित होती. पंचायतीचा निर्णय मान्य नसल्यास सरकारी दरबारात अपील होऊ शकत होते. Calkins यांच्या मते, बहुतेक तंटे कोर्टाच्या बाहेरच मिटवले जात असत. मुगल साम्राज्याची सुरुवात 1526 मध्ये बाबर यांनी केली होती. जे ब्रिटिशांचे राज्य येईपर्यंत अंदाजे दोन शतकांपर्यंत होते.

इंग्रजांच्या विजयाच्या अगोदर मोगलकाळात जेव्हा इतर कोणत्याही काळापेक्षा प्रशासनकेंद्रीत होते तेव्हाही मोगल कायद्याची अंमलबजावणी क्वचितच खेडोपाडी पोहोचत असे. त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी होते व दळणवळणाची साधनेदेखील कमी होती व त्यामुळे खेडेगावी न्यायालय स्थापन करणे शक्य नव्हते.

Katju (1961) यांनी नमूद केले आहे की, त्यांचे न्यायालय मशिदीत भरत असे. जेथे गरीब श्रीमंत मोकळेपणे येऊ शकत होते. त्यांच्याकडे Katibs (साक्ष लिहिण्यासाठी) व अनुवादक (जर कोणत्या पक्षाची किंवा साक्षीदारांची भाषा त्याला अवगत असेल तर अनुवादक) जर वादीने लेखी दावा आणला नसेल तर काझी त्यांना Katib कडे पाठवून त्यांचे दस्तऐवजावर दिलेल्या पद्धतीने उतरवून घेऊन प्रतिवादीना समन्स देत असे. त्याच्या असे निदर्शनास आले की, मोगल व सल्तनत काळात वकील हे स्थानिक व अनौपचारिक न्यायालयात नेमले जात नव्हते.

Wilson (1963) यांनी वकिलाची व्याख्या अशी केली की, वकील हा दुसऱ्याच्या लढ्यात सहभागी होण्याचा अधिकारी आहे. त्याला मुखत्यार, प्रतिनिधी, राजदूत होता येत होते. मोगलकाळात मात्र वकील हा कायदे पंडित म्हणून नव्हता तर फक्त एक प्रतिनिधी मानला जात होता. त्याचे काम फक्त मालकासाठी समान स्तरावर अथवा उच्च स्तरावर बोलणी घडवून आणून हवा असलेला उद्देश साध्य करणे हा होता.

Mehta आणि Gupta (2000) म्हणतात, ''मोठे जमीनदार व परराष्ट्रीय व्यापारी कंपनी वकील नेमत. ज्याचे काम बादशाहच्या दरबारात हजेरी लावणे व महत्त्वाची माहिती काढणे आणि जरुर असल्यास मालकाच्या विरुद्ध काही वाद निर्माण झाल्यास त्याच्यासाठी लढणे हे होते.'' येथे लेखक असे नमूद करतात की, दोन्ही बाजू ऐकल्यावर केसचा तिथल्या तिथे निकाल देण्यासाठी बादशाह किंवा काझी हा कायदे पंडितांचा सल्ला घेत. तो सदैव हजर असे.

शेरशाहची न्यायालयीन सुधारणा ही इ.स. 1540 पासून 1555 पर्यंत होती. 1540 मध्ये शेरशाहनी मुगल सम्राट हुमायूनचा पराभव करुन भारतात सुरी राजवंशची स्थापना केली. या काळामध्ये लक्षणीय सुधारणा घडली. दिवाणी व फौजदारी प्रकरणासाठी स्वतंत्र न्यायालये सुरू करण्यात आली. प्रशासकीय सोयीसाठी काही गावांचा एक गट झाला. त्याला परगणा (Pargana) असे म्हणायचे. त्याचे नागरी न्यायाधीश, ज्याला मुन्सीफ म्हणतात हे शीर्षक आजपर्यंत टिकून आहे (अहमद 1941).

**2.1.7 विधी शिक्षण – समस्या व त्यांचा संबंध :**

भारतीय विधी पद्धती ही ब्रिटिश वारसा चालविणाऱ्या सामाजिक प्रणालीचा एक भाग आहे. भारत हे जगात मोठे लोकशाही राष्ट्र असल्याकारणाने विधी शिक्षणाची भूमिका व प्रगती महत्त्वाची आहे. विधी शिक्षणात चाळीस वर्षात आमूलाग्र बदल घडला आहे. विधी विद्यार्थ्यांना समाजात विविध भूमिका घेण्यास व विधीची विविध कार्ये करण्यास विधी शिक्षणाची मदत होते. विधी शिक्षणाचे कार्य हे वकिली व्यवसाय, विशेषज्ञ निर्माण करणे आहे, जेणेकरुन समाजाची प्रगती होईल व अंतिमतः पूर्ण राष्ट्राची प्रगती होईल.

वकिली व्यवसाय करणाऱ्यांमध्ये हे सामर्थ्य असणे आवश्यक आहे. जसे समस्यांचे विवेचन करुन, सामाजिक व अर्थशास्त्राला धरून व कायद्याचे नियंत्रण जाणून कौशल्याने संशोधनाची क्रिया करता येणे गरजेचे आहे. Pillai (2012) भविष्यात वकिली व्यवसाय करणाऱ्यांनी दक्षतेने राज्य व केंद्राने केलेल्या कायद्याचे निरीक्षण केले पाहिजे. भारतीय विधी शिक्षणाचे मूल्य केवळ उच्च श्रेणी मिळविणाऱ्या विधी पदवीधरांचे मूल्य अधिक वाढविण्यासाठी नसून विधीच्या सामान्य विद्यार्थ्यांचा दर्जा वाढवून त्यांच्यात बदल घडविण्यासाठी असावे. मग ते कोणत्या विधी विद्यालयातून पदवी घेतात ह्याचा विचार करू नये. बार कौन्सिल ऑफ इंडियाने प्रथम पर्वाच्या सुधारणेअंतर्गत नॅशनल लॉ स्कूल स्थापन केल्या. ह्या विद्यालयामध्ये जागतिक दर्जाचे कायद्याचे शिक्षण भारतातही सर्वांना परवडेल असे उपलब्ध आहे हे दाखवून दिले. दुसऱ्या पर्वातील सुधारणा तीन स्तंभावर आधारित असतील. विस्तृतपणा समाविष्ट करणारे व श्रेष्ठत्व मिळवून देणारे बदल घडवून आणेल असे प्रतिपादन Moily (2010) यांनी केले.

नवीन रूपात उपलब्ध असलेली भरपूर माहितीने विधी व्यावसायिकांच्या संशोधन प्रक्रियेत बदल घडविला आहे. आज माहिती तंत्रज्ञानाच्या आघातामुळे अनेक विधी ग्रंथालये आपले सामर्थ्य ई–साधने, ऑनलाइन डेटाबेस इत्यादीच्या समावेशाने वाढवत आहेत. गणन यंत्राक्षरे बोटाने बटण दाबताच मिळणारी माहिती ही संशोधकाला व ग्रंथपालांना नेटवर उपलब्ध करून विधी व्यावसायिकांना देता येईल. Pillai (२००२) world wide web (www) ने संशोधकांना विशेषतः विधी संशोधकांना अधिक सुसंधी मिळवून दिली आहे. नवीन विधी

व्यावसायिक पिढीस स्वतःच्या राष्ट्राच्या कायद्यांसोबत इतर देशांच्या कायद्यांचे उत्तम प्रतीचे ज्ञान आज आवश्यक आहे.

### 2.1.8 भारतातील विधी शिक्षण :

**प्राचीन भारतातील विधी शिक्षणाचा संक्षिप्त इतिहास :** प्राचीन भारतात कायद्याला धर्म असे संबोधले जायचे व चार वेदांना कायद्याचे स्त्रोत मानले जात होते. वेद पवित्र मानले जातात. विशेषतः ऋग्वेद (ऋगावेद) हे महत्त्वाचे स्त्रोत मानून हिंदू समाज व समाजातील मूल्य सांभाळणारे मानत. 'मनुस्मृती' हा कायद्याचा संग्रह मानला जातो. त्यात व्यक्तिगत, सामाजिक अधिकार व कार्ये दिलेली आहेत. न्यायालयाची सुरुवात ही एकदम खालच्या स्तरापासून झाली. खेडेगावात ग्राम न्यायालये चालत होती. त्यात गावाचा मुखिया/मुख्य माणूस भांडण–तंटे ऐकून न्याय करीत असे. त्यावर सुनावणी जिल्हा न्यायाधीशाकडे होत असे व त्यानंतर राजाच्या दरबारात पुढील निवाड्यासाठी जात असे.

सध्या अस्तित्वात असलेल्या विधी प्रणालीची सुरुवात 1774 मध्ये अतिउच्च न्यायालयाच्या कलकत्त्यातील स्थापनेने झाली. सुरुवातीला वकील होण्यासाठी पर्शियन भाषेचे ज्ञान असणे आवश्यक होते पण सन 1826 नंतर पर्शियन भाषेचे परिवर्तन हे इंग्रजी भाषेत झाले. भारतात औपचारिक शिक्षण 1855 साली अस्तित्वात आले. जेव्हा प्रथमच विधी प्राध्यापकी कार्य सरकारी एलफिन्स्टन महाविद्यालयामध्ये 1855 मध्ये सुरु झाले. नंतर उच्च न्यायालयाची स्थापना उच्च न्यायालय कायदा अंतर्गत 1861 मध्ये झाली. ज्यात तीन श्रेणीचे वकील न्यायालयात अशिलासाठी काम पाहात होते. त्यांना बॅरिस्टर, सॉलीसिटर व वकील असे संबोधिले जात होते. त्यामागोमाग अनेक उच्च न्यायालये स्थापित झाली. ह्याचे कारण भारतातील इतर भागातही खूप खटले वाढले होते. त्यामुळे भारतातील इतर भागातही 1857 साली औपचारिक विधी शिक्षण सुरू झाले. तीन विद्यापीठांतून विधी शिक्षण हा विषय शिकविला जाऊ लागला. ती तीन विद्यापीठे म्हणजे मद्रास, कलकत्ता व मुंबई ही होती.

लिगल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट, 1879 ला पारीत केला गेला. त्याच्यामुळे उच्च न्यायालयांमध्ये व इतर कनिष्ठ कार्यालयात वकिली व्यवसाय करणाऱ्यांची यादी राखली जाई. उच्च न्यायालये

वकिलांची परीक्षा घेत व त्यात उत्तीर्ण झालेल्यांनाच न्यायालयात दावे चालविण्याची मुभा दिली जात होती. मुंबई व मद्रास विद्यापीठांनी प्रथमच विधी पदवी प्रदान केली. जे वकिली व्यवसाय करण्यास योग्य होते त्यांना पदवी प्रदान करण्यात आली, कारण त्यांनी 10 वर्षे व्यवसाय करणाऱ्या ज्येष्ठ वकिलांकडे प्रशिक्षण घेऊन उच्च न्यायालयाची परीक्षा उत्तीर्ण केली होती.

वकील, बॅरिस्टर व सॉलीसिटर यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीतील फरक, विशेषतः ज्या खास सवलती बॅरिस्टर्सना दिल्या जात होत्या त्यामुळे सर्वत्र नाराजी होती. ऑल इंडिया बारची निर्मिती व्हावी अशी देशभर मागणी झाली. 1923 साली इंडियन बार कमिटीची स्थापना सर एडवर्ड शामियर ह्यांच्या अध्यक्षतेखाली हे मुद्दे पडताळण्यासाठी झाली.

Benjamin (2007) ह्या समितीच्या सूचनांवरुन इंडियन बार कौन्सिल हा कायदा 1926 मध्ये पारित झाला. त्या कायद्यामुळे विविध उच्च न्यायालयामध्ये बार कौन्सिल निर्माण झाले. ह्यात वकील व त्यांच्या क्षेत्रातील समस्यांना न्याय मिळाला.

**2.1.9 स्वतंत्र भारतात विधी शिक्षण :**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने ऑल इंडिया बार कमिटी, 1951 मध्ये अतिउच्च न्यायालयाचे न्यायाधीश एस. आर. दास यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. त्यांच्या सूचनेप्रमाणे बार कौन्सिल प्रत्येक राज्यांत स्थापन करून नावनोंदणी करणे, स्थगिती देणे, कामावरुन कमी करणे अशी कार्य करतील. त्यांनी हे देखील सूचित केले की, प्लीडरशीपची परीक्षा वर्ज्य करावी व जे विधी पदवीधर नसतील त्यांची नावे वकिली व्यवसायाच्या यादीत नोंदवू नयेत. 1961 साली ॲडव्होकेट ॲक्ट पारीत झाला. ज्याच्या अन्वये ऑल इंडिया बार कौन्सिल व प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र बार कौन्सिल स्थापन झाले. त्याच्याप्रमाणे न्यायालयात वकीली व्यवसाय करण्यासाठी किमान दर्जाचे नियम प्रस्थापित केले. त्यामुळे तीन वर्षाचा विधी अभ्यासक्रम 1967 पासून सर्व भारतातील विद्यापीठांनी सुरू केला.

Benjamin (2007) स्वातंत्र्याच्या काळात ज्यांना वकिली व्यवसाय करण्याची इच्छा असे, ते प्रथम इंग्लंडला जात व इंग्लिश बारमध्ये बॅरिस्टर म्हणून नाव नोंदवत. ज्यांना हे परवडत

नसे ते कोणत्याही भारतीय विद्यापीठातून विधी शाखेची पदवी घेऊन प्रांतीय किंवा राज्याच्या बार कौन्सिलची परीक्षा देऊन व्यावसायिक वकील म्हणून प्रांतीय किंवा राज्याच्या उच्च न्यायालयात नाव नोंदवत असत. विद्यापीठात विधीचा अभ्यासक्रम दोन वर्षाचा होता व प्रत्येक वर्षाच्या शेवटी विद्यापीठाची परीक्षा होती. पदवी मिळाल्यानंतर त्यांना वर्षभर व्यावसायिक वकिलांकडे प्रशिक्षण घ्यावे लागे व त्यानंतर ते राज्य बार कौन्सिलची परीक्षा देण्यास पात्र ठरत. वकिली व्यवसायावर बार कौन्सिलचे नियंत्रण होते व अभ्यासक्रमावर विद्यापीठाचे नियंत्रण होते.

द ॲडव्होकेट ॲक्ट,1961 ने बार कौन्सिल ऑफ इंडियाला विधी शिक्षणाच्या योग्यतेचे मोजमाप करण्याची जबाबदारी दिली व विधी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचीदेखील जबाबदारी सोपविली. 1967 साली त्यांनी विधी अभ्यासक्रम तीन वर्षाचा सुचविला व सर्व भारतातील विद्यापीठांनी तो स्वीकारला. एक वर्षाची उमेदवारी व बारची परीक्षा वर्ज्य करून त्या जागी एलएल.बी.च्या अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष शिक्षण देण्याचे ठरविले. बीसीआयने वेळोवेळी बदल घड्वून नवीन विषय सुरू केले. ज्यावेळी विद्यापीठांना 5 वर्षांचे एलएल.बी. अभ्यासक्रम सुरू करण्यास उद्युक्त केले. ह्या पर्वाची सुरुवात नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया, युनिव्हर्सिटी, बेंगलोरने 1986 मध्ये केली. याच्या नियमित अभ्यासक्रमाचे कार्य 1 जुलै 1988 ला सुरू झाले. भारतीय विधी शिक्षण प्रणालीत यामुळे नवीन बदल घडवून आला, जो समान कायद्याच्या राष्ट्रांमध्ये पूर्णतः वेगळा होता.

पाच वर्षीय अभ्यासक्रमाचा उद्देश प्रगत दृष्टिकोन ठेवून, समाजाची जाणीव बाळगून नवीन कायद्यांच्या तत्त्वावर नवीन समाज घडविणे हा होता. पाच वर्षीय अभ्यासक्रमाचे दोन भाग आहेत. पहिली दोन वर्षे विधीअगोदरचा अभ्यास शिकविला जातो व त्यानंतरची तीन वर्षे विधी अभ्यासक्रम शिकविला जातो. पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमने विधी व्यवसायाला पूर्ण वेळेचे महत्त्व प्राप्त करून दिले.

**2.1.10 भारतातील विधी शिक्षणाची सद्यस्थिती :**

विधी शिक्षणाविषयी नेहमी बोलले जाते की, हे तांत्रिक शिक्षण आहे की बौद्धिक, बुद्धिमत्तेच्या माध्यमातून मिळालेले आहे. तसे अनेक मान्यवरांनीदेखील विधी ग्रंथालयाला

लॅबोरेटरी असे संबोधित केले आहे. भारतात सुरुवातीला विधी शिक्षण परंपरागत स्वरूपात तीन वर्षाचा पदवी अभ्यास म्हणून चालविला जात होता. तथापि, 1987 पासून ही संरचना बदलण्यात आली आहे. भारतातील विधी आयोग आणि बार कौन्सिल ऑफ इंडिया यांनी दिलेल्या सूचनेनुसार विधीच्या विशेषाधिकारातील विधी विद्यापीठांची स्थापना करण्याच्या बाबतीत भारतातील पहिले नॅशनल लॉ स्कूल बेंगलोरमध्ये स्थापित झाले. याचे नाव नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी (NLU) असे आहे. त्यानंतर इतर विद्यापीठांची स्थापना झाली व पाच वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमास सुरुवात झाली. ही विधी विद्यापीठे विधी शिक्षणासाठी एक बहुशिस्तबद्ध आणि एकीकृत पद्धत प्रदान करण्यासाठी होती, म्हणून भारतामध्ये एलएल.बी. किंवा बी.एल.ऐवजी दुसरी एक विधीशाखेची पदवी मंजूर करण्यात आली.

नॅशनल लॉ स्कूलचा पाच वर्षाचा विधी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना पुढील पदव्या दिल्या जातात. त्या म्हणजे बी.ए.एलएल.बी.(ऑनर्स)/बी.एस्सी, एलएल.बी.(ऑनर्स)/बी.कॉम.एलएल.बी.(ऑनर्स) / बी.बी.ए.एलएल.बी.(ऑनर्स) या पदव्या दिल्या जातात तीन व पाच वर्षाच्या बॅचलर डिग्रीशिवाय मास्टर इन लॉ, डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी(पीएच.डी.), एम.बी.एल.एल.एल.एम./एम.बी.ए. एलएल.एम. हे अभ्यासक्रम भारतात उपलब्ध आहेत. त्यानंतर ॲडव्होकेट ॲक्ट 1961 अंतर्गत पाच वर्षांचा एकत्रित विधी पदवी देणाऱ्या अनेक विधी महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली.

नॅशनल लॉ स्कूलच्या स्थापनेनंतर विधी महाविद्यालयांमध्ये सन 2000 पासून आमूलाग्र बदल होण्यास सुरुवात झाली Moily (2010). गेल्या 10 वर्षांमध्ये नॅशनल लॉ स्कूलचा आकडा एकवरून चौदावर गेला. Bar and Bench प्रमाणे मे 2010 मध्ये भारतात 913 विधी महाविद्यालये होती. आजमितीला त्यांची संख्या हजारपेक्षा जास्त आहे. बार कौन्सिलऑफ इंडियाला या सर्वांवर लक्ष ठेवणे फार कठीण झाले आहे. विधी महाविद्यालयांचा दर्जा उच्च राखण्यासाठी व व्यावसायिक दर्जा उंचविण्यासाठी प्रत्येक राज्यातील सरकारने आपल्या राज्यासाठी एक कायद्याचे विद्यापीठ स्थापन करावे. त्यामध्ये प्रमाणित विधी शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी राज्यांतील सरकारांनी कायद्याची स्वतंत्र विद्यापीठे स्थापित केली, ज्यांच्याद्वारे विधी शिक्षणाचा दर्जा पाहिला जातो. खालील कायद्याची विद्यापीठे भारतात उपलब्ध आहेत.

**2.1.10.1 भारतातील विधी विद्यापीठे :**

**तक्ता क्र. 2.1**

**भारतातील विधी विद्यापीठे**

| अनु.क्र. | विद्यापीठाचे नाव | ॲक्टनुसार स्थापना वर्ष |
|---|---|---|
| 1 | नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी बेंगलोर, कर्नाटक | 1987<br>1986 चा कर्नाटका ॲक्ट |
| 2 | डॉ.बी.आर. आंबेडकर लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू, चेन्नई | 1996<br>1987 चा लेझिस्नेशन ॲक्ट 43 |
| 3 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, भोपाळ | 1997<br>1997 चा ॲक्ट नं. 41 |
| 4 | वेस्ट बंगाल नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ज्युडिशियल सायन्सेस कलकत्ता,वेस्ट बंगाल | 1999<br>वेस्ट बेंगॉल ॲक्ट IX |
| 5 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, जोधपूर | 1999<br>1999 मधील जोधपूर ॲक्ट |
| 6 | NALSAR युनिव्हर्सिटी ऑफ लॉ, हैद्राबाद | 1998<br>1998 चा आंध्र प्रदेश ॲक्ट 34 |
| 7 | गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, गांधीनगर | 2003<br>2003 चा गव्हर्नमेंट ऑफ गुजराथ नॅशनल युनिव्हर्सिटी ॲक्ट |
| 8 | हिदायतुल्ला नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, रायपूर | 2003<br>2003 चा छत्तीसगढ ॲक्ट नं. 10 |
| 9 | नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ॲडव्हान्स लिगल स्टडिज, कोची | 2005<br>2005 चा केरला ॲक्ट 27 |
| 10 | राम मनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, लखनौ | 2005<br>2005 चा उत्तर प्रदेश ॲक्ट नं. 10 |
| 11 | राजीव गांधी नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ लॉ, पटियाला | 2006<br>2006 चा पंजाब ॲक्ट नं. 12 |
| 12 | चाणक्य नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, पटणा | 2006<br>2006 चा बिहार ॲक्ट नं. 24 |
| 13 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, दिल्ली | 2008<br>2008 चा ॲक्ट नं. 1 |
| 14 | कर्नाटक राज्य लॉ युनिव्हर्सिटी, हुबळी | 2009<br>2009 चा कर्नाटका ॲक्ट नं. 11 |
| 15 | महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, औरंगाबाद | 2016<br>2014 चा महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ॲक्ट VI |
| 16 | महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर | 2017<br>2014 चा महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ॲक्ट VI |
| 17 | महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई | 2014<br>2014 चा महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ॲक्ट VI |

| अनु.क्र. | विद्यापीठाचे नाव | ॲक्टनुसार स्थापना वर्ष |
|---|---|---|
| 18 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, कटक, ओरिसा | 2008<br>2008 चा ओरिसा ॲक्ट |
| 19 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ॲण्ड ज्युडिशिअल अकॅडेमी, गुवाहाटी, आसाम | 2009<br>2009 चा आसाम ॲक्ट नं. 25 |
| 20 | नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी ऑफ स्टडी ॲण्ड रिसर्च इन लॉ, रांची, झारखंड | 2010<br>2010 चा झारखंड ॲक्ट नं. 4 |
| 21 | दामोदरम संजीवाय्या नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश | 2008<br>2008 चा आंध्रप्रदेश ॲक्ट |

परंपरागत पद्धतीने विधी शिक्षणात सद्यपरिस्थितीत अनेक बदल घडून आले आहेत. हे बदल घडूवन आणणारे राष्ट्रीय विधी विद्यालये (National Law Schools) व जागतिक विधी विद्यालये (Global Law Schools) आहेत. आंतरराष्ट्रीय Moots उन्हाळी शाळा (Summer Schools) व अदलाबदलीचे कार्यक्रम (Exchange Programmes) मार्फत विद्यार्थ्यांना नवीन व बदलत्या विधी शिक्षणाला सामोरे जाण्यासाठी सज्ज केले जात आहे.

**2.1.11 विधी शिक्षणात सुधारणा :**

विधी शिक्षणात महाविद्यालयांना उच्च व सन्मानाचे स्थान आहे. हे स्थान अधिक उंचावल्यास विधी शिष्यवृत्ती आणि संशोधन क्षेत्र सशक्त बनू शकते. विधी शिक्षण मूलतः शिस्तबद्ध, बहुउद्देशीय शिक्षण आहे, जे राष्ट्रीय विकास आणि सामाजिक परिवर्तनात अधिक रचनात्मक पद्धतीने योगदान देतात. जागतिकीकरणाने भारतातील विधी शिक्षणाच्या भविष्यासाठी अनेक आव्हाने उभी केली आहेत. भारतात कोठेही बहुराष्ट्रीय कंपन्याचे आगमन झाल्यास वकिलांचे कार्य अत्यंत तांत्रिक असते. आवश्यक शिक्षण विधी शिक्षणाच्या योग्य सांस्कृतिक प्रशिक्षण घेणारे सक्षम वकील असणे आवश्यक आहे. विधी शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी हा एक आदर्श प्रकार आहे.

विधी शिक्षण केवळ कायद्याची निर्मिती करणाऱ्यांना (वकिलांना) नव्हे तर विधी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करुन गंभीरपणे विचार करण्यास लावणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांचे विचार स्पष्टपणे, खात्रीपूर्वक व सखोल लिखाणासाठी त्यांच्या अशिलांचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करण्यास प्रवृत्त करणारे असणे आवश्यक आहे.

विधी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करताना विधी शिक्षकांनी नवीन माहिती सुसंवाद तंत्रज्ञान वापरासंबंधी प्रशिक्षणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. अशा तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थीकेंद्रीत शिक्षणाचा प्रसार करण्यामध्ये आणि विधी शिक्षणात वेळोवेळी सहभाग घेणे, व्यावहारिक आणि बौद्धिक उत्तेजन देणारे शिक्षण देणे आवश्यक आहे.

### 2.1.12 विधी शिक्षण सुधारण्यासाठी आयोग :

भारतात विधी शिक्षण सुधारण्यासाठी अनेक आयोग स्थापित केले, ते खालीलप्रमाणे आहेतः

1) कलकत्ता विद्यापीठ आयोग (1917 - 1919)

2) विद्यापीठ शिक्षण आयोग (1948 - 1949)

3) 1949 मध्ये विधी शिक्षण समिती ही शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी स्थापित करण्यात आली.

अखिल भारतीय बार समितीने 1951 मध्ये काही शिफारशी केल्या होत्या. 1954 मध्ये चौदावा विधी आयोग अहवाल आला, ज्यामध्ये भारताच्या विधी शिक्षणाची स्थिती आणि त्यात सुधारणा याबद्दल चर्चा व मान्यता देण्यात आली. ॲडव्होकेट्स ॲक्ट, 1961 हा विधी शिक्षणाचा केंद्रबिंदू झाला. भारतीय बार परिषद अंतर्गतचे नियम हे ॲडव्होकेट्स ॲक्ट, 1961 मध्ये समावेश करण्यास इंडियन लॉ इन्स्टिट्यूट (दिल्ली) ची स्थापना झाली.

इंडियन लॉ इन्स्टिट्यूट (www.ilidelhi.org) ची स्थापना 1956 मध्ये प्रामुख्याने विधी संशोधनाच्या उद्देशाने केली गेली. ही संस्था नोंदणी कायदा 1860 अंतर्गत नोंदणीकृत करण्यात आली आहे. ह्या संस्थेला स्वायत्तता प्राप्त झाली आहे. इंडियन लॉ इन्स्टिट्यूटचे ग्रंथालय देशात अनेक ग्रंथालयांपैकी एक सर्वोत्तम ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात 75,000 पेक्षा जास्त टायटल्स आहे. त्यात 270 विधी नियतकालिकांचे सदस्यत्व आहे. संस्थेला त्याची उद्दिष्टे अंमलात आणण्याचे आवश्यक आणि शैक्षणिक स्वातंत्र्य आहे. मानवी संसाधन व विकास मंत्रालयाच्या शासन निर्णय सूचना क्रमांक फ 9-9/2001 – 03.03.2004 दिनांक 29.10.2004 च्या अंतर्गत अभिमत विद्यापीठ म्हणून दर्जा मंजूर करण्यात आला.

### 2.1.13 विधी शिक्षण सुधारण्यासाठी आयोग विधी शिक्षणावर राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे अहवाल :

राष्ट्रीय ज्ञान आयोगाची 2005 मध्ये भारताचे पंतप्रधान यांच्या हस्ते स्थापना करण्यात आली. त्याचा उद्देश भारताला ज्ञानाधारित अर्थव्यवस्था मिळावी आणि त्यासाठी विविध सुधारणा

कार्यक्रम राबविण्यात यावेत. समाजासाठी त्यात विविध शिफारशी सुचविण्यात याव्यात, या उद्देशाने त्या आयोगाची स्थापना करण्यात आली. एन.के.सी.चे कार्य महत्त्वपूर्णपणे व्यावसायिक शिक्षण आणि विशेषतः विधी शिक्षणक्षेत्रात आहे. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन एन.के.सी.ने देशात विधी शिक्षणाच्या कार्यरत गटाची स्थापना केली. एन.के.सी.च्या अध्यक्षांनी काही सदस्यांची नेमणूक केली. त्यामध्ये श्री. साम पित्रोदा, कार्यरत गटाचे सदस्य न्यायमूर्ती जगन्नाथराव (अध्यक्ष), न्यायमूर्ती लीला सेठ, डॉ. माधव मेनन, डॉ. बी. एस. चिमणी, डॉ. मोहन गोपाल, श्री. पी. पी. राव आणि श्री. निशीय देसाई यांचा समावेश आहे. या कार्यरत गटाने गुणवत्ता आणि प्रमाणके विधी शिक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे विषय हाताळले आहेत.

1) विधी शिक्षणाची सद्यस्थिती आणि पुढील योजना आणि त्यासाठी व्यापक धोरण.
2) विधी शिक्षणाचे विषय व व्याप्ती.
3) हुकूमत संरचना
4) केंद्र सरकारने निधी उपलब्ध करुन दिलेले आणि 100 कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले कमीत कमी चार स्वतंत्र संशोधन केंद्र.
5) प्रवेश, अर्थसाह्य पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन.

**समारोप :**

भारतातील कायद्याची पाळेमुळे जरी पुरातन रूढीवर आधारित असली तरी आजचे विधी शिक्षण आंतरराष्ट्रीय पातळीवरील होण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया निरतंर प्रयत्न करीत आहे. आपला समाज न्यायाधिष्ठित समाज आहे विधीविषयक ज्ञानाची गरजही संविधानिक संदर्भात जरूरी ठरते आणि त्यामुळे गेल्या चाळीस वर्षात विधी शिक्षणात आमूलाग्र बदल झाला आहे. विधी शिक्षणाचे कार्य हे वकिली व्यवसायात विशेषज्ञ निर्माण करणे हे आहे. जेणेकरून सर्व समाजाची प्रगती होईल व सरतेशेवटी पूर्ण राष्ट्राची प्रगती होईल.

वकील, बॅरिस्टर व सॉलिसिटर यांना आज समाजात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशभरात जवळजवळ एक हजार विधी महाविद्यालये आजमितीला आहेत. देशात एकूण एकवीस विधी विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय उन्हाळी शाळा, अदलाबदलीचे कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जातात.

## 2.2 विधी ग्रंथालये

### 2.2.1 प्रस्तावना :

माहितीच्या उपभोक्त्यांच्या विधीविषयक शोधाच्या स्वरूपाला साजेल अशा सोप्या आणि जलदगतीने वितरित करण्यासाठीची उपयुक्त आणि योग्य माहितीची निवड, अधिग्रहण संग्रह, व्यवस्था आणि वितरण करण्याची फार मोठी जबाबदारी ग्रंथपालाची आहे. हे करताना ते, न्याय व्यवस्थापनात, शिष्यवृत्तीच्या समर्थनात, गुणवत्तापूर्ण विधी शिक्षण प्रोत्साहनार्थ, सामाजिक प्रणालीच्या कार्यपूर्तीत महत्त्वाची भूमिका बजाऊ शकतात. ज्यामुळे न्यायाधीशांना/विधी विद्यार्थ्यांना नियमांचे तंतोतंत पालन करता येईल, कारण संशोधकांना सुसंगत विधी अहवाल आणि कायदे त्याखालील नियम शोधण्यास वेळ नाही आणि त्यांची व्याप्ती विविध ठिकाणी व स्रोतांवर आहे. त्यामुळेच ग्रंथपाल व त्याच्या व्यावसायिक कौशल्यावर निर्भर राहणे हाच एकमेव पर्याय उरतो व त्यामुळेच कोणत्याही विद्यार्थ्याची/संशोधकांची त्यांच्या संशोधन कार्यात निकाल टप्प्यावर लवकर पोहोचण्याची क्षमता वृद्धिंगत करत असते. हे साध्य करण्यासाठी ग्रंथपाल किंवा ग्रंथालय आणि विधी संस्था ज्यात महाविद्यालये समाविष्ट आहेत, तेथील कार्यरत माहिती व्यावसायिक हे नेतृत्वपूर्ण व नेतृत्वदर्शक भूमिका निभावू शकतात. जसे विधी लिखाण कार्यक्रम राबविणे, विशिष्ट प्रशिक्षण प्रयोजन, व्याख्याते यांच्या सलोख्याने तंत्रज्ञानाचा वापर करुन संशोधनार्थ विधी डेटाबेसचा वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम निर्मित करणे आवश्यक असते.

### 2.2.2 विधी ग्रंथालयांची भूमिका :

Shera (1972) विधी ग्रंथालयाची रचना ही विधीचे विद्यार्थी, अध्यापक, न्यायाधीश व त्याचे सहाय्यक यांच्या दृष्टिकोनातून केलेली असते. विधी ग्रंथपालन हा एक आव्हानात्मक व्यवसाय आहे. या क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या गरजा इतरांपेक्षा निराळ्या व जास्त असतात. Dollenny (1963) यांच्या मते विधी ग्रंथालय खरोखरच एक न्याय प्रशासनाचा महत्त्वाचा घटक आहे. ''स्वातंत्र्य समाजव्यवस्थेत या संस्थेला सामाजिक महत्त्व प्राप्त झाले.'' या ग्रंथालयाचे उपभोक्ते फार चिकित्सक असतात. ग्रंथालयाच्या उद्देशानुसार व आवश्यकतेनुसार ग्रंथपाल

(विधी) ग्रंथालय संग्रह विकसित करतात. या ग्रंथालयांचे वर्गीकरण Shrivastava, R (2008) यांच्या प्रमाणे :

| **ग्रंथालयाचे प्रकार** | **उपभोक्ते** |
|---|---|
| विधी महाविद्यालयातील ग्रंथालय | विधी विद्यार्थी, अध्यापक, संशोधक |
| न्यायालयीन ग्रंथालय | न्यायाधीश, कायदेपंडित, सहाय्यक |
| शासकीय कार्यालयातील विधी ग्रंथालय | शासकीय, निमशासकीय अधिकारी |
| विधानसभा/विधानपरिषद संसदेचे ग्रंथालय | आमदार |
| बार असोसिएशन्स ग्रंथालय | न्यायालयातील वकील |
| व्यावसायिक ग्रंथालय | व्यावसायिक वकील. |

Wong and Sawatzty (2014) यांच्या मते ग्रंथालयीन कार्यक्रमांमध्ये साधारणतः विधी ग्रंथपालांविषयी, त्यांच्या व्यवस्थेविषयी विशेष चर्चा होत नाही. त्यांच्या मते विधी ग्रंथालयात ग्रंथपाल आपोआपच खेचले जातात. विधी ग्रंथपाल कधी कधी त्याला अपघाताने घडलेला व्यवसाय मानतात. विविध विधी ग्रंथालये या अभ्यासात अभ्यासली आहेत. ह्यात विधी व्यवसायाचे फर्म, विधीच्या शाळा, विद्यालये, न्यायालये, विधी संस्था परिषदांची ग्रंथालये, विधान मंडळाचे ग्रंथालय, जिल्हा किंवा प्रांतिक, सांघिक न्यायविभागाचा समावेश आहे. Wong आणि Swatzty, (2014) यांच्या मते विधी ग्रंथालयाचे पुढील प्रकार असू शकतात.

### 2.2.3 विविध प्रकारची विधी ग्रंथालये :

1) **विधीविषयक सल्ला देणाऱ्या संस्थांची ग्रंथालये :** मोठ्या विधी फर्म्समध्ये मोठी ग्रंथालये असतात. येथे बहुतेक पक्षकार हे कायद्याचे विद्यार्थी अथवा तरुण व्यावसायिक असतात. येथे छापील व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे उपलब्ध असतात. ग्रंथालये इलेक्ट्रॉनिक संसाधने वकिलांच्या टेबलावर उपलब्ध करुन दिली जातात. परंतु केव्हा केव्हा लायसन्सर महाग असल्याने सर्वत्र ही व्यवस्था उपलब्ध होऊ शकत नाही. काही ग्रंथालयांमध्ये संगणक सेवा ही Remote access च्या माध्यमातून वापरू शकतात व फर्मसमध्ये घेतलेले डेटाबेसेस ई–सामुग्री

कोठूनही वापरण्याची व्यवस्था करून दिलेली असते. अशा ग्रंथालय विशेष सेवा करून संशोधन केले जाते अथवा ग्रंथपाल हे संशोधन पक्षकारांना करून देतात.

विधीचे ग्रंथपाल नवोदित व्यावसायिकांना व विधी विद्यार्थ्यांना संस्थेमध्ये असलेल्या माहितीचे संशोधन करण्यास वा शोध घेण्यास शिकविले पाहिजे. त्यामुळे ग्रंथपालांच्या गैरहजेरीत त्यांना शोध घेता येतो. ह्याचाच अर्थ त्यांना आपले शोध स्वतःच करावे लागतात. जेव्हा वरिष्ठ संशोधनात वेळ घालत नाहीत. स्वतःसाठी अथवा टीमसाठी विधी ग्रंथालय संशोधनासाठी वापरली जात नाहीत. विधी ग्रंथालयात आता स्पर्धात्मक माहिती, व्यवसायात्मक विश्लेषण व संघर्षाची/विरोधाभासाची माहिती मिळू शकते.

**2) विधी महाविद्यालयांची ग्रंथालये :** महाविद्यालयाच्या विधी ग्रंथालयात मोठी ग्रंथालये असतात. येथे सर्व सामान्यांना ग्रंथालय वापरांसाठी आवश्यक परवानगीची गरज असते. त्यांचा वाचकवर्ग हा अध्यापक, विद्यार्थी, संशोधक असतात. तेथील ग्रंथालयांना उत्तम स्तरावर ठेवणे आवश्यक असते. ती नेहमी अद्ययावतच ठेवावी लागतात. अनेक शैक्षणिक उपक्रम या ग्रंथालयांमध्ये राबवावे लागतात.

**3) विधी संस्था/न्यायालयीन ग्रंथालये :** तेथील सभासदांसाठी प्रांतिक विधी संस्था ग्रंथालये वाढवित आहेत. ही ग्रंथालये सर्वसाधारण समाजास मदत करतात. सर्वसाधारण समाजास लागणारी ग्रंथसामुग्री (विधीची) येथे संग्रहीत केलेली असते. या संस्था अनेक उपक्रम राबवित असतात.

**4) शासकीय कार्यालयातील विधी ग्रंथालये :** प्रांतिक व सांघिक कर्मचाऱ्यांसाठी विधी ग्रंथालये उपलब्ध करतात. ह्यांत शिकाऊ व अनुभवी वकिलांचा व न्यायाधीशांचा समावेश असतो. विधान मंडळे पण विधी ग्रंथालये ठेवतात, ज्यांचा उपयोग राजकारणातील लोक व आम जनता करते. विधान मंडळाच्या ग्रंथालयांचे लक्ष विधान मंडळाच्या कार्यावर केंद्रित असते. कायद्यांच्या मसुद्यांवर, नियम, कायदे कानून व रेकॉर्ड (नोंदी) वर केंद्रीत केलेले असते.

**5) सार्वजनिक ग्रंथालये :** काही सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विधी विभाग आम जनतेच्या फायद्यासाठी असतो. ह्याचा उपयोग विधान मंडळाच्या ऐतिहासिक अभ्यासासाठी व संसाधन

म्हणून उपयोग करण्यासाठी केला जातो. विशेषतः नगरपालिका व वंशावळीच्या नोंदींचा अभ्यास करण्यासाठी यांचा उपयोग केला जातो. तसेच ही सार्वजनिक ग्रंथालये जुन्या गोष्टींचे संशोधन व अभ्यास करण्यास मदत करतात.

**6) तुरुंगातील ग्रंथालये :** या ग्रंथालयाचा उपयोग फौजदारी संग्रह म्हणून उपयोगी पडतो. यात कैद्यांना लागणाऱ्या विरंगुळ्याच्या ग्रंथसामुग्रीबरोबर, कायद्याला लागणारा संग्रह संग्रहित केलेला असतो.

1) विधी ग्रंथालये तीन प्रकारची आहेत; शैक्षणिक, न्यायालयीन आणि संशोधन ग्रंथालय. शैक्षणिक विधी ग्रंथालय फार प्रबळ आहेत. विधी शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था आहेत, त्यापैकी 234 खाजगी विधी महाविद्यालये आहेत. 115 सार्वजनिक शैक्षणिक विधी ग्रंथालयांना वित्तपुरवठा केला जातो. यामध्ये पुढील निवडक ग्रंथालयांचा अंतर्भाव होतो – बंगलोर युनिव्हर्सिटी लॉ कॉलेज ग्रंथालय, गव्हर्मेन्ट लॉ कॉलेज मुंबई, मुंबई युनिव्हर्सिटी लॉ ग्रंथालय, कोलकत्ता युनिव्हर्सिटी लॉ ग्रंथालय, दिल्ली युनिव्हर्सिटी लॉ ग्रंथालय, काश्मीर युनिव्हर्सिटी लॉ ग्रंथालय, आणि मद्रास लॉ कॉलेज ग्रंथालय इत्यादी. दिल्ली युनिव्हर्सिटी ही भारतातील सर्वोत्तम विधी ग्रंथालयापैकी एक म्हणून ओळखली जाते. त्याच्याकडे सुमारे दोन लाख ग्रंथांचा संग्रह आहे. सार्वजनिकरित्या अनुदानित केलेले ग्रंथालय त्याच्या खाजगीरित्या प्रतिपादनापेक्षा व्यवस्थित आणि उत्तम आहेत.
2) न्यायालयीन ग्रंथालयांमध्ये 18 राज्यांतील सर्वोच्च न्यायालयाची ग्रंथालये (नवी दिल्ली) व उच्च न्यायालयाचे ग्रंथालय यांचा समावेश होतो. याशिवाय सर्वोच्च न्यायालयांशी संलग्न बार असोसिएशन ग्रंथालयही आहेत. सुप्रीम कोर्ट ग्रंथालयात तीन लाखांपेक्षाही जास्त ग्रंथांचा संग्रह आहे. हे सर्वात मोठे ग्रंथालय आहे. इतर न्यायालयीन ग्रंथालयांमध्ये कोलकता हाय कोर्ट ग्रंथालय, कर्नाटक उच्च न्यायालयाचे ग्रंथालय व मद्रास उच्च न्यायालय यांचा समावेश होतो. प्रत्येक बार संघटनांचे स्वतःचे ग्रंथालय असते. हे मुंबई, दिल्ली, कोलकता आणि मद्रास येथे आहेत. त्यांचे वकील

त्यांच्या सदस्यांना सेवा देतात. ज्या संस्थांमध्ये विधी संशोधनाचा सहभाग आहे अशा संस्थांकडे स्वतःचे विधी ग्रंथालय असणे आवश्यक आहे.

अशी संस्था म्हणजे इंडियन लॉ इन्स्टिटयूट (नवी दिल्ली) ILI (2017). या संस्थेमध्ये 50,000 हून अधिक ग्रंथांचा संग्रह आहे, ज्यामध्ये दस्तऐवज, अहवाल व इतर संग्रहाचा समावेश आहे. सदर ग्रंथालयाने इंडेक्स टू इंडियन लिगल पिरियॉडिकल्स आणि माहिती केंद्रे उदयास आणले. हे ग्रंथालय जर्नल ऑफ इंडियन लॉ इन्स्टिटयूट नावाने एक महत्त्वाचे नियतकालिक प्रकाशित करते. तसेच अनेक दुर्मिळ ग्रंथाचे प्रकाशन या ग्रंथालयाने प्रकाशित केले आहे.

विधी ग्रंथालयातील ग्रंथपालांना विशेष प्रशिक्षणाची गरज आहे. या प्रशिक्षणासाठी M.Lib. आणि M.Phil. आवश्यक आहे. विधी महाविद्यालयातील सेवा, संग्रह सुधारण्यासाठी बार कौन्सिलने घालून दिलेल्या ग्रंथालयाच्या प्रमाणकांचे (standards) गांभीर्याने पालन केले पाहिजे.

**2.2.4 विधी ग्रंथालयाची भूमिका :**

कायदा हा नेहमीच माहितीवर आणि सखोल माहितीवर आधारित असतो. कारण विधी संस्था माहितीचा वापर अधिक प्रभावीपणे हाताळून मूल्ये साध्य करू इच्छितात. त्यामुळे संबंधित माहिती अधिक प्रमाणात पुरविली जाते. विशेषतः विधी संस्थांमध्ये संबंधित विधीविषयक माहिती आज फक्त प्रकाशित स्वरुपात, कौशल्य आणि व्यवसायामुळे उत्पन्न होणारी माहिती विधीविषयक स्वरुपात उपलब्ध नाही. माहितीचे विविध प्रकार अधिक औपचारिक माहिती प्रणालीत आणले जात नाहीत आणि स्पर्धात्मक वातावरणात त्याचे बौद्धिक भांडवल होते. ही वास्तविकपणे कोणत्याही ग्रंथालय माहिती प्रणालीची सुरुवात आहे.

**1) विधी महाविद्यालयातील ग्रंथालय म्हणजे विशेष ग्रंथालय :**

विधी ग्रंथपालांची कार्यक्षमता आणि मूलभूत शिक्षण हे इतर प्रकारच्या ग्रंथपालांप्रमाणे असले तरी त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या त्यांना भिन्न करते. विधी ग्रंथपाल आणि विधी ग्रंथालये एक विशिष्ट आणि अविभाज्य भूमिका निभावतात. ज्यात त्यांच्या सेवा आणि विशिष्ट संग्रह यामुळे त्यांना गुणवत्तापूर्ण विधी प्रणाली तयार करण्यात योगदान देता येते. अगदी सुरुवातीपासूनच ते या प्रक्रियेचा भाग आहेत. ते विधी शिक्षणात सहभाग घेतात आणि जनतेला

त्यांचे कायदेशीर अधिकार संरक्षित करण्यासाठी मोलाचा मोठा वाटा उचलत आहेत आणि त्यांची भूमिका दिवसेंदिवस वाढत आहे. ते प्रक्रियेच्या दुसऱ्या टोकावर कायदेशीर प्रयत्न करतात. ते वाजवी किंमतीत विधीविषयक माहितीची गुणवत्ता आणि उपलब्धता संरक्षित ठेवतात आणि प्रत्येकाला खुली, समान व एकसारखी माहिती उपलब्ध करुन दिली जाते.

**2) संदर्भ (सायटेशन) पद्धती यावर प्रशिक्षण :**

James and Alan (1997) संदर्भ देण्यासाठी विधी व्यावसायिक संदर्भ लिहिण्यासाठी स्वतःची पद्धती वापरतात. विधीविषयक संदर्भ देण्याच्या पद्धती इतर सामान्य संदर्भ पद्धतींपेक्षा वेगळ्या असतात. कोणत्या नवीन विद्यार्थ्यांना विधीविषयक लेखात, दस्ताऐवजात दिलेल्या संदर्भाच्या पद्धती याबाबत संपूर्ण माहिती नसते. न्यायालयीन निर्णयांचा शोध कसा घ्यावा, त्याचा संदर्भ कसा द्यावा आणि निगडित संदर्भ कसे शोधावे याबाबत ग्रंथपालांनी नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. बौद्धिक संस्थेत ग्रंथालय सामुग्रीचे/संग्रहाचे प्रमाणीकरण ही किचकट आणि व्यापक प्रणाली आहे. ज्यामुळे गरज भासेल त्याप्रमाणे स्थानिक वापर सुनिश्चित करता येतो. ग्रंथालयाच्या संग्रहाची भौतिक रचना यावर ही वर्गीकरण प्रणाली लागू केल्याने, अतिशय कुशल आणि विशेषज्ञ ग्रंथालय, व्यावसायिक संशोधन प्रक्रियेत सहकार्य करत असतात आणि संशोधकांना सर्वात जास्त संबंधित आणि उपयोगी सामुग्रीपर्यंत पोहोचण्यात मार्गदर्शन करतात, आणि त्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांत मदत करतात. या विधी व्यावसायिकांनी सर्वेक्षण करायला हवे, समजून घ्यावयाला हवे आणि शोध वर्तणूक व विधी संशोधकांच्या गरजांबाबत संवेदनशील असायला हवे, जेणेकरून त्याचा संशोधन वेळ आणि श्रम विनाकारण वाया न घालविता मदत होऊ शकेल.

**3) विधी अद्ययावत माहिती/घटना यांच्यावर लक्ष ठेवणे व त्यांचा मागोवा घेणे :**

नव्या सहस्त्रकात कित्येक विधी डेटाबेसेस तयार केले जातात ते ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही स्वरूपात उपलब्ध केले जातात. ग्रंथालयात सहजपणे उपलब्ध असलेले डेटाबेसेस कशा प्रकारे वापरावेत याबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. ग्रंथपालांनी समाजातील, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील विधीविषयक बदल यावर लक्ष ठेवणे जरुरी आहे

व त्यासाठी व्यावसायिक प्रकाशने, वर्तमानपत्रे, संसदीय कामकाज नियम, नवीन कायद्यांची प्रस्तावना किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांतील सुधारणा यावर लक्ष ठेवावे. आजकाल ही सर्व राज्य आणि देशस्तरावरील सामान्य बाब आहे. त्यामुळे ग्रंथालयांनी अशा प्रकारच्या हालचालींवर लक्ष ठेवावे, यामुळेच त्यांना विद्यार्थ्यांचे व अध्यापक वर्गाचे व तसेच संशोधकांचे ज्ञान अद्ययावत ठेवता येईल.

**4) मूल्यवर्धित सेवा :**

संबंधित ग्रंथसूची यादी संकलन करणे, उपलब्ध ग्रंथ एकत्रित करणे ग्रंथांतून किंवा इतर कोणत्याही स्त्रोतांकडून जसे इंटरनेट, नियतकालिके यातून लेख शोधणे. या कामामुळे/कृतीमुळे विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना मदत करणे सोपे होते, जेणेकरुन विद्यार्थी खुल्या वादविवाद  चर्चा करण्यासाठी, न्यायालयात सहभाग घेण्यासाठी, स्वाध्याय पूर्ण करण्यात संशोधन प्रकल्प लेखन इत्यादी कार्यात स्वतःला व्यस्त ठेवतील आणि त्यामुळे विद्यार्थी आणि संशोधक यांना मदत होईल आणि त्यांना वास्तविक भौतिक दस्तऐवज किंवा माहिती उपलब्ध करून देता येईल. हे सर्व त्यांना या सर्व बाबींचे स्थान सांगणे किंवा त्यांना फक्त ग्रंथसूची विवरण पुरविणे यापेक्षा कधीही योग्य आहे. त्यामुळे ग्रंथालयात मूल्यवर्धित सेवा पुरविल्या जातात.

**5) खुल्या वादविवाद  चर्चा न्यायालयात सहभागासाठी मदत :**

Rai (2001) विधी अध्यापनासाठी नवीन विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) अभ्यासक्रमानुसार विधीच्या विद्यार्थी इच्छुकांसाठी खुल्या वादविवाद  चर्चा, न्यायालयात सहभाग आवश्यक आहे. विधी विद्यार्थ्यांसाठी विशिष्ट विषयांवर किंवा समस्येवर किंवा काल्पनिक प्रकरणात कृत्रिम न्यायालये आयोजित करणे म्हणजे खुल्या वादविवाद चर्चा न्यायालये होय. विविध विधी संस्था खुल्या वादविवाद चर्चा, न्यायालय स्पर्धा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर आयोजित करत असतात. या खुल्या वादविवाद चर्चा न्यायालयात भाग घेतल्याने विद्यार्थ्यांना त्यांची विधी कौशल्ये, सादरीकरण कौशल्य आणि संवाद कौशल्य विकसित करता येतात आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना यशस्वी वकील होता येऊ शकते.

हे गुण फक्त सरावामुळे साध्य करता येतात आणि ग्रंथालय सेवा त्यात भर घालतात. खुल्या वादविवाद चर्चा न्यायालय स्पर्धेत सहभागकर्ते यांना न्यायालयीन प्रकरणांशी संबंधित विधी साहित्य एकत्र करावे लागते आणि त्यामुळे योग्य निवाडा देण्यासाठी न्यायालयांना मदत होत असते. अशा प्रकरणात ग्रंथालय खुल्या वादविवाद चर्चा न्यायालय समस्येशी निगडीत विधी साहित्य प्रदर्शित करू शकते आणि ग्रंथसूची तयार केल्याने मूळ दस्तऐवज सहजपणे आणि जलदपणे परत मिळविण्यासाठी मदत होत असते. सहभागकर्त्यांसाठी ही बाब त्यावेळेची गरज असते म्हणूनच विधी ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना, अध्यापकांना आणि मदत कर्मचारी/सहाय्यकांना संशोधन परिस्थितीत नेमक्या कोणत्या प्रकारचे स्वरूप वापरावे, याचा निर्णय कसा घ्यावा यावर मार्गदर्शन करण्यासाठी सर्वोत्तमपणे तत्पर असायला हवे. विधी सिद्धांत आणि विधी ग्रंथसूची यातील त्यांचे नैपुण्य यामुळे विधी ग्रंथपाल हे संशोधन समस्याचे वास्तविक आणि संकल्पनात्मक पैलू यात फरक करू शकतात आणि या विविध प्रकारांच्या समस्यांना सोडविण्यासाठी स्वरूपाचा प्रभाव आणि साधनांची निवड जाणून घेऊ शकतात. विधी विद्यार्थी, अध्यापक आणि कर्मचारीसुद्धा हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर बाबींवर तसेच इलेक्ट्रॉनिक संशोधन संगणक खरेदी आणि इंटरनेट साधनता या विषयांवर विधी ग्रंथपालांची मदत वारंवार घेत असतात.

**6) विधी संशोधनात मदत :**

विधी ग्रंथपालांपुढे हे आवाहन आहे की, विधी माहितीचा शोध घेण्यापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे. त्याचे संशोधन करताना विद्यार्थ्यांना त्यांना मिळालेल्या स्रोतांची विश्वसनीयता व निगडित अधिकाधिक व्यवहार्यता यांचे आकलन आणि मूल्यमापन करण्यास शिकायला हवे. विधी ग्रंथपालांनी आवश्यकपणे विद्यार्थ्यांना फक्त हेच शिकवायला हवे की प्रकाशित इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रीत स्त्रोतात/साधनात अधिकार्यता कुठे स्थित आहे तर सर्वाधिक खात्रीपूर्ण, खर्च मूल्य प्रभावी आणि कार्यक्षम संशोधन धोरण आणि साधने यांची निवड कशी करावी आणि त्यांचा अवलंब कसा करावा हे सुद्धा शिकवावे.

**7) प्रचलित जागरुकता सेवा :**

विधी व्यवसायात माहिती हे फार महत्त्वाचे साधन आहे आणि त्याशिवाय या व्यवसायाचे

कामकाज चालू शकत नाही. प्रचलित जागरुकता सेवा विधी क्षेत्रातील संशोधकांना अतिशय महत्त्वाची ठरेल. कारण कायद्यातील, नियमांतील किंवा कोणत्याही दाव्यातील अंतिम अहवाल यातील किरकोळ बदल यामुळे विधी विश्व आणि विधी व्यवसाय यात बदल घडवू शकतो. आधुनिक सुसंवाद तंत्रज्ञान जसे गट ई–मेल सुविधा, मोबाईल फोनच्या एसएमएस सेवा ऑनलाइन ब्लॉगनिर्मिती करून यांचा वापर करून प्रचलित जागरुकता सेवा अधिक प्रभावी केल्या जाऊ शकतात. या सेवा पुरविल्याने संपूर्ण विधी विश्व आणि त्यात समाविष्ट व्यावसायिक यांना निश्चितच मदत होईल.

**8) जागरुकता (Legal Aid) दरम्यान ग्रंथ प्रदर्शन, विधीविषयक मदत :**

Matheson (1988) यांच्या मते, सामान्य व्यक्तीच्या मनात कायद्याचे महत्त्व याबद्दल जागरुकता निर्माण करणे ही विधी महाविद्यालयांची मुख्य जबाबदारी आहे. हे साध्य करण्यासाठी विधी महाविद्यालये सामान्य व्यक्तींसाठी विधीविषयक जागरुकता/मदत कार्यक्रम आयोजित करत आहेत. ''विधीविषयक मदत हा फक्त एक सर्वसामान्य शब्द आहे. जेणेकरुन सार्वजनिक वित्तीय सहाय्य प्राप्त विधीविषयक सेवांची तरतूद केली जाऊ शकते आणि त्याचा पैलू म्हणजे सल्ला, प्रतिनिधित्व या प्रकारे ओळखली जाते.'' वैधानिक संस्था जसे, विधी सेवा प्राधिकरण आणि काही वेळा संसदीय सुधारणा आणि कायदे यासाठी असलेली कर्नाटक संस्था या कामी वित्तीय सहाय्य पुरवीत असते. विद्यार्थी आणि अध्यापक जवळपासच्या गावाला भेट देतात आणि सामान्य माणसांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आवश्यक असलेले कायद्याचे ज्ञान यावर संभाषण करून मंचावर सोप्या नाट्यकृती सादर करतात. यातील विषय महिला आणि मुलांचे हक्क घरगुती हिंसा, जमिनीच्या बाबतीतील कायदे असू शकतात. या कार्यक्रमाच्या दरम्यान विषयाशी निगडित एक छोटेखानी पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित केल्यास या कार्यक्रमांचा मूळ हेतू साध्य करण्यात नक्कीच मदत होईल. ग्रंथपालांपुढे त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे अतिरिक्त आव्हाने असतात. ग्रंथपालन संकल्पना ही सेवा त्या तत्त्वज्ञानावर आधारित असली तरी, ज्या सेवा ग्रंथपाल पुरवीत असतो, त्या आजच्या काळात तंत्रज्ञानाच्या वापराशिवाय प्रभावीपणे पुरविल्या जाऊ शकत नाही. आजच्या डिजिटल वातावरणात प्रभावी सेवा पुरविण्यासाठी वापर केला

पाहिजे. ज्यामुळे ग्रंथालयाला इतर माहिती आणि सेवा पुरवठादार यांचेवर स्पर्धात्मक विजय मिळविता येईल.

एक शैक्षणिक विधी ग्रंथालय हे त्याच्या ग्रंथ सामग्री, संघटन, व्यवस्थापन आणि वापर या बाबतीत इतर प्रकारच्या शैक्षणिक ग्रंथालयापेक्षा वेगळी असतात. संशोधक अभ्यासकांना सामान्यपणे ग्रंथसूची उपलब्धता प्रदान करणे यासाठी प्रतिविषयावर तज्ज्ञ कौशल्ये आणि विशिष्ट साधनांशी असलेली सान्निध्यता यावर प्रमुखपणे अवलंबून असते. ग्रंथसूची निर्माता म्हणून ग्रंथपालांकडे पुरेशी शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, जेणेकरून माहितीची योग्य व्यवस्था आणि व्यवस्थापन केले जाऊ शकते. संशोधकांसाठी पुरेशी आणि योग्य माहितीची व्यवस्था आणि व्यवस्थापन केले जाऊ शकते. तसेच संशोधकांना पुरेशा आणि योग्य माहितीबाबत मार्गदर्शन करता येईल. विधी संशोधन या क्षेत्रात असे असूनही या गरजा सामान्य कायदे आणि वैधानिक संशोधन यांच्या स्वरूपामुळे अधिक प्रमाणात वाढतात. माहितीची व्यवस्था आणि तिचे सादरीकरण कायद्यांच्या पदानुक्रमांच्या आंतरिक संबंधान्वये करण्यात यावी. या अतिरिक्त अडचणींमुळे विधी ग्रंथालयाच्या प्रत्येक पैलूवर प्रभाव पडत असतो. ज्यात संदर्भ कक्षा येथे देण्यात येत असलेली मदत आणि भौतिक जागा आणि संकलन यांच्या व्यवस्थानासाठी पुरविल्या जाणाऱ्या सेवा हे चक्र समाविष्ट आहे. याशिवाय विधी ग्रंथपालांकडे अतिविशिष्ट ज्ञान, कौशल्ये आणि सेवा पुरविण्यासाठीचा अनुभव ज्यामुळे त्यांच्या अंतिम उपभोक्त्यांच्या मालमत्तेवर, जीवनावर आणि स्वातंत्र्यावर प्रभाव पडतो. हे सर्व असणे अतिशय आवश्यक आहे.

### 2.2.5 विधी ग्रंथालयातील माहिती साधने :

इतर शैक्षणिक ग्रंथालयांना ज्या पारंपारिक सेवा द्याव्या लागतात त्याही विधी ग्रंथालयांना वेळोवेळी द्याव्या लागतात, जसे, ग्रंथालयात ग्रंथांची देवघेव, साहित्याचा शोध, वर्तमानपत्रांतील महत्त्वाची कात्रणे, इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचा शोध घेणे, एकापेक्षा जास्त माध्यमांपासून प्रचलित जागरुकता सेवा देणे, सूची तयार करणे, छापील तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातून माहिती उपलब्ध करून देणे यांसारख्या कितीतरी सेवा पारंपारिक पद्धतीने विधी ग्रंथालय करीत असतात. परंतु त्याचबरोबर विधी ग्रंथालयांना लागणाऱ्या सेवाचा अंतर्भाव करावा लागतो. विधी ग्रंथालयाची

माहिती संसाधने ही इतर ग्रंथालयांपेक्षा फार वेगळी असतात म्हणून हे ग्रंथालय एक विशेष ग्रंथालय म्हणून गणले जाते. त्यांच्या संग्रह विकासाचे धोरण हे फार महत्त्वाचे असते.

**1) विधी ग्रंथालयातील संग्रह :**

विधीविषयक व्यवहाराशी निगडित लेख, दस्तऐवज विशेषतः न्यायालयीन निवाडे, विधी मंडळातील कायदे, संविधाने, परस्पर करार, अध्यादेश, वटहुकूम, नियम, प्रशासकीय नियम आणि नियमावली हाताळण्यासाठी नेहमीच विशिष्ट कौशल्ये लागतात. या पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथे आणि व्यावसायिक प्रकाशने व्यतिरिक्त व नमूद बाबी कोणत्याही विधी ग्रंथालयांची प्रमुख सामग्री ठरतात. विधी ग्रंथालयातील संग्रह खालीलप्रमाणे विभाजित करता येतील.

**आकृती क्र. २.१ : Information Sources of Law Libraries**




**प्राथमिक साधने :**

- राष्ट्राची/देशाची संविधाने
- विधी अधिनियम, नियम, वटहुकूम, अध्यादेश राज्ये आणि केंद्रीय संस्था
- संसदीय चर्चासत्रे/कामकाज  कनिष्ठ आणि वरिष्ठ सभागृह
- राजपत्रे राज्य आणि केंद्रीय शासनांची
- न्यायालयीन निर्णय अहवाल, सर्वोच्च न्यायालय, राज्यातील उच्च न्यायालये न्यायाधिकरण,

विशेष न्यायालये आणि आयोग.

- विधी नियतकालिके
- विधी संस्थांनी निर्मित केलेले शोधप्रबंध आणि शोधप्रकाशने
- शासकीय प्रकाशने.

केंद्र व राज्यशासन वेळोवेळी काही प्रकाशने प्रकाशित करत असतात. त्यापैकी बहुतांश वेगवेगळ्या समित्या आणि आयोग यांचे अहवाल असतात. अशा प्रकारच्या संस्थांचे अहवाल कोणत्याही विधी संशोधनात फार सहाय्यक असतात आणि त्यांचा संदर्भ न घेता संशोधन परिपूर्ण होत नाही.

**द्वितीय साधने :**

- संसदीय आणि वैधानिक संस्था अनावृत्त कायद्याचे संकलन.
- शासकीय विभागांचे नियम आणि अधिसूचना यांची माहिती पुस्तिका.
- आंतरराष्ट्रीय करार, अभिसंधी यांचे संकलन.
- पाठ्यपुस्तके/ग्रंथ आणि तृतीय साधने.

निर्णय सायटेशन, विशिष्ट विषयावरील निर्णयांचा संग्रह, वार्षिक, आनुषंगिक दशवार्षिक.

**2) संग्रहविकास :**

विधी ग्रंथालयात संग्रह विकास व ग्रंथ संपादन ही दोन्ही कार्ये वेगवेगळी केली जातात. या ग्रंथालयात ताज्या विधी घडामोडीची व ऐतिहासिक नोंदीची कुठल्याही परिस्थितीत साधने ठेवणे अनिवार्य असते. ग्रंथपालांना विशेष क्षेत्रातील घडामोडींची माहिती ठेवावी लागते. काही छापील संसाधने जसे Loose Leaf उपलब्ध असतात. वर्षभरासाठी बारा Loose Leaf च्या पुरवण्या मिळतात. या पुरवण्या संग्रहविकास करण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे साधन होय. हा विकास करीत असताना ग्रंथपालांना राष्ट्रातील साधनांसोबत आंतरराष्ट्रीय साधनेही घ्यावी लागतात. आपला कायदा हा इंग्लिश कायद्यावर आधारित असल्याने विधी ग्रंथालयांना हॅल्सबरी लॉ ऑफ इंग्लड, कॉमन वेल्थ रिपोर्ट, लॉ कमिशन, फॉर्म्स अॅड प्रेसिडन्ड इत्यादीसारखे अहवाल आणि

पुनर्आवृत्ती ग्रंथालयात घ्यावे लागतात. अपील संसाधनाचे संकलनाचे कार्य फार महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर ते योग्य किंमतीत खरेदी करणे हे मोठे आव्हान आहे.

अनेक विधी प्रकाशक विधीशी संबंधित डेटाबेसेस वितरित करीत असतात. असे डेटाबेसेस फार प्रबळ व महत्त्वाचे असतात. तसेच अनेक साधनांचा त्यात अंतर्भाव असतो. त्यामुळे त्यांना फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. अशा डेटाबेसची निवड करताना अनेक निकष लावून त्या निकालाला अनुसरून असे डेटाबेसेस ग्रंथालयासाठी निवडले जातात व आपल्या ग्रंथालयाचा संग्रहविकास केला जातो.

विधी ग्रंथालयाला आपला संग्रहविकास करण्यासाठी विधी ग्रंथालयात पुढील साधनांचा अंतर्भाव करावा लागतो. Shrivastave (2009) यांच्या मते पुढील साधने विधी ग्रंथालयात असणे आवश्यक आहेत.

**विधी साहित्य (Legal Literature) :**

a) Bare Acts

b) Commentaries on specific Laws

c) Manuals / Local Acts

d) Reports :

Law Commission Report

Committee / Commission Report

Annual Report

Parlimentary Committee Report

Joint Committe

Select Committe

Standing Committe

e) Gazettes :

Central Government

State Government

f) Parlimentary Debates :

Contitnent Assembly Debates

Lok Sabha Debates

Rajya Sabha Debates

g) Parlimentary Bills :

Lok Sabha Bill

Rajya Sabha Bills

State Ligislative Bills

h) Law Journals :

Academic Journals

Law Reports

Hybrid Journals (Those containing)

Combination of Both articales & Cases.

Journals, such as Acts, Rules Notification ect.

i) Digests

j) Legal Dictionaries

k) Legal encylopedias such as American Jurisprudence, Corpus Juris, Halsbury's Law of England, Halsbury's Law of India.

विधी ग्रंथालयातील वाचकांच्या माहितीच्या गरजांप्रमाणे संग्रहविकास करणे आवश्यक असते. या सर्व ग्रंथ संग्रहांचा मेळ घालण्यासाठी विधी ग्रंथपालांना आपली साधने अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. विधी ग्रंथालयात प्रत्येक साधनाचे वैशिष्ट्य वेगळे असल्याने त्यांचा ग्रंथालयात अंतर्भाव असणे आवश्यक असते. वरील नमूद केलेली साधने जरी ग्रंथालयात समाविष्ट केली तरी पुढील साधने त्या साधनांना जोड म्हणून ठेवणे फार आवश्यक आहे.

जसे :

- Alphabetical Index to all Acts including details of amendments
- Topical Alphabetical Index to important landmark cases.
- Topical Bibliographies on important legal aspects.
- Union catalogue of current periocicals
- In house Databases of case Law.
- In house Database of articals published
  In journals subscribed in the Library.
- Indexing of Government Gazettes.

या सर्व साधनाचा आपल्या ग्रंथालयात समावेश करुन विधी ग्रंथालयाला संग्रहविकास करणे आवश्यक आहे.

### 2.2.6 विधी ग्रंथालयातील ऑनलाइन माहिती साधने :

Dusari, Hanchinal (2012) एकविसाव्या शतकाला मुख्यत्वे ज्ञानाचे शतक मानले जाते. कारण इंटरनेट व world wide web ने माहिती निर्मितीच्या प्रक्रियेत अमुलाग्र बदल घडवून आणला. Greenleaf (2010) आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना, मानवाच्या समस्या, आंतरराष्ट्रीय न्यायालये, विशेष प्रकारच्या तक्रारीविषयक कामकाज चालविणारे न्यायालय (Tribunals) गुंतागुंत वाढविणारे प्रांतीय करार ही उदाहरणे होत.

आजच्या जगामध्ये विधी शिक्षण हे महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विधी ग्रंथालयाला आपला संग्रह प्रबळ करणे गरजेचे झाले. त्यासाठी विधी ग्रंथालयांनी चांगल्या प्रकारची छापील साधने ग्रंथालयात संग्रहित करण्याबरोबर महत्त्वाची इलेक्ट्रॉनिक साधने ग्रंथालयात घेणे तेवढेच गरजेचे आहे.

**Lexis Nexis Academic Universe :** लेक्सिसनेक्सिस हा प्रकाशक सर्वसमावेशक माहिती डेटाबेसमध्ये पुरविण्यासाठी अग्रगण्य आहे. या डेटाबेसमध्ये विधीच्या अनेक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. ह्या डेटाबेसमधून 5 अब्ज दस्तऐवजातून माहिती शोधता येते. हा डेटाबेस 900 विधी नियतकालिकांमधून 300 पेक्षा अधिक माहिती विधी वर्तमानपत्रांमधून उपलब्ध करून देतो. अमेरिकेच्या अतिउच्च न्यायालयातून 1790 सालापासून ते आजपर्यंतची माहिती उपलब्ध होते. 1971 पासून पेटंट तसेच 1988 पासून सर्व फेडरल कायदे यामध्ये उपलब्ध आहेत.

**West Law :** वेस्ट लॉ थॉम्सन वेस्ट या प्रकाशकाचा विधी ऑनलाइन डेटाबेस आहे. हा डेटाबेस अगदी जलद व सोप्या पद्धतीने त्यात समावेश असलेले संग्रह पुरवितो. यात ब्रिटन आणि अमेरिकेतील साहित्यावर प्रकाश टाकला जातो. यामध्ये UK चे 1865 पासूनचे न्यायनिवाडे आहेत. अमेरिका (फेडरल आणि स्टेट) चे 1658 पासून, युरोपियन युनियनचे 1952 पासून, ऑस्ट्रेलियाचे 1903 पासून, हाँगकाँगचे 1905 पासून, कॅनडाचे 1825 पासून निवाडे आहेत. हे

डेटाबेस 1000 नियतकालिकांचे व विधी समीक्षांची माहिती देतात. पारित झालेले कायदे व बातम्या पुरवितात.

**Hein online** : या डेटाबेसमध्ये विधी नियतकालिकांचा संग्रह मूळ प्रतिमेसारखाच असतो. छापील प्रतिमेप्रमाणेच यात विधी नियतकालिकांची प्रतिमा पाहावयास मिळते. यामध्ये 70 दशलक्ष पानांचा कायद्याचा इतिहास ऑनलाइन उपलब्ध होऊ शकतो. ह्यात 1500 कायदे व विधी संदर्भातील मासिके आहेत. याव्यतिरिक्त नियतमासिकांचा मोठा संग्रह आहे.

विधीचे महत्त्वाचे ग्रंथ सोळाव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत उपलब्ध आहेत. अमेरिकेचे विविध देशांमधील करार यात उपलब्ध आहेत.

**Lexia India :** ह्या प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा समावेश केला आहे. प्राथमिक साधनांमध्ये विधी नियतकालिकांचा समावेश करण्यात आला आहे. जसे मद्रास लॉ जर्नल, (केस लॉ) (क्रिमिनल) समावेश आहे. ह्यात भारतातील अतिउच्च न्यायालयीन निवाड्याचे 1950 पासून आजपर्यंत व 10 उच्च न्यायालयांचे निवाडे दिलेले आहेत.

**West Law India :** यात भारतीय दाव्यांचे निकालांबरोबरच इंग्लंड, अमेरिका, युरोपियन युनियन व इतर कॉमनवेल्थ न्यायालयाचे निवाडे समाविष्ट आहेत. त्यात अतिउच्च न्यायालयाचे 1950 पासून आतापर्यंतचे निकाल आहेत. यात 20 उच्च न्यायालयाचे 330,000 च्या पेक्षा जास्त पूर्ण लिखित निवाडे दिलेले आहेत. तसेच 70,000 विविध तक्रारीचे (Tribunals) कामकाज चालविणाऱ्या न्यायालयाचे निकालही दिलेले आहेत.

**Manupatra :** 2001 पासून Manupatra हे एक भारतात सर्वात अधिक पसंतीचे डेटाबेस आहे. त्यांत भारताच्या अतिउच्च न्यायालयाचे मूळ निकाल 1950 पासून आजपर्यंत दिलेला आहे. तसेच 21 उच्च न्यायालयाचे निकाल सर्व विषयांवरील ट्रिब्युनल हा कमिशनच्या आज्ञा निकाल 1754 पासून आजपर्यंत 30 विधी विषयाचे नमुने दिले आहेत. तयार करारांचे व करारनाम्यांचे नमुने त्यात उपलब्ध आहेत.

**Legal Pundits :** हा डेटाबेस इंटरनेटवर विधी आणि माहितीसेवा नियमित पुरविते. ह्यात भारतीय अतिउच्च न्यायालयाचे ट्रिब्युनल, जाहीर बातम्या देणारी परिपत्रके Bare Acts नमुने विधीच्या समस्या व मते यात उपलब्ध आहेत.

**S.C.C. :** ह्यात अतिउच्च न्यायालयाचे 1969 पासून आतापर्यंत निर्णय समाविष्ट आहेत. न्यायालयातील दाव्यांच्या टिपण्या, निर्णय, आशा 1950-1969 उपलब्ध आहेत. त्यात 21 उच्च न्यायालयांचे Tribunals व Commissions चे निकाल ही मिळतात. तसेच त्यांत आंतरराष्ट्रीय गोषवारा जसे इंग्लिश विधी. विधीचे अहवाल 1865 पासूनचे आहेत. आठवड्याचे कायद्याचे अहवाल 1853 पासून मिळतात. मानवाचे करार व परिषद, संविधानाची दक्षिण आफ्रिका, पश्चिम आफ्रिकेचे न्यायालयीन कामकाज कोर्टात दाद मागणेचे कोर्टाचे कामकाजाची माहिती दिली आहे.

**E-Jurix :** भारतातील विधीच्या संदर्भातील माहितीचा हा इलेक्ट्रॉनिक संग्रह आहे. त्यामध्ये 250,000 सर्वोच्च न्यायालयाचे संपूर्ण मजकूर असलेले निर्णय अंतर्भूत करण्यात आले आहेत. आजपर्यंतचे उच्च न्यायालयांचे निर्णय ट्रिब्यिनल्स्चे निर्णयसुद्धा यात सामावलेले आहेत.

**INDLAW :** या डेटाबेसमध्ये भारतीय विधीविषयक माहिती, कर व्यवसाय, नियामक संबंधित समस्या यावर विधी साहित्य उपलब्ध आहे. INDLAW Indian law online प्रकल्पाचा भाग आहे. हा प्रकल्प 1997 मध्ये सुरू झाला. व्यावसायिक आणि शैक्षणिक स्वरूप असलेला हा प्रकल्प इंग्लंडच्या धर्तीवर आधारित आहे. भारतात इलेक्ट्रॉनिक विधी ग्रंथालय तयार करण्यासाठी तसेच कायदेपंडित, वकील, विद्यार्थी आणि पक्षकार यांना सक्षम करण्यासाठी या डेटाबेसमध्ये प्राथमिक व दुय्यम साधनांचा समावेश करण्यात आला. भारतातील व युनायटेड किंगडम याच्या प्रतिनिधींनी नियुक्त केलेले कायदे यात पाहावयास मिळतात.

**World Bank Resource online**.

वर्ल्ड बॅक ई–लायब्ररी पोर्टल आहे. यात आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी अहवाल आणि दस्तऐवज हा डेटाबेस पुरवितो.

**Jstor :** जेस्टोर हा असा प्रकल्प आहे की जो जर्नल्स्च्या संग्रहीत प्रतींचे अंकीकरण करीत आहे. जेस्टोर नियतकालिकाचे नवीन अंक उपलब्ध करून देत नाही. परंतु दोन वर्षामागील पूर्ण जर्नल्स्चे अंक वापरावयास देते. या डेटाबेसमधून अनेक ऐतिहासिक गोष्टींचा गोषवारा पाहावयास मिळतो.

**CLA :** कॉर्पोरेट/सेबी/कॉर्पोरेट लॉ ॲडव्हायझर यासाठी भारतातील प्रमुख ऑनलाइन ई–ग्रंथालय. 1950 पासून माहिती पुरवित आहेत. ई–ग्रंथालय, केस लॉज (हेड नोटसह), कंपनी

विधी प्रक्रिया ठराव, परीक्षणे, विविध मंत्रालय/विभागाचे अधिसूचना आणि परिपत्रके, अद्ययावत कायदे यांचा यात समावेश आहे.

**Ebsco – Legal Database :** हा कायद्याचा अधिकृत डेटाबेस आहे. आंतरराष्ट्रीय डेटाबेस आहे. हा डेटाबेस नामांकित असणारे विधी नियतकालिकेचे निर्देशन आणि संपूर्ण मजकूर उपलब्ध करुन देतो. वकील, शिक्षक, व्यावसायिक विधी ग्रंथपाल विद्यार्थी यांच्यासाठी एक उत्कृष्ट ऑनलाइन साधन आहे. यामध्ये 1100 पेक्षा अधिक पूर्ण मजकूर जर्नल्स, विधी जर्नल्स कायद्याचा आढावा, इयर बुक बार असोसिएशनची प्रकाशने. आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची प्रकाशने, विस्तृत अनुक्रमणिका, ग्रंथांचा आढावा, केस स्टडीज, 2.2 दशलक्ष कायद्यांच्या रेकॉर्डस्‌चा समावेश या डेटाबेसमध्ये केला आहे. विविध विधी विषयांना यात स्थान देण्यात आले आहे.

**Taxmann :** टॅक्समन हा भारतीय डेटाबेस आहे. कॉर्पोरेट लॉ संबंधित हा प्रकाशक आहे. ग्रंथ प्रकाशित करण्याबरोबर कॉर्पोरेट विधी लेखा परीक्षण, भारतीय विधी नियम यावर अचूक आणि सर्वात मोठ्या ऑनलाइन डेटाबेसचे व्यवस्थापन टॅक्समन डेटाबेसमध्ये केले जाते. यामध्ये पुढील साधनांचा समावेश होतो.

- टी.डी.एस. रिटर्न्सचे इ फायलिंग
- आयकर विवरणांच्या करमोजणी
- इ.टी.डी.एस प्रकरणांमध्ये परवान्याचा शोध (हा डेटा एक्सेल फॉरमॅट मध्ये उपब्ध केला जातो)

**2.2.7 ऑनलाइन मोफत उपलब्ध असणारी निवडक विधी साधने :**

ज्या ग्रंथालयाचे अर्थसहाय्य मुबलक प्रमाणात आहे, ती ग्रंथालये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय डेटाबेस आपल्या ग्रंथालयांसाठी वर्गणी भरून घेतात. परंतु अशी बरीच ग्रंथालये आहेत ज्यांना वर्गणीदार होऊन डेटाबेस घेता येणे शक्य नसते, कारण त्यांच्या वार्षिक वर्गण्या काही लाखांमध्ये आहेत. अनेक ऑनलाइन विधी साधने इंटरनेटवर उपलब्ध आहेत. त्यातील निवडक साधने पुढीलप्रमाणे :

- Legal Information Institute of India (LII of India) http://liiofindia.org/
- The judgement Information system (JUDIS) http://judis.nic.in
- India Legal information institute (Indlii) http://www.indlii.org
- Indian kanoon http://www.indiankanoon.org
- World Legal information institute (world Lii) http://www.worldlii.org
- Australian Legal information institute (Aust LII) http://www.austlii.edu.au/
- Findlaw http://www.findlaw.com
- Lexis Nexis Communities http://www.lexisone.com/ix1/caselaw
- American Bar Association and legal technology resources /resources/free journal search.htm http://www.americanbar.org / groups/departments
- Open Access Law.Adopting journals http://sciencecommons.org

### 2.2.8 विधी ग्रंथालय पद्धती :

विधी ग्रंथालयात छापील व इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये मनुष्यांनी प्राप्ती केलेल्या ज्ञानाचे संग्रह केले आहेत. Deakin University Australia (2014) ने विधी ग्रंथालयात उत्तम प्रतीची विधीविषयक माहिती विविध संसाधनांमधून वकील, संशोधक, अध्यापक व विधीच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ, नियतकालिके व जर्नल उपलब्ध करुन दिली आहेत. विधी ग्रंथालय विविध कार्य पद्धतीने, माहितीचे प्रसारण करण्याचे कार्य करते.

विधी ग्रंथालये विधी विषयांवरील संसाधने उपलब्ध करुन देतात. छापील व इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जगभरातील विधीविषयक माहिती विधी ग्रंथालयातून मिळते. काही वर्षापूर्वी विधी ग्रंथालयात पारंपारिकरित्या छापील ग्रंथ, नियतकालिके, मासिके व वर्तमानपत्रे ठराविक जागी ठेवली जात व वापर करणाऱ्याला ग्रंथपालांच्या मदतीने शेल्फवरील कार्डाच्या व कॅटलॉगच्या विषयांच्या इंडेक्सच्या आधारे ग्रंथ मिळत.

माहितीच्या परिस्फोटामुळे त्यावर नियंत्रण आणण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने विधी ग्रंथालयात जलद प्रगती झाली. त्यामुळे विधी ग्रंथालयात माहिती संप्रेषणाचा वापर वाढला व ग्रंथालयात सुधारणा झाली. Lowal, (2012) यांनी असे सांगितले की, विधी ग्रंथालयात काही विधीविषयक माहितीची परिमाणे दिली आहेत. त्यात इलेक्ट्रॉनिक व मानवी संसाधने धरली जातात. वकिली व्यवसायातील लोकांना, विधी अध्यापकांना, विद्यार्थ्यांना

संगणकाचे शिक्षण व ज्ञान मिळविणे व वापरणे आवश्यक आहे.

**Bar Council of India Rules :** (2008) च्या नियमाप्रमाणे ग्रंथालयामध्ये कमीत कमी कोणती साधने आवश्यक आहेत याची यादी प्रस्तुत करण्यात आली आहे. त्यामध्ये मुद्रित आणि अंकित स्वरुपातील साधनांना यात सामावलेले आहे. त्यावर दृष्टिक्षेप टाकल्यास लक्षात येते की, बीसीआयने पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ व नियतकालिके ऑनलाइन, ऑफलाइन डेटाबेसेसला यात सामावून घेतले आहे.

विधी ग्रंथालयात कायद्याची माहिती विद्यार्थ्यांना, अध्यापकांना, संशोधकांना व व्यावसायिकांना ग्रंथालयाच्या आत व बाहेर Remote access चा वापर करून ऑनलाइन माहिती साधने वापरण्याची मिळण्याची सोय केली जाते. विधी अध्यापकांना विधी अभ्यासक्रमासाठी संसाधनाची प्रगती केली जात आहे. विधी संशोधन पारंपरिक रीतीने सुरू झाले. मात्र आता इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यात फार बदल घडत आहे. हा बदल निश्चितच माहिती प्रसारणाचे तंत्र वाढल्याने घडला आहे. Du Plessis (2008) विधी संशोधन करण्यास संगणक वापरण्याची कला व इंटरनेट ब्राऊजिंग करण्याची कला ही विधी माहिती इलेक्ट्रॉनिक व ऑनलाइन डेटाबेसेस (कायद्याचे)मुळे होऊ शकते. माहिती संप्रेषणाच्या तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे व प्रगतीमुळे प्राथमिक व दुय्यम विधी संशोधनाचे काम कॉम्पॅक्ट डीस्कने व छापील प्रकाशने करण्याऐवजी इंटरनेटने संग्रहित केले जाते. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे विधीविषयक माहितीचे संसाधन व त्याचा इतर विधी विषयावर परिणाम झाला आहे. त्यात विधी शिक्षण, कायद्याचे लॉ, सायबर लॉ असे विषय मोडतात. हे विषय असले तरीही माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर संशोधन करण्यासाठी हे तंत्रज्ञान अत्यावश्यक आहे. त्यावरच अनुभवी संशोधक सामान्य संशोधकांपेक्षा सक्षम दिसून येतो, असे Du Plessis यांचे मत आहे. विधी विद्यार्थ्यांना उत्तम संसाधन व तत्कालीन माहिती पुरविणारे संसाधन म्हणून माहिती संप्रेषण तंत्रज्ञान ओळखले जाते.

### 2.2.9 विधी ग्रंथालय अर्थसहाय्य :

विधी ग्रंथालयांना नेहमी एक प्रश्न भेडसाविणारा असतो. तो म्हणजे, ग्रंथालयाला मिळणारे अर्थसहाय्य/अर्थपुरवठा होय. भारतात ग्रंथालयाला अर्थसहाय्य द्यावयाचे झाल्यास इतर

बाबीच्या खर्चाच्या तरतुदी झाल्यानंतर सरतेशेवटी ग्रंथालयाचा विचार केला जातो. हे फक्त भारतात होते असे नव्हे तर Jacobstein (1962) म्हणतात, 'युनायटेड नेशन्समधील स्टॅम्फर्ड' ग्रंथालयाबाबत त्यांनी निदर्शनास आणून दिले की, ''विधी ग्रंथालय हे विधीचे हृदय'' आत्मा आहे. परंतु खर्चाची वेळ आल्यास सुरुवातीला अर्थसहाय्य मिळत नाही. भारतातील स्थिती याहून बिकट आहे. बऱ्याच शासकीय ग्रंथालयांना पुरेसे अर्थसहाय्य मिळत नाही. विधी ग्रंथालयांची स्थिती थोड्याफार अंशी तशीच आहे. परंतु खाजगी विधी संस्थांना स्पर्धेच्या जगात टिकून राहण्यासाठी, आपले वेगळेपण सिद्ध करण्यासाठी तेथील विधी ग्रंथालयांवर लक्ष केंद्रीत करावे लागते. त्यामुळे त्या विधी (खाजगी) क्षेत्रातील ग्रंथालयांना पुरेसे अर्थसाहाय्य मिळत असते.

**2.2.10 विधी ग्रंथालयांचे भवितव्य :**

इतर ग्रंथालयाप्रमाणे विधी ग्रंथपालांनासुद्धा डिजिटल संसाधने वापरण्याची संधी उपलब्ध झाली. अनेक फायदे ह्या संसाधनेच्या वापराने होणार होते. एकाच वेळी अनेकजण हे इलेक्ट्रॉनिक संसाधन वापरू शकत असल्याने जागेची, पैशाची, वेळेची बचत होते. छापील ग्रंथाच्या उपलब्धतेपेक्षा नवीन ताजी माहिती डिजिटल संसाधनांमुळे ताबडतोब मिळू शकते. लुज लिफ्‌ची ई–आवृत्ती सभासदांना/विद्यार्थ्यांना डिजिटल स्वरूपात लगेच मिळू शकते. विधी फर्मसाठी हे साध्य आहे. कारण सभासदांची ओळख आयडी स्वरूपात होऊ शकते. परंतु विधी संस्थेच्या ग्रंथालयात जेथे खूप सदस्य असतात तेथे ओळख पटविणे कठीण असते. तसेच सर्व ग्रंथ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध नसतात. पूर्वीपासून विधीविषयक माहिती छापील व ग्रंथाद्वारे प्रसारित होते. वकिली व्यवसाय करणारे (ग्रंथाच्या पहिल्या पानापासून शेवटच्या कव्हरपर्यंत) वाचत नाहीत. त्याऐवजी एखादा उल्लेख काढून ग्रंथातील प्रकरण काढतात. त्यावरून टिपणी, लेख, दस्तऐवज तयार करुन न्यायालयात सादर करतात. येथे असे म्हणता येऊ शकते की, छापील संसाधन हे इलेक्ट्रॉनिक संसाधनापेक्षा निश्चित उतारा देण्यास उपयुक्त ठरतात. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये अनेक उतारे दिलेले असतात. हे सहजरित्या मिळू शकतात व बदलू शकतात. पण छापील उतारे हे जास्त स्थायी व व्यावसायिक असतात. कारण त्याचा वापर व्यावसायिक वकील अनेक वर्षे करीत आलेले असतात.

पुढील काळात मुद्रित संग्रहापेक्षा इलेक्ट्रॉनिक संसाधनेवर जास्त भर दिला जाईल असे वाटत होते परंतु असे झाले नाही. कारण विधी संशोधन हे किचकट आहे व ते पूर्व निकालांवर, ग्रंथांवर, संसाधनांवर बऱ्याच अंशी अवलंबून आहे. इलेक्ट्रॉनिक संसाधने ताज्या माहितीसाठी मोठ्या प्रमाणात वापरली जात असली तरी वकिलांना/विद्यार्थ्यांना काही वेळेला जुन्या माहितीची आवश्यकता असते व ती अभ्यासांच्या ग्रंथांमधून मिळू शकते. आजच्या काळात ई–संसाधने तयार करण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तरी ते वापरणे कठीण आहे. डेटाबेस व ई–बुक्स महाग असतात. बऱ्याचदा ग्रंथालयांना ह्या गोष्टींसाठी अर्थसंकल्पात वाढ करावी लागते. डेटाबेसवर लायसन्सर फी ही सभासदांच्या क्रमांकावर अवलंबून असते.

ई–बुक्स हे वाचनासाठी सर्वाधिक लोकप्रिय आहे. परंतु विधी क्षेत्रात परिस्थिती वेगळी आहे. प्रकाशकांनी त्याच्या इलेक्ट्रॉनिक आवृत्ती काढलेल्या नाहीत. प्रकाशक योग्य संग्रह प्रकाशित होण्यासाठी झगडत आहे. परंतु त्यांना अजूनही ग्रंथालयांना व विधी विद्यार्थ्यांना वकिली व्यवसाय करणाऱ्याला त्याचे वाचन संग्रह घेणे जमलेले नाही. हळूहळू विधी ग्रंथालय ही डिजिटल संसाधनेकडे वळतील परंतु छापील संसाधनांसाठीदेखील त्यात जागा राहील.

भारतात एक सामाजिक शास्त्रातील डॉक्युमेन्टेशन सेंटर (NASSDOC) आहे परंतु त्यामध्ये विधी संग्रहांचा समावेश केलेला नाही.

### 2.2.11 भारतातील विधी ग्रंथालये :

विधी ग्रंथपाल, न्यायालयीन संस्थेचे ग्रंथपाल हे विशेषतः हे इतर कोणत्याही शाखेतील ग्रंथपालांपेक्षा वेगळे आहेत. Kavass (1975) यांनी असे स्पष्ट केले की, विधी ग्रंथालय हे इतर ग्रंथालयांपेक्षा वेगळे आहेत कारण हा एक असा व्यवसाय आहे की, ग्रंथाचा वापर न करता त्यांचे काम होऊच शकत नाही. इतर संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना, उपभोक्त्यांना माहिती पुरविण्यासाठी ग्रंथपाल वेळ घेऊ शकतात वा आपल्या सोयीप्रमाणे संसाधने पुरवू शकतात. त्या उपभोक्त्यांची गरज निवडक आहे. तात्काळ न भागविल्यासही चालते. परंतु विधी ग्रंथपालाला त्यांच्या उपभोक्त्यांना इच्छित असणारी माहितीही तात्काळ सादर करावी लागते. कारण त्यांचा न्यायालयात दावा चालू असताना इच्छित माहिती वादविवादाच्या वेळेस सादर करावी लागते.

त्यामुळे विधी ग्रंथपालाला कोणतेही निमित्त न सांगता त्वरित माहिती प्रदान करणे आवश्यक आहे. या कारणासाठी विधी ग्रंथपाल अतिशय जागृत व दक्ष व्यावसायिक असणे आवश्यक आहे व त्वरित इच्छित माहिती प्रदान करण्यासाठी त्यांच्या ग्रंथालयांची साधने आपल्या कौशल्याने विकसित करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

Kavas, यांनी असे म्हटले आहे की, ''विधी ग्रंथालये इतर प्रकारच्या ग्रंथालयापेक्षा वेगळी आहेत. कारण ते एका अशा व्यवसायाला सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत जे आपले कर्तव्य पुस्तकांच्या वापराशिवाय बजावूच शकत नाहीत''

**2.2.12 भारतातील विधी ग्रंथपालनाची सद्यस्थिती :**

भारतातील विधी ग्रंथपालन क्षेत्राकडे अजूनही एक नवीन क्षेत्र म्हणून पाहिले जाते. या ग्रंथालयांचा विकास समन्वित पद्धतीने होणे आवश्यक आहे. Sinha (2016) च्या आकडेवारीनुसार भारतात एकूण 1124 विधी संस्था आहेत, 430 दुय्यम न्यायालये, 22 उच्च न्यायालये, 14 बेन्च कोर्ट व एक सर्वोच्च न्यायालय आहे. विधीच्या अनेक संशोधन संस्था आहेत. परंतु त्यांच्यामध्ये कोणतेही संसाधने शेअर(मिळून वापरण्यासाठी) करण्यासाठी पुढाकार घेतला जात नाही.

विधी ग्रंथालयाचा कोणताही कन्सोरशिया(संघ) कार्यरत नाही. काही विधी संस्थेच्या ग्रंथपालांकडून कन्सोरशिया तयार करण्यासाठी प्रयत्न केले गेले परंतु हे प्रयत्न तुटपुंजे पडले. मुंबईमध्ये 2006 मध्ये विधी ग्रंथपालांच्या एका परिषदेचे आयोजन केले होते. तो प्रयत्न म्हणजेच असोसिएशन ऑफ लॉ लायब्ररीयन,परंतु औपचारिकरित्या ती संघटना नोंदणीकृत होऊ शकली नाही.

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका येथे जशी अमेरिकन बार असोसिएशन विधी ग्रंथालयांसाठी आहे, तशी कोणतीही एजन्सी भारतामध्ये उपलब्ध नाही. बार कौन्सिल ऑफ इंडिया BCI (2008) ने विधी संस्थांना मान्यता देण्यासाठी ग्रंथालयात कोणत्या ग्रंथसंग्रहाची उपलब्धता असणे आवश्यक आहे यासंबंधी काही नियम ठरवून दिलेले आहेत. परंतु एकदा संस्थांना मान्यता मिळाल्यास कोणतीही पद्धती उपलब्ध नाही की, ज्यामुळे त्या संस्था नियमांचे पालन करतात की नाही यांची माहिती मिळू शकेल.

नॅशनल मेडिकल लायब्ररी व नॅशनल ॲग्रीकल्चरल लायब्ररी उपलब्ध आहे, परंतु नॅशनल लॉ लायब्ररी भारतात उपलब्ध नाही. डिफेन्ससाठी (DESIDOC), ॲग्रीकल्चर सायन्ससाठी (ARIC), नॅचरल सायन्ससाठी (INSDOC NOW NISCAIR) आणि लहान कंपन्यांसाठी (SENDOC) उपलब्ध आहेत, परंतु विधी ग्रंथालयांसाठी कोणतेही डॉक्युमेन्टेशन सेंटर उपलब्ध नाही.

**2.2.13 भारतातील नामांकित पहिल्या पंधरा क्रमांकाची विधी महाविद्यालये :**

भारतामध्ये विधी महाविद्यालयांची संख्या फार मोठी आहे. प्रत्येक महाविद्यालयाला संलग्न विधी ग्रंथालये आहेत. विधी महाविद्यालयांची सधनता, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा, त्यांच्याकडून फीच्या स्वरूपात स्वीकारण्यात येणारा अर्थपुरवठा, त्यांना देण्यात येणाऱ्या नोकऱ्या, आणि त्यांच्यासाठी सर्व साधनसामग्रीने सज्ज असणारे ग्रंथालय या सुविधांच्या आधारे भारतातील विधी महाविद्यालयाचे व ग्रंथालयाचे मूल्यांकन करून त्यांना खाजगीरित्या श्रेणी दिली जाते. या श्रेणीच्या आधारावर कोणते विधी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी सज्ज आहे याची प्रचिती येते. याविधी महाविद्यालयांचा श्रेयांक वाढला तर आपोआपच विधी ग्रंथालयाचा श्रेयांकसुद्धा वाढतो. इंडिया टुडे (2017) या मासिकाने नुकतेच भारतातील विधी महाविद्यालयांची श्रेणी जाहीर केली. त्यामध्ये भारतातील केवळ एकूण पंधरा विधी महाविद्यालये अग्रस्थानी आहेत. त्या मान्यवर विधी महाविद्यालयांबरोबर त्याचे ग्रंथालयही त्या श्रेणीत बसते. भारतातील अशा विधी ग्रंथालयांचा एकूण ग्रंथसंग्रह व त्याच्याकडे उपलब्ध असलेले ऑनलाइन संसाधने पुढील तक्त्यांच्या सहाय्याने दर्शविण्यात आली आहेत.

**तक्ता क्र. 2.2**

**भारतातील पहिल्या पंधरा क्रमांकातील विधी महाविद्यालयातील माहितीची छापील आणि इलेक्ट्रॉनिक संसाधने दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | श्रेयांक संस्थेचे नाव | छापील साधने | इलेक्ट्रॉनिक संसाधने |
|---|---|---|---|
| 1 | नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी, | 34,000 | 1) केम्ब्रीज बुक ऑनलाइन डेटाबेस<br>2) क्लुवर आर्बिट्रेशन |

| | | | |
|---|---|---|---|
| | बेंगलोर | | 3) वेस्ट लॉ इंडिया आणि इंटरनॅशनल<br>4) हिन ऑनलाइन<br>5) लेक्सिस नेक्सिस<br>6) मनुपात्रा<br>7) एस. सी. सी. ऑनलाइन<br>8) इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट<br>9) लीगल सूत्र<br>10) टॅक्समन<br>11) ब्लुम्सबरी कलेक्शन<br>12) वर्ल्ड बुक लायब्ररी |
| 2 | फॅकल्टी ऑफ लॉ. अलीगड युनिव्हर्सिटी, अलीगड | 35,500 | 1) मनुपत्रा<br>2) एस.सी.सी. ऑनलाइन |
| 3 | द वेब नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ज्युरिडिकल सायन्सेस (NUJD) कोलकत्ता | 22,000 | 1) केम्ब्रीज युनिव्हर्सिटीज एरियाज<br>2) मनुपात्रा<br>3) एस.सी.सी.<br>4) वेस्ट लॉ<br>5) हिन ऑनलाइन<br>6) लेक्सिस नेक्सिस इंडिया<br>7) जेस्टोर<br>8) क्लुअर वॉल्टर<br>9) ब्लुम्सबरी कलेक्शन |
| 4 | ॲमिटी लॉ स्कूल, नॉयडा | 10,116 | 1) वेस्ट लॉ इंडिया |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 2) मनुपात्रा<br>3) एस.सी.सी.<br>4) ई – बुक्स |
| 5 | स्कूल ऑफ लॉ, क्रीस्ट युनिव्हर्सिटी, बेंगलोर | 2,35,108 | 1) इबस्को<br>2) हिन ऑनलाइन<br>3) जेस्टोर<br>4) लेक्सिस नेक्सिस<br>5) मनुपात्रा<br>6) वेस्ट लॉ<br>7) प्रोक्वेस्ट<br>8) ई – लायब्ररी |
| 6 | भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, पुणे. | 33,949 | 1) मनुपात्रा<br>2) वेस्ट लॉ<br>3) एस.सी.सी. ऑनलाइन<br>4) सी.एल.ए. ऑनलाइन<br>5) टॅक्समन ऑनलाइन |
| 7 | फॅकल्टी ऑफ लॉ, बनारस हिंदू युनिव्हर्सिटी, वाराणसी | 80,000 | 1) वेस्ट लॉ इंडिया<br>2) मनुपात्रा<br>3) जेस्टोर |
| 8 | सिंबायोसिस लॉ स्कूल, पुणे | 63,940 | 1) मनुपात्रा<br>2) सी.एल.ए. ऑनलाइन<br>3) वेस्ट लॉ<br>4) लेक्सिस नेक्सिस अकॅडेमिक<br>5) लेक्सिस नेक्सिस |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 6) हिन ऑनलाइन<br>7) जेस्टोर<br>8) टॅक्समन<br>9) इंडेक्स टू लिगल पिरीऑडिकल<br>10) इबस्को<br>11) क्लुवर आर्बिट्रेशन<br>12) क्लुवर कॉम्पीटिशन लॉ<br>13) क्लुवर पेटंट लॉ<br>14) इमराल्ड<br>15) ऑक्सफर्ड कॉन्स्टिट्यूशन ऑफ द वर्ल्ड<br>16) ए.आय.आर. ऑनलाइन<br>17) ऑक्सफर्ड हॅन्डबुक्स ऑनलाइन(ई–बुक्स)<br>18) केम्ब्रीज ऑनलाइन बुक डेटाबेस |
| 9 | फॅकल्टी लॉ आय.सी.एफ.ए.आय युनिव्हर्सिटी, डेहराडून | 24,179 | 1) इबस्को<br>2) मनुपात्रा |
| 10 | आय.एल.एस.लॉ कॉलेज, पुणे | 60,000 | 1) ए.आय.आर. ऑनलाइन<br>2) एस.सी.सी. ऑनलाइन<br>3) मनुपात्रा<br>4) लेक्सिस नेक्सिस<br>5) जेस्टोर<br>6) वेस्ट लॉ |
| 11 | गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, गांधीनगर | 35,000 | 1) जेस्टोर<br>2) मनुपात्रा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3) वेस्ट लॉ इंडिया<br>4) हिन ऑनलाइन<br>5) वर्ल्ड बुक ई लायब्ररी<br>6) सी.एल.ए.ऑनलाइन<br>7) टॅक्समन<br>8) सी.एम.आय.इ.<br>9) लेक्सिस नेक्सिस इंडिया<br>10) क्लुअर आर्बिट्रेशन<br>11) एस.सी.सी. ऑनलाइन<br>12) ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इलेक्ट्रॉनिक जर्नल |
| 12 | आर्मी इन्स्टिट्यूट लॉ, मोहाली | 10367 | 1) मनुपात्रा<br>2) लेक्सिस नेक्सिस<br>3) वेस्ट लॉ<br>4) एस.सी.सी. ऑनलाइन<br>5) हिन ऑनलाइन<br>6) जेस्टोर |
| 13 | के.एल.ई.सोसायटीज लॉ कॉलेज, बेंगलोर | 17,398 | 1) वेस्ट लॉ इंडिया<br>2) वेस्ट लॉ इंटरनॅशनल<br>3) एस.सी.सी. ऑनलाइन<br>4) ग्रँड ज्युरिक्स |
| 14 | सी.एम.आर. लॉ स्कूल, बेंगलोर | 28550 | 1) मनुपात्रा<br>2) एससीसी ऑनलाइन |
| 15 | युनिव्हर्सिटी लॉ कॉलेज, बेंगलोर | 58,000 | 1) मनुपात्रा<br>2) वर्ल्ड ई बुक लायब्ररी |

### 2.2.14 विधी ग्रंथालयांचे आधुनिकीकरण :

#### 2.2.14.1 प्रस्तावना :

आधुनिकीकरण ही सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. आधुनिकीकरणाने प्रत्येक क्षेत्रात आपले प्रबळ स्थान प्रस्थापित केले आहे. विधी महाविद्यालयात ग्रंथालय शैक्षणिक क्षेत्रात एक महत्त्वाचा घटक मानला जातो. येथील उपभोक्त्यांना ग्रंथालयाचा वापर सतत करावा लागतो. आधुनिक काळामध्ये त्यांना पारंपारिक ग्रंथालयावर अवलंबून न राहता पारंपारिक साधनाच्या जोडीला आधुनिक साधनांची जोड देणे आवश्यक आहे. शिक्षणाबरोबरच त्यांना संशोधन व प्रशिक्षण, चर्चासत्र, विधीविषयक अनेक कार्यक्रम मूटकोर्ट, विधी महाविद्यालयाच्या अनेक न्यायालयामध्ये व्यावसायिकांना ताजी माहिती त्वरित पुरवावी लागते. त्याच्या बळावर व्यावसायिकांना त्यांच्या केसेसवर प्रकाश टाकता येतो. त्यासाठी विधी ग्रंथालयांचे आधुनिकीकरण होणे काळाची गरज आहे.

#### 2.2.14.2 पारंपरिक विधी ग्रंथालये :

विधी महाविद्यालयातील पारंपरिक ग्रंथालयामध्ये त्या काळातील सर्वोत्तम पद्धती वापरून ग्रंथ खरेदी करणे, त्यावर प्रक्रिया करणे, सोपस्कर करणे यांचे संघटन, तालिकीकरण, वर्गीकरण, सूची तयार करणे अशी पारंपारिक कामे करावी लागत. उपभोक्त्यांच्या मागणीवरुन ग्रंथालयातील माहिती त्यांना पुरविली जात असे. कोणतेही विधी साधने दस्तऐवज ग्रंथालयातून उपभोक्त्याने मागविल्यास ग्रंथालय सहकाऱ्यांना त्यांच्या संग्रहातून शोधून देण्यास फार कष्ट घ्यावे लागले. काही प्रसंगी साधने मिळण्यास फार उशीर होत असे. जोपर्यंत माहितीच्या साधनांवर नियंत्रण होते तोपर्यंत ह्या गोष्टी साध्य होत गेल्या. परंतु पुढील काळामध्ये माहितीचा परिस्फोट झाला. उपभोक्त्यांची मागणीसुद्धा बदलली, प्रकाशन माध्यमात वाढ झाली. पारंपरिक सोपस्कार करुन जी माहिती साधने ग्रंथालयात वापरली जात होती ती साधने या परिस्फोटाने व्यवस्थित हाताळण्याजोगी ठेवणे शक्य नव्हते. ग्रंथालयाला सतत आव्हानाला सामोरे जावे लागत असे. उत्तम सेवा प्रदान करण्यासाठी ग्रंथालयाला अनेक अडचणी येत असत.

आयसीटीच्या बदलाचा परिणाम ग्रंथालयांवर झाला आणि वाचकांच्या गरजा वाढल्या. त्यांची गरज भागविण्यासाठी व त्यांना सेवा देण्यासाठी नवीन तंत्रज्ञांची विधी ग्रंथालयाला गरज भासू लागली. विविध ग्रंथालय हे पूर्वी ज्ञानांचे भांडार (knowledge store house) म्हणून ओळखले जायचे आणि नंतर उपभोक्त्यांच्या गरजेप्रमाणे त्यात माहिती विकसित केली गेली.

Levor (2006) तंत्रज्ञानातील प्रगतीला विधी ग्रंथालयेदेखील साक्षीदार आहेत. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ग्रंथालयाचा प्रभावशाली विकास झाला आहे. शैक्षणिक विधी ग्रंथालयांनी आपल्या प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना सेवा पुरवाव्यात, विधी ग्रंथालयाचे आधुनिकीकरण झाले पाहिजे असे सूचित केले आहे.

**2.2.14.3 ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा वापर (ICT) :**

आयसीटीचा शिरकाव झाल्यामुळे ग्रंथालयाचे उपभोक्ते शैक्षणिक कारणांसाठी प्रगत साधने वापरणे पसंत करू लागले. त्यामुळे पारंपरिक पद्धतीमध्ये संपूर्ण बदल झाला. नवीन विषयांना त्यात स्थान देण्यात आले.

आयसीटीचा परिणाम शिक्षण आणि सर्व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये सर्वत्र झाला. शैक्षणिक प्रणालीचा कल हा जलद बदलत आहे. शिक्षण प्रणाली ऑनलाइन झाली. त्यासाठी आयसीटीचा आधार घेतला जात आहे. विधी महाविद्यालयातील उपभोक्ते ई–प्रकाशने, ऑनलाइन साधने, इंटरनेट सेवा यांचा आधार घेऊ लागली. कारण त्याच्यासाठी ते अत्यंत सोपे साधन ठरले. ग्रंथालय व्यावसायिकांनी शैक्षणिक क्षेत्रातील हे बदल लक्षात घेऊन उपभोक्त्यांना सुधारित माहिती देण्यासाठी व्यवसायातील बदलाला तोंड देण्यासाठी अनेक बदलांना सामोरे जावे लागले.

विधी ग्रंथालयात आयसीटीचा शिरकाव झाल्यामुळे विधी ग्रंथालयांमध्ये व्यावसायिक स्वतः तयार केलेल्या सॉफ्टवेअरचा वापर करुन ग्रंथालय प्रणाली (software) घेण्यात आल्या.

Lawal et. al. (2012) and Ossai (2011) हे ICT संदर्भात म्हणतात की, विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकाक्रमाने आयसीटी तंत्रज्ञानाचा वापर करून त्यामध्ये निष्णात होणे आवश्यक आहे.

**2.2.14.4 पारंपरिक ग्रंथालयाचे स्वरूप :**

पारंपरिक विधी ग्रंथालय पूर्वी छापील माध्यमामार्फत सेवा प्रदान करीत होते आणि त्या ग्रंथालयाचा विकास हा छापील माध्यमांवरच आधारित होता. पारंपरिक ग्रंथालय प्रामुख्याने तालिकीकरण वर्गीकरण संदर्भसेवा सूची प्रदान करणे इत्यादी सेवा पुरवित.

पारंपरिक ग्रंथालयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

1) माहिती साधने फक्त छापील स्वरुपातच उपलब्ध होती.

2) माहिती सेवा ही एकाच ग्रंथालयावर आधारित होती.

3) माहिती शोधण्यासाठी माहितीचे दुय्यम स्रोत मर्यादित होते.

4) ग्रंथालयाचे मनुष्यबळ, देखभाल एक आव्हानात्मक आणि महाग काम होते.

5) तालिकीकरणाचा वापर करणे व हाताळणे यावर मर्यादा होत्या.

6) ग्रंथालय संग्रहातून अधिक पुनर्प्राप्तीचे कार्य करण्यासाठी अधिक कर्मचाऱ्याची गरज.

7) ग्रंथालयामार्फत सेवा प्रदान करण्यासाठी आर्थिक गरज लागते. संग्रह व्यवस्थापन करण्यासाठी मनुष्यबळही अधिक लागते.

हे अडथळे दूर करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान फार प्रभावी आहे.

**2.2.14.5 माहिती तंत्रज्ञान युगातील ग्रंथालयांची स्थिती :**

माहिती तंत्रज्ञानामुळे पारंपारिक ग्रंथालयाची दुर्बलता कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे व त्यामुळे परिस्थितीत फार बदल झाला. ग्रंथालय व उपभोक्त्यांना आयसीटीच्या वापरामुळे अनेक फायदे होतात, ते पुढीलप्रमाणे.

1) विविध माहितीच्या ई–स्रोतातून त्वरित व अचूक माहिती मिळते. त्यामुळे विधी महाविद्यालयात आयोजित केलेल्या मूटकोर्ट स्पर्धेमध्ये लेख लिहिताना संशोधनाच्या आयत्यावेळी विद्यार्थ्यांना त्वरित केस, दस्तऐवज, Bare Acts, Amendements statues ची माहिती पुरविता येते.

2) इंटरनेटवर आधारित माहिती स्रोताचा अधिक वापर या माध्यमातून अनेक न्यायालयांच्या केसेसची माहिती मिळू शकते.

3) संसाधन शेअरिंगसाठी डेटाबेसचा विकास व त्याचे एकत्रिकरण.

4) आंतरराष्ट्रीय डेटाबेसमध्ये ऑनलाइन शोधाची सुविधा.

5) OPAC आणि Web OPAC मध्ये विकास.

6) हायपर लिंकच्या सहाय्याने दुर्मिळ दस्तऐवजांचे जतन व संवर्धन.

7) रिमोट ॲक्सेस(Remote access)च्या सहाय्याने कोठूनही ई–साधने वापरण्यास संधी मिळते.

8) कन्सोरशियामार्फत ई–जर्नलचे परवडणाऱ्या दरामध्ये सदस्यत्व घेता येते.

9) डिस्कवरी सेवेमार्फत की–वर्डस्च्या सहाय्याने नेमक्या डेटाबेसमधील माहिती मिळते.

10) क्लाउड्सवरच्या माध्यमाने माहितीचे जलद प्रसारण होते.

11) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ग्रंथालय सहकार्यांना विविध गोष्टींची माहिती मिळण्यास वाव.

**2.2.14.6 ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणावर परिणाम करणारे घटक :**

सर्व प्रकारच्या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करताना खालील घटक विचारात घ्यावेत.

a) माहितीच्या स्फोटामुळे जागतिक स्तरांवरील प्रकाशनांच्या मागणीत वाढ झाली आहे.

b) छपाई (प्रिंटिंग) प्रकाशनाचा खर्च वाढला आहे.

c) ग्रंथालयाच्या खर्चाचे अंदाजपत्रक हे मर्यादित आणि अपुरे पडत आहे.

d) उपभोक्त्यांकडून त्यांच्या आवडत्या विषयांवरील आवश्यक माहितीच्या मागणीची वाढ होत आहे.

e) माहिती तंत्रज्ञानासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा ह्या आर्थिकदृष्ट्या ग्रंथालयाला परवडणाऱ्या आहेत.

f) माहिती आणि माहितीची संसाधने यांचे जागतिकीकरण व डेटाबेसेसचा विकास होत आहे.

वरील घटकांमुळे ग्रंथालय व ग्रंथालय कर्मचारी यांनी नवीन तंत्रज्ञान स्वीकारून माहिती संपादित, संचयित करणे, त्याचा प्रसार करणे सोपे जाते आणि त्यामुळे उपभोक्त्यांना चांगल्या प्रकारे सेवा प्रदान करण्यास मदत होते.

| ग्रंथालयाची कार्ये | साधारणपणे 10 वर्षांपूर्वीची ग्रंथालये | सध्याची ग्रंथालये |
|---|---|---|
| ग्रंथालय प्रणाली समाविष्ट | उपभोक्त्यांचे व देवघेवीचे MARC Record उपलब्ध होते. | वेब आधारित मेटाडेटा : संसाधनाचे शोध क्रॉस डेटाबेस शोध क्लाऊड सर्व्हर |
| माहितीची उपलब्धता | छापील स्वरूपात आंतर–ग्रंथालयीन देवघेवीच्या स्वरुपात कॉम्पॅक्ट डिस्कच्या स्वरूपात सूची, निर्देशांक | छापील संग्रहाबरोबर ऑनलाइनचा आधार, दस्तऐवज वितरण व्यापक प्रमाणात ई–संसाधने |
| माहितीचा वापर | ऑनलाइन पब्लिक इंडेक्सच्या स्वरूपात स्टॉक रुममधून उपलब्ध, कॉम्प्युटरच्या स्वरुपात | रिमोट, वायरलेस |
| अभ्यासिका | शांत स्वरूपातील ठिकाण | ग्रुपनुसार अभ्यास |
| माहितीचे शोध प्रशिक्षण | सूचीच्या स्वरूपात | माहिती साक्षरता, प्रॅक्टिकल प्रशिक्षण |
| प्रिंटर | डॉट मॅट्रिक्स प्रिंटर | लेझर प्रिंटर |
| संगणकाचा वापर | OPAC साठी | ऑनलाइन, ऑफलाइन ई–संसाधनासाठी |
| सुरक्षा यंत्रणा | कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने | RFID  च्या स्वरूपात |
| देवघेव | कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने | बारकोडच्या सहाय्याने |
| मार्गदर्शन Orientation | स्थानिक पातळीवर | प्रादेशिक, ऑनलाइन |
| अभिप्राय Feedback | स्थानिक पातळीवर | ऑनलाइन |

**समारोप :**

इतर शाखेतील ग्रंथालयाप्रमाणे विधी ग्रंथालयाचीदेखील पारंपरिक, इलेक्ट्रॉनिक, हायब्रीड ग्रंथालय अशी वाटचाल होत आहे. हे विधी ग्रंथालयाचे ग्रंथालयाच्या वैशिष्ट्यांप्रमाणे प्रकार आहेत. विधी ग्रंथालय पद्धती ही इतर शाखेतील ग्रंथालयापेक्षा वेगळी आहे. येथील सेवा, संग्रह, माहिती वितरणामध्ये निरंतर बदल होत आहेत. कायदा हा संपूर्ण सरकारी दस्तऐवजावर अवलंबून

असतो. त्याप्रमाणे तेथील संग्रहामध्ये बदल करावा लागतो. विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सेवकांच्या प्रशिक्षणावर अधिक जोर देणे तसेच ग्रंथालयांनी आर्थिक कार्यक्षेत्रात सहभाग होण्याची आवश्यकता आहे. विधी ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक संशोधन साधने वापरण्यासाठी सतत प्रशिक्षित करणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यातील वकील आपल्या ग्राहकांचे हितसंबंध प्रभावीपणे व कायदेशीरपणे सुरक्षित करू शकतील.

## संदर्भ सूची :


1. Bar Council of India Reform of Legal Education in India Retrieved from Retrieved from http://www.barcouncilofindia.org/wp-content/upload/2014/11/legaleducationreformrecommendationspdf

2. Bhavani, J. K. C. (1962). Legal Education in India. *Journal of India Law institute*, *IV*. 167.

3. Deakin University Australia (2014). *MLL 110- Legal Principal and skills.* Current students. Retrieved from https://www.deakin.edu.au/current-students-courses/unit.php?unit=MLL110

4. Du Plessis, T. (2014). Competitive legal professions use of technology in legal practice and legal research. *Potchefstroom Electronic Law journal*. 4. 32 - 60. Retrieved from https://www.ajol.info/index.php/pelj/article/download/42241/9358

5. Dusari, J. and Hanchinal, V. (2012). Legal Education and Research in Digital Age : Issues and concerns. Singh, R., Devroa, S., Rai, P. & Singh, A. (Eds.) *International conference on Access to Legal information and Research in Digital Age* .New Delhi, National Law University 63-75. Retrieved from http://nludelhi.ac.in/download/publication/2015/august/Conference%20Proceeding-International%20Conference%20on%20Access%20to%20Legal%20Infomration%20and%20Research%20in%20Digital%20Age%202012.pdf

6. Singh, R., Devroa, S., Rai, P. & Singh, A. (Eds.) International conference on Access to *Legal information and Research in Digital Age* .New Delhi, National Law University.

7. Farlex Free Dictionary (2014). Retrieved from http://www.thefreed ictionary.com/law

8. Frederic, D. D. (Ed.). (1964). The Law Library' A Living Test I. Proceedings. Sixth Biennial. A.A.L.L., Institute for Law Librarians. Chicago. Illinois.

9. Greenleaf G (2010).The Global development of free access to legal information, *European Journal of Law and Technology*, *1*(1) Retrieved from http://ejlt.org/article/view/17/39

10. Igbeka, J.V. (1995). Information needs of agricultural engineers: In case of Ibadan, Oyo State Capital Nigeria. *UNESCO Africa*, 99-108. Retrieved from http://unesdoc.unesco.org/Ulis/cgi-bin/ulis.pl?catno=104526&set=4AF2FF94_2_94&gp=1&ll=1

11. James, R. S. and Alan, R. T. (1997). Cataloging and classification Trends, Transformation, Teaching and Training.

12. Katju, K. K. (1961). The Days I Remember, II (52). 373-374.

13. Kavass, lgor, I. (1975). Law Libraries of United States Development and growth. *International Journal of Law Librarian, 3,* 27-28. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/ijli3&div=9&start_page=25&collection=journals&set_as_cursor=14&men_tab=srchresults

14. Lawal, V. (2007). *Legal Research and Legal Education in Africa: the Challenge for Information Literacy. Starr Workshop Papers.* Retrieved from http://scholarship.law.cornell.edu/cgi/viewcontent.cgi?article=1004&context=sws_papers

15. Gloria J. Leckie, Karen, E. Pettigrew and Christian, Sylvain .(1996). Modeling the Information Seeking of Professionals: A General Model Derived from Research on Engineers, Health Care Professionals, and Lawyers. *The Library Quarterly: Information, Community, Policy,* 66 (2). 161 – 193. Retrieved from http://www.jstor.org/stable/pdf/4309109.pdf?refreqid=excelsior:7c9e0d98c25a5fb4a7c4930ce2cf0eb2

16. Levor, R. (2006). The Unique Role of Academic Law Libraries, Toolkit for Academic Law Libraries, Academic Law Libraries special interest section, *American Association of Law Libraries.* Retrieved from http://www.aallnet.org/sections/all/storage/marketingtoolkit2004/unique-role.pdf

17. Ludu, Rocher. (1986), Lawyer's in classical Hindu Law, *India Bar Review*, *13* (3&4).

18. Malik, Soumen and Sen, B.K. (2008). Information Sources in Academic Law Libraries in India. *Annals of Library and information studies*, 55(9), 196-203. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/2442/1/ALIS%2055%283%29%20196-203.pdf

19. Markose, A.T. (1986). A Brief History of the steps taken in India for Reform of Legal Education. *Journal of the All India Law Teachers Association*, 75.

20. Matheson, D. and Hart D. (1988). *Legal Aid: The New frame work*, London : Butter worths St. Paul, Minn. : Butterworths Legal Publishers P.164. Retrieved from https://searchworks.stanford.edu/view/1809170

21. Maxwell, K. T. and Schafer, B. (2008). Concept and context in legal information retrieval. The Twenty-First Annual Conference on *Legal Knowledge and information Systems*. Nertherland: JURIX, 63-72. Retrieved from https://www.researchgate.net/profile/Burkhard_Schafer/publication/220809928_Concept_and_Context_in_Legal_Information_Retrieval/links/0fcfd50d9a01e4d11a000000.pdf

22. Moily, V. (2010). Law Minister Announces Vision for Legal Education Reform: A vision statement delivered by the Law Minister veerappa consultation for second Generation Reform in Legal Education held at the vigyan Bhavan,*The Bar council of India*, New Delhi. Retrieved from http://www.barcouncilofindia.org/law-ministers-vision-statement-for-second-generation-reforms-in-legal-education/

23. Ossai, N. B. (2011). How law students utilise information resources: A case study of the University of Benin. *International Journal of Library and Information Science, 3*(1), 1-14. Retrieved from http://www.academicjournals.org/article/article1379510973_Ossai.pdf

24. Pillai, K.N. Chandrasenkharan (2012). Legal Education and the Digital Era in Singh, R., Devroa, S., Rai, P. & Singh, A. (Eds.) International conference on Access to *Legal information and Research in Digital Age*. New Delhi, National Law University. Retrieved from http://nludelhi.ac.in/download/publication/2015/august/Conference%20Proceeding-International%20Conference%20on%20Access%20to%20Legal%20Infomration%20and%20Research%20in%20Digital%20Age%202012.pdf

25. Schmittheener, S. (1986). A sketch of the Development of the legal. Profession in India. *India Bar Review, 13* (3&4). 309.

26. Shrivastava, R. K. (2008). Law Librarianship in India with Special Reference to thw Judicial Library System. *International Journal of Legal Information: the Official Journal of the International Association of Law Libraries, 36*(2). 275-299. Retrieved from http://scholarship.law.cornell.edu/cgi/viewcontent.cgi?article=1139&context=ijli

27. Singh, J. A. (2011). Workshop on Research, ethics, and law. Faculty of Arts, University of Zululand at Protea Hotels, Empangeni.

28. Wong, B. and Sawatzky, K. (2014). Presented at Ontario Library Association super conference. *The Hidden of Law Libraries.* Retrieved from https://brendawoa.files.wordpress.com/2014/02/hidden_world_paper.pdf

## Books :

1. Clinch, P. (2001). *Using a Law Library : A Student Guide to Legal Research Skills.* London, Black Stone Press Ltd.

2. Garner, B. A. and Black, H. C. (2004). *Black's law Dictionary*. 8th ed. St. Paul, M. N.: Thomson / West Group.

3. Gupta, S. and Mehta, P. L. (2000*). Legal Education and Profession in India*, Delhi, Deep and Deep Publications Pvt. Ltd.

4. Jayswal, K.P.(2011). *An Imperial history of India*, United Kingdom ,Nabu Press. Retrieved from https://www.archive.org/details/imper...toryo035289mbp

5. Koul, A. K. (1999). Proceedings of the All India Law Teachers Congress. *Legal Education in India in 21st century problems and prospects*, Delhi, University of Delhi faculty of Law.

6. Rai, K. (2001). *Moot Court, Pretrial preparations and participation trial proceeding*. Allahabad: Central Law publication.

7. Saran, P. (2002). *The provincial Government of the Mughals.* New Delhi, Reliance Publishing House.

8. Shera, J. H. (1972). *The Foundation of Education for Librarianship,* New York, Becker and Hayer.

## Books :

1. साळवे, ए. (2002). कायदेविषयक जनजागृती. पिल्लाई, ए. पी. (संपादक). सामाजिक न्यायासाठी कायदे : कायद्याच्या राज्यात आम्ही, भाग ३ (पृष्ठ क्र. २५–२७). तुकुम चंद्रपूर : शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय.


❑❑

# प्रकरण तिसरे

# साहित्याचा आढावा

## 3.1 प्रस्तावना :

ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यासामध्ये उपभोक्त्यांचा अभ्यास हे संशोधनाचे सर्वात महत्त्वाचे आणि उपयुक्त क्षेत्र आहे. या अभ्यासात मोठ्या प्रमाणात माहिती निर्माण होते. सध्याचा अभ्यास हा उपभोक्त्याच्या वापरांची मूल्यांकने स्पष्ट करतो.

भारतामध्ये विधी उपभोक्त्यांचा अभ्यास, सर्वेक्षण कमी प्रमाणात झाले आहे परंतु पाश्चिमात्य देशांमध्ये सदर विषयामध्ये बऱ्यापैकी संशोधन झाले आहे आणि त्यांची संख्या सतत वाढत आहे. संशोधन विषयाशी संबंधित बाबींची माहिती मिळविण्यासाठी संबंधित साहित्याचा पूर्वाभ्यास महत्त्वपूर्ण मानला जातो. प्रत्यक्ष संशोधनाशी निगडित तो दुवा असतो. आपले संशोधन ज्या विषयाशी संबंधित आहे. त्या विषयात यापूर्वी काय संशोधन झाले आहे हे पाहिल्यामुळे आपल्या संशोधनाला पूर्वाभ्यासामुळे एक दिशा मिळते.

सदर विषयाचा अभ्यास करताना अभ्यासकाने भूतकाळातील संशोधनाचा पूर्वाभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. या साहित्याच्या समालोचनामुळे माहिती तसेच उचित संशोधन पद्धती संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित माहिती मिळण्यास मदत होते. त्यासाठी पूर्वाभ्यास आणि शोध विषयाचे समालोचन आवश्यक असते.

विधी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास या विषयाशी संबंधित पूर्वी इतर विद्यापीठांमध्ये काही संशोधन झाले आहेत की नाही याबाबत खात्री करून घेण्यासाठी संशोधकाने संशोधन पूर्वाभ्यास व इतर वाचन साहित्याचा शोध घेतला.

खालील वृद्धिंगत केलेल्या विधी ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन संशोधकाने संशोधनपूर्व अभ्यास व वाचन साहित्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

- नॅशनल लॉ स्कूल द्वारका, दिल्ली

- नॅशनल लॉ स्कूल, कलकत्ता
- इंडियन लॉ सोसायटीज कॉलेज, पुणे
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर
- सिंबायोसिस लॉ स्कूल, हैद्राबाद, नॉयडा

इंटरनेटच्या माध्यमातून अभ्यासविषयाच्या अनुषंगाने जे साहित्य उपलब्ध झाले ते अभ्यासले.

Harvard (2007) पूर्व साहित्य शोध हा लेखक, संशोधक, तज्ज्ञ त्याचबरोबर तांत्रिक विशेषज्ञ या सर्वांनी त्या त्या विषयात केलेल्या योगदानाचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीने शोध घेतला जातो. त्यामुळे पूर्वसाहित्य शोध हा संशोधनाचा अविभाज्य भाग समजला जातो.

संशोधनामध्ये साहित्याचा शोध महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे संशोधकास समजण्यास स्फूर्ती मिळते की प्राप्त स्थितीमध्ये काय केले आहे. संबंधित साहित्याच्या कल्पना, शिफारशी सूचना समस्या समजून घेता येतात. मागील संशोधन अभ्यासाचा निष्कर्ष संशोधकाला इशारा देऊ शकतो. अनेक निष्कर्षावर प्रकाश टाकला जातो. त्यामुळे संशोधकाला आपला अभ्यास व्यवस्थितपणे करण्यास मदत होते.

सदर अभ्यासामध्ये साहित्याचा आढावा घेण्यासाठी मोठया प्रमाणावरील साहित्यांचा अभ्यास करण्यात आला व त्याची मांडणी प्रस्तुत प्रकरणामध्ये केली आहे ती पुढीलप्रमाणे :–

- माहिती व माहितीचा शोध
- माहितीची गरज व माहिती शोध वर्तन
- माहितीचा वापर व माहिती शोध वर्तन
- विधी माहिती शोध वर्तन
- विधी ग्रंथालय माहिती शोध वर्तन
- विविध विषयातील माहिती शोध वर्तन

- माहितीची साधने आणि माहिती शोध वर्तन
- डिजिटल युगातील माहिती शोध वर्तन
- माहिती शोध प्रतिकृती

वर वृद्धिंगत केलेल्या शीर्षकानुसार माहिती शोध वर्तनाचा शोध घेण्याचा संशोधकांने विविध अंगाने प्रयत्न केला आहे. विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना माहितीचे महत्त्व माहितीचा शोध, त्यांची गरज काय असते. माहितीचा वापर, विधी संबंधित माहिती शोध वर्तन विद्यार्थ्यांचे, व्यावसायिकांचे कसे आहे, त्यांना कोणत्या समस्या येतात यासंबंधी पुष्टी मिळते. विधी विद्यार्थ्यांचे माहिती शोध वर्तन अभ्यासताना इतर शाखेतीलही जसे, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी व सर्वसाधारण क्षेत्रातील उपभोक्त्यांचाही अभ्यास संशोधनाच्या अनुषंगाने केला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती शोध वर्तनात काय परिणाम होतो हे पाहण्याचा थोडक्यात प्रयत्न केला आहे. विविध अभ्यासकांनी अभ्यासलेल्या निवडक माहिती शोधप्रतिकृतींचा सदर आढाव्यामध्ये समावेश केला आहे.

साहित्याचा शोध मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून घेताना संशोधकाने पुढील संज्ञांचा माहितीचा शोध घेताना वापर करण्यात आला.

User study, information sources, Information, Information need legal Research, Information seeking behaviour. User needs, Lawyers, attorneys. Law information behaviours Legal information behaviours. Legal Research Law students, ICT use skill, Models of information seeking behaviour.

## 3.2 माहिती व माहिती शोध :

माहिती एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. प्रत्येकासाठी माहितीची आवश्यकता आहे. मानवी विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर माहिती महत्त्वाचा घटक समजला जातो. प्रत्येक व्यक्तीच्या व देशाच्या विकासासाठी तसेच ज्ञान वाढविण्यासाठी माहितीची गरज आहे. माहितीशिवाय कोणताही निर्णय होऊ शकत नाही. विधी क्षेत्रातील माहितीच्या निर्णयाची गुणवत्ता मुख्यत्वेकरुन माहितीच्या अचूकता, उपयुक्तता यावरच अवलंबून असते.

Marvel (1978) यांच्या मते कोणती माहिती वापरायला पाहिजे आणि ती कशी प्राप्त केली पाहिजे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. Storm (1995) यांच्या मते माहितीचा शोध घेत असताना त्यामध्ये गुंतागुंतीचे प्रमाण वाढताच अनौपचारिक सुत्राच्या साहाय्याने ती माहिती मिळविली जाते. माहितीचा शोध घेण्याअगोदर माहितीची गरज समजणे आवश्यक आहे.

**माहिती** :

Murari and Nagarkar (2013) प्रस्तुत लेख पुण्यातील पहिल्या महिला उद्योजक पिढीवर आधारित आहे. महिला उद्योजकांनी उद्योग चालू करताना कशी माहिती घेतली, उद्योगास सुरुवात कशी केली याबद्दलची पार्श्वभूमी विचारण्यात येऊन उद्योगास सुरुवात का केली याबद्दलची पार्श्वभूमी विचारण्यात येऊन त्याच्या नियोजनासाठी माहिती कशी पाहिली याचा अभ्यास केला आहे. महिला उद्योजकांना लहान आणि सूक्ष्म स्वरूपातील व्यवसायामध्ये कार्यरत राहण्यासाठी त्यांनी साइट कशी तयार केली आणि त्यांना माहिती पुढे कशी सक्षम बनविते यासंबंधी अभ्यास केला. उद्योजक महिला यांचा कल पाहिला गेला, जे माहितीचे अधिक जाणकार आहेत ते आपल्या उपक्रमामध्ये अधिक यशस्वी होत असतात. या अभ्यासामध्ये डॉक्टर्स, वकील आणि लेखापरीक्षक यांना वगळण्यात आले होते, हा फक्त महिला उद्योजकांचाच अभ्यास केला आहे. ग्रंथपाल, उद्योजक आणि त्यांना आवश्यक असणारी माहिती या दरम्यान एक मध्यस्थाची भूमिका पार पाडू शकतो, ग्रंथपालांना माहितीच्या गरजा समजण्यासाठी अगदी तळागाळापर्यंत विशेष प्रयत्न केले जाऊ शकतात. महिला उद्योजकांना मदत करण्यासाठी एक साइट (Site) डिझाइन करणे हे या सर्वेक्षणाचे निष्कर्ष दिसतात.

Alemna and skouby Adebiu and Adio (1997) यांनी Ladoke Akintola University of Technology Ognomoso Oyo State येथील वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या आवश्यक माहिती व ती मिळविण्याचे विविध नमुन्यांचे प्रकार अभ्यासले. त्यातील 60 टक्के विद्यार्थी हे आठवड्यातील 3 ते 8 तास ग्रंथालयांत त्याच्या अभ्यासक्रमातील विशिष्ट विषयांच्या ग्रंथाचे अध्ययन करताना आढळले. 68 टक्के ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांचा उपयोग त्यांना लागणाऱ्या ग्रंथांच्या शोधासाठी करीत होते, असे निदर्शनास आले.

Storm and Jarvelin (1995) यांनी माहिती मिळविण्याचे कठीण व गुंतागुंतीचे कार्य कसे हाताळले जाते ते पाहिले Bystroom यांनाही Howland यांच्याप्रमाणे सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब संबंधित अभ्यासासाठी केला होता. त्यांनी Pan Finland मध्ये शहरी सचिवालयात Finish सार्वजनिक राज्य कारभार चालविणाऱ्या मंडळाचे परीक्षण केले. तसेच Finish वकिलांची मुलाखत घेतली. प्रश्नावली व संशोधकाच्या दैनंदिनीवरुन मुलाखत आधारलेली होती. त्यांनी निरीक्षणावरुन निष्कर्ष काढला की, माहिती मिळविता गुंतागुंतीचे प्रमाण वाढताच अनौपचारिक सूत्रांच्या साहाय्यांनी ती माहिती मिळविली जाते. वकिलाच्या कामाच्या तक्त्यावरुन हे लक्षात आले की, बाहेरील विशेषज्ञांची मदत माहिती विश्लेषणासाठी Finish वकिलांनी घेतली होती. विशेषज्ञ हे खात्रीशीर व झटपट काम करणारे होते. संशोधकांचे समाधान लक्षणीय आहे

Ikoja-odongo and Mostert (2006) यांच्या मते विभिन्न व्यवसायात किंवा अभ्यास क्षेत्रात माहितीची परिभाषा वेगवेगळी केली गेली आहे. Olorunfemi (2009) हे सुद्धा ह्या विचाराशी सहमत आहेत की लोक माहितीच्या विविध पद्धतीने व्याख्या देऊन स्पष्ट करतात. संशोधनाने, अभ्यासाने किंवा शिक्षणाने मिळालेले ज्ञान याचा माहिती म्हणून उल्लेख करु शकतो.

Olerunfemi (2009) यांनी निर्णय घेणारे राजकारणी लोक, सरकार, व्यवस्थापक न्यायाधीशांच्या मते, माहिती ही जागतिक घटनांचे आकलन करण्याची प्रक्रिया आहे. ज्यामुळे आर्थिक, शैक्षणिक, नैतिक, बोधपर व विधीविषयक ज्ञान उत्पन्न होते व निर्णय घेण्यास मदत होते.

Folorunsho and Ibrahim (2005) यांच्या मते कोठूनही उद्‌भवलेली वस्तुस्थिती, मत, अभिप्राय, कल्पना जे निर्णय घेण्यास मदत करतील. त्याला 'माहिती' म्हणता येईल. माहितीची अजूनही परिभाषा पाहिल्यास माहिती म्हणजे भौतिक किंवा जड वस्तूचे किंवा कोणत्याही बाबीचे गुणधर्म किंवा संदेश, दस्तऐवज किंवा माहितीचे स्त्रोत किंवा सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेले छापील सूचक साहित्य किंवा डेटा असे Smith and Mosters (2004) सांगतात. Opeke (1993) च्या मते माहिती हा निर्णय घेण्यास महत्त्वाचा घटक आहे तर Buckland (1991) प्रमाणे माहितीमुळे निर्णय घेण्यातली अनिश्चितता दूर होते.

Igbeka and Atinmo : (2002) ह्यांना माहिती ही कोणत्याही समाजास व मानवी अस्तित्वास प्रामुख्याने आवश्यक असणारे स्त्रोत आहे व त्याच्या अभावामुळे मानवजात अंधारात असते. समाजाची आर्थिक, सामाजिक प्रगती होण्यास माहिती महत्त्वाची आहे. माहिती ही विविध व्यवसायांमध्ये आवश्यक व महत्त्वाची आहे. न्यायाधीश, वकील व विधी विद्यार्थ्यांना रोजच्या जीवनातच माहितीची आवश्यकता असते. न्यायाधीशांना केसेसचे निवाडे करण्यासाठी माहितीची आवश्यकता असते. वकिलांना आपल्या पक्षकारांची केस नीट मांडण्यासाठी व युक्तिवाद करण्यासाठी तर विधी विद्यार्थ्यांना विधी विषयाच्या परीक्षा देण्यासाठी माहितीची आवश्यकता असते.

सद्यपरिस्थितीत व विधी विश्वात दैनंदिन जीवनात माहितीला अत्यंत महत्त्वाचे व मौलिक स्थान आहे. मानवी जीवनात महत्त्वाचे व योग्य निर्णय घेण्यास माहितीची आवश्यकता आहे. कायद्याची माहिती अचूक मिळाल्यास निर्णय योग्य व चांगला असेल. माहिती अचूक नसल्यास योग्य व बरोबर निर्णय होऊ शकणार नाही. Walcruck (2004) च्या मते चांगली माहिती चांगल्या निर्णयाला कारणीभूत होईल.

Dada (2011) आणि Oguufole (2006) त्यांनी विधीविषयक माहितीच्या उगमाला इतके महत्त्व दिले की, त्यांनी विधी ग्रंथालयाला वकिली व्यवसायाची प्रयोगशाळा म्हणूनच संबोधिले. तेव्हा विधीची माहिती हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे, स्त्रोत आहे ज्याच्यामुळे वकील आपल्या पक्षकाराची केस कोणत्याही अधिकार क्षेत्रातील न्यायाधीशापुढे नीट मांडून, युक्तिवाद करुन निर्णय घेण्यास मदत करतात. वकिली व्यवसायात कायद्याची माहिती हे अत्यंत महत्त्वाचे संसाधन आहे. ह्यात विधीच्या विद्यार्थ्यांचादेखील समावेश आहे. कारण ते वकिली व्यवसायात पदार्पण करणार असतात. वकील हे समाजाचे अविभाज्य व महत्त्वाचे घटक आहेत. जे सामान्य माणसांना हाताळता येत नाहीत किंवा हाताळायला वेळ नसतो अशा दैनंदिन विधीविषयक बाबींसाठी आवाज उठविणे, विधीविषयक मुद्यांवर विचार मांडणे अशी महत्वाची कार्ये वकील करतात. आपल्यालादेखील विधी कामकाज सांभाळण्यासाठी वकील अतिआवश्यक असतो. त्यामुळे आपण अनावश्यक डोकेदुखीपासून मुक्त राहू शकतो. वकिली व्यवसायाच्या कार्यात विधीविषयक

सल्ला देणे हा देखील महत्त्वाचा भाग आहे व त्यासाठी त्यांनी विधीविषयक माहिती कोठे उपलब्ध होईल हे जाणणे आवश्यक आहे, असे Okesamuel (2008) नमूद करतात. तसेच सरकारी विभागात कित्येक मुद्यांवर वकील आहेत व शांततेच्या प्रसारासाठी व शांतता राखण्यासाठी कार्य करीत असतात, असे Hood (2006), Exforsys (2010), Buzzle (2010), A. C. Khan and Bhatti (2011) व्यक्त करतात. माहितीची संकल्पना विधी व्यावसायिकांना जसे न्यायाधीश, वकील व विधी विद्यार्थ्यांसाठी बहुमोलाची आहे. त्यांना विधीच्या विविध क्षेत्रात निर्णय घेण्यास कायद्याची माहिती अतिआवश्यक आहे. विशेषत: विधी विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या विविध क्षेत्रात माहितीची उपलब्धता आवश्यक आहे. त्यासाठी विधीविषयक माहितीचे संशोधन प्रक्रियेचा अभ्यास आवश्यक आहे.

Yadamsurea (2007) ने Monholian विद्वानांच्या मुलाखती घेतल्या व सर्वेक्षण केले. त्यांना आवश्यक माहितीबद्दल विचारले. त्यात 134 संशोधक 15 वेगवेगळ्या Monholian संस्थामधून आले होते. त्यांनी स्थानिक माहिती व ग्रंथालय सेवांनी संशोधकांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिली पाहिजे असे मत प्रकर्षाने व्यक्त केले.

Safahieh and Singh (2006) यांनी मलेशियन विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची आवश्यक माहिती मिळविण्याची पद्धत न्याहाळली. ते ग्रंथालयाचा वापर माहिती मिळविण्यासाठी करताना आढळले पण त्याच्याकडून ग्रंथालयाचा वापर फार कमी प्रमाणावर केला जात होता.

Nikol (2008) ने निमसरकारी संस्थांचे आवश्यक माहिती मिळविण्याच्या वर्तणुकीबद्दल महत्त्वाचे निदान केले. त्यांनी उत्तर घानाच्या NGO (2008) सेवकाचा अभ्यास केला. त्यांनी सामाजिक, मानसिक अशी परिमाणे आवश्यक माहितीसाठी दिली. हा अभ्यास गुणात्मक दृष्टीने केला गेला होता.

Folorunsho & Haruna (2005) यांच्या मते, कोठूनही उद्‌भवलेली वस्तुस्थिती मत, अभिप्राय कल्पना ते निर्णय घेण्यास मदत करतील त्याला माहिती म्हणता येईल. माहितीची आणखीनही परिभाषा आढळते. माहिती म्हणजे भौतिक किंवा जडवस्तूचे किंवा कोणत्याही बाबींचे गुणधर्म किंवा संदेश दाखवत किंवा माहितीचे स्त्रोत किंवा सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेले

छापील सूचक साहित्य किंवा डेटा, माहिती हा निर्णय घेण्यात महत्वाचा घटक आहे. माहितीमुळे निर्णय घेण्यातली अनिश्चितता दूर होते.

Igbeka (1995) माहिती ही कोणत्याही समाजास व मानवी अस्तित्वात प्रामुख्याने आवश्यक असणारे स्त्रोत आहे व त्याच्या अभावामुळे मानवी जात ही अंधारात असते. समाजाची, आर्थिक सामाजिक प्रगती होण्यास माहिती महत्त्वाची आहे. माहिती ही विविध व्यवसायांमध्ये आवश्यक व महत्त्वाची आहे. उदा. न्यायाधीश, वकील व विधी विद्यार्थ्यांना रोजच्या जीवनातच माहितीची आवश्यकता असते. न्यायाधीशांना केसेसचे निवाडे करण्यासाठी माहितीची आवश्यकता असते. वकिलांना आपल्या पक्षकाराची केस नीट मांडण्यासाठी व युक्तिवाद करण्यासाठी, तर विधी विद्यार्थ्यांना विधी परीक्षा देण्यासाठी माहितीची आवश्यकता असते. सद्यपरिस्थितीत व विधी विश्वात दैनंदिन जीवनात माहितीचे अत्यंत महत्त्वाचे व मौलिक स्थान आहे. मानवी जीवनात महत्त्वाचे व योग्य निर्णय घेण्यास माहितीची आवश्यकता आहे. कायद्याची माहिती अचूक मिळाल्यास निर्णय योग्य व चांगला राहील. माहिती अचूक नसल्यास योग्य व बरोबर निर्णय होऊ शकणार नाही. चांगली माहिती चांगले निर्णयाला कारणीभूत होईल.

**माहिती शोध :**

Adegbore (2010) हे असे म्हणतात की लोकांचे माहिती मिळविण्याचे धोरण त्यांना मिळणाऱ्या सामुग्रीनुसार बदलते. माध्यम, संवाद, वेळ, भाषा माहितीचे स्वरूप यावर त्यांनी भर दिला. उपभोक्ते जेथे वसलेले आहेत त्या संस्थेचे स्वरूप आणि शैक्षणिक प्रशिक्षणाची स्थिती ज्यासाठी माहिती वापरली जाते. माहिती मिळविण्याच्या वर्तनावर उपभोक्ते अत्यंत प्रभाव टाकू शकतात.

Rolinson, Al-Shanbari and Meadows (1995) यांनी माहितीचे शोध व वापर ह्याचा अभ्यास केला. त्यांच्या असे लक्षात आले की, माहितीचा उगम व विविध माहितीच्या साधनांचा वापर व्यावसायिक करतात. विधी विद्यार्थ्यांची इतर क्षेत्रातील विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी वृत्ती असते व त्यामुळे माहितीची संसाधने व सेवा ह्यात विषमता असते. त्यांनी अभ्यासलेल्या उपभोक्त्यांमध्ये ही विषमता आयसीटीच्या बदलामुळे आहे. त्यानेच विधी विद्यार्थ्यांच्या शोध वृत्तीत बदल आणला

आहे. त्यांच्या मते, आयसीटीमुळे माहिती वातावरण ग्रंथालये माहितीची गरज व माहिती शोधाचे तंत्रात अमुल्य बदल झाला आहे.

Mary (1995) यांच्या मते समाजशास्त्रांच्या माहिती शोधासाठी संदर्भ पुरविणाऱ्या सेवा केंद्राची प्रगती होणे फार आवश्यक आहे. या माहिती केंद्रांनी (ग्रंथालयांनी) नियतकालिकामधील उताऱ्यांचे, सहकारी व परिषदांचा चर्चासत्राचा व ग्रंथालयांचा संसाधन म्हणून उपयोग प्रस्थापित करणे आवश्यक आहे असे सुचविले आहे.

Lueg, C. (2000) ने माहितीच्या संशोधनाने सामाजिक क्रिया समजून सामाजिक व सांस्कृतिक घटनांच्या दृष्टिकोनातून अभ्यासले. त्यांना अनेक घटनांना विविध संकल्पनांतून समजून त्याप्रमाणे माहितीच्या शोधाची रूपरेषा आखली.

Mahapatra and Panda (2001) यांच्या अभ्यासात कार्यरत पत्रकारांनी ग्रंथालयातून माहिती संकलन यासाठी वापरलेल्या सुसंवाद पद्धती याचा आढावा घेतला आहे. लेखकांनी वापरलेली प्रमुख माहिती शोधणे आणि कार्यरत पत्रकारांना माहिती शोधण्यात येणाऱ्या समस्या याचा तपास, अध्ययन केलेले आहे. एक विशिष्टपणे संरचित प्रश्नावली माहितीचे संकलन यासाठी वापरण्यात आली. दोनशे सहा पत्रकारांनी या अभ्यासात सहभाग घेतला. या अभ्यासाचे निष्कर्ष असे दर्शवितात की, बहुतांश कार्यरत पत्रकार माहिती संग्रह करण्यासाठी ग्रंथालयांना व्यक्तिगतपणे भेट देण्याला प्राधान्य देतात. या अभ्यासात हेसुद्धा उघड झाले आहे की, वेळेची कमतरता ही कार्यरत पत्रकारांना प्रमुख भेडसावणारी समस्या आहे.

Kumar (1990) यांच्या मते, समाज शास्त्रज्ञांच्या व सामाजिक शास्त्रज्ञांच्या माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेत फार फरक आहे. समाज शास्त्रज्ञांची विषयाची निवड, संदर्भ ग्रंथांच्या यादीचे संकलन, संबंधित नियतकालिके, मासिके ह्यात अंतर आहे. ह्या अभ्यासात Kumar (1990) यांनी असा निष्कर्ष काढला की, ग्रंथालय कर्मचारी व समाज शास्त्रज्ञ यांच्यात संवाद साधणे आवश्यक आहे, जेणेकरुन माहिती मिळविण्यास अडथळे न येता काम सहजरित्या होईल.

Karisiddappa et.al. (1989) यांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून भारतीय इतिहासकारांचे माहितीच्या नमुना पद्धतीचा अभ्यास केला. इतिहासकारांची माहिती शोधपद्धती कशी आहे. हे

त्यांनी अभ्यासले. प्रत्येक साधनांचा वापर करताना माहिती शोधण्यासाठी त्यांचा दृष्टिकोन हा वेगळा असतो असे त्यांना जाणवले. त्यांच्या माहिती शोधांत येण्याऱ्या अडचणींवर Karisiddappa et. al. (1989) यांनी प्रकाश टाकला. राष्ट्रीय सामाजिक शास्त्र दस्तावेज केंद्र, नवी दिल्ली (NASSDOC - National Social Science Documentation Center, New Delhi) च्या माहिती सेवेविषयी इतिहासकारांमध्ये जागरुकता निर्माण केली. त्यांनी असे सुचविले की, माहिती सेवा केंद्राचे योग्य व किफायतशीर नियोजन, संघटन करणे आवश्यक आहे.

## ३.३ माहितीची गरज आणि माहिती शोध वर्तन :

मानवी जीवनात सर्व क्षेत्रांमध्ये टिकून राहण्यासाठी संसाधनांची आवश्यकता आहे. माहितीची गरज ही अस्पष्ट जागरूकता असते. कमीचा अभास यामुळे योगदान देणाऱ्या माहितीचा शोध घेण्यात येतो. ग्रंथालयाचे उपभोक्ते माहितीचा शोध घेतात. त्यांना त्या माहितीची गरज असते. ही गरज वकिलाचे वय, अनुभव यामुळे प्रामुख्याने प्रभावित होत असते. विधीविषयक गरजा बदलत असतात. त्याप्रमाणे माहितीच्या गरजांच्या प्रकारातही बदल होत असतो. Thanuskodi (2012) याच्या मते, शिकवणे आणि संशोधन या कारणासाठी ग्रंथांना फार महत्त्व आहे. इंटरनेट हे ज्ञान संपादन करण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे. Croalia (2012) यांच्या मते शैक्षणिक प्रयोजनार्थ माहितीची गरज असते. मानवी जीवनात महत्त्वाचे व योग्य निर्णय घेण्यास माहितीची गरज आहे. चांगली माहिती चांगले निर्णयाला कारणीभूत होते. Mahajan (2009) मांडतात, उपभोक्त्यांचे शोध वर्तन ग्रंथालयाना माहीत असणे आवश्यक आहे तरच त्याची गरज भागविली जाते. ई–स्रोतात वाढ झाल्यामुळे विधी ग्रंथालय व माहिती व्यावसायिकांना महत्त्वपूर्ण सेवा देण्यासाठी आणि व्यावसायिक कौशल्य तंत्र प्रदर्शित करण्यासाठी आवश्यक झाले आहे. ग्रंथालय व माहिती शास्त्र व्यावसायिकांना उपभोक्त्यांच्या गरजांबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. त्यांना ग्रंथालय सेवांचा अधिकाधिक फायदा आणि वापर करता येतो.

Wilson (1997) च्या मते, विधी विद्यार्थ्यांना माहितीची गरज व आवश्यकता माहिती संशोधनाचे प्रक्रियेबद्दलच्या वर्तणुकीची समस्या समजण्यासाठी आधी 'माहितीची गरज समजणे' आवश्यक आहे. परंतु हे समजणे फार कठीण आहे. कारण माहितीची गरज ही व्यक्तिगत असते. ती

त्याला कशासाठी व कोणती माहिती हवी आहे हे त्यालाच माहिती असते. त्या व्यक्तीच्या वागण्यावरुन, अहवालावरुन व अनुभवावरुन निष्कर्ष काढता येतो. परंतु सरळ निष्कर्ष काढणे शक्य नसते. भविष्यातील ध्येय गाठण्याची इच्छा हा ज्ञान आकलन करण्याचा उद्देश असतो. विल्सन म्हणतात, तरीही वैयक्तिक गरजेवर, विविध प्रकारची माहितीची आवश्यकता अवलंबून असते हे अनुभवाने व निष्कर्षाने लक्षात आले आहे. ते पुढे म्हणतात की, उद्दिष्टांपासून गरज उदभवते. शारीरिक आवश्यकता जसे, तहान–भूक, ज्ञानाचे उदिद्ष्ट, कुतुहल, ज्ञानेंद्रियाचे उत्तेजन आणि सामाजिक संलग्नता, समाजात स्थान, दर्जा मिळविण्याची इच्छा ह्या हेतूंना किंवा उद्देशांना समजून घेतल्यास विधी विद्यार्थ्यांना माहितीची गरज का असते ते स्पष्ट होते.त्यांना महाविद्यालयात प्रवेश कसा मिळवावा, परीक्षा कशी उत्तीर्ण व्हावी, महाविद्यालयातून पदवीधर होऊन बाहेर कसे पडावे व अंतत: पदवीधर वकील कसे होता येईल, ह्याची माहिती आवश्यक असते.

Otike and Matthews (2000) याच्या मते, टिप्पणीतून वकील कायद्याच्या संदर्भात आपल्या पक्षकाराच्या केससाठी विवेकी निकष लावण्यासाठी, न्यायालयीन ग्रंथालयातून डिस्ट्रीक्ट बारच्या ग्रंथालयातून किंवा इतर वकिलांच्या फर्ममधून माहिती गोळा करतात. विधी विद्यार्थ्यांच्या संदर्भात त्यांना अभ्यासक्रमासाठी माहितीची गरज असते.

Odsanya आणि Amusa (2003) यांनी विधी विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजेसंबंधी चार पैलूंची ओळख करून दिली – सद्यपरिस्थितीतील परिषदांमधून कार्यशाळांमधून प्रसिद्ध होणारे विधी अहवाल; माहितीच्या संदर्भातील नवीन कल्पना व संशोधनात्मक ज्ञान ज्याने विद्यार्थ्यांचे कुतुहलाचे समाधान घडेल; चालू घडामोडीवर व सामान्य ज्ञानावर माहिती; आणि कायद्यात प्रशासनासाठी लागणारी माहिती.

Borah (1990) यांनी समाजशास्त्राला शिक्षण विस्तारक शास्त्रज्ञांना शेतकी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना लागणाऱ्या वा आवश्यक असलेल्या माहितीवर संशोधन केले. त्यांनी असे दाखवून दिले की, शिक्षणतज्ज्ञ शिक्षक व पदव्युत्तर विद्यार्थी माहिती विविध स्त्रोतांतून गोळा करतात. त्यांनी असाही शोध लावला की, ते अप्रकाशित प्रबंधामधून मुख्यत्वे माहिती मिळवतात. शिक्षण क्षेत्रात माहितीची आवश्यकता व वापराचे विश्लेषण Summers et. al. (1982) मध्ये केले.

त्यांनी शिक्षणाची स्थिती माहितीचे संशोधन हेतू व माहिती मिळविण्यासाठी वापरण्याचे स्त्रोत हे British Columbio Public School च्या शिक्षण तज्ञांकडून समजावून घेतले. Agrawal आणि Chakraborty (1995) ने भूगर्भ विज्ञान विशेष तज्ञाचे बनारस हिंदू विद्यापीठात प्रश्नावली व मुलाखती घेतल्या व त्यांना आवश्यक माहिती मिळविण्यासाठी अवलंबिलेल्या पद्धती ज्याचे संशोधन केले. त्याचा निष्कर्ष असा निघाला की, ग्रंथालयात अधिक माहिती उपलब्ध केली गेली पाहिजे. तेथे वेगवेगळ्या सेवा उपलब्ध केल्या गेल्या पाहिजेत व माहितीचे प्रसारण वाढले पाहिजे. तसेच आयसीटी तज्ञांचे वापर करण्याचे शिक्षण उपभोक्त्यांना ग्रंथालयातून दिले गेले पाहिजे.

Bruce (2005) ने व्यक्तिगतरित्या अपेक्षित माहितीच्या आवश्यकतेसंबंधी अभ्यास केला. त्यांनी व्यक्तिगत माहिती गोळा करण्याच्या व संग्रहित करण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या व्यवस्थापनावर अवलंबून असते. त्यांनी माहितीची आवश्यकता व माहिती संशोधन वर्तणुकीवर साहित्य तपासून माहिती निवडीच्या संकल्पनेवर मुद्दे मांडले. माहितीची आवश्यकता व वापर यांच्या संबंधांचा अभ्यास Wilson (2006) मध्ये केला. माहितीशास्त्रांत आवश्यक माहिती व ती मिळविण्यासाठी लागणाऱ्या योग्य व्याख्यांच्या अभावी अडचणी येतात.

Purnima and Vikas C. (2005) यांनी मणिपूर येथील उच्च शिक्षणातील प्राध्यापकांच्या माहितीच्या गरजांचा अभ्यास केला. हा अभ्यास निदर्शनास आणतो की, काही महाविद्यालये/ विद्यापीठे वगळता बहुतांश प्राध्यापकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या ज्या सुविधा पुरविल्या आहेत. त्यांची फारशी माहिती नाही. त्यांच्या ग्रंथालयांमध्ये संसाधनाची कमतरता आहे. Purnima and Vikas (2005) यांनी महाविद्यालये आणि विद्यापीठीय प्राध्यापकांच्या माहितीच्या गरजांचा अभ्यास केला आहे.

Tunumwire O. (2010) यांनी संशोधन अहवालात विशिष्ट व्यापक समूह त्यांच्या माहिती गरजा आणि वापर तपासले जेणेकरुन माहितीचे ठिकाण आणि वापर यासाठीचे प्रयत्न जाणून घेता येईल आणि त्या गटांसाठी माहितीचे संकलन वाढविणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. माहितीचे संकलन हे वकिलांच्या कामाचा महत्त्वाचा भाग आहे आणि इतर अनेक व्यवसायाप्रमाणेच विधी व्यवसायाच्या गरजा शोधणे. जेणेकरुन अनेक समर्पित विधीविषयक माहिती संसाधने शोधल्या जाऊ शकतील.

माहितीची गरज ही वकील यांचे वय आणि अनुभव यामुळे प्रामुख्याने प्रभावित होत असते. असा तर्क केला जातो की, वकील जितका जास्त वयस्कर आणि त्याच्या/तिच्या विधी व्यवसायात जितका जास्त अनुभव असेल त्याला माहिती साधने शोधण्याची गरज कमी असेल.

Fowler (2007) यांच्या असे निदर्शनास आले आहे की, वकील यांना जर ते सुसंगत विधी माहितीचा शोध घेत असतील तर त्यांना राज्य आणि संघराज्ये संविधाने, कायदे आणि न्यायालयीन नियमावली यांचे जबरदस्त ज्ञान आहे अशी त्यांची ओळख असायला हवी. त्यापलीकडे प्रत्येक विशिष्ट व्यावसायाची व्याप्ती यामुळे तत्पर संदर्भ आणि संशोधन यासाठीची विधीविषयक माहितीची विशिष्टता निर्धारित होते. छोट्या विधी व्यवसाय फर्मस्मधील वकिलांना प्रामुख्याने आणि प्रामाणिकपणे मूलभुत राज्यात संसाधने आणि अपीलीय न्यायालयाचे अद्ययावत निर्णय, निर्वाळे यापर्यंतची पोहोच गरजेची असते. वकिलांच्या विधीविषयक माहितीच्या गरजा बदलत असतात आणि हाताळलेल्या प्रकरणांचे वैविध्य आणि विशिष्ट क्षेत्रातील कुशलता हे कारणीभूत असते. व्यावसायिक वकील यांना कायदे, नियम आणि अंतिम आदेश जे शासनाने निर्गमित केलेले आहेत याची माहिती असते. मूलभूतपणे त्याची व्यवस्था वार्षिक आधारावर केलेली असते आणि सोबत अनुक्रमणिका जोडलेली असते.

Solman (2002) यांनी संबंधित लेखामध्ये कार्य सिद्धांत (Activity Theory) चा माहिती वागणूक साधन म्हणून उपयोग करता येईल असे सुचविले. हा अभ्यास Vygotsky, Engestrom त्याच्या कार्य सिद्धांताच्या कार्यपध्दतीचे साधन समजून त्याचा अवलंब केला. यात माहिती वापर वातावरणासाठी लागणाऱ्या कृत्रिम साधनांचा वापर हा माहितीची गरज व त्याच्या उद्दिष्टांशी निगडित आहे. कार्याच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात समस्या ह्या अचानक येतात व त्या अधोरेखित राहात नाही हे वेळोवेळी जाणवते. परंपरागत बघताना, माहिती वापरांचा अभ्यास हा त्याची निकड, कार्य व प्रणाली यांचा संबंध परस्परांवर अवलंबून असतो व त्यात येणाऱ्या अडचणी व त्रुटी ह्यांचे वेगळे स्थान असते. ह्या अभ्यासात कार्य सिद्धांत वापरून त्यातील त्रुटी व अडचणी समजून घेऊन ती कार्य सिद्धांत ही संशोधनाचे साधन म्हणून वापरून ह्या कल्पना कशा एकमेकांशी निगडित आहेत ते पाहणे आवश्यक आहे. एका अर्थी ही कार्य सिद्धांत हीच माहिती

वापराची प्रतिकृती बनू शकेल. माहिती व माहितीची गरज, शोध व घेण्याची कृती कार्ये व प्रश्न सोडविण्याची पद्धत कार्याबद्दल आपल्या भ्रामक कल्पना आहेत. त्यावर काय परिणाम होतो तो पाहिला जाईल. त्या चौकटीच्या लागू करण्याने चिकित्सालयात काय कार्य चालतात याचे वर्णन मिळेल व त्यात ऐतिहासिक दृष्टिकोनातून वकिलांना विवेकी निकष, संशोधन व विवेकाची सुयोग्य मांडणी कशी करावी, ते कसे शिकविले जात होते ते समजेल यासंबंधी चर्चा केली आहे.

Thanuskodi (2012) यांच्या मते, या अभ्यासाचे प्रयोजन तामिळनाडू येथील डॉ.आंबेडकर विधी विद्यापीठातील प्राध्यापक सदस्य यांनी वापरलेली माहिती माध्यमे, ते प्राधान्य देत असलेली माहिती साधने, आवश्यक माहिती संकलन यांसाठी वापरलेली पद्धती आणि त्यांचा ग्रंथालये वापरण्याची पद्धती तपासणे हे होते. तामिळनाडू येथील डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ येथील 20 प्राध्यापक सदस्य यांना प्रश्नावली वितरित करण्यात आल्या आणि 18 लोकांनी प्रश्नावलीला प्रतिसाद दिला. त्यामुळे एकंदरीत प्रतिसादाचा दर हा 90 टक्के होता असे लक्षात आले आहे की, आवश्यक माहितीच्या अधिग्रहणासाठी प्रतिसादक विविध साधने वापरत होते. अध्यापन आणि संशोधन यासाठी ग्रंथांना क्रमवारीत सर्वांत जास्त महत्त्व देण्यात आले आणि त्यानंतर विधी अहवाल आणि कायदे यांचा क्रम लावला गेला. प्रतिसादकांनी इतर माहिती पुरवठा साधने व संस्था यांचा वापर करण्यापूर्वी आपल्या स्वत:चा व्यक्तिगत संग्रह तपासला. ऑनलाइन सार्वजनिक प्रवेश कॅटलॉग (OPAC) आणि CD-ROM यांचा वापर माहिती तंत्रज्ञान (IT) आधारित साधने आणि सुविधा म्हणून सर्वांत जास्त आणि वारंवार करण्यात आला. इंटरनेट आधारित सेवा आणि ॲप्लिकेशन्स यात ई–मेल सर्वांत लोकप्रिय होते. एकंदरीत तामिळनाडू येथील डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ येथील प्रतिसादकांना ग्रंथालय संग्रह, सेवा आणि सुविधा त्यांच्या माहितीच्या गरजा प्रभावीपणे भागविण्यासाठी पुरेसे वाटत होते.

Bates (1996) यांनी माहितीची गरज आणि माहिती शोध वर्तनाचा अभ्यास सर्वेक्षण पद्धतीच्या आधारे हा अभ्यास एक दशकाचा होता. Bates यांनी असे मांडले की, इंटरनेट हे एक शिक्षण घेण्यासाठी व ज्ञान संपादन करण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे. वर्ल्डवाईड वेब हे माहितीचे संकलन करण्यासाठी महत्त्वाचा घटक मानला जातो हे निष्कर्ष मांडले.

Jackson (2005) यूएसमध्ये शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय गरजांवर सदर अभ्यास निर्धारित आहे. सॅन जोस राज्यातील विद्यापीठामधील ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांकडून प्रश्नावलीच्या साहाय्याने माहितीचे संकलन केले गेले.˙ संबंधित विद्यापीठामध्ये 38 देशाचे प्रतिनिधीत्व करणारे विद्यार्थी होते. 121 प्रश्नावलींना प्रतिसाद मिळाला. अभ्यासाचे निष्कर्ष निदर्शनास येतात की निरनिराळया भाषेतील माहिती,माहितीची साधने अधिक असणे ग्रंथालयात गरजेचे आहे. विशेष करुन त्या उपभोक्त्यांना त्यांच्या देशातील, राज्यातील माहिती वर्तमानपत्र, रोजगार संबंधित साधने विद्यापीठ ग्रंथालयात असणे आवश्यक वाटते.

Mahajan (2009) उपभोक्त्यांना माहितीचा शोध घेताना वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीची आवश्यकता असते. बहुतांश उपभोक्ते छापील आणि इलेक्ट्रॉनिक या दोन्ही स्वरूपातील माहितीला पसंती देतात. त्यावेळी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक संसाधने प्राप्त करण्याबाबत असुरक्षितता वाटते. यासंदर्भात Mahajan (2009) म्हणतात की, ग्रंथालय व माहितीशास्त्र केंद्रांना वापरकर्त्यांचे माहिती शोध वर्तन, माहित असणे आवश्यक आहे. ग्रंथालय सेवाची पुनर्बांधणी करुन त्या तत्परतेने देणे आवश्यक आहे.

Choukhande et. al. (2004) यांनी अमरावती विद्यापीठाशी संलग्न असणारी महाविद्यालये व संबंधित विभागातील प्राध्यापकांची माहितीची गरज आणि तिचा वापर करण्याच्या पध्दतीचा अभ्यास लेखकाने केला. यादृच्छिक नमुना तंत्राचा वापर अभ्यासासाठी केला. माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत व निरीक्षण या साधनांचा वापर करण्यात आला. 1200 प्राध्यापकांनी संबंधित सर्वेक्षणाला प्रतिसाद दिला. गृहितकाचे परीक्षण करण्यासाठी chi square या सांख्यिकी तंत्राचा वापर टक्केवारी काढण्यासाठी करण्यात आला. सर्वेक्षणअंती त्यांना लक्षात आले की, उपभोक्त्यांचा कल हा सर्वांत जास्त पाठ्यपुस्तके संदर्भ ग्रंथ वापरण्याकडे होता. त्यांना भेडसावणारी सर्वांत मोठी अडचण म्हणजे ग्रंथालय सेवा वापरण्यातील कोणतेही त्याबाबतचे ज्ञान देणारे तयार झाले नव्हते. तसेच इलेक्ट्रॉनिक संसाधनातून माहिती उपलब्ध करताना अधिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. ग्रंथालयातील उपलब्ध साधने वापरण्यासाठी जरी आवश्यक कौशल्याची आवश्यकता असली तरी ते त्याबाबत अज्ञानीच होते.

Marcella and Baaxter (1999) यांनी इंग्लंडमधील लोकसंख्येवर माहितीची आवश्यकता व त्यासंबंधी त्यांची प्रक्रिया ह्यावर सर्वेक्षण केले. त्यामध्ये त्यांनी स्पष्ट केले की, बहुतांशी लोकांना जुनी माहिती भविष्यातील माहितीचे आराखडे देण्यासाठी ज्ञान आवश्यक असते. त्यासाठी लेखकाने 3/4 लोक सार्वजनिक ग्रंथालयाचा 1/3 वा 3/4 लोक नागरी सल्ला संस्था, पोस्ट ऑफिस, सरकारी विभाग मित्र मंडळी नातेवाईक ह्यांचा उपयोग करुन घेताना आढळतात. माहिती मिळविण्याची सर्वांत लोकप्रिय पद्धत ही प्रत्यक्ष संसाधनातून ग्रंथ घेऊन वाचले जात होते. फक्त काहीच लोक संगणकाचा वापर करुन माहिती मिळवितात. हा सार्वजनिक ग्रंथालयाकडून हे इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील माहिती जमविण्यासाठी एक चांगले ठिकाण आहे. इलेक्ट्रॉनिक माहितीसाठी सार्वजनिक ग्रंथालय योग्य असतात ते निदर्शनास आले.

Anyaogu (2014) प्रस्तुत अभ्यासात लेखकाने माहितीची आवश्यकता आणि शोध वर्तन यासंबंधी अभ्यास NIALS ग्रंथालयातील विद्यार्थ्यांचा केला आहे. विधी विद्यार्थी सर्वांत जास्त माहितीचे स्त्रोत म्हणून विधी ग्रंथालयातील अभ्यासक्रमित पाठ्यपुस्तके मोठ्या प्रमाणात वापरतात असे अभ्यासातून निर्देशित झाले.

Cheatle (1992) यांनी मांडल्याप्रमाणे, इंग्लंड आणि वेल्स सामान्य कायदा विधी प्रणालीचे अनुकरण करतात जेथे बहुतांश कायदे अलिखित असतात. परंतु न्यायपालिकेने न्यायालयात मांडलेल्या विधीविषयक नियमांवर अवलंबित असतात. कायद्याचे आकलन करुन न्यायालये न्याय व्यवस्थापन करत असतात आणि न्यायप्रकरणांतील मागील सिद्धांताशी निगडित असतात. ज्यामुळे वरिष्ठ न्यायालयाचे निर्णयांचा आधार घेण्यासाठी न्यायालये बांधील असतात. यामुळे हे समजण्यात मदत मिळते की विधीविषयक माहितीची मागणी हे एक कठीण काम आहे. विधीविषयक प्रश्नावर उत्तर शोधणे म्हणजे विधीच्या विश्वसनीय स्वीकृत आवृत्तीचा अभ्यास करणे इतके सोपे नव्हे असे मत मांडले आहे.

Mersky and Dunn (2002) यांच्या मते, विधी संशोधन ही एक प्रक्रिया आहे. ज्यात माहिती का हवी आहे, कोणत्या प्रकारची हवी आहे. त्यासाठी शोधण्याचा प्रयत्न असतो. योग्य निर्णय न्यायाधीशांकडून मिळविण्यासाठी आपल्या दाव्याला पूरक माहिती मिळविणे आवश्यक असते.

Otike (1999) यांनी विधी विषयातील प्राध्यापक आणि संशोधक तसेच वरिष्ठ व्यावसायिक वकील की जे लंडन आणि पूर्वेकडील मिडलँड येथे स्थायिक होते. त्यांच्या रचनात्मक मुलाखती घेतल्या. या वकिलांचे वय, त्यांचा विधीविषयक अनुभव वेगवेगळा होता. आपल्या गरजा भागविण्यासाठी वकिलांना कोणत्या प्रकारची माहिती लागते, माहितीचा शोध घेण्यासाठीची कारणे, ते कोठून माहितीचा शोध घेतात आणि त्यांच्या माहितीच्या गरजांना व सवयींना प्रभावित करणाऱ्या बाबी याबाबत प्रश्न विचारण्यात आले. वकिलांची मुलाखत लेखकाने घेतली. वकिलांनी आपली कामे शिकाऊ वकिलांना, ग्रंथालयातील,कर्मचाऱ्याला आणि कायद्याच्या कारकुनांना दिली होती. कामे प्रदान करण्याचे मुख्य कारण म्हणजे संशोधनासाठी वेळेची कमतरता (व्यावसायिक वकिलांमध्ये संशोधनाचे काम इतरांना प्रदान करणे ही एक साधारण बाब होती.) परंतु अभ्यासू वकिलांमध्ये त्याला कमी मान्यता होती. लेखकाच्या असे लक्षात आले की, वकिलांचा माहितीचा वापर वेगवेगळा होता. त्यांनी हाती घेतलेल्या कामाचा प्रकार आणि त्या विशिष्ट क्षेत्रातील आणि विधीविषयक भागातील त्यांचा अनुभव या आधारावर माहितीच्या वापराची वारंवारिता अवलंबून होती.

व्यावसायिक वकिलांनी अभ्यासू वकिलांपेक्षा कमी वेळा माहितीचा शोध घेतला आहे. कारण त्यांच्या गरजा मर्यादित क्षेत्रांशी निगडित होत्या म्हणून त्यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी माहितीची गरज कमी होते. त्यांना असे लक्षात आले की, जे वकील काम करतात त्यामुळे त्यांच्या माहितीच्या गरजा प्रभावित होत होत्या. व्यावसायिक वकील हे वकिली, दस्ताऐवजीकरण, मार्गदर्शन आणि व्यवस्थापन ही कामे करतात. अभ्यासू वकील, प्रशिक्षण, संशोधन आणि सल्लामसलत ही कामे करतात. वकिलांना कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे, याबाबत त्यांच्या लक्षात आले की, विस्तृत आणि संशोधित माहिती, वास्तविक माहिती यात बराच फरक आहे. काही वकील दोन्ही प्रकारची माहिती वापरत आहेत. ओटाइक यांच्या निदर्शनास आले की, बरीच माहिती आंतरिक साधनांकडून जमा केली होती. जी बहुतांशपणे कागदावर आधारित होती. व्यक्तिगत मित्र, सहकारी किंवा सेमिनार किंवा चर्चासत्र यांसारख्या साधनांपासून माहिती मिळविणे सुद्धा प्रचलित होते.

इलेक्ट्रॉनिक साधनांकडून माहिती मिळविणे असे नमूद केले असले तरी ओटाइक यांनी सुचविले की, त्यांचा वापर मोठ्या विधी संस्था आणि काही महाविद्यालयांची ग्रंथालये यांच्यापुरताच मर्यादित होता. त्यांचा वापर करणे त्यांच्या आवाक्यात आणि खर्चात शक्य होते. व्यावसायिक वकिलांच्या ज्या मुलाखती घेण्यात आलेल्या होत्या. त्या विधी संस्था किती मोठ्या होत्या हे लेखकाने नमूद केलेले नाही.

Kidd (1978) यांनी स्कॉटलंड येथील खाजगी विधी व्यवसाय करणाऱ्या कायदेपंडित लोकांच्या माहितीच्या गरजांचा अभ्यास केला. कायदेपंडित लोकांच्या गरजांना इलेक्ट्रॉनिक विधीविषयक संसाधने यांच्या वापराने मदत मिळू शकेल याचे निरीक्षण हा 'किड' यांच्या अभ्यासाचा अंतिम मुख्य हेतू होता. त्यांच्या असे लक्षात आले की, कायदेपंडित लोकांचे काम सखोल माहिती वातावरणात होते आणि त्यात नियमितपणे अडथळे येत असतात. त्यांच्या असेही लक्षात आले की, विधीविषयक प्रकरणे सोडविण्यात आणि स्वत:ला विधी क्षेत्रातील नवीनतम ज्ञानासोबत अद्ययावत ठेवण्यासाठी कायदेपंडित लोक माहिती मागतात. कदाचित त्यांना हे माहित नव्हते की, माहितीवर प्रक्रिया सुरू आहे. त्यांनी निष्कर्ष काढला की, कायदेपंडितांचे कामाला मदत करण्यासाठी संग्रह केलेली माहिती पुन्हा वापरण्यासाठी संगणकीय प्रणाली मदत करू शकते. असे असले तरी ही एक चांगली सुरुवात आहे असे त्यांना वाटत असल्यामुळे ज्या वकिलांची मुलाखत घेण्यात आली त्यापैकी कोणीही संगणकीय सेवेची अतिशय गरज आहे असे सांगितले नाही.

Feliciano (1984) यांनी फिलिपाईन्स येथील 30 वकिलांना एक साचेबंद प्रश्नावली दिली, जेणेकरुन इतर बाबीसोबतच त्यांना माहिती का हवी असते आणि त्यांना कोणत्या प्रकारची माहिती हवी असते हे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. मुलाखतदारांपैकी बहुतांश लोकांनी असा दावा केला की, त्यांना प्रगतिपथावर असलेल्या कामासाठी विशिष्ट माहिती पुरविण्यासाठी माहितीची गरज असते.

कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि कामांचा विकास याबाबत माहिती पुरविण्याची माहितीची गरज असते. या सर्व गरजा किमान 70 टक्के मुलाखतदारांनी व्यक्त केल्या आणि असे

नमूद केले की वकिलांना माहितीची गरज विस्तृत गरजा भागविण्यासाठी असते.

Balasubramanian et.al. (2010) यांच्या अभ्यासात उपभोक्त्यांचा अभ्यास, माहितीच्या गरजांचा अभ्यास आणि उपभोक्त्याचे समाधान आणि असमाधान अभ्यास, सुसंवाद, वागणूक अभ्यास, माहिती वापर, रचना, नमुने अभ्यास, सामुग्रीचे पर्याय आणि प्राधान्य अभ्यास या बाबी एक दुसऱ्यांशी निगडित आहेत. याबाबत परीक्षण केले गेले. कोणताही उपभोक्ता अभ्यास माहिती प्रणाली आणि सेवाची रचना निर्मिती करण्यासाठी उपभोक्त्याचा अभ्यास एक मूलभूत बाब होय आणि तो ठराविक कालावधीत करणे गरजेचे आहे. जेणेकरुन ग्रंथालयातील संग्रह आणि सेवा सुधारित करण्यासाठी आणि अद्ययावत मूल्यमापन करून योग्य उपाय केले जाऊ शकतात. उपभोक्ता अभ्यासाची उद्दिष्ट्ये, उपभोक्ता अभ्यास पद्धती, तंत्र, माहिती संकलन, वागणूक आणि ग्रंथालये आणि माहिती विज्ञानातील संशोधन याबाबत या प्रबंधामध्ये चर्चा करण्यात आली आहे.

## 3.4 माहितीचा वापर आणि माहिती शोध वर्तन :

विधी संशोधन प्रणालीत विद्यार्थ्यांना फक्त इलेक्ट्रॉनिक विधी साधने वापरावी लागत नाहीत तर त्यांना त्यांच्या व्यक्तिगत संशोधनातसुद्धा माहितीचा तपास करावा लागतो. Yuan (1996) यांच्या मते, अनुभवामुळे शोधकर्त्यांच्या प्रक्रियेत चुका कमी होतात अथवा चुका करण्यापासून ते परावृत्त होतात असे काहीही होत नाही. विधी व्यवसाय करणाऱ्या वकिलांसाठी अगोदर निर्माण केलेले दस्ताऐवज शोधणे आणि त्यांचा पुनर्वापर सुलभ होऊ शकतो.

Beautieu (2003) यांनी उपभोक्त्याच्या दृष्टिकोनातून माहिती शोध व माहिती पुनर्प्राप्ती (Retrieval) ह्यांचा अभ्यास केला. शेफिल्डचे माहिती अभ्यासक विभागाने (Department of informaiton studies) चाळीस वर्षाचे संशोधनाचे जे प्रकल्प होते. त्या प्रकल्पाच्या वैशिष्ट्यांचे मूल्यमापन हे विविध प्रश्नांच्या आधारे केले. उपभोक्त्याच्या दृष्टिकोनातून संशोधनाची प्रगती Beautieu (2003) यांनी दाखवून दिली. त्या अभ्यासातून माहिती वापर करण्याचा संबंध आवश्यक माहिती मिळविण्याशी व त्याच्या प्रक्रियेशी निगडित आहे हे समजले. तसेच ह्या अभ्यासात माहिती मिळविण्याच्या प्रणालीचे मूल्यमापनही करण्यात आले.

Taylor (1991) यांनी माहितीचा वापर वातावरणाची कल्पना स्पष्ट केली, त्यांनी माहितीचा वर्णनात्मक अभ्यास केला. तिच्या चिकित्सालयाच्या स्थापनेत माहितीचा वापर वातावरण तपासण्यात काही चौकटीची आवश्यकता भासते. त्या चौकटीत लोक, परिस्थिती, प्रश्न व निराकरण यांचा समावेश करण्यात आला होता. त्यांची पुष्टीही गटनिर्धारित होती. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास, टेलर यांनी विविध स्तरांमधील लोक जसे डॉक्टर, वकील, इंजिनिअर यांच्या समूहांवर लक्ष केंद्रित केले. कार्य सिद्धांताच्या (Activity Theory) आधारे माहिती शोध साधन म्हणून विधी चिकित्सालयात सहभागी होणाऱ्या काळातील माहितीद्वारे प्रश्न सोडविण्याची पद्धत न्याहाळली. माहिती शोध वातावरण हे विधी चिकित्सालयातील एक कार्य म्हणून अभ्यासले गेले. लेखकाच्या मते वकील, विद्यार्थी हे लोक विशिष्ट साच्यात कार्यरत असतात. प्रत्येक स्तरातील लोक विशिष्ट वातावरणात काम करतात. टेलर यांनी त्या स्थितीचे वर्णन व संदर्भ त्या स्थितीत राहणाऱ्या व काम करणाऱ्या लोकांशी लावला. म्हणून त्यावरून हे लक्षात आले की, वापर व उपभोक्ता या बाबी लोकांवर केंद्रित आहेत. लोक माहिती कशी मिळवतात व प्रश्न कसे सोडवतात. तसेच शोध कार्ये व प्रणाली संसाधने कसे वापरून स्वत: अर्थबोध करुन घेतात हे स्पष्ट होते. त्यांनी संघटनेच्या क्षेत्रात काम करताना माहिती मिळविण्याची सहज उपलब्धता ऐतिहासिक व स्वानुभवाचे महत्त्व विचारात घेतले. त्या विशेष स्थितीत राहून ते समस्यांना सामोरे कसे जातात व प्रश्न सोडवितात ते पाहिले गेले.

हा अभ्यास जास्त शोधक व माहिती वापर वातावरणाच्या चिकित्सालयाच्या अनुषंगाने केलेले वर्णनात्मक बाबी समजविणारा आहे. त्यात इतर प्रतिकृतींमध्ये स्पष्ट होणाऱ्या गोष्टींकडे लक्ष दिले गेले. जसे सामाजिक, निशब्द वर्तणूक चैतन्यशील व न रोखलेल्या वागणुकीच्या अभ्यासाचाही समावेश आहे. त्यात वापर व उपभोक्ता हे दोन्ही लोकांभवती आधारित असून ते समस्यांचे निराकरण कोणत्या प्रकारे प्रत्यक्ष कार्य करून व कोणती प्रणाली वापरून करतात व अर्थ काढतात हे स्पष्ट होते.

Komlodi आणि Soergel (2002) यांनी माहितीचा वापर आणि पुनर्वापर विशेषतः विधीविषयक माहितीचा शोध घेणाऱ्यांचे त्यांचे आठवणींचा वापर यावर लक्ष केंद्रित केले आणि

बाह्यपणे त्यांचा शोध इतिहास नोंदविला. जेणेकरून त्यांचे शोध त्यांना कळविता येतील. Komlodi आणि Soergel यांच्या असे निदर्शनास आले की, कुहलथाऊ आणि टामा (2001) यांच्याप्रमाणेच विधी संशोधन प्रणालीत विधी विद्यार्थ्यांना फक्त इलेक्ट्रॉनिक विधी साधने वापरावे लागत नाही तर त्यांना त्यांच्या व्यक्तिगत संशोधनाचासुध्दा तपास करावा लागतो. Komlodi आणि Soergel यांनी शोध इतिहास संच यांवर आधारित उपभोक्ता आंतरपाठ उपकरण बनविले जेणेकरुन नोंदी घेणे, विभागणी करणे आणि शोधप्राप्तीचे भाष्य यांचे समर्थन करता येईल. या सर्वांसाठी उपभोक्त्याच्या कृतीवर शोध आणि नियंत्रणासाठी आणि इलेक्ट्रॉनिक संसाधन आणि विस्तृत केलेला इतिहास यासाठी प्रणाली तयार करण्यात आली, जेणेकरुन उपभोक्त्यांना माहितीचा पुन्हा वापर करण्यासाठी आणि भविष्यातील शोध कृती यासाठी प्रोत्साहित करता येईल.

Jones (2006) यांनी संयुक्त राष्ट्र विधी मदत केंद्र येथील आठ विद्यार्थी आणि प्रशिक्षक यांचा संदर्भ शोध यावर निरीक्षण अभ्यास केला. त्यांनी वकील जेव्हा आपल्या ग्राहकांसोबत पक्षकार म्हणून काम करतात. त्यांच्या शब्दांच्या नोंदी आणि व्हिडिओ टेप यांचा अभ्यास केला आणि वकिलांचा लेक्सिस नेक्सिस आणि वेस्टलॉ शोधांच्या नोंदी आणि तयार केलेले दस्तऐवज यांचा अभ्यास केला. जोन्स यांचे प्राथमिक निष्कर्ष हे होते की, वकील हे ज्ञान व्यवस्थापन आणि सहकार्य यावर अतिशय जास्त भर देत होते. ज्यात ग्राहकांचे फाईलमधील दस्तऐवज शोधणे आणि त्यांना वाचणे यांचा समावेश होता. त्यांच्या असे लक्षात आले की, या दस्तऐवजांना फारच क्वचित अवतरित केल्या जातात. आणि बाहेरील तज्ज्ञांसोबत जेव्हा चर्चा केली तेव्हा विस्तृत कायदे, नोंदी तयार करण्यात आल्या. जोन्स यांनी निष्कर्ष काढला की, अनौपचारिक साधने, जसे, यादी शोधणे आणि स्थानिक तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांवर अतिशय मोठ्या प्रमाणावर सहकार्य आणि अवलंबन असल्यामुळे विद्यार्थ्यांना नंतर येणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रकरणात मदत मिळाली. त्यांनी पुढे असे सुचविले की, भविष्यातील प्रणाली यासारख्या विधी मदत केंद्रांत वकिलांना मदत करण्यासाठी निर्माण केलेल्या होत्या. त्यांनी विधी संशोधन या सामाजिक पैलूंवर लक्ष केंद्रित करावे, जेथे ते ऑनलाइन संग्रह म्हणून काम करतील व दस्तऐवज एक–दुसऱ्यांना पुरविणे,

अवतरणे आणि दस्तऐवजांची ओळखीसाठी त्यांची क्रमावली ठरविणे शक्य होईल. जेणेकरून त्यांचा शोध अधिक सहजपणे घेता येईल.

या अभ्यासात लेखक वकिलांची समज आणि त्यांचे काम विशद करणे सुलभ करतात, जेणेकरून या कामाचे समर्थन करण्यासाठी परस्परांशी सुसंवाद साधणाऱ्या प्रणालीची निर्मिती केली जाऊ शकते. या अभ्यासात हेसुद्धा पुढे येते की, वकिलांची माहिती वागणूक यात माहिती शोध कार्यक्रमापेक्षा बरेच काही असते. या अभ्यासातून फक्त इलेक्ट्रॉनिक उपकरणांची निर्मिती न करता येथे इलेक्ट्रॉनिक विधी संसाधने यांची तपासणी आणि त्यानंतर त्यांची पुन:निर्मिती यासाठी समर्थन मिळते.

Engestrom (1996) यांनी विशेषज्ञ न्यायाधीशांचा प्रत्यक्ष न्यायालयात सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास केला. त्यांनी कार्य सिद्धांत (Activity Theory) ची विस्तृत प्रतिकृती वापरून त्याच्या अनुषंगाने कायद्याच्या प्रक्रियेतील त्रुटी, अडचणी व विवंचनांचा अभ्यास केला. लेखकाने कॅलिफोर्निया व फिनलँडमधील नगरपालिकांच्या न्यायाधीशांचा अभ्यास केला. दारूचे सेवन करून वा नशेत गाडी चालविण्याचे (DUI - Driving Under the Influence) मुकदमे चालविणाऱ्या ह्या न्यायाधीशांची विचारपूस केली. त्यांनी काही बाबींवर लक्ष केंद्रित केले. जसे, विविध बोलीभाषा, कोर्टातील गोंधळ व न्यायाधीशांच्या कामातील तणाव याचा अभ्यासावर, बदलांवर व प्रगतीवर जबरदस्त परिणाम होण्याची शक्यता आहे असे वक्तव्य एगेस्ट्रॉम यांनी केले. प्रस्तुत अभ्यासात न्यायालयातील दस्तऐवज, कोर्टापुढे चालणाऱ्या मुलाखतीच्या कामकाजाचे उतारे, न्यायालयातील चित्रफिती, ध्वनीफिती वापरण्यात आल्या. ज्या मुकादम्यात गोंधळ व अडचणी आल्या होत्या तिथे बहुतेक वेळा तणाव प्रतिवादीच्या विनंतीमुळे आहे हे जाणवले. न्यायालयातील कडक नियमांमध्ये लवचीकता आणण्यासाठीची त्यांची मागणी कारणीभूत होती. हे गोंधळ मिटविण्यासाठी सामूहिक पद्धतीने विविध पक्षांची इतरत्र भेट घेऊन वाद मिटवला जात होता. लेखकाने जरी त्यांच्या अभ्यासाला माहिती वापराचा अभ्यास असे नाव दिले नाही तरीही त्यांच्या अभ्यासावरून हा अभ्यास माहिती वापराचा असल्याचे निदर्शनास येते.

Biomberg आणि Trigg (1936) यांनी सिलिकॉम व्हॅली येथील विधी सल्ला देणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने अभ्यास केला. माहितीचा वापर आणि पुनर्वापर यावरील हा अभ्यास होता. विधी संस्थेच्या व्यवसाय शाखेच्या सहकार्याने जी अशी उत्पादने विकसित करीत होते, जे मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक दस्तऐवज यांचा दुवा होते, त्यांचा विस्तृत अभ्यास केलेला आहे. या कार्यात फायलिंग कॅबिनेट नमुना करणे यांचा समावेश होता जेथे विधी व्यवसाय करणाऱ्या वकिलांना अगोदर निर्माण केलेले दस्तऐवज शोधणे आणि त्यांचा पुन: वापर सुलभ होऊ शकतो.

Biomberg etc. यांच्या असे लक्षात आले की, या फर्मचे केंद्रिय तत्त्व हे होते की शक्यतोवर ते जुन्यापासून दस्तऐवजीकरण टाळू शकतात. यामध्ये व्यवहाराचे दस्तऐवज सांभाळून ठेवणे यांचा समावेश होता. जे भविष्यात उपयोगी पडू शकतील आणि इतर सहकारी लोकांना विचारणे की त्यांनी या प्रकारचे विशिष्ट तरतुदी असलेले दस्तऐवज यापूर्वी बनविले आहेत काय याची विचारणा करणे. यामुळे लोकांना अशी प्रणाली बनविण्याची संधी मिळाली जेथे एखाद्या वकिलाच्या वास्तविक फायलिंग कॅबिनेटमधून अधिकाधिक वापरले जाणारे, दस्तऐवजांचे स्कॅन केलेली आवृत्ती तयार केली जाऊ शकते आणि त्यानंतर फाइल कॅबिनेट यांच्यासाठी शोधप्रणाली निर्माण करणे. त्यांनी असे नमूद केले की, कॉर्पोरेशन आणि करार यासारखे शब्द विधीविषयक माहिती शोधणाऱ्यांना विशेष वेगळे वाटत नाहीत. त्यामुळे लेखकाने उपभोक्त्यांना त्यांचे शब्द ठरविण्याची मुभा देणे गरजेचे ठरले. लेखकाने स्कॅन केलेल्या चित्रांची छोटी प्रतिकृती म्हणजेच थम्बनेल वापरले, ज्यामुळे उपभोक्त्यांना त्या विधी दस्ताची व त्याच प्रकारच्या दस्तांची जलदपणे ओळख करता येईल. त्यामुळे चित्र आणि शब्द यांचा शोध घेण्याची प्रथा पडली.

## 3.5 विधी विषयातील माहिती शोध वर्तन :

देशाचा, राष्ट्राचा विकास होण्यासाठी विधी विद्यार्थ्यांचे माहिती शोध वर्तन तपासून त्यांच्या समस्याचे निराकरण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा आणि त्यातही विधी विद्यार्थ्यांचा विकास होणे ही समाजासाठी फार मोठी बाब आहे. या विद्यार्थ्यांवर विकासाचे मोठे क्षेत्र विसंबून असते. विधी विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक साधने दिल्यास ते पदवी घेऊन बाहेर पडल्यावर निश्चितच समाजाचा त्याच्या ज्ञानाच्या आधारे विकास करतील. या संशोधनाच्या माध्यमातून

त्यांना येणाऱ्या समस्या प्रकाशित करुन त्यावर कशी मात केली जाऊ शकते याचा विचार केला जाऊ शकतो. Adekunmisi (2005) यांच्या मते, विधी विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर कमी करतात. साधनांची कमतरता, सुलभतेची समस्या, ऑनलाइन सेवांचा अभाव विद्यार्थ्यांना भेडसावतो. Hainsworth (1992) यांच्या मते, न्यायालयातील न्यायाधीश हे स्वतंत्रपणे आणि एकटेपणे माहिती शोधतात आणि त्यांना पुरविल्या गेलेल्या सेवांबाबत ते साशंक असतात. ग्रंथालय व्यायसायिकांनी दूरदृष्टिकोन ठेवून, स्वयंप्रेरित होऊन विधी व्यावसायिकांना भविष्यात येणाऱ्या अडचणींवर मात करावी. Abbas (2014) यांच्या मते, ग्रंथालय माहितीशास्त्र व्यावसायिकांनी सक्रिय राहणे आवश्यक आहे. माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करताना George (2006) यांच्या लक्षात आले की, विधी विद्यार्थ्यांच्या अभ्यासामध्ये इंटरनेट महत्त्वाची भूमिका निभावतो. तरीही विधी विद्यार्थी मुद्रित साधानांचा वापर करतात. Chidinm (2003) यांना माहिती कौशल्यांची कमतरता अभ्यासातून दिसून आली. विधी विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर करण्यास टाळतात व जुन्या केसेस व फायलींचा उपयोग विविध केसेसचे मुद्दे पाहण्यासाठी करतात.

Marvel (1978) यांनी अपील न्यायालये आणि वकीलविषयक माहिती जमा करण्याची प्रणालीचा अभ्यास केला. यांनी आपल्या ग्रंथात सूचित केले की, न्यायालयात अपील करणारे न्यायाधीश माहितीशिवाय कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. त्यांच्या निर्णयाची गुणवत्ता मुख्यत्वेकरुन माहितीची अचूकता व उपयुक्तता यावरच अवलंबून असते. न्यायालये ही मोठ्या प्रमाणावरील माहितीवरच अवलंबून असतात. उर्वरित माहिती ही विधी लिपिक, न्यायाधीश आणि वैयक्तिक पार्श्वभूमीच्या ज्ञानातून गोळा केली जाते. ही माहिती पुढे कायदा तयार करण्यासाठी, संघर्षाचे निराकरण करण्यासाठी वापरली जाते. कोणती माहिती वापरायला पाहिजे आणि ती कशी प्राप्त केली पाहिजे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. लेखकाने सर्वोच्च न्यायालय व त्यापेक्षा कमी दर्जाची अन्य पाच न्यायालये यांचा अभ्यास केला. त्यांनी 46 न्यायाधीश, 33 विधी लिपिक, 16 कर्मचारी,36 अपील करणारे वकील,100 पेक्षा अधिक प्राप्त कोर्टाच्या ब्रिफ्सचे विश्लेषण केले.

Kerins, Modden a Fulton (2004) मध्ये ह्यांनी आर्यलंडमधील विधी विद्यार्थ्यांची व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची माहिती वर्तणूक वा माहिती वापराचा अभ्यास केला. त्यांनी लेक्की

Leckie व सर्व यांचा नमुना अभ्यास या संदर्भात वापरला. त्यांनी बारा स्नातकोत्तर आयरिश विधी विद्यार्थी यांच्यावर हा अभ्यास हाती घेतला.

व्यावसायिक अभ्यास करताना विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वागणुकी दरम्यानचे निरीक्षण त्यांना Leckie व इतर सर्व (1996) यांच्या व्यावयायिक अभ्यासावरील अभ्यासासारखेच वाटले. त्यांनी असे मांडले की, विधी विद्यार्थी व्यावसायिक वकिलांसारखेच कार्य हाती घेतात. जसे व्यावसायिकाप्रमाणेच त्यांना त्यांच्या अभ्यासाचे क्षेत्रात प्रकाशित झालेल्या साहित्याबाबत अद्ययावत असावे लागते. केरिन्स पुढे असे मांडतात की, विधी व्यावसायिकांची आवश्यक माहिती कौशल्ये ही सर्व विधी विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना लागणाऱ्या माहिती कौशल्यासारखीच असतात. Leckie व इतर सर्व यांच्या नमुन्याच्या सभोवताली असलेले हे अभ्यास वकिलांच्या कामाचा विस्तृत आढावा घेतात. लेक्की Leckie व इतर सर्व यांच्या नमुन्याच्या सभोवताली असलेले हे अभ्यास वकिलांच्या कामाचा विस्तृत आढावा घेतात. लेक्की Leckie यांचे काम Wilkinson यांनी (2001) आणि Kerins इतर सर्व यांनी (2004) वापरले. Kerins व सर्व यांच्या लक्षात आले की सर्व विधी स्त्रोतांचा वापर करुन बहुतांशी विधी विद्यालयात अभ्यासाच्या कालावधीत ग्रंथालयाचा भरपूर वापर करतात. परंतु त्यांना केस लॉ कोणत्या कायद्यात, ग्रंथात, नियतकालिकात, मासिकात मिळेल हे समजत नाही. हा नमुना वकिलांच्या माहितीशोध वर्तणुकीसाठी अथवा विद्यार्थ्यांच्या वागणुकीसाठी उपयुक्त वाटत नाही.

Frederick Hick (1942) ने विधी संशोधनाबद्दल असे नमूद केले होते की, वकिलांना व विधी विद्यार्थ्यांना आपल्या उद्योगांसाठी व अभ्यासासाठी करावे लागणारे विधीचे आवश्यक संशोधन होय. All et. al. (2010) विधी संशोधन हे विधी ग्रंथालयातील उपलब्ध असणाऱ्या संसाधनांवर अवलंबून असते.

Lawal (2007) च्या मते, विधी संशोधन म्हणजे एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधणे. त्यात असलेल्या मुद्यांचा गोषवारा काढणे व समान केसेसच्या अनुषंगाने वकील व विधी विद्यार्थ्यांचा संसाधनांचा त्यांच्या पक्षकारांसाठी न्यायालयात लढण्यासाठी केलेला वापर विधी स्त्रोत हा विविधतेने समजविण्यात येतो.

Afaro and Lamptey (2012) यांनी त्यांच्या अभ्यासात कुमासी धाना येथील विधी नकृमाह विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ येथील विधी शाखेतील प्राध्यापकांच्या माहिती गरजा आणि माहिती संकलन वागणूक तपासल्या, खुले आणि बंद स्वरूपाचे प्रश्न माहितीची निवड, गरजा आणि माहिती संकलनाची वर्तणूक तपासले खुले आणि बंद स्वरूपाचे प्रश्न माहितीची निवड आणि संकलन, याचे प्रकार आणि प्रयोजन माहिती संकलन करतेवेळी येणाऱ्या समस्यांच्या विषयांवर विधी व्याख्याते यांना प्रश्न विचारले गेले. पिअर्सनची–स्क्वेअर चाचणी ग्राफ पॅडप्रिसम आवृत्ती पाच वापरून मूल्यमापन केल्यावर मोजल्या गेलेल्या मापदंडावर लक्षणीय फरक निदर्शनास आला. निकालात असे दिसून आले की, माहिती संकलन चालविणेचे प्राथमिक प्रयोजन संशोधन कामकाजासाठी उपयुक्त साहित्य (75%) गोळा करणे. पृष्ठभूमी वाचन (62.5%) आणि त्यांच्यात विशेष रूची असलेल्या क्षेत्रात अद्ययावत ज्ञान ठेवणे (56.3%) याप्रमाणे होते. विधी अहवाल, नियतकालिके, प्रकाशने आणि पाठ्यपुस्तके (93.8%) आणि (1.3%) हे माहितीचे सर्वांत उपयुक्त साधन सांगितले गेले. माहितीचा वापर यासाठी प्रमुखपणे इलेक्ट्रॉनिक संसाधने यांना प्राधान्य दिले गेले. बहुतांश व्याख्याते (68.8%) यांनी माहिती आपल्या रोजच्या कामासाठी वापरली होती. सर्व विधी विषयावर व्याख्याते यांनी सर कोरसाह विधी ग्रंथालय म्हणजे माहिती संकलन यासाठी प्रमुख स्थानही मान्य केले होते, पुरेसे ग्रंथालय साहित्य आणि ग्रंथालयांना भेट देण्याची वारंवारता यात एक सकारात्मक सुसंबंध होता. विधी व्याख्याते यांच्या माहिती गरजा निरनिराळ्या व विविध होत्या. परंतु विधी व्याख्याते प्रामुख्याने विधी अहवाल, नियतकालिके प्रकाशने आणि पाठ्यपुस्तके यावर अवलंबून होते. माहिती व्यावसायिक हे मूल्यमापन करू शकत होते आणि व्याख्याते त्याच्यासाठी नवीन ग्रंथालये माहिती सेवा रचना, निर्मिती आणि प्रस्तावना करू शकत होते.

Yuan (1997) यांनी एक वर्षाच्या कालावधीसाठी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या गटावर ते लेक्सिसनेक्सिस, क्वीक लॉ चा शोध कशा प्रकारे घेतात. यावर अभ्यास केला यामध्ये विधीचा अभ्यास करणारे विद्यार्थी, व्यावसायिक संशोधन कौशल्य असणारे जे की विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात त्यांचाही समावेश करण्यात आला. युआन यांनी

100 विधी विषयांशी संबंधितांचे सर्वेक्षण केले. त्यामध्ये न्यायाधीश महाशय, त्यांचे मदतनीस, वकील, सरकारी वकील, बचाव पक्षाचे वकील इत्यादींचा समावेश केला होता. हे सर्वजण कॅलिफोर्नियातील होते.

युआन यांनी त्यांच्या शोध वर्तनाबद्दल बऱ्याच बाबी तपासल्या. त्यात त्यांच्या शोध घेण्याच्या पद्धती आणि माहितीचे संकलन, स्थळे शोधणे यासाठीचे कौशल्य, भाषा, वापरातील बदल, शोध गतीतील वाढ आणि शिकण्याच्या पद्धतीतील बदल यांचा समावेश आहे. युआन यांच्या असे लक्षात आले की, अनुभवामुळे शोधकर्त्यांच्या शोधप्रक्रियेत चुका कमी होतात किंवा चुका करण्यापासून ते परावृत्त होतात असे काहीही होत नाही. लेखकाच्या असेही निदर्शनास आले की, या अभ्यासातील सहभागी वर्गात कमी अनुभव असलेल्यापेक्षा अधिक क्वीक लॉ अनुभव असलेले वेगवेगळे आदेश आणि आकर्षणे वापरत होते. असे असले तरी काही आदेशांचा क्वचितच किंवा कधीच वापर झालेला नव्हता. तरीदेखील अभ्यासवर्गातील सहभागी आदेशाचा आणि आकर्षणाचा विशिष्ट संच समजून आणि वापरून अनेक कामे साध्य करू शकत होते. युआन यांनी हे स्पष्ट केले की, प्रणाली निर्माण करणाऱ्यांनी उपभोक्त्यांसाठी कोणती विशिष्ट आकर्षणे उघड करावीत, कोणती लपवून ठेवावीत आणि कोणती वैशिष्ट्ये आपसूकच ठेवण्यात यावीत व कशा प्रकारे ठेवण्यात यावीत याबाबत विचार करावा.

युआन यांनी असे मत मांडले की, प्रणाली प्रदान करत असलेली प्रणालीची वैशिष्ट्ये उघड माहितीची देवाण–घेवाण करत असतात. तसेच उपभोक्त्यांसाठीचे दस्तऐवज आणि ऑनलाइन मदत अधिक चांगली असावी. लेखकाला वकील माहिती कशी शोधतात यात जास्त रस होता परंतु त्यांचा हेतू विस्तृत नव्हता. ज्यामुळे वकिलांच्या शोध वर्तनाला मदत मिळू शकेल.

Barton, Mckellar et (2007) यांनी कायद्याच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वस्तुस्थितीला अनुसरून शिक्षण देणे आवश्यक आहे हे प्रकर्षाने मांडले. एखाद्या कृतीचा, घडामोंडींचा अभ्यास करण्यासाठी तद्नुरुप प्रतिकृती तयार करण्यात संगणकात घालावयाची माहिती तयार केली आहे. ह्याला Simple Simulated professional learning environment असे संबोधले आहे. यांनी कार्य सिद्धांताद्वारे विधी चिकित्सालयाच्या साहित्यात विवेचन केले आहे. परंतु ह्या विवेचनाचा

प्रत्यक्ष अनुभवाच्या संशोधनात अमेरिकन विधी चिकित्सालयाने वापर केला नाही. लेखक समारोप करताना म्हणतात की, काही विपरित बाबी माहिती शोधताना विधी स्नातकांना व वकिलांना भेडसावतात त्या पुढीलप्रमाणे आहेत.

- अपुरी व कमी ग्रंथालये किंवा माहिती केंद्रे व यामध्ये अपुरे व अयोग्य कर्मचारी
- आर्थिक अभाव.
- अद्ययावत संसाधनांची कमतरता, साहित्य अभाव
- ज्ञान संपादन करण्याबद्दलचे अज्ञान
- ग्रंथालयाचे काम करण्याचे ठराविक तास

Adekunmisi (2005) याचे असे मत आहे की, विधी विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर कमी करतात. माहिती संसाधनांची कमतरता, सुलभतेची समस्या व ऑनलाइन सुविधांचा अभाव ही ग्रंथालयाचा वापर कमी करण्यामागील कारण असल्याचे लेखक सांगतात.

Kakai, Ikoja Odongo and Kigongo Benkenya (2004) Taylor यांचा उल्लेख करतात. तसेच माहिती मिळविण्याच्या तंत्रावर जास्त भर देण्यात येतो ना की माहिती वापराच्या दर्जावर विधी शिक्षक विधी विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयाच्या सुविधांचा उपयोग करण्यास प्रोत्साहन देत नाहीत. तसेच संबंधित स्त्रोतांची कमतरता, जशी ICT उपकरणे व इतर छापील विधीविषयक ग्रंथांची कमतरता हे विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयाच्या कमी वापरामुळे होते असे मानले जाते.

Hainsworth (1992) यांनी फ्लोरिडा येथील 56 अपिलीय न्यायाधीशांच्या माहिती शोध वर्तणुकीचे परीक्षण केले. त्या न्यायाधीशांची ओळख करणे, वेगळे करणे आणि त्यांच्या वागणुकीसाठीचे कारणीभूत पर्याय विशद करणे हा त्यांचा हेतू होता. त्यांच्या असे लक्षात आले की, न्यायाधीशांनी शोधलेल्या माहितीचा दर्जा आणि खोलपणा यामुळे निर्माण होणाऱ्या आंतरिक भावनेमुळे प्रेरित होते. हेन्सवर्थ यांच्या असे लक्षात आले की, न्यायाधीश स्वतंत्रपणे आणि एकटेपणे माहिती शोधतात आणि यांना पुरविल्या गेलेल्या माहितीबाबत ते साशंक असतात. यांच्या माहिती वागणुकीचे समर्थन करण्यासाठी न्यायाधीश संगणकांचा वापर करत आहेत असे लक्षात आले असले तरी ते मुख्यत: त्यांचे कामाप्रती वाचन आणि लेखन या कृतीच्या समर्थनार्थ

होते. लेखकाच्या असेदेखील लक्षात आले की, न्यायाधीशांचे वयाचा तो किंवा ती इलेक्ट्रॉनिक विधी संसाधने वापरतील की नाही यावर प्रभाव पडत नाही. त्यांच्या लक्षात आले की, काही तरुण न्यायाधीश त्यांच्या वयाच्या चाळीसाव्या वर्षी, त्यांची इलेक्ट्रॉनिक विधी संसाधने वापरण्याची प्रवृत्ती नव्हती. परंतु वरिष्ठ न्यायाधीश मात्र ही संसाधने अनेकदा व सततपणे वापरत होते.

Kuhlthau and Tama (2001) यांनी वकिलांच्या माहिती शोध वागणुकीचा अभ्यास केला. वकिली व्यवसाय करणारे किती प्रकारची कामे हाताळतात. त्यासाठी लागणारी वेगवेगळी माहिती, तसेच ते आपले काम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी माहिती कसे वापरतात तसेच विधीविषयक माहितीचा शोध व वापर या प्रक्रियेतील मध्यस्थांचे काम हा या अभ्यासाचा केंद्रबिंदू होता. कुहलथाऊ व टामा यांनी न्यूजर्सी येथील आठ व्यावसायिक वकिलांची रचनात्मक मुलाखत घेतली. त्यात सहभाग असणारे मुलाखतीदार छोटे आणि मध्यम प्रकारचे विधीविषयक काम करत होते. ते वेगवेगळ्या विधी शाखेत काम करीत होते आणि त्यात गुंतागुंतीचे करारभंग, व्यक्तिगत नुकसान, करारातील वाद, दिवाणी प्रकरणे, पर्यावरण प्रकरणे, बांधकाम क्षेत्रातील बाबी आणि घरमालक भाडेकरू वाद या सर्वांचा समावेश होता. लेखकांच्या असे लक्षात आले की, वकिलांच्या कामात सर्वसाधारण कामे आणि गुंतागुंतीची कामे या दोन्हींचा समावेश होता. गुंतागुंतीची कामे टप्पा–टप्प्यात पूर्णत्वास जात होती. यात सत्याची जुळवाजुळव ते प्रकरणाची तात्त्विक बाजूंची व्याख्या ते प्रकरणवाले न्यायप्रक्रियेतून सोडविणे असे स्पष्टीकरण केलेले आहे. मुलाखतदारांनी गुंतागुंतीच्या प्रकरणात डावपेच रचणे.

लेखकाला असे दिसून आले की, जेव्हा मुलाखतदारांनी सर्वप्रथम कामाची सुरुवात केली तेव्हा ते बैचेन दिसले. त्यांना सुरुवातीला परिस्थितीची जाणीव नसते. त्यानंतर त्यांना आता अनुभव असल्यामुळे त्यांनी अधिक गुंतागुंतीच्या कार्यासाठी उत्साह दर्शविला. कारण त्यांना प्रकरणाच्या सादरीकरणासाठी सृजनता प्राप्त झालेली होती. गुंतागुंतीचे प्रकरण हाताळतेवेळी प्रक्रियेत कुहलथाऊ आणि टामा यांच्या असे लक्षात आले की, संपूर्ण प्रक्रियेच्या दरम्यान वकिलांनी माहितीची साधने वेगवेगळ्या प्रकारे वापरली. सुरुवातीला त्या माहिती साधनांची संकल्पना आणि पार्श्वभूमी ज्ञान पुरविले. त्यानंतर त्यांनी त्या प्रकरणात तात्त्विक बाबी

उभारण्यासाठी हेतू ठरविला. न्यायालयात आवश्यक सादरीकरणासाठी पुरेशी माहिती मिळविल्यानंतर वकिलांनी त्यांचे काम पूर्ण केले.

बहुतांश मुलाखतदारांनी माहितीसाठी इलेक्ट्रॉनिक साधनांपेक्षा कागदोपत्री साधनांना जास्त पसंती दिलेली आहे. काही मुलाखतदारांनी त्यांची पसंती सारांश, बहाणे याला अग्रक्रम दिला. कारण त्यासाठी त्यांनी कागदोपत्री साधनांची इलेक्ट्रॉनिक साधनांशी तुलना केली. दुसऱ्याने कागदोपत्री स्वरूप असलेल्या साधनांमध्ये एकाच वेळी अनेक दस्त बघायला मिळतात याला अधिक पसंती दिली. अनेक मुलाखतदारांनी असे मत मांडले की, इलेक्ट्रॉनिक संसाधने शोधतेवेळी एक विशिष्ट शब्दरचना असायला हवी.

कुहलथाऊ आणि टामा यांनी एकाच वेळी अनेक प्रकरणे प्रदर्शित करणे, शब्दरचनेला समर्पक प्राचीन पद्धतीपेक्षा बाहेरील माहिती सादर करणे या गरजांचे समर्थन केले. संशोधन करतेवेळी उपभोक्त्यांना नियंत्रणांची जाणीव करुन देणे आणि संगणकीय माहितीत ते कुठेही भरकटलेले नसावे या गरजांचे समर्थन केले. कुहलथाऊ आणि टामा यांचे शोधनिष्कर्ष एक रोचक प्रश्नाला अधोरेखित करतात. एकविसाव्या शतकात हे आठ वकील इलेक्ट्रॉनिक संसाधनापेक्षा कागदोपत्री साधनांना जास्त पसंती का देत आहेत? वरील पुरावा असे सूचित करतो की, याचे इतर वापर व्यवहार्यतेशी संबंधित असेल. एका पुस्तकाचा ताबडतोब उपयोग शक्य आहे. उपयुक्त विभाग शोधण्यासाठी आणि तसेच उत्तर पुस्तकांसाठी संदर्भ शोधण्यासाठी ग्रंथातील अनुक्रमणिका आणि पाठांचा तक्ता यांचा वापर सोपा असतो. हे मुद्दे संबंधित अभ्यासातील वकिलांची माहिती वागणुकीत अभ्यासातील सहभागी वकिलांनीसुद्धा मान्य केले होते. असे असले तरी साधारणपणे इलेक्ट्रॉनिक विधी संसाधनांचा वापर अभ्यासू आणि व्यावसायिक या दोहोमध्येही बऱ्याच मोठ्या प्रमाणांवर होता.

वेळेअभावी व कामाच्या दडपणाखाली त्यांना ग्रंथ वाचणे सोपे वाटते. संगणकाला विशिष्ट प्रश्न विचारणे व त्यांत विविध प्रकारची एकाच वेळी माहिती उपलब्ध करून देण्याची कृती नसते. कुहलथाऊ आणि टामा यांच्या अभ्यासाअंती हे लक्षात आले की, विधी संदर्भातील मूळ माहिती ही काल्पनिक प्रतिकृती बांधण्यास व डावपेच लढवण्यास मदत करते. आठही वकिलांनी हे मान्य

केले की कठीण व गुंतागुंतीच्या कामासाठी ग्रंथ अधिक उपयोगाचे वाटतात. संगणकांकडून ही अपेक्षा होती ते त्यांचे काम सोपे करतील पण तसे झाले नाही व ते स्वत:ही जुनाट व पुरोगामी असल्याचे मान्य करून ग्रंथ व छापील साहित्य हे कठीण मुकदम्यासाठी जास्त उपयोगी पडतात असे मत व्यक्त केले. कुहलथाऊ आणि टामा यांनी व्यक्तिगत व वैशिष्ट्यपूर्ण लागणारी कायद्याच्या माहितीच्या संदर्भात असे सांगितले की, ह्या अभ्यासात भाग घेणाऱ्यांच्या मते ज्यांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे 'केवळ माझ्यासाठी'(Just for me) अशा पद्धतीची रचना हवी होती, त्यांना असे दिसून आले की, असंभव व अशक्य होणाऱ्या शोधामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता व निराशा निर्माण होते.

Singh and Mann (2015) यांनी पंजाब, हरियाणा व चंदीगडमधील उच्च न्यायालयातील वकिलांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास केला. माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरण्यात आले. 200 प्रश्नावलींचे वकिलांना वाटप करण्यात आले. त्यातील 86 प्रश्नावली वकिलांकडून भरून आल्या. प्रश्नावली वाटप अरचनात्मकपणे (randomly) भरून घेतल्या. उपभोक्त्यांकडून (वकिलांकडून) 44 टक्के प्रतिसाद मिळाला. या सर्वेक्षणात असे निदर्शनास आले की, माहिती तंत्रज्ञानाचा वकिलांच्या अभ्यासावर फार प्रभाव पडलेला आहे आणि बहुतांश वकील इंटरनेट आणि ई–संसाधने या साधनांद्वारे माहितीचा वापर करीत आहेत. आवश्यक माहितीसाठी मुद्रित आणि ई–संसाधने वापरण्यासाठी उपभोक्त्यांनी पसंती दिली आहे. या अभ्यासात निष्कर्ष काढण्यात आले की, ग्रंथालय व्यावसायिकाने दूरदृष्टी ठेवून स्वयंप्रेरित अवलंब करणे आवश्यक आहे, जेणेकरुन विधी व्यावसायिकांना भविष्यात येणाऱ्या अडचणींचे समाधान होऊ शकेल.

Abbas et.al.(2014) यांनी विधी उच्च शिक्षणसंस्थेतील विद्यार्थ्यांचे स्मार्टफोनसंबंधी माहिती शोध वर्तन आणि त्यांचे प्रभाव तपासले. इंग्लंडमध्ये मोबाईल तंत्रज्ञानांचा वापर करून माहिती सेवा पुरविणे यासंबंधी हा अभ्यास आहे. लेखकाने असे सूचित केले आहे की, ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावसायिकांनी अधिक सक्रिय राहणे आवश्यक आहे. प्रस्तुत माहिती सेवा एक माहितीचे साधन म्हणून स्मार्टफोनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती वितरित करणे हे या अभ्यासात सूचित केले आहे.

Howard, Lehmann and Rood's (2002) यांच्या अभ्यासाचे प्रयोजन माहिती उपभोक्ता गटांची माहिती वर्तणूक तपासणे हे होते. यासाठी लेखकाने त्यांची मुलाखत घेण्याचे ठरविले. या अभ्यासासाठी किमान 10 वर्षे विधी व्यवसाय करत असलेल्या तीन वकिलांची मुलाखत घेण्यात आली. या सर्वेक्षण माध्यमात सतत खुले स्वरूपातील प्रश्न यास काही पूरक किंवा स्पष्टीकरणात्मक असे प्रश्न होते. मुलाखत ध्वनिमुद्रित करण्यात आली आणि विश्लेषण लिपीबद्ध करण्यात आले. या तीन वकिलांची माहिती वर्तणूक जाणून घेण्यासाठी प्रश्न तयार करण्यात आले. गरजांचे प्रकार, संकलन प्रकार माहिती मूल्यमापन माहिती वापर, वकिलांना ज्ञात गरजा आणि विषय गरजा या दोन्हीतही रस असतो. काही वेळा त्यांना गरज असलेल्या बाबी तंतोतंत ठाऊक होत्या, जसे, पोलीस अहवाल करार किंवा प्रकरणनिहाय कायदा, योग्य बाब शोधून काढण्यासाठी सूचक शब्द वापरावा लागत होता. अनेक वेळा काहीतरी उपयुक्त शोधण्याच्या आशेत त्यांना हजारो दस्तऐवज शोधावे लागत होते. या अभ्यासातील तीन वकील यांचे निष्कर्ष वकील बऱ्याच प्रमाणात इतर दोन अभ्यासातील निष्कर्षांशी मिळतेजुळते होते. परंतु त्या विभागात त्याचे दुमत होते. तेथे तंत्रज्ञानांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येत होता. ही कदाचित कालानुक्रमे आलेली समस्या अथवा प्रादेशिक समस्या असावी कारण वायव्य क्षेत्रातील (Pacific North West) माहिती व्यावसायिक कदाचित जगाच्या इतर भागातील लोकांपेक्षा तंत्रज्ञानाने जास्त प्रभावीत असतील. त्याची माहिती वागणूक अत्याधुनिक होती आणि त्यांची माहिती व्यवस्थापन कौशल्ये अतिशय विकसित होती. खरे तर प्रत्येक माहिती व्यवस्थापन प्रणाली एक विशिष्ट प्रणाली आहे.

George et. al. (2006) यांनी कार्नेगो मेल्लोन विद्यापीठातील विधी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती शोध वर्तणूक या अभ्यासात तपासली. विधी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती शोध वर्तणूक आणि त्यांचे संशोधन अध्ययन यावर हा अभ्यास केंद्रित केला आहे. सर्व शाखांना प्रतिनिधित्व मिळेल अशा शाखांतील शंभर विद्यार्थ्यांचा एक नमुना निवडला गेला आणि विशिष्टपणे सखोल मुलाखत घेऊन माहितीसंग्रह करण्यात आला. सांख्यिकीय माहिती विश्लेषण संगणक प्रणाली वापरून करण्यात आले. अभ्यासात जसे दर्शविण्यात आले आहे की, विधी

अभ्यास करणारे विद्यार्थी, त्यांचे माहिती संकलन, शिक्षकांच्या सूचना आणि मार्गदर्शन येथून सुरू होतात. त्यांना असे लक्षात आले की, अभ्यासाच्या गरजा, संसाधनांच्या वापरात सुसंस्कृतपणाचा अभाव यामुळे त्यांच्या माहिती शोध वर्तनावर प्रभाव पडतो. यात पुढे असा निष्कर्ष काढला गेला की, अभ्यासामध्ये इंटरनेटचा वापर महत्त्वाची भूमिका निभावतो. असे असले तरीही विद्यार्थी मुद्रित संसाधनांचा वापर सुरूच ठेवतात. प्रत्येक विद्या शाखांचे माहिती शोध वर्तन यामध्ये फरक असतो. ग्रंथालये ही विद्यार्थ्यांची माहिती शोध वर्तणूक प्रभावित करतात, हा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

Chidinm (2013) यांनी इकटी या राज्यातील विद्यापीठामध्ये विधी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शोध वर्तणुकीचा अभ्यास केला आहे. अंतिम वर्षाच्या विधी विद्यार्थ्यांचे वर्तन माहिती मिळविण्यासाठी कसे होते याचा अभ्यास लेखकाने या ग्रंथात केला आहे. मागील जे अभ्यास या विषयावर झालेत, त्या अभ्यासाचाही हा एक पाठपुरावा आहे. विल्सनचे (1999) मॉडेल फ्रेमवर्क माहिती शोध वर्तनामध्ये कसे होते याबद्दलचे विवेचन करण्यात आले आहे. सन 2012-2013 मधील अंतिम वर्षातील 25 विद्यार्थ्यांची समोरासमोर मुलाखत इकटी विद्यापीठामध्ये घेण्यात आली. डेटा हा फक्त अंतिम वर्षातील विधी विद्यापीठांकडून जमा केला होता. एक पद्धत म्हणून विज्ञानाचे संशोधन करीत असताना कोणती साधने वापरतात याचे निरीक्षण करण्यात आले. मुलाखतीचा व्यवस्था योग्य व विश्लेषणात्मकपणे केली होती. निष्कर्ष असा काढला गेला की, उपभोक्ते हे ग्रंथालयातील शेल्फवरील ग्रंथ चाळतात, त्यांना ग्रंथालय सेवांचे ज्ञान नाही. ते ग्रंथालयाचा वापर छापील साहित्यासाठी करतात. ते सायबर कॅफेमध्ये माहिती चाळतात आणि ग्रंथालयाला टाळतात व त्यांतील सेवेला टाळतात. ग्रंथालय सेवकांचे सहकार्य घेण्याचे ते टाळतात. कारण त्यांना ते फार उद्धट वाटतात. सर्वेक्षणात त्यांना आढळले की, उपभोक्त्यांना Google फार आवडते. परंतु Google वरील माहिती शोधताना त्यांना अनेक तक्रारी आणि अडचणींना सामोरे जावे लागते. या अभ्यासात त्यांना अडचणी दिसून आल्या. इंटरनेटवर अपुरे संसाधने होती. संशोधनासाठी योग्य साधने निवडण्यास विद्यार्थी असमर्थ होते. साईटवर माहिती शोधताना ज्ञानाचा व पैशांचा अभाव, माहिती कौशल्याचा

अभाव, ग्रंथालय कर्मचाऱ्यांची वृत्ती, संसाधने सहज न मिळणे या अडचणी दिसून आल्या. सर्वेक्षणात निष्कर्ष काढला की, माहितीच्या स्त्रोताच्या मूल्यमापन क्षेत्रात माहिती कौशल्यांची कमतरता या अभ्यासात दिसून आली.

Cohen (1969) च्या मते वकिलांना विधी संशोधनाचे कार्य इतरांकडून करून घेण्यास आवडते व योग्यही वाटते. वकिलांना वेळोवेळी केसेस (मुकदमे) लागतात. त्यांना लागणारे कायदे, नियमावली, विषयांना धरून तयार केलेली मार्गदर्शके यांची आवश्यकता असते. त्यांना संशोधनासाठी वरील गोष्टी लागतात, हे कोहेन यांनी नमूद केले आहे. ते नमूद करतात की, मिसुरी बारमध्ये केलेल्या चाचणीत 100 वकिलांच्या घेतलेल्या मुलाखतीमधून हे स्पष्ट झाले की एखादी परप्रांतीय समस्या आल्यास त्या प्रांतातील वकिलांच्या मदतीने ती सोडवावी. त्यांच्या असेही लक्षात आले की, बहुतांशी वकील ग्रंथालयाचा वापर करण्यास टाळतात. जेव्हा त्यांच्याकडे नवीन केस येते, तेव्हा ते खालील प्रकारांची निवड करतात.

- दुसऱ्या वकिलांकडे उल्लेखांसाठी तसेच वैयक्तिक मत घेण्यासाठी केस पाठवितात.
- इतर वकिलांचे सल्ले घेतात.
- जुन्या केसेस व फायलींचा उपयोग करतात व त्यांचे निरीक्षण करतात.
- हाती असलेल्या केससारखे मुद्दे किंवा परिस्थिती किंवा काही साम्य आहे का ते पाहतात.
- मोठ्या नामांकित व अनुभवी वकिलांच्या कार्यालयात लहान सहकारी वकिलांना संशोधनाचे कार्य दिले जाते.

वकिली व्यवसायात विशेषज्ञ असलेल्या वकिलांना, निपुण असलेल्या वकिलांना व बरेच वर्षे ह्या व्यवसायात असलेले लोक संशोधनात किती काळ घालवतात हे कोहेन यांनी तपासले. त्यांच्या असे लक्षात आले की, जे वकील स्वत:ला विशेषज्ञ समजत नाही ते विधी संशोधन करण्यात खूप तास व्यथित करतात. जेवढा जास्त काळ ह्या व्यवसायात व्यथित करतात तेवढे संशोधनासाठी कमी तास ते खर्च करतात, असे 80 टक्के लोकांनी कबूल केले. त्यांच्या मते, पूर्वीप्रमाणे ते तितकासा वेळ विधी अभ्यासासाठी देत नाहीत. त्याच साधारण उत्तर असे होते की, ते आता अनुभवी वकील झाले आहेंत व त्यांचे विधीविषयक ज्ञान वाढले आहेत. वकिलांकडे

किती केसेस आहेत व आठवड्याला किती दावे ते चालवितात व किती वेळ संशोधनासाठी देतात याचा काहीही संबंध नाही.

Ogba (2013) यांनी आपल्या अभ्यासात नायजेरियातील अंतिम वर्षाच्या विधी विद्यार्थ्यांचे माहिती संकलन करण्यासाठी विशिष्टपणे संरचित प्रश्नावली आणि मुलाखत संसाधने वापरली. या संकलित माहितीचे विश्लेषण विभागणी, केंद्रिय प्रवृत्ती आणि उपायमापन, सामाजिक शास्त्रे यासाठीचे सांख्यिकीय उपाय अर्थात एसपीएसएस आणि मायक्रोसॉप्ट एक्सेल–एक या सॉफ्टवेअरचा वापर करून करण्यात आले. मुलाखतीचा मजकूर कागदावर लिहिण्यात आला. योग्य विश्लेषण विषयवार व्यवस्थित मांडले. संशोधनाच्या निष्कर्षात असे दिसून आले की, प्रतिसादक हे मुद्रित पाठ्यपुस्तके आणि गुगल यांचा वापर प्रमुख संशोधन साधन म्हणून करतात. तसेच शैक्षणिक विधी ग्रंथालये आणि सर्च इंजिन यांचा वापरसुद्धा प्रमुख संशोधन ठिकाणे म्हणून करतात. परंतु वर्तमानपत्रे, सार्वजनिक ग्रंथालये या ठिकाणांचा वापर संशोधनासाठी होत असतो. उपभोक्ते/प्रतिसादक यांच्याकडे संगणक कौशल्ये होती मात्र माहिती कौशल्ये नव्हती. एटीएम, ग्रंथालये आणि माहिती सेवा, विधी अध्यापकांचा ड्रेस कोड आणि ज्येष्ठ लोकांप्रती असलेला आदर या सर्व बाबी प्रतिसादकाची माहिती संकलन वागणूक यात घटक म्हणून समाविष्ट होतात. येथील विधी विद्यार्थ्यांत माहिती संकलन वर्तणूक यातील नवीन निष्कर्ष सादर करुन हा अभ्यास पूर्ण करण्यात आला.

Khan and Bhatti (2012) यांनी त्यांच्या संशोधन अहवालात पेशावर विद्यापीठ आणि तिला संलग्न 96 विधी महाविद्यालये खायबर पख्तूरव्वा येथील विधी प्राध्यापक सदस्यांची माहितीची गरज आणि माहिती संकलन वागणूक या अभ्यासातील निष्कर्ष मांडले आहेत. त्यांची माहिती साधने, माध्यमे, पद्धती, ग्रंथालय, वापर पद्धती, सोयीस्कर अभ्यास ठिकाणे, समाधान स्तर आणि माहिती गरजा आणि माहिती संकलन यात त्यांना येणाऱ्या समस्या या विविध बाबींवर त्यांचा प्राधान्यक्रम याबाबतचा अभ्यास संख्यात्मक सर्वेक्षण पद्धतीने मांडला आहे. यासाठी एक विशिष्टपणे संरचित प्रश्नावली निर्माण करण्यात आली आणि सुमारे शंभर निवडक विधी प्राध्यापक सदस्यांत अनियत अभ्यासक्रमात वितरित करण्यात आली. प्रतिसाद दर 86 टक्के होता.

अभ्यासाच्या निष्कर्षात हे उघड झाले की, बहुतांश विधी प्राध्यापक सदस्य यांच्या महाविद्यालयांत ग्रंथालयांची तरतूद या बाबींवर समाधानी नव्हते. विधी महाविद्यालयातील साधने, सेवा आणि ग्रंथालयाद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवा या बाबींवर उघडपणे आपली असमाधानता त्यांनी व्यक्त केली. व्याख्यान देण्यासाठी तयारी आणि इतर शैक्षणिक प्रयोजनासाठी त्यांनी माहिती ही मुद्रित स्वरुपात आणि इंग्रजी भाषेत असायला हवी याला त्यांनी प्राधान्य दिले होते. या अभ्यासात हे लक्षात आले की, त्यांच्या ग्रंथालयात असलेली माहिती तंत्रज्ञान सुविधा जसे संगणक आणि इंटरनेट याबाबत सुद्धा ते असमाधानी होते. शैक्षणिक आणि संशोधन गरजा जलदगतीने पूर्ण करण्यासाठी त्यापैकी बहुतांश लोकांनी घरी आणि कार्यालयात स्वत:चे व्यक्तिगत संग्रह, ग्रंथालये निर्मित केलेली आहेत. विधी प्राध्यापक सदस्य यांनी ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याच्या भूमिकेची प्रशंसा केलेली आहे. अभ्यासात असे सुचविले आहे की, माहिती तंत्रज्ञान आधारित साधने आणि सुविधा याची तरतूद असावी आणि तसेच शिक्षक समुदायाच्या माहिती गरजा याचे मूल्यमापन असावे जेणेकरून उपभोक्ताकेंद्रीत सेवा योजना आखता येईल आणि प्रभावी ग्रंथालयसंग्रह निर्माण करता येईल.

खान व भट्टी यांच्या संशोधनाचे निष्कर्ष दर्शवितात की, अभ्यासाचे निकाल यापूर्वी आयोजित केल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासाच्या निकालाला समर्पक आहेत व त्यांच्यात तारतम्य आहे. वकील समुदायाची जिल्हावार परिषद (कौन्सिल) क्वालालांपूर येथे संशोधकाद्वारे सर्वेक्षण आयोजित केले गेले. एका विशिष्टपणे संरचित, आढावा घेतलेल्या आणि पथदर्शी परीक्षित प्रश्नावलींच्या मदतीने माहिती मूल्यमापनासाठी संकलित करण्यात आली. माहिती संग्रह करण्यासाठी वकिलांमध्ये 70 प्रश्नावली वितरित करण्यात आल्या आणि 54 प्रश्नावली वकिलांनी भरुन दिल्या. वकिलांच्या कामाच्या व्यस्त वेळापत्रकामुळे संशोधकाला माहिती संग्रह करण्यासाठी अनेक अडचणी आल्या. त्यांना प्रतिसाद दर 66 टक्के मिळाला. वकिलांना प्रकरण निर्मिती सादरीकरण करण्यासाठी माहितीची गरज भासते. बहुतांश लोक त्यांच्या जिल्हावार ग्रंथालये येथून माहिती ग्रहण करत असतात असे या अभ्यासात नमूद केले आहे. संशोधनातून निष्पन्न निकाल दर्शवितात की, बहुतांश प्रतिसादकांचे असे मत होते की

माहिती तंत्रज्ञान (ICT) माहिती संकलन आणि एकत्रिकरण व सामायिकीकरण हे काम सोपे झाले आहे. किंबहुना फक्त अकरा प्रतिसादक इंटरनेटचा वापर करत होते आणि त्यांचे माहिती पुन्हा शोधून काढण्याचे कौशल्ये कमी अथवा हलक्या प्रतीचे होते. सदर संशोधनामुळे क्वालालांपूर येथील सत्र न्यायालयात व्यवसाय करण्याच्या वकिलांच्या माहिती गरजा समजण्यात मदत मिळाली. या अभ्यासात सुचविले की, संगणक प्रशिक्षण आणि इंटरनेट सेवा वकिलांना त्यांचे संगणक कौशल्य सुधारण्यासाठी पुरवली पाहिजे.

Yemisi and Ochalla (2012) यांनी सादर केलेल्या संशोधन लेखाचा प्रमुख उद्देश देशाच्या विकासासाठी व पदवीपूर्व विधी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती शोध वर्तणूक तपासणे हा होता. विशेषत: या प्रबंधात त्यांनी प्रयत्न केलेला आहे की विधी माहिती ग्रंथालये यावर संदर्भित साहित्याचा जागतिक आढावा घेणे आणि वकील, विधी अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी, माहितीची सुसंवाद तंत्रज्ञान, विधी व्यवसाय, विधी व्यवसायिक यांना माहिती सेवा देणे, विधी शिकणारे विद्यार्थी यांच्या माहिती गरजा तपासणे, त्यांची माहिती संकलन धोरणे व माहिती सुसंवाद, तंत्रज्ञान वापराचे कौशल्ये पाहणे, त्यांच्याद्वारे डिजिटल ग्रंथालयांचा वापर, डिजिटल ग्रंथालये यांची आव्हाने आणि समस्या तपासल्या. विधीविषयक माहिती संकलन वागणूक आणि तेथील विधी शिकणारे विद्यार्थी यांची माहिती सुसंवाद तंत्रज्ञान कौशल्य या बाबींशी समर्पकता तपासल्या गेल्या. ज्या साहित्याचा आढावा घेण्यात आला त्यात उघड झाले की, विधी अभ्यासक्रम शिकणारे विद्यार्थी ग्रंथालय माहिती संसाधने यांचा माहिती संकलनासाठी पूर्णपणे वापर करत नाही. कारण त्यांना तंत्रज्ञान उपकरणांचा अनुभव नाही अथवा विधी वर्गात वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणपद्धतीत विधी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ विधी ग्रंथालयातून विधीविषयक माहिती शोधण्यासाठी प्रोत्साहित केले जात नाही. काही साहित्यात असे निष्पन्न झाले आहे की, विधी ग्रंथालयात वीजपुरवठा अनियमित असतो, व्यावसायिक आणि कुशल कर्मचारी नसतात, कर्मचारी कामाशी कटिबध्द नसतात. त्यात हे सुध्दा निष्पन्न झाले की माहिती, सुसंवाद, तंत्रज्ञान, ग्रंथालय संसाधनाचा अभाव, कर्मचारी प्रशिक्षणातील उणीवा हे आवाहन ठरते. इतर घटक त्यात भर घालतात, ज्यामुळे विधी अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती

संकलनासाठी विधी ग्रंथालये वापरण्यात रस नसतो.

Olorunfemi and Mostert (2012) यांच्या अभ्यासाचे प्रयोजन विकसनशील देशातील स्नातकपूर्व विधी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती संकलन वागणूक तपासणे हे होते. या अभ्यासात संशोधकांनी नायजेरिया येथील विद्यापीठातील स्नातकपूर्व विधी शिकणारे विद्यार्थी यांची माहिती संकलन वर्तणूक यावरील साहित्य आणि माहिती सुसंवाद तंत्रज्ञानाचे वापर कौशल्य या बाबींचा अभ्यास केला. या आढाव्यात संशोधकांनी येथील विधीविषयक माहिती, ग्रंथालये, वकिलांची समर्पकता आणि विधी शिकणारे विद्यार्थ्यांच्या गरजा, माहिती संकलनाचे धोरण, माहिती सुसंवाद, तंत्रज्ञान वापराचे कौशल्य, त्यांचा डिजिटल ग्रंथालयाचा वापर, डिजिटल ग्रंथालयाचे आव्हान व समस्या आणि विधीविषयक माहिती संकलन वर्तणूक यांची माहिती, सुसंवाद, तंत्रज्ञान कौशल्ये या बाबींवर आपले लक्ष केंद्रित केले होते.

Eisenschitz and Walsh (1995) यांनी वकिलांची माहितीबाबतची प्रवृत्ती/दृष्टिकोनाचा अभ्यास केलेला आहे. निकालाचे विश्लेषण करताना संशोधकाच्या असे निदर्शनास आले की, जेव्हा वकील ज्ञात बाबींचा शोध घेत होते तेव्हा त्यांची वापरण्याची वर्तणूक यात फरक होता. विषय शोध प्रकरणात वकिलाचे त्याच्या कार्यक्षेत्रातील नैपुण्य हे प्राप्त सामुग्रीच्या उपयुक्ततेचे मूल्यमापन करताना अधिक महत्त्वाचे ठरते आणि त्यांनी फक्त स्वत: संशोधन करणे नगण्य ठरते. अर्थात हा अभ्यास नैपुण्यगुणांची विशेष कदर करतो.

विद्वानांनी माहिती शोधाच्या धोरणावर ग्रंथालयाचा वापर करणाऱ्या व्यक्तीचा विविध विषयांवर, विविध व्यावसायिकांवर, माहितीच्या वातावरणावर, भौगोलिक स्थानावर अभ्यास केला आहे. Majid आणि Kassim (2000) यांनी विधी विद्यार्थी व व्यावसायिकांची माहिती संशोधनाच्या स्वाभाविक क्रियेचा अभ्यास केला. त्यातून त्यांना असे लक्षात आले की, विधी विद्यार्थी व वकील विधीविषयक ग्रंथ व नियतकालिकांचा वापर जास्त करीत होते. Kuhlthau आणि Tama (2001) म्हणतात की वकील छापील मजकूर अधिक पसंत करतात. Majid आणि Kassim (2000) यांनी माहिती संशोधनाची प्रक्रिया ही International Islamic Malaysia Law Faculty Members द्वारे अभ्यासली असता असा निष्कर्ष निघाला की, विधीचे उपभोक्ते,

विद्यार्थी, शिक्षक छापील साधनांपेक्षा इलेक्ट्रॉनिक वाचन साहित्य जास्त वापरतात व त्यातही स्वत:कडील उपलब्ध छापील पुस्तके वापरतात. वकिलांना अनौपचारिक रीतीने मिळालेली माहिती जास्त पसंत पडते व योग्य वाटते.

Vale (1988) यांनी परस्पर संवादाच्या माध्यमातून माहिती शोधण्याचा व उपभोक्त्यांचा अभ्यास केला. त्यांनी कॅनडातील 700 वकिलांच्या मुलाखती घेतल्या व निष्कर्ष काढले. त्यांनी विधी संशोधनासाठी माहिती गोळा करण्याची प्रतिकृती तयार केली. आकडेवारीच्या सहाय्याने सिद्ध केले. ही प्रतिकृती विशेष बाबींवर आधारलेली होती. त्यांचा उद्देश होता की अशा कोणत्या गोष्टी आहेत, ज्यामुळे छापील माहिती किंवा संगणकाद्वारे विधी संशोधन करावेसे वाटते. वाले यांना जाणवले की, प्रसारणाचे माध्यम तीन कार्यावर अवलंबून असते. प्रथमत: विधी माहितीची निकड व त्यासाठी कामाचे संयोजन, दुसरे म्हणजे प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या कामाचे नियोजन, माहिती व नियंत्रण कसे करते ते तपासणे व तिसरे कार्य खर्चाचा समतोल अभ्यास करणे. कोणत्या माध्यमाला किती खर्च येतो ते पाहणे. काही गोष्टी ह्या काल्पनिक प्रतिकृतीला आधार देत होत्या व काही गोष्टी साथ देत नव्हत्या. त्यात माहितीचा वापर ह्या कार्यात फरक होता. विधी माहितीचा शोध हा स्वत:च्या उपयोगासाठी अथवा दुसऱ्यासाठी होता, त्यावरही कार्य अवलंबून होते. लेखकाने असे गृहीत धरुन निष्कर्ष काढले की, इतरांसाठी माहिती काढण्याच्या प्रक्रियेत व स्वत:साठी माहिती वगळण्याच्या प्रक्रियेत फरक आहे. स्वत:साठी माहिती काढण्यात जास्त वेळ लागतो. कारण व्यक्ती स्वत:चे निराकरण करण्यासाठी जास्त काम करुन वेळ लावून कार्य करते. त्यांनी हे मान्य केले की, सांख्यिकीय स्वरूपात हे मांडल्यास ह्यात खास फरक जाणवत नाही. वाले यांनी संशोधन अशा काळात केले जेव्हा संगणकावर विधीची माहिती मिळवण्याची नुकतीच सुरुवात झाली होती.

American Bar Association Technology Survey (2007) च्या सर्वेक्षणानुसार आता संगणकाच्या मदतीने विधीविषयक माहिती मिळविण्याची सवय असल्याचे वकिलांनी कबूल केले. American Legal Technology Research Center (2007) वर बऱ्याच प्रतिवाद्यांनी स्वत: संगणकावर संशोधन करण्याचे मान्य केले.

Haruna and Mabawonku (2001) यांनी लोगस शहरातील वकिलांची माहितीची गरज आणि शोध वर्तणुकीचा अभ्यास करून विधी ग्रंथालयासमोरील आव्हाने मांडण्याचा प्रयत्न केला. नायजेरियातील अनेक वकिलांनी निदर्शनास आणले की, त्यांना वरिष्ठ न्यायालयातील नवनवीन निर्णयांची सतत गरज भासत असते. त्याचबरोबर नवीन व्यावसायिकांनाही माहितीची गरज लागत असते. सध्याच्या काळामध्ये ताजी माहिती (नवीन माहिती) त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधून मिळते. परिषदांमधून विधीविषयक माहितीला कसे महत्त्व दिले जाते हे त्यांना समजते. ग्रंथालये हे नोकरी संबंधित माहिती पुरविण्यासाठी सर्वांत महत्त्वाचे स्त्रोत म्हणून ओळखले जाते. मात्र ग्रंथपालाची भूमिका संबंधित अभ्यासात असमाधानकारक असल्याचे अभ्यासात नमूद केले आहे.

Wilkinson (2001) च्या मते माहिती शोधण्याचे कार्य अजून पूर्णपणे केलेले नाही. त्यासाठी त्यांनी लेक्की व इतर सर्व यांचा नमुना वापरला. त्यासाठी त्यांनी ओन्टारिओ कॅनडामधील 180 व्यावसायिक विधी वकिलांच्या माहिती शोध वर्तणुकीचा अभ्यास केला. त्यातील 154 कॅनडियन वकिलांच्या मुलाखती 20 मिनिटे ते 1 तासापर्यंत घेण्यात आल्या. त्यांनी त्यासाठी तीन चार वेगवेगळ्या आकारांच्या फर्म निवडल्या. मनुष्यबळ आकाराच्या आधारावर कार्पोरेट आणि खाजगी व्यवसायातील वकिलांची योग्य प्रमाणात निवड केली. त्याना अलीकडेच अनुभवलेल्या समस्यांबाबत विस्तृतपणे चर्चा करण्यासाठी पाचारण करण्यात आले. विल्किनसन यांच्या असे लक्षात आले की, या समस्या दोन प्रकारात विभागल्या गेल्या होत्या. विधी व्यवसाय व्यवस्थासंबंधित समस्या आणि महत्त्वपूर्ण विधीविषयक समस्या, (व्यावसायिक कायदे, इच्छापत्रे, मुलकी आणि दिवाणी दावा, कौटुंबिक कायदे, बांधकाम व्यवसाय). विल्किनसन पुढे अशी चर्चा करतात की, वकिलांसाठी केवळ दोन व्यावसायिक भूमिका पुढे येतात. हे लेक्की व इतर सर्व (1996) ने मांडलेल्या चार भूमिकांपेक्षा वेगळ्या आहेत. 1) सेवा पुरवठादार 2) व्यवस्थापक सेवा पुरवठादार. जेव्हा वकील आपल्या ग्राहकांच्या गरजा भागविण्यासाठी विधीच्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात कार्य करतात. विल्किनसन यांच्या 'सेवा पुरवठादार' या भूमिकेला लेक्की (1996) व इतर सर्व यांच्या 'वकिली दस्तावजीकरण' आणि 'मार्गदर्शन' या सदरात मांडता येते. एखादी व्यक्ती असा

युक्तिवाद करेल की, वकिली, दस्तावजीकरण आणि मार्गदर्शन हे सर्व सेवा पुरविणे यात मोडतात. विल्किनसनने थेट लेक्कीच्या भूमिकांचा वेगळ्या स्तरावर गटमांडणी आढावा घेतला आहे. त्यांना असेही लक्षात आले की, लेक्की व इतर सर्व (1996) यांनी असे नमूद केले की वकिलांच्या समस्या, जसे, संशोधक, शिक्षक किंवा विद्यार्थी या इतर व्यावसायिक भूमिकांशी संबंधित नव्हते. विल्किनसन यांचा अभ्यास लेक्की व इतर सर्व (1966) च्या प्रतिकृतीस साथ देत नाही. त्या लेक्कीच्या प्रतिकृतीशी सहमत नाही. लेक्कीचे माहिती बदल जी व्यावसायिकांची वर्तणूक आहे व त्याबद्दल त्यांचे मत योग्य नाही. विधी संशोधन हे माहितीचा शोध घेण्याची क्रिया आहे व त्यांच्याशी लेक्की सहमत नाही. विल्किनसन म्हणतात की, विधी हा माहितीसंबंधित संलग्न व्यवसाय आहे. वकील हा आपल्या अशिलासाठी मध्यस्थाची भूमिका घेतो. त्यांनी हेदेखील नमूद केले की, वकील जास्त करून प्रश्न हाताळताना अनौपचारिक पद्धतीने माहिती मिळविण्याच्या मार्गाचा अवलंब करतात. त्यांच्या मते लेक्कीची प्रतिकृती ही खोलवर जात नाही. विल्किनसन यांच्या मते, वकील हे माहिती शोधण्यात व्यस्त नसून ते माहिती उत्पन्न करण्यात व्यस्त असतात.

Thanus Kodi (2009) यांनी त्यांच्या अभ्यासात हे उघड केले की, प्रतिसादक माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा वापर मुद्रित साधनांच्या तुलनेत कमी वापरतात. हे कदाचित त्यांच्या उपलब्धतेबाबतची जागरूकता नसल्याकारणामुळे, सामुग्रीची अयोग्य निवड, ई–उत्पादनांबद्दल माहिती नसल्याने होत असेल. त्यांच्या लक्षात आले की ई–मेल हे एक सर्वात लोकप्रिय इंटरनेट ॲप्लिकेशन आहे आणि इतर इंटरनेट आधारित सेवा आणि ॲप्लिकेशन्सचा वापर मर्यादित प्रतिसादक करत आहेत. ही चिंतेची बाब आहे कारण सध्या इलेक्ट्रॉनिक माहिती साधने आणि इंटरनेट प्रभावीपणे शिकविणे आणि संशोधन यासाठी अतिशय महत्त्वाची साधने समजली जातात. त्यामुळे केंद्रीय विधी महाविद्यालये ग्रंथालयांना कदाचित आपल्या इलेक्ट्रॉनिक माहिती संसाधनांचा आढावा घेणे गरजेचे आहे. या अभ्यासात केंद्रीय विधी महाविद्यालय, सालेम येथील विधी प्राध्यापक सदस्यांच्या माहिती गरजा आणि माहिती शोध वर्तणूक याचा अभ्यास केला आहे. शिकविणे आणि संशोधन यासाठी प्रतिसादक विविध प्रकारची माहितीच्या साधनांचा वापर

करतात. पुस्तके आणि विधी अहवाल अतिशय जास्त महत्त्वाचे समजले जातात. हे लक्षात घेणे जरूरीचे आहे की, प्रतिसादकांना त्यांच्या माहिती गरजा भागविण्यासाठी ग्रंथालय प्रभावी वाटत असले तरी ते सर्वप्रथम त्यांच्या व्यक्तिगत संग्रहाचा संदर्भ घेतात.

Patil (2014) यांच्या संशोधनाचा विषय कर्नाटक विद्यापीठाच्या संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयातील विधी ग्रंथालयातील उपभोक्त्याच्या माहिती संकलनाच्या आणि वापरण्याच्या सवयीचा अभ्यास हा होता. त्यासाठी त्यांनी आपल्या अभ्यासाचा मुख्य उद्देश कर्नाटक विद्यापीठाला धारवाड संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास करणे, त्याच्या समस्या, अडचणी, ते वापरत असलेली प्रकाशने, सध्या अस्तित्वात असलेली माहितीची पद्धती, प्राध्यापकांचा व उपभोक्त्यांचा माहितीचा शोध घेण्याची रणनीती काय आहे ही लेखकाच्या अभ्यासाची उद्दिष्टे होती.

माहितीचे संकलन त्यांनी प्रश्नावलीच्या साधनाने केले. रँडम पद्धतीने नमुना घेतला आहे. आवश्यक तेथे मुलाखतीचे आयोजन केले आहे. अभ्यासासाठी अगोदर पथदर्शक अभ्यास केला आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष त्यांनी पुढीलप्रमाणे मांडले आहेत. ग्रंथालय उपभोक्ता अभ्यास निश्चितच ग्रंथालयाची उपयुक्तता वाढवेल, उपभोक्त्यांकडे स्वतःचा ग्रंथालय संग्रह नाही. उपभोक्ता त्यांच्या महाविद्यालय ग्रंथालयाचा वापर करतात. ग्रंथालयातील सर्व सुविधांबाबतही उपभोक्त्यांना माहिती आहे. बहुतेक उपभोक्ते मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक दोन्ही साधनाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. इंटरनेट सुविधा उपभोक्त्यांकडून वापरल्या जात होत्या. त्यांनी आवश्यक सूचना देऊन अनुमान काढले आहे. हा अभ्यास विधी ग्रंथालयाच्या सेवा, संसाधने आणि विधी शिक्षणक्रमाचा इतिहास याची खोलात जाऊन सविस्तरपणे या प्रबंधात चर्चा करण्यात आली आहे.

## 3.6 विधी ग्रंथालय व माहिती शोध वर्तन :

विधी हे एक ज्ञान क्षेत्र आहे आणि विधीविषयक निर्णयामुळे जीवनावर फार प्रभाव पडतो. ग्रंथालयासाठी मुद्रित साहित्याच्या किमती ही एक चिंतेची बाब झाली आहे. ज्याप्रमाणे विधी ग्रंथालये, विधी महाविद्यालय तृतीय स्थानावर आहेत त्याचप्रमाणे शैक्षणिक मदत सेवा ही बाब

विधी ग्रंथालयासाठी तृतीय स्थानावर आहे. (Walker 2013) विधी महाविद्यालयात ते एक केंद्र म्हणून कार्यरत राहील आणि व्यवसायात तत्पर वकिलांना निर्माण करण्यासाठी आणि प्रशिक्षित करण्यासाठी आपला हातभार लावत राहील. Whiteman (2014) विधी ग्रंथालयात माहिती गरजेनुसार तेव्हाच आणि त्याचवेळी पुरवावी लागते. आवश्यक माहितीची गरज युक्तिवाद करतेवेळी उपयोगी पडते. विधी ग्रंथालयांना कोणतीही सबब न देता ती माहिती ताबडतोब पुरवावी लागते. या कारणांमुळे विधी ग्रंथपालांना जागरुक व्यावसायिक राहावे लागते.

Reddy (2010) विधी विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयात उपलब्ध असलेले विधी साहित्य जे अंकित व पारंपरिकरित्या उपलब्ध आहेत ते परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी व नेमलेले लेखन प्रबंध पूर्ण करण्यासाठी आवश्यक असते व त्यासाठी ते ग्रंथालयाचा उपयोग करून घेतात. रेड्डी यांच्या मते, महाविद्यालयीन ग्रंथालय हे माहितीचे संशोधन करून ते प्रसारण करण्याचे ठिकाण आहे. जेथे उपभोक्ते व माहिती व्यवस्थापक हे परस्परांशी संवाद साधून एकत्रितपणे माहितीच्या ज्ञानाचे संप्रेषण करतात. माहितीच्या ज्ञानाचे संप्रेषण हे उच्च शिक्षणात सर्वांत महत्त्वाचे ध्येय व उद्दिष्ट गाठण्याचे साधन आहे. ग्रंथालयात या साधनांचा कसा वापर केला जातो हे समजणे आवश्यक आहे. याबाबत या लेखकाने आपले मत मांडले आहे.

Garrod (1999) असे स्पष्ट करतात की, नवीन शैक्षणिक प्रवाहात शैक्षणिक ग्रंथालयांनी भोवतालच्या परिस्थितीत लवकरात लवकर जुळवून घेणे आवश्यक आहे. ग्रंथालय संसाधनाचे बदलत्या स्वरूपाचे व्यवस्थापन आणि रक्षण करणे हे ग्रंथालयासमोर फार मोठे आव्हानच आहे.

Croatia (2012) संबंधित लेखामध्ये संशोधकाने विविध देशांतील उपलब्ध असलेल्या अभ्यासाचे परिणाम सादर केले. अभ्यासाचा उद्देश माहितीच्या गरजा ओळखणे, माहितीचे स्त्रोत तपासणे हा होता. विविध क्षेत्रांतील विद्यापीठांतील सर्वेक्षणात असे उघड झाले की, बहुतांश उपभोक्त्यांना माहिती ही शैक्षणिक प्रयोजनार्थ लागते. वारंवार वापरली जाणारी साधने म्हणजे ग्रंथालयातील लेख व ऑनलाइन संसाधने इत्यादी होत. अनेक उपभोक्त्यांच्या दृष्टीने इंटरनेट हा शैक्षणिक क्षेत्रात फार महत्त्वाचा स्त्रोत होता. शैक्षणिक ग्रंथालये ही पारंपरिक सेवा वाचकांना

देतात. क्रोशिया पुढे असे मांडतात की, शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने समाधानकारक व लक्षणीय होती.

American Association of Law Libraries (2008) नुसार संगणकामुळे छपाईकडून इलेक्ट्रॉनिक संसाधनांकडील बदल हा केवळ संसाधनाच्या स्वरूपात होणारा फरक असल्याचे जाणवले. विधी ग्रंथालयाची मूळ रचना मात्र तीच राहिली.

Thomson West Corporation (2007) यांच्या असे लक्षात आले की, विधी विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करून संशोधन व व्यावसायिक वकिलांसारखी लेखनाची प्रक्रिया शिकवली जात नाही. त्यामुळे त्यांना ग्रंथालयातून माहिती शोधून हे कार्य करणे कठीण जाते.

Lee (2008) हे असे तर्क करतात की, विधी ग्रंथालयांना निर्णायक ठरविण्यासाठी पारंपरिक गुणवत्तेचा मापदंड आता पुरेसा नाही. कारण आजकालच्या ग्रंथालयांचे प्रमुख ग्रंथालयांनी साध्य करावयाची विविध लक्ष्ये आपल्या ग्रंथालयीन कामकाजात अंतर्भूत करून घेत नाहीत. त्यांना असे उपाय सुचवले आहेत, ज्यामुळे विधी ग्रंथपाल गुणवत्ता निर्माण करू शकतात. ज्यामुळे पुरेशा प्रमाणात एकाच वेळी समप्रमाणात विधी ग्रंथालयांचे मूल्यमापन करू शकतात आणि त्यांची प्रमुख उद्दिष्ट्ये, लक्ष्ये जतन करू शकतात.

Vyas (2010) यांच्या अभ्यासात हे सामोरे आले की, विधी (एलएल.बी.) चे विद्यार्थी सामान्यपणे न्यायालयात थेट विधी व्यवसाय करण्यापेक्षा खाजगी विधी संस्थात नोकरी करतात. काही विदेशी विधी संस्थांमध्ये नोकरी करतात. नवीन लोकांना सरासरी 10 ते 12 लाख वार्षिक पगार दिला जातो. याप्रकारे त्यांना आय.आय.टी. विद्यार्थ्यांपेक्षा जास्त पगार दिला जातो. फक्त आय.आय.एम. विद्यार्थ्यांना त्यांच्यापेक्षा अधिक पगार मिळतो. शैक्षणिक विधी ग्रंथालयांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांना सतत गुणवत्ता सेवा पुरविण्याचा प्रयत्न करायला हवा. ग्रंथालयांनी वास्तविक वेळात संदर्भ सेवा पुरवायला हवी, पोर्टल्स अद्ययावत ठेवायला हवे आणि त्यातील लिंक चांगल्या स्थितीत असाव्यात. विविध विधी ग्रंथपालांनी वर्षातून एकदा तरी भेटावे आणि एकमेकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर चर्चा करायला हवी. तसेच हीच वेळ आहे की , लेखकांनी सहनिर्मितीचे महत्त्व समजून घ्यावे. म्हणजेच उपभोक्त्यांच्या सहकार्याने ग्रंथालये सेवा यांची

निर्मिती आणि रचना करायला हवी. सरतेशेवटी, या अभ्यासाची संपुष्टी या शब्दात केली गेली आहे की विधी विद्यापीठातील वाढती संख्या लक्षात घेता हे शक्य आहे की एकतर यूजीसी (UGC) ने यांनी एक स्वतंत्र विभाग उघडावा जो विधी ग्रंथालयांच्या गरजा यावर आणि आपले लक्ष केंद्रित करेल अथवा यूजीसीसारखी एखादी संस्था भविष्यात गठन करावी जी विधी ग्रंथालयांच्या गरजांवर आपले लक्ष केंद्रित करेल.

Tung (2013) यांनी यावर प्रकाश टाकला की, आजच्या काळातील विधी महाविद्यालयांना विद्यार्थी न मिळणे आणि पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना चांगला रोजगार न मिळणे ही एक चिंतेची बाब आहे. प्रमुख सुधारक सध्या अस्तित्त्वात असलेल्या कार्यक्षमतेबाबतच्या बाबी उघड करत आहेत आणि सुधारणांची शिफारस करत आहेत. परंतु यापैकीच्या अनेक प्रस्तावात शैक्षणिक विधी ग्रंथालये आणि त्याचे विद्यार्थी व अध्यापक यांच्या यशातील योगदानाबाबत काही गैरसमज आहेत. संबंधित लेखामध्ये चार शक्य अभ्यासक्रम सुधारणा तपासल्या गेल्या आहेत आणि विधी शिक्षण अधिक उपयुक्त करण्यासाठीच्या व्यापक प्रयत्नात विधी ग्रंथपाल आपला सहभाग व योगदान कशा प्रकारे देऊ शकतील यासाठीचे मार्ग सुचविले आहेत.

Lenz (2013) यांनी त्यांच्या अभ्यासात सुचविले आहे की, राज्य सरकारची वित्तीय मदत कमी होत आहे. शासकीय विधी महाविद्यालये स्वयंपूर्ण व स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि त्याद्वारे सार्वजनिक दायित्व निभावण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत आहेत. सार्वजनिक विधी महाविद्यालयांनी ही संधी त्यांची सार्वजनिक दायित्त्वे तपासण्यासाठी आणि त्यांना पुरस्कृत करण्यासाठी वापरावी आणि त्यासाठी त्यांनी त्यांच्या विधी महाविद्यालयाचे सार्वजनिक दायित्वांच्या समर्थनार्थ त्यांची भूमिकेबाबतचा व्यापक दृष्टिकोन ठेवायला हवा. त्यासाठी त्यांनी एक दुसऱ्यांशी आणि राज्य सरकार अनुदानित शैक्षणिक ग्रंथालये यांच्यासोबत सहकार्य करावे, जेणेकरून त्यांची सार्वजनिक दायित्वे राष्ट्रीय स्तरावर पूर्ण होऊ शकतील. यात आमुलाग्र बदल आणि वर्तमान स्थितीतील विधी प्राध्यापकांचे प्रोत्साहन या बाबी समाविष्ट आहेत. स्वहित जोपासणाऱ्या विद्यापीठ अधिष्ठाते आणि प्राध्यापक यांच्या गरजा लक्षात घेऊन ग्रंथालये एक नवीन भूमिका निभावू शकतात, जी प्रमुख मूल्यांशी सुसंगत असेल. प्राध्यापकांचे काम, त्याचा

प्रचार आणि प्रसार, विशेषत: नाविन्यपूर्ण खुले प्रवेश प्रकल्प यांच्या साहाय्याने यांवरसुद्धा ग्रंथपाल आपले लक्ष केंद्रीत करू शकतात.

Robert (2011) यांच्या लेखात अलीकडेच केल्या गेलेल्या विधी ग्रंथालयांचे अमेरिकन असोसिएशन यावरील सर्वेक्षणाचे निष्कर्ष पाहण्यात आले. MARC नसलेला मेटाडेटा प्रथेचा आदर राखला गेला आहे. आंतरकार्यान्वयीन त्यांच्या निष्कर्षात संग्रहाचे प्रकार MARC नसलेला मेटाडेटा मानक, साधने विशद करण्यात आलेली आहेत. हे निष्कर्ष जरी अपूर्ण असले तरी प्रतिसादकांमधील मेटाडेटा आंतरकार्यान्वयन आणि त्याबद्दलची जागरुकता आणि ती कार्यान्वित करण्यासाठीचे घटक सूचित करतात.

McCormack (2012) या प्राध्यापकाने कॅनडा येथील शैक्षणिक विधी ग्रंथालये 2010 चे सर्वेक्षणाचे निष्कर्ष यावर चर्चा केलेली आहे. ज्यात कॅनडा येथील संचालकांनी त्यांची ग्रंथालये माहितीचे प्राथमिक स्त्रोत असावे याबद्दल रद्द केलेले धोरण यावर चर्चा केलेली आहे. मुद्रित साहित्य रद्द केल्याबाबतचे सर्वेक्षण खात्री करण्यासाठीचे निष्कर्ष यांची ओळख त्यांनी केलेली आहे. ग्रंथालये आणि त्यांचे उपभोक्ते यांच्यावर माहिती संकलन वर्तणुकीच्या स्वरूपात काही बदल झालेला आहे काय याबाबत विवेचन केलेले आहे. मुद्रित कायदे रद्द करण्याच्या निर्णयात किंमत हा प्रमुख घटक नव्हता. एका प्रतिसादामध्ये मुद्रित कायद्याची किंमत ही फक्त 26.6 टक्के ग्रंथालयांच्यासाठी प्रमुख चिंता होती आणि शैक्षणिक विधी ग्रंथालये यांनी असे म्हटले की, ते मान्य करतात. याविपरित 80 टक्के विधी ग्रंथालये यांचे संचालक त्या विधानाला मान्य करतात की ग्रंथालये यांचेसाठी मुद्रित साहित्य सदस्यता यासाठीची किंमत ही चिंतेची बाब असते.

Walker (2013) यांनी प्रकाशित केलेल्या लेखात अमेरिकेतील विधी शिक्षणाचा विकास याबाबत थोडक्यात इतिहास मांडला आहे. त्यामध्ये त्यांनी विधी ग्रंथालये आणि शैक्षणिक मदत कार्यक्रम यांची भूमिका तपासली आहे. त्यानंतर त्यांनी ग्रंथालय सेवांना शैक्षणिक मदत सेवा यांच्याशी कशा प्रकारे जोडता येईल यासाठी काही सूचना केल्या. त्यांना असे आढळून आले की ज्याप्रमाणे विधी ग्रंथालये विधी महाविद्यालयात तृतीय स्थानावर आहेत त्याचप्रमाणे शैक्षणिक मदत सेवा ही बाब विधी ग्रंथालये यांच्यासाठी तृतीय स्थानावर आहे. प्रथम स्थानी ते माहितीचे

भांडार आहेत आणि त्यात शिरकाव केल्याने ज्ञान जगताचा मार्ग खुला होतो. दुसऱ्या स्थानी, विधी ग्रंथालये शोधकर्त्यांना त्यांच्या ज्ञानाच्या शोधात माहितीची ठिकाणे सुचवित असतात, तृतीय स्थानी जसे शैक्षणिक मदत कार्यक्रम बळकट करणे, यात विधी ग्रंथालये म्हणजे एक असे ठिकाण ठरते जेथे बौद्धिक बांधणी बळकट करण्यास सुरुवात होते.

Whiteman (2014) यांनी 2014 साली विकसित होत असलेले अमेरिकन बार असोसिएशन 606 मानक आणि त्याचा शैक्षणिक विधी ग्रंथालय संग्रह यावरील परिणामावर अभ्यास केला. एकविसाव्या शतकातील शैक्षणिक विधी ग्रंथालय कसे दिसेल हे अमेरिकन बार असोसिएशन मानक (Standard) हे विधी, शैक्षणिक बाजारपेठेतील बदलते वास्तवाला कशाप्रकारे प्रतिसाद देईल यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहील. एकीकडे काही लोक विधी शैक्षणिक ग्रंथालये काढून टाकावीत असे सुचवित असले तरी प्रत्यक्षात मात्र असे दिसेल की विकसित होत असलेल्या मानकांच्या प्रतिसादावर आणि सध्याच्या आर्थिक वास्तवावर शैक्षणिक विधी ग्रंथालयांच्या जागेची व्याप्ती आणि ग्रंथसंपत्ती सूची हे दोन्हीही कमी होईल. परंतु विधी महाविद्यालयात ते एक केंद्र म्हणून कार्यरत राहील आणि तत्पर वकिलांना निर्माण करण्यासाठी आणि प्रशिक्षित करण्यासाठी आपला हातभार लावत राहतील. हे सध्याच्या विधी शिक्षण सुधारणांचे दृश्यमान उद्दिष्ट होय.

Carter (2002) यांच्या लेखात आदिवासींच्या सार्वभौमत्त्वासाठीची विधीविषयक पार्श्वभूमी मांडलेली आहे. अमेरिकन ग्रंथालयात तिसऱ्या सार्वभौमप्रती लक्षणीय वाढ यावर यात समर्थन केलेले आहे. विधी ग्रंथपालांना अमेरिकन भारतीय कायदे आणि विशेषत: आदिवासी कायदे यावर वेगळ्या प्रकारे विचार करण्यासाठी सांगण्यात आले. जेणेकरून ग्रंथालयातील प्रमुख संग्रह सामुग्री त्यांच्या ठिकाणाचे पुनर्मूल्यांकन करता येईल आणि अजून नवीन मार्ग शोधता येईल. ज्याद्वारे ग्रंथपाल संदर्भाची उपलब्धता, तालिकीकरण आणि वर्गीकरण यांच्या साहाय्याने माहिती पुरवू शकतील. ग्रंथालये व्यावसायिक हाताळणी पद्धती यांना नवे रूप देणे ते तिसऱ्या सार्वभौमत्त्वाच्या विधीविषयक नोंदी आणि त्यांना अधिक स्थिर बनविण्यासाठी मदत करणे यासाठी विधी ग्रंथपालन यातील प्रत्येक विशिष्टतेला आपली भूमिका निभावायची आहे हे प्रस्तुत लेखात लेखकाने सांगितले आहे.

Wong and Frank (2002) यांनी असे सूचित केले की, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक ग्रंथालय वापरताना, माहितीच्या गरजा भागवितांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. शैक्षणिक संस्थांमध्ये येणाऱ्या अडचणी आणि अडथळे या सारख्याच असू शकतात. विविध माहिती तंत्रज्ञान कौशल्याचा अभाव, संदर्भाच्या ठिकाणाचे वातावरण व्यावसायिक ग्रंथपालांच्या संवादात फरक, माहिती साक्षरतेचा अभाव, माहिती शोधातील व मूल्यमापनातील असहाय्यता या सर्व बाबींना वँग आणि फ्रँक यांच्या मताप्रमाणे उपभोक्त्यांना तोंड द्यावे लागते.

Baron and Strout Dapaz (2001) यांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना ग्रंथालय कौशल्यांच्या सहाय्याने माहितीचे संप्रेषण करुन सक्षम करणे यावर (Baron 2001) अभ्यास केला आहे. त्यांनी सुचविले की आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा ओळखून संग्रहविकास करणे आवश्यक आहे. Jackson (2005) यांच्या मताप्रमाणेच बॅरन यांनी म्हटले आहे की, ग्रंथालय संग्रहामध्ये परदेशी भाषांचे शब्दकोश माहिती साहित्य, स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याची साधने साहित्य, पेपर्स यांचा समावेश असावा. त्यांनी असा निष्कर्ष काढला की, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा या विविध आणि अद्वितीय आहेत. या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा हेतू त्यांच्या माहितीच्या गरजांचे मूल्यांकन करून ज्ञाननिर्मिती करणे, संस्थात्मक प्रयत्न करणे आणि अशा माहितीच्या गरजांना प्राधान्यक्रम देणे हा आहे. संबंधित महाविद्यालयाने या गटांच्या गरजाचे परीक्षण करून त्यांच्या गरजा प्रभावीपणे भागवाव्यात. मलेशियन विद्यापीठांमध्ये आवश्यक मानले जाते.

Shrivastava (2008) यांनी त्यांच्या अभ्यासामध्ये विधी ग्रंथपालन विशेषत: न्यायिक संस्थात (कार्यामध्ये) ग्रंथपालन हे इतर कोणत्याही विद्याशाखा ग्रंथपालनापेक्षा वेगळे आहे. विधी या विषयावर आढावा घेण्यात आला. इतर संस्थेतील ग्रंथपाल त्यांच्या उपभोक्त्यांना पटवून देऊ शकतात की त्यांच्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी त्यांना काही वेळ लागेल. न्यायालयीन ग्रंथपालाला आवश्यक माहिती न्यायालयात जेव्हा प्रकरणावर युक्तिवाद केला जात असतो तेव्हाच आणि त्याचवेळी पुरवावी लागते आणि आवश्यक माहितीची गरज युक्तिवाद करतेवेळीच पडते. विधी ग्रंथपालांना कोणतीही सबब न देता माहिती ताबडतोब पुरवावी लागते. या कारणांमुळे

विधी ग्रंथपालांना जागरुक व्यावसायिक राहावे लागते आणि त्यांची स्वत:ची साधने आणि कौशल्ये आवश्यकपणे विकसित करावी लागतात, जेणेकरून मागितलेली माहिती ताबडतोब पुरविता येईल.

Rao and Rao (2012) यांच्या असे निदर्शनास आलेले आहे की, भारतातील प्रसिद्ध विधी महाविद्यालयांतील ग्रंथालये आणि माहिती सेवा पुरविण्यात येणाऱ्या सेवांची गुणवत्ता आणि उपभोक्त्याचे समाधान हे ज्या प्रकारचे संग्रह उपलब्ध करुन दिले जातात यावर अवलंबून असते. विधी ग्रंथालयांचा प्राथमिक दृष्टिकोन, ते ज्या संस्थेला सहाय्य करत आहेत, तेथील प्राध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या माहिती गरजा भागविणे हा असतो. भविष्यातील वकील प्रशिक्षित करण्याच्या त्यांच्या भूमिकेच्या व्यतिरिक्त विधी महाविद्यालये संशोधन अध्ययन साहित्याचे प्रमुख निर्माते आहेत आणि संशोधन प्रकाशन यासाठीची संसाधने आणि आवश्यक सहाय्य यासाठी संस्थागत विधी ग्रंथालये यावर अवलंबून असतात. हा अभ्यास हे सुचवितो की, सर्व प्रकारच्या ग्रंथालयात कार्यरत ग्रंथपालांनी किमान सक्षम असायला हवे. ग्रंथालये शिक्षण माध्यमे यात आवश्यकपणे विधी ग्रंथपालन याबाबत विशिष्ट असलेल्या क्षेत्रातील घटक समाविष्ट करायला हवे. त्यांना महत्त्व देणे गरजेचे आहे. तसेच ग्रंथालय व्यवस्थापन, संग्रह व्यवस्थापन, वर्गीकरण आणि विषय सक्षमता आणि ग्रंथालये सेवा ज्या संदर्भ सेवा आहेत त्यांनाही महत्त्व द्यायला पाहिजे. सध्याच्या जागरुकता सेवा, दस्तऐवज वितरण सेवा, निवडक माहितीचे वितरण, प्रतिरुप लेखन सेवा, ग्रंथालयाचे आंतरग्रंथालयीन व्यवहार (Inter Library Loan), ग्रंथकोषाविषयी सेवा, ग्रंथालय वेब सेवा, सीडी रॉम सेवा याबाबत सखोल अभ्यास व्हायला हवा.

Nikam and Madhu (2006) यांनी नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी (NLSIU) ग्रंथालयात ग्रंथालय पुरवित असलेल्या सेवा आणि सुविधांबद्दल उपभोक्त्यांच्या काय अपेक्षा आहेत, ग्रंथालय वापराचा उपभोक्त्यांचा उद्देश कोणता आहे यासाठी निकम व मधू यांनी संबंधित अभ्यास हाती घेतला. संरचित प्रश्नावलीचा वापर माहितीचे संकलन करण्यासाठी केला. चारशे पन्नासपैकी एकशे पन्नास विद्यार्थी रिसर्च स्कॉलर्स असून उर्वरित प्राध्यापकांना प्रश्नावलीचे

वितरण केले होते. त्यावर प्रतिसाद फक्त एकशे चोवीस जणांकडून मिळाला. प्रश्नावली भरून घेताना वयाप्रमाणे गटाने, तसेच लिंगभेदाप्रमाणे गटवारीने भरून घेण्यात आल्या. या अभ्यासात असे लक्षात आले की, उपभोक्त्यांनी ग्रंथालयाचा वापर सुलभ व जलद रीतीने करण्यावर भर दिला आहे. यात सुचविण्यात आले आहे की, नियतकालिकातील लेखांचे इंडेक्सिंग करणे आवश्यक आहे. संबंधित अभ्यासात अभ्यासकाने अगदी ढोबळ प्रश्नावली बनवून त्यांच्या आधारे उपभोक्त्यांच्या ग्रंथालयाबद्दल असणाऱ्या अपेक्षा जाणून घेतल्या आहेत. या अभ्यासाला उपभोक्त्यांचा हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. तसेच संबंधित अभ्यास सखोलपणे करण्यात आला नाही.

American Association of Law Libraries (AALL) (2002) नमूद करतात की, संगणक यंत्राचे संलग्न वापराचे संशोधन महत्त्वाचे आहे. AALL च्या अहवालानुसार विधीविषयक माहितीचे छापील स्थितीकडून इलेक्ट्रॉनिक संसाधनाकडे स्थानांतरण होत आहे. विधी ग्रंथालये यात सक्रिय सहभागी होत आहेत. नवीन प्रकल्प व मूल्यांकनाच्या प्रतिकृती निर्माण करीत आहे. त्यात विद्यापीठाच्या आवारातील ग्रंथालयांचा व आयटी विभागांचा तसेच विधी प्रकाशकांचा पण नवीन संच व प्रणाली संसाधन तयार करण्यात सहभाग आहे.

Lohosit J (2008) यांनी सॅन दिएगो विद्यापीठातील विधी विद्यालयाच्या विधी संशोधन केंद्राच्या संयोजिका व वक्त्या यांनी 2008 च्या अमेरिकन असोसिएशन ऑफ लॉ लायब्ररिज वार्षिक संमेलनात 'संगणक व संगणकाच्या सहाय्याने विधी संशोधन' ह्या विषयांवर बोलताना तर्क केला की संगणकावर संशोधन होणे हे ग्रंथपालांना अजिबात भीती उत्पन्न करण्याचे कारण नाही. विधी व्यवसाय हा ठराविक मर्यादित संदर्भ साधने वापरून होत नाही, ती एक कला आहे. ज्यांच्यात उत्तम वाद करण्यासाठी अशी प्रणाली आवश्यक आहे, ज्यात अनौपचारिक नेटवर्क व अनुभवी सल्लागारांची मदत घ्यावी लागते. त्यामुळे छपाईतून इलेक्ट्रॉनिक संसाधनेतील बदल हा केवळ संसाधनाच्या स्वरुपातील फरक जाणवला. विधीची मूळ रचना तीच राहिली, हे अमेरिकेच्या कायद्याचा इतिहासात घडले होते. ह्या साखळीतील जोड म्हणून ग्रंथपाल नेहमीच महत्त्वाचे राहतील.

Howland and Lewis (1990) यांनी प्रस्तुत अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धती अवलंबिली आहे. त्यांनी नमूद केले की, नवीन विधी पदवीधरांना शेवटच्या संचित माहितीच्या आधारे संशोधन करणे जमत नाही. बराचसा वेळ व शक्ती देऊन विधी संशोधन कसे करावयाचे ह्याचे प्रशिक्षण देऊनही संशोधन करणे त्यांना जमत नाही. अशा गोष्टी प्रचलित आहेत की नवीन सहकारी कोर्टात अशा केसचा उल्लेख करतात, ज्यांचे निर्णय कधीच बदलले गेले आहेत अथवा त्यांना असे वाटते की Federed Reporter 2 D मध्ये निव्वळ संघराज्याचेच मुकदमे असतात. त्यांना पुढे असेही वाटते की, लेक्सिस/वेस्ट लॉ वर काही माहिती मिळाली नाही तर माहिती कोठेच उपलब्ध होणार नाही. अशा अज्ञानामध्ये नवीन सहकार्यांना वाटत असते विधी विद्यालयात विधी संशोधन कार्य करण्याची प्रक्रिया योग्य असते कां? व त्यामुळे नवीन शिक्षितांना व्यवसाय सुरू करताना मुद्दे शोधण्याचे सामान्य कौशल्य मिळते कां? असे मत हाउलहॅण्ड आणि लुईस यांनी व्यक्त केले आहे. त्यांचे निष्कर्ष आजही योग्य असल्याचे लक्षात येतात.

Callister (2003) विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून वकिलांकडे कमी अधिक प्रमाणात संशोधन कौशल्य असते अशी धारणा निर्माण झाली. 1902 या वर्षातील विधीविषयक संशोधन वाङ्मयातील एका उदाहरणात आयोवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश डोमर म्हणतात की, ''जेव्हा विद्यार्थी आणि वकीलसुद्धा अधिकृत माहिती मिळवण्यासाठी ग्रंथालयामध्ये जातात तेव्हा त्यांची असहाय्यता बघून मला आश्चर्य वाटते.'' शंभर वर्षानंतर असे म्हटले जाऊ शकते की, हे विधान विधीविषयक अंकीकृत ग्रंथालयाच्या वापरासंदर्भात अजूनही सत्य आहे.

Thomson West Corporation (2006) हे वेस्ट लॉ डेटाबेसचे प्रकाशक आहेत. त्यांनी गुणधर्मासंबंधी शोध घेतला. युनायटेड स्टेट्समधील विधी व्यवसाय करणाऱ्या संस्था आणि विधी क्षेत्रातील ग्रंथपालाचे चर्चासत्र भरविण्यात आले होते. त्या परिसंवादात अभ्यासू ग्रंथपालांचा सहभाग होता. विधी संशोधन आणि लेखन हा या चर्चासत्राचा विषय होता. ''जीवनातील एक दिवस''(Day in the life) ह्या गुणधर्मासंबंधी स्पष्ट करणाऱ्या संशोधनात थॉमसन वेस्ट यांच्या असे लक्षात आले की, विधी व्यावसायिक कार्यालयामध्ये नवीन सहकार्याला 80 टक्के वेळ हा संशोधनात विधी मसुदे तयार करण्यात व दस्तऐवज बनविण्यात

घालवावा लागतो. त्या कामाची विभागणी केल्यास 45 टक्के संशोधनात तर 35 टक्के लेखनात जातो. ह्याचा अर्थ नवीन सहकारी त्यांना विधी विद्यालयात विधी मंडळाची (Bar Exam) ची परीक्षा उत्तीर्ण होण्यास शिकविले जाते परंतु स्वतंत्र विचार करून संशोधन व व्यावसायिक वकिलांसारखी लेखनाची प्रक्रिया शिकवली जात नाही. त्यामुळे त्यांना हे कार्य कठीण जाते.

## 3.7 विविध विषयांतील उपभोक्त्यांचे माहिती शोध वर्तन :

विधी ग्रंथालयातील विद्यार्थ्यांचे माहिती शोध वर्तनाचे परीक्षण करताना अभ्यास करतेवेळी इतर शाखेतील उपभोक्ते माहिती शोध वर्तन कशा प्रकारे करतात हे या प्रकरणात अभ्यासून त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. Reddy (1997) माहितीचे संकलन करण्यासाठी इतर क्षेत्रातील साधनांचा अनौपचारिक अधिक वापर करतात. Seth (2006) यांनी मांडले की आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजामध्ये उच्च शिक्षणाची प्रगती ही समाधानकारक झाली नाही. Adefunmisi (2005) यांच्या मते उपभोक्ते कोणत्या संस्थेतील आहेत व त्या शिक्षणसंस्थेचा दर्जा व स्थान काय आहे ह्यावरही माहितीचे शोध वर्तन अवलंबून असते. माहितीचा शोध घेताना उपभोक्त्यांना एकसारख्या समस्येला सामोरे जावे लागते. ती म्हणजे माहितीची अनउपलब्धता होय. ग्रंथालयीन सेवा परिणामकारक होण्यासाठी ती आधी कार्यक्षम हवी हे जरी खरे असले तरी कार्यक्षम ग्रंथालय परिणामकारक सेवा देऊ शकेलच असे म्हणता येत नाही.

Tenopir and King (2009) यांनी विज्ञान, सामाजिक विज्ञान तंत्रज्ञान आणि वैद्यकीय विद्यापीठ, प्राध्यापक सदस्य यांच्या वाचनपद्धतीचा अभ्यास केला. हा अभ्यास विद्यापीठ विज्ञान प्राध्यापक सदस्य यांच्यापुरता मर्यादित होता आणि त्याच्या प्रतिसादाचा एका विशिष्ट कालावधीसाठी तुलनात्मकपणे अभ्यास केला गेला. अभ्यासासाठीची माहिती वेळोवेळी 1966 पासून संकलित करण्यात आली. 31 प्रश्नावलीद्वारा माहिती संग्रहीत करण्यात आली. या अभ्यासात असे निदर्शनास आले की, विज्ञान प्राध्यापक यांची माहिती निष्पन्न झालेली आहे. प्रत्येक वर्षी विज्ञान प्राध्यापक सदस्य यांची सरासरी वाचनसंख्या वाढतच आहे. तसेच वाचनासाठीचा सरासरी वेळ कमी होत आहे.

Skeltion I. (1973) यांनी वैज्ञानिक व समाजशास्त्रज्ञ ह्यांचा माहिती वापरासंबंधी तुलनात्मक अभ्यास केला व असे निष्कर्ष काढले की दोघेही एकच माहितीचे स्त्रोत वापरत होते व ते मिळविण्याची प्रक्रिया ही समान होती. वैज्ञानिक व समाजशास्त्रज्ञ दोघांची माहिती शोधाची वर्तणूक बहुतांशी समान होती.

Jamali et.al. (2008) यांनी विद्यापीठ महाविद्यालय येथील भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ यांच्या माहिती संकलन वर्तणूक यावरील दोन पैलू तपासले. अद्ययावत राहण्यासाठी शैक्षणिक वर्ग वापरत असलेले तंत्र, पध्दती आणि लेख शोधण्यासाठी वापरलेल्या पध्दती इथपर्यंतच या अभ्यासाची व्याप्ती होती. एकशे चौदा लोकांनी (47.1 टक्के) या सर्वेक्षण कार्यक्रमात भाग घेतला. लंडन विद्यापीठातील महाविद्यालय विभागात भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र विभागातील कर्मचारी आणि विद्यावाचस्पती (पी.एच्.डी.) यांच्याकडून माहिती गोळा करण्यासाठी एक स्वयं संचालित वेब आधारित प्रश्नावली वापरण्यात आली. या अभ्यासात असे दिसून आले आहे की, भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र यांचे शैक्षणिक विभाग यांची माहिती संकलन वर्तणूक याबाबतीत बऱ्याच प्रमाणात साम्य असले तरी बऱ्याच प्रमाणात फरकसुद्धा आहेत. या अभ्यासात असे नमूद केले आहे की, शास्त्रज्ञ यांची माहिती वर्तणूक योग्यपणे समजून घेण्यासाठी या विभागातील विषय आणि सामाईक उपभोक्ते यांच्या गरजा आणि महत्त्वाचा अधिक गंभीरपणे आढावा घ्यावा लागेल.

Qureshi et.al. (2008) यांनी पाकिस्तानातील नऊ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि माहिती संकलन वर्तणूक तपासली. विद्यार्थ्यांची माहितीसाठीची वर्तणूक तपासणे, माहितीची प्रमुख साधने ओळखणे, साधनेबाबत जागरुकता स्तर निर्धारित करणे आणि शैक्षणिक माध्यम संसाधनांचा वापर विद्यार्थी यांनी केलेला आहे किंवा नाही याची पडताळणी करणे ही या अभ्यासाची उद्दिष्ट्ये होती. माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनांचा मार्ग निवडला गेला होता. एक हजार विद्यार्थ्यांनी या अभ्यासात भाग घेतला होता. माहिती मूल्यमापन ह्यासाठी सांख्यिकी विश्लेषण साधने परस्परसंबंध आणि प्रतिगमन वापरली गेली. या अभ्यासात असे निदर्शनास आले की, शैक्षणिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी सभोवतालचे वातावरण आणि

विद्यार्थी सहभाग यामुळे माहिती संकलन वर्तणूक या बाबींवर विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव पडला. या अभ्यासात हे निष्पन्न झाले की, आधुनिक अंकीकृत ग्रंथालये आंतरपाठ आणि डेटाबेस साधने इत्यादीमुळे सुध्दा विद्यार्थ्यांच्या माहिती संकलन वर्तणुकीवर प्रभाव पडत असतो.

Ramesh and Sahoo (2012) यांनी ग्रंथालयातील माहिती वर्तनाचे आणि गरजांचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्यास केला. हा अभ्यास ICFAI स्कूल (हैद्राबाद) मधील प्राध्यापकांच्या माहिती वर्तन आणि माहितीच्या गरजांच्या मूल्यमापनाचा होता. माहिती वर्तन आणि माहितीच्या गरजांचा त्यांनी सत्तर प्राध्यापकांकडून माहिती जमा करून माहितीचे विश्लेषण केले. निष्कर्षाअंती निदर्शनात आले की, ग्रंथालय व्यावसायिकांसाठी प्राध्यापकांना जास्तीत जास्त सहाय्य करण्यासाठी ग्रंथालयातील माहितीचे स्त्रोत वापरण्यासाठी प्राध्यापक वर्गात जागरुकता निर्माण करुन साधने त्याला उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

Reddy (1997) यांनी भारतातील अपंग क्षेत्रातील व्यावसायिकांचा माहिती शोध वर्तनाचा अभ्यास सर्वेक्षणाच्या माध्यमातून केला. 160 अपंग क्षेत्रातील व्यावसायिकांचे वर्तन अभ्यासण्यात आले. या अभ्यासातून आढळले की माहितीचे संकलन करण्यासाठी अनौपचारिक साधनाचा वापर केला जातो. अध्यायन व अध्यापनासाठी नियतकालिक ह्या माहितीच्या स्त्रोताला उपभोक्त्यांनी पसंती दिली. ग्रंथालयाचा वापर, सल्ला प्रदान करण्यासाठी आणि उपचारात्मक, समस्येचे निदान करण्यासाठी केला जातो.

Supriya et. al. (2004) यांनी कुदडलोरे जिल्ह्यातील गव्हर्नमेंट आर्ट कॉलेजमधील प्राध्यापकांच्या माहितीच्या शोध वर्तनाचा अभ्यास केला. या अभ्यासामागील उद्देश प्राध्यापक वर्ग ग्रंथालयातून माहिती शोधण्यांचा मार्ग तपासणे हा होता. अभ्यासाचे निष्कर्ष उद्धृत करतात की, 38.12 टक्के उपभोक्ते हे अनेक वेळा त्याच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाला भेट देतात. कोणत्या प्रकारची माहिती ते शोधतात हे पाहिले असता असे निदर्शनास येते की बहुतांश उपभोक्ते (56.86 टक्के) हे विषयाशी संबंधित माहितीचाच वापर करतात.

Seth and Parido (2006) यांनी एका विशिष्ट समाजातील व्यक्तीची माहितीची गरज आणि वर्तनाचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी ओरिसातील अनुसूचित जाती व जमाती

समाजातील व्यक्ती उच्च शिक्षण प्राप्त करताना कोणती आवश्यक माहिती साधने वापरतात याचा अभ्यास करण्यात आला. या समाजामध्ये खूप मोठया प्रमाणावर सुधारणा होणे आवश्यक आहे हे सेठ आणि पांडो यांनी सुचविले. त्यांनी महत्वाच्या बाबीवर प्रकाश टाकला तो म्हणजे या समाजामध्ये उच्च शिक्षणासंबंधी प्रगती ही समाधानकारक नाही.

Kanungo (2007) या अभ्यासकांने सामाजिक शास्त्रज्ञाच्या माहिती वापराचा नमुना अभ्यासला. त्यासाठी त्यांनी जर्नल ऑफ एशियन स्टडीज या नियतकालिकाचे संदर्भांचे विश्लेषण केले. त्यासाठी 2000-2004 हा कालखंड निवडला होता. एकूण 114 लेखकांचा सहभाग असलेले 108 लेख व 9111 संदर्भांचा यात समावेश होता. त्याचे त्यांनी विश्लेषण केले. ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक साधनांच्या वापराची चर्चाही करण्यात आली. सामाजिक शास्त्रज्ञ ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक साधनाचा वापर करतात यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

Adefunmisi (2005) यांच्या मते व्यक्तीची, संघटनेची, गटांची, विधी विद्यार्थ्यांच्या समुहाची माहिती शोधाची प्रक्रिया ठरविण्याची पध्दत वेगवेगळी असू शकते. ह्या बाबींमध्ये विधी शिक्षकांचे प्रोत्साहन, सुसज्ज ग्रंथालय, जय्यत आधुनिक तांत्रिक सामुग्री उपलब्ध आहेत. (e-Library, e-books, Law databases, computer systems, Internet etc.) व वर्तमान माहितीस्त्रोत (ग्रंथ, नियतकालिके, विधी अहवाल) ह्या गोष्टी विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयाचा वापर करण्यास आकर्षित करू शकतात म्हणून लेखक ह्या निष्कर्षास आला की माहिती शोधाचे धोरण हे व्यक्तीच्या मजकूर, भाषा, वेळ, संप्रेषण (दळणवळण) व माहितीची गरज यावर अवलंबून असते. त्यांचे असे ठाम मत आहे की उपभोक्ते कोणत्या संस्थेतील आहेत व त्या शिक्षणसंस्थेचा दर्जा व स्थान काय आहे यावरही माहितीचा शोध अवलंबून असतो.

Tackie and Adams (2007) यांच्या मते, माहिती संशोधनाची वृत्ती, रोजच्या माहिती मिळविण्याच्या पद्धतीपेक्षा बदलली आहे. तसेच विविध कामांच्या क्षेत्रात माहिती संशोधनाची प्रक्रिया वेगळी आहे. तेव्हा टॅकी आणि ॲडम्स असे सुचवितात की, माहिती शोध करणाऱ्या एक एक गटांचा वेगवेगळा अभ्यास करावा व निर्णय त्याच गटाच्या प्रगतीसाठी वापरावा. अनेक संशोधनातून विधी ग्रंथालयाचा वापर करून माहिती संशोधनाच्या प्रक्रियेतील त्रुटी लक्षात आल्या.

Saraf (1990) यांनी नॉर्थ इस्टर्न हिल युनिव्हर्सिटी आणि मणिपूर विद्यापीठ येथील समाजशास्त्राचे संशोधन करणाऱ्या विद्वानांच्या प्रगतीचा अभ्यास केला. त्यांना वेळोवेळी येणाऱ्या अडचणी, त्यांना आवश्यक असलेली माहिती व ती माहिती मिळविण्यासाठी असलेला त्यांचा दृष्टिकोन यावर काही तोडगा काढणे आवश्यक होते. या अभ्यासाने हे सुचविले की संबंधित विद्यापीठांमध्ये संशोधनाचे सामायिकीकरण होणे अंत्यत आवश्यक आहे.

Kingkaew and Deshpande (2005) यांनी बँकॉक आणि थायलंडमधील राजाभाट विद्यापीठातील प्राध्यापकांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास केला. प्राध्यापक वर्गाकडून प्रश्नावलीच्या साहाय्याने माहितीचे संकलन केले. प्राध्यापकांच्या माहिती शोध वर्तनाची पध्दत ही त्या ज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींशी विचारविनिमय करून केली जाते. 213 वापकर्त्यांनी नमूद केले की त्यांना माहिती ही वर्गातील तासाची तयारी करण्यासाठी लागते. 54 टक्के प्राध्यापक हे ग्रंथातून संदर्भ साहित्य मिळवितात. बहुतांश प्राध्यापक हे ग्रंथाचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. 74 टक्के प्राध्यापकांना माहितीची साधने थाई भाषेतून हवी आहे तर, 24 टक्के प्राध्यापकांना इंग्लिश भाषेत ते हवे आहे. साहित्याचा शोध ते ग्रंथालयातून आणि इंटरनेटच्या माध्यमातून घेतात. Google हे माहिती शोधण्यासाठी तेथील प्राध्यापकांकडून वापरले जाते. माहिती संप्रेषणाचे साधन म्हणून ई–मेलचा 42 टक्के वापर ते करतात. 42 टक्के प्राध्यापक हे शैक्षणिक क्षेत्रातील डेटाबेसेसचा वापर करतात. लेखकांना सर्वेक्षणात असे दिसून आले की, बहुतांशांना माहिती शोधताना एकसारख्या समस्येला सामोरे जावे लागते ती म्हणजे माहितीची अनउपलब्धता नमूद केली आहे.

Gray et.al (2005) यांनी पौगंडावस्थेतील समलिंगी मुलांच्या स्वास्थ्याच्या संदर्भात अभ्यास केला. इंटरनेटवर वेगवेगळ्या विषयांवर उपलब्ध असणाऱ्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास ग्रे यांनी केला. अमेरिकेतीलमधील 157 इंग्लिश बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड केली. 11 ते 19 वयोगटातील समलिंगी मुले होती ह्या मुलांना लागणारी आवश्यक माहिती व त्याची उपलब्धता यावर हा अभ्यास होता. त्यातून हे स्पष्ट झाले की, त्या मुलांना स्वास्थ्यासंबंधी माहितीचे मुख्य स्त्रोत इंटरनेट होते.

Branch (2000) यांनी पौगंडावस्थेतील तरुण विद्यार्थ्यांच्या माहिती शोध प्रक्रियेचा अभ्यास केला. मौखिक/मोठ्याने स्पष्ट करण्याचे विचार व नंतर अंतर्मनाने त्यावर विचार करण्याच्या संदर्भात काही मूल्यमापन केले. ह्या माहितीच्या शोधाच्या प्रक्रियेसाठी त्यांनी 12-15 वयोगटातील विद्यार्थ्याची निवड केली. मायक्रोसॉफ्ट एन्कार्टा 98 ने मूल्यमापन केले. एकाच वेळी आंतर व बाह्य मनातील शाब्दिक शिष्टाचार पौगंडावस्थेत संवाद साधताना व सी.डी.रोम. इनसायक्लोपीडिया ते कसे वापरतात ते समजले.

Meho (2001) यांनी सामाजिक शास्त्राच्या प्राध्यापकांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास केला. संदर्भाचे विश्लेषण (सायटेशन ॲनालिसिस) आणि चौकशीला अनुसरून प्रश्नावली तयार करून माहिती जमविण्यात आली. दोन प्रश्नांवर यात विशेष चर्चा करण्यात आली. सामाजिक शास्त्राच्या प्राध्यापकांना सरकारी माहिती ते कोठून शोधून काढतात आणि अशी माहिती वापरताना त्यावर कोणत्या घटकांचा प्रभाव शोध वर्तनास भाग पाडतो. यावर त्यांनी असा निष्कर्ष काढला की, पारंपारिक पद्धतीचा वापर करून सरकारी माहिती शोधली जाते. वर्ल्ड वाइड वेब आणि ई–मेलचा वापर प्राध्यापक करीत होते. सामाजिक शास्त्रातील प्राध्यापकांना माहिती आहे की त्यांच्या रिसर्चसाठी नवीन आयसीटी तंत्राचा त्यांना आधार घेता येतो.

Sing (2007) यांच्या अभ्यासात कृषी क्षेत्रातील प्राध्यापक सदस्यांच्या वाचनाच्या सवयी आणि विविध रूची यावर मोजमाप करण्यात आलेले आहे. तसेच ग्रंथालयांचा वापर याबाबत परीक्षण केलेले आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरले आहे. एकशे साठ लोकांनी या अभ्यासासाठी प्रतिसाद दिला. या अभ्यासात असे निष्पन्न झाले की प्राध्यापक सदस्य विषयवार शोध घेण्यात प्राधान्य देतात. एक चतुर्थांशपेक्षा जास्त प्रतिसादक संगणक सेवेचा वापर करत नाहीत.

Kumar (2013) या अभ्यासात भगत फूल सिंग महिला विद्यापीठातील प्राध्यापकांच्या माहिती शोध वर्तणुकीचा अभ्यास करण्यात आला. प्रश्नावलींच्या माध्यमातून माहिती मिळविण्यात आली. या अभ्यासातून मुख्य आणि उल्लेखनीय बाब निदर्शनास आली की, प्राध्यापक महाशय हे गुगल वर माहिती शोधतात. बहुतांश प्राध्यापक म्हणतात की, 'इंटरनेटवर

माहितीची उपलब्धता नाही’. या अभ्यासात प्राध्यापकांना माहितीची गरज ही व्याख्याने देण्यासाठी, अद्ययावत राहण्यासाठी आणि संशोधनासाठी गरज लागते. प्राध्यापक महाशय अनेक पद्धतींनी माहिती शोधतात.परंतु ते संबंधित क्षेत्रातील विद्वान व्यक्तीचा सल्ला घेणे पसंत करतात.

Ganesan and Kaliyaperumal (2013) श्री रामचंद्र विद्यापीठ ग्रंथालय चेन्नई येथील दंतशास्त्र शैक्षणिक व्याख्याते याचा अभ्यास केला. एक विशिष्टपणे संरचित प्रश्नावली निर्माण करण्यात आली आणि नमुना पद्धती वापरून उपभोक्त्यांना वितरित केल्या गेल्या. या अभ्यासाचे निकाल दर्शवितात की, ग्रंथालयातील जागरूकता कार्यक्रम स्नातकोत्तर विद्यार्थी आणि शिक्षक यांना उपयुक्त असले तरी ते स्नातकपूर्व विद्यार्थ्यांना उपयुक्त नसतात. या निकालाच्या आधारावर सुचविण्यात आले आहे की, एकच विशिष्ट मंच तयार करायला हवा जेथे सर्व प्रकारची ई–संसाधने वापरता येईल आणि वैद्यकीय साहित्यावर माहिती साक्षरता कार्यक्रम वारंवार आयोजित करता येतील.

Siddiqui (2011) या अभ्यासाचा प्रमुख हेतू लखनौ येथील बी.टेक. आणि एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांची माहिती शोध वर्तणुकीचे परीक्षण करणे हा होता. यामध्ये माहिती शोध वर्तणूक विविध स्वरूपात व्यक्त करण्यात आली. जसे मुद्रित साहित्याचे वाचन ते संशोधन आणि प्रयोगशीलता, विशेषतः या अभ्यासात वापरलेली साधने आणि विद्यार्थ्यांची माहिती शोध वर्तणूक यावर विद्यार्थ्यांची पातळी आणि अभ्यासक्रम यासाठी माहिती संकलन प्रणाली यासाठीचे सामान्य नमुने निर्धारित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

Babariya and Patel (2014) यांनी या संशोधनपर लेखामध्ये भारतातील विविध राज्यांमधील ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावसायिक (ग्रंथपाल व ग्रंथालयाशी संबंधित) यांचे माहिती प्राप्त करण्याचे विविध दृष्टिकोन आणि वर्तन यांची चर्चा केली आहे. तांत्रिक युगातील आधुनिक काळामध्ये हे संशोधन उपभोक्त्यांना स्वत: अद्ययावत ठेवण्यासाठी सखोल अभ्यास करण्यासाठी आणि माहिती प्रदान करण्यासाठी किती नाविन्यपूर्ण ग्रंथालय, सॉफ्टवेअर, बारकोड प्रणाली ग्रंथालयामध्ये वापरली जातात याचा सखोल अभ्यास यात करण्यात आला आहे. अधिक उपभोक्त्यांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्यासाठी कोणते धोरण आखले पाहिजे याची सखोल चर्चा यात करण्यात आली आहे. गुगलच्या माध्यमातून 100 ग्रंथालय व माहितीशास्त्र

व्यावसायिकांकडून प्रश्नावली ऑनलाइन भरून घेण्यात आल्या. यात सुचित करण्यात आले की, माहिती शोध वर्तनासंबंधीचे संशोधन करणे ग्रंथालय व्यावसायिकांना खूप आवश्यक आहे. त्यांना आपल्या व्यवसायादरम्यान ज्या समस्या येतात त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, हे यात सूचित केले आहे.

Prasad et. al. (1998) सामाजिक शास्त्रज्ञ आणि भौतिक शास्त्रज्ञ यांचा माहिती संकलन कार्यक्रम तपासला आणि माहिती संकलनासाठी त्यांनी वापरलेले विविध औपचारिक आणि अनौपचारिक साधने यांचा आढावा घेण्यात आला या अभ्यासाची व्याप्ती बनारस हिंदू विद्यापीठ येथिल शास्त्रज्ञ यांच्यापुरते मर्यादित होती. माहिती संकलन यासाठी प्रश्नावली साधनाचा वापर करण्यात आला, भौतिकशास्त्र आणि सामाजिक विज्ञान या दोन्ही विषयांतील एकूण सव्वीस शास्त्रज्ञांनी भाग घेतला. या अभ्यासात हे स्पष्ट झाले आहे की, भौतिकशास्त्र शास्त्रज्ञ आणि सामाजिक विज्ञान शास्त्रज्ञ यांच्या माहिती संकलन वर्तणुकीत बराच फरक होता.

Dasgupta et. al. (2017) यांनी कोलकत्ता येथील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास केला आहे. वैद्यकीय व्यावसायिकांसाठी माहितीची कोणती साधने सामावलेली आहेत याचा यामध्ये बोध करण्यात आला आहे. माहिती गोळा करण्याचे महत्त्वाचे स्त्रोत सर्वात जास्त वापरण्याची कारणे आणि माहितीचा शोध घेताना काही समस्या येत असल्यास त्यासंबंधी मुद्दे मांडण्यात आले आहेत.

कोलकत्ता महानगरातील पदवीपूर्व आणि पदव्युत्तर कार्यक्रमांच्या चार वैद्यकीय संस्थांमधील उपभोक्त्यांची निवड अभ्यासासाठी करण्यात आली होती. सर्वेक्षण पद्धतीचा वापर माहिती संकलन करण्यासाठी करण्यात आला. माहितीचे संकलन करण्यासाठी ओपन एण्डेड प्रश्नावलीची रचना केली होती. माहितीचे संकलनासाठी एम.बी.बी.एस.चे विद्यार्थी, पदव्युत्तर विद्यार्थी व प्राध्यापकांचा समावेश करण्यात आला आहे. रूग्णांची काळजी घेण्यासाठी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमाचा विकास ही माहितीचा शोध घेण्याची दोन प्रमुख कारणे होती. बहुतांश उपभोक्त्यांना औपचारिकरित्या सूचना माहिती साधने वापरासंदर्भात प्राप्त होत नव्हत्या. सरकारी वैद्यकीय वेबसाइट हे सर्वात लोकप्रिय माहितीचे साधन मानले जाते. फार्मास्युटिकल

कंपन्यांमधील साधनेही कमी महत्त्वाची मानली गेली आहेत.

Panda (1997) यांनी ओरिया भाषेतील सर्जनशील लेखकांच्या माहिती शोध वर्तणुकीचे परीक्षण केले आहे. ई–मेलच्या साहाय्याने माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या ई–मेलच्या माध्यमातून पाठवून माहिती संकलन करण्यात आले एकशेचार लेखकांनी (52 टक्के ) प्रश्नावलीला प्रतिसाद दिला. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी chi-square test सामान्य चाचणीद्वारे करण्यात आले. अभ्यासात लक्षात आले की, सर्वात सर्जनशील लेखक शिक्षण क्षेत्रातील होते. सर्वेक्षणातील बहुसंख्य वापरकर्ते 53.4 टक्के इंडेक्सींग सेवेशी चांगले परिचित होते. त्यांना वाटते की, ग्रंथालयातील संसाधनाचा उत्तम वापर करण्यासाठी जे शिक्षण दिले जाते ते अत्यावश्यक आहे.

Sudha Rani (2014) यांनी त्यांच्या अभ्यासात वर्तमानपत्र वाचण्याच्या सवयीचा अभ्यास केला. त्यानी विक्रमास्मिहा पुरी विद्यापीठ महाविद्यालय (नेल्लोर) ग्रंथालयातील पदव्युत्तर विद्यार्थी वर्तमानपत्र कसे वापरतात याचा अभ्यास केला आहे. सर्वेक्षण पद्धतीचा वापर या अभ्यासासाठी करण्यात आला. उपभोक्त्यांची निवड करण्यासाठी यात फक्त पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला. प्रश्नावलीच्या साहाय्याने माहितीचे संकलन करण्यात आले होते. एकूण 200 प्रश्नावली विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. त्यापैकी 152 प्रश्नावलींना 76 टक्के प्रतिसाद मिळाला. सर्वेक्षण विश्लेषणात दिसून आले की, बहुतांश उपभोक्ते हे दररोज वृत्तपत्रातील बातम्या वाचत आहे. यात दर्शविण्यात आले आहे की, इंग्लिश आणि तेलगु भाषांतील बातम्या उपभोक्त्यांना आवडतात. त्याचबरोबर व्ही. एस. विद्यापीठातील विद्यार्थी रोजगार आणि अध्ययनासाठी हिंदू आणि एकनाडू (Ecnadu) वर्तमानपत्रे वाचतात.

Jeong (2004) यांनी युनायटेड स्टेट्समधील कोरियन पदवीधर विद्यार्थ्यांचे दररोजचे माहिती शोध वर्तन यावर अभ्यास केला आहे. कोरियन विद्यार्थी क्वचितच स्थानिक किंवा राष्ट्रीय पातळीवर वर्तमानपत्राचे वाचन करतात. त्यातील काही दूरदर्शन पाहतात. त्याचा परिणाम असा झाला की, कोरियन विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे कौशल्ये मर्यादित प्रमाणातच राहिले. ते त्यांच्या माहितीच्या गरजांविषयी पारंपारिक समूहातील कोरियन चर्चमध्ये एकत्र येऊन चर्चा एकत्र करतात.

तथापि, इंग्रजी भाषेत, संप्रेषण करण्याची भीती काही कोरियन पदवीधर विद्यार्थ्यांना प्रतिबंधित करते. महत्त्वाची माहिती दररोज जीवनात प्राप्त करण्यासाठी आणि सामाजिक सेवेसंबंधित महत्त्वाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. भाषेतील अडथळादेखील विद्यार्थ्यांना चालू घडामोडीत रस घेण्यापासून परावृत्त करतो.

Dervin (2003) यांच्या मते, ऐतिहासिक व सामाजिक दृष्टिकोनातून अगोदर केलेल्या संशोधनाचे संकलन करण्याची आवश्यकता आहे. अर्थपूर्ण व सामाजिक ऐतिहासिक बाबींचा संदर्भ जोडून अभ्यास करण्याची गरज आहे. यामुळेच प्रश्न सुटू शकतील व प्रश्न न सुटल्यास ते वाढणार तरी नाहीत. त्यांच्या वर्णनाप्रमाणे आपण मानवाचा व उपभोक्त्याच्या अभ्यासाचे आवाहन स्वीकारू शकतो व त्या विचारांशी संलग्न होऊ शकतो. सद्यपरिस्थितीत ते शक्य नाही. कारण आपले वापराचे मार्ग अयोग्य आहेत. त्यामुळे नको असलेल्या एकाच प्रकारच्या माहितीचे डोंगर उभे–आडवे रचले जात आहेत परंतु त्यात समजण्याची खोली नाही. अंततः त्या अभ्यास ग्रंथपाल व प्रणाली संसाधनेच्या सुधारणा व सेवा उपलब्ध करण्याचा हेतू पोषक ठरू शकेल असे सामर्थ्य आहे. (डर्विन यांच्या मते शोध हा अर्थपूर्ण असला पाहिजे) माहिती वापराचा अभ्यासाचा निष्कर्ष हा मध्यस्थांना प्रश्न विचारण्यासाठी आवश्यक आहे, जेणेकरून मानवास किंवा संगणकास सांगड घालता येईल.

Khot and Barve (2010-11) संशोधकाच्या सदरच्या मासिकामध्ये संशोधकाच्या दृष्टीने उपभोक्त्यांचा अभ्यासासंदर्भात हा लेख महत्त्वाचा आहे. ग्रंथालयातील वाचन साहित्याचे व ते प्रदान करीत असलेल्या सेवांचे अचूक नियोजन यासाठी वाचकांचा माहितीविषयक दृष्टिकोन व गरजांचे विश्लेषण व माहिती मिळविण्याचे मार्ग याबाबत माहिती नमूद केली आहे. उपभोक्ता अभ्यास, त्यांचे प्रकार आणि 'युझर स्टडी' व 'युज स्टडी' हे दोन प्रकारचे विचार संशोधकांच्या दृष्टीने उपयुक्त आहेत.

Kumbhar (2015) सदर ग्रंथात लेखकाने वाचनसाहित्याचा आढावा व उपभोक्त्यांचा अभ्यास व संशोधनाबाबत सर्व माहिती विशद केली आहे. संशोधनाच्या संदर्भात वाचनसाहित्याचा अर्थ स्पष्ट केला आहे. तसेच प्राथमिक वाचन साहित्य व द्वितीय वाचन साहित्य या प्रकाराबाबत

माहिती नमूद केली आहे. वाचनसाहित्याचा आढावा घेण्यासाठी कोणकोणती साधने उपयुक्त आहेत याचा संक्षिप्त परिचय दिला आहे. 'उपभोक्ता अभ्यास' याबाबत ग्रंथालयीन उपभोक्त्यांच्या वाचन सवयी, उपभोक्त्यांचे माहितीविषयक वर्तन, ग्रंथालय वापराबाबत अडचणी याबाबत माहिती दिली आहे. अशा वेळी प्रश्नावलीद्वारे केलेला उपभोक्ता–अभ्यास विश्वसनीय ठरु शकतो.

Kumar (2002) सदर ग्रंथाची मांडणी दोन भागात करण्यात आली असून त्यातील दुसऱ्या भागात वाचनसाहित्य संग्रह व वाचक, उपभोक्ता–अभ्यास, उपभोक्ता–प्रशिक्षण या संदर्भात लेखकाने मांडणी केली आहे. वाचनसाहित्य संग्रह करताना निवड पद्धती ही क्रमप्राप्त ठरते. या संग्रहात ग्रंथ, नियतकालिके, सरकारी प्रकाशने, शैक्षणिक प्रबंध, संशोधन अहवाल, परिषद अहवाल, पुस्तिका, दृकश्राव्य साधने इत्यादी मुद्रित व अमुद्रित साधनांची माहिती दिली आहे. वाचनसाहित्य निवडीबाबत तज्ज्ञांची मते नमूद करण्यात आली आहेत. उपयोजक म्हणजेच उपभोक्ता या शब्दाच्या संदर्भात व्याप्ती व भूमिका स्पष्ट केली आहे. उपभोक्त्याच्या प्रकारामध्ये मानसशास्त्रीय निकषानुसार व वर्तनानुसार प्रकार सांगितले आहेत. उपभोक्त्याच्या माहितीविषयक गरजा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. उपभोक्त्यांच्या शिक्षणप्रणालीमध्ये नियोजक, व्यवस्थापक, विषयतज्ज्ञ, शास्त्रज्ञ, संशोधक इत्यादीबद्दलची माहिती नमूद करण्यात आली आहे. थोडक्यात, संशोधकाच्या दृष्टीने ग्रंथालयातील असणारे वाचन साहित्य व उपभोक्त्यांच्या गरजा यांचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

Harvard (2007) याच्या मते, पूर्व साहित्य शोध हा लेखक, संशोधक, तज्ज्ञ त्याचबरोबर तांत्रिक विशेषज्ञ या सर्वांनी त्या त्या विषयात केलेल्या योगदानाचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीने घेतला जातो. एखाद्या विषयात होत गेलेल्या प्रगती आणि विकासाचे कालक्रमानुसार केलेले सादरीकरण म्हणजे साहित्यशोधाचे प्रगटीकरण होय. संशोधकास मार्गदर्शन करताना उद्दिष्ट ठरवून त्यांची रचना करताना, परिकल्पना निश्चित करताना, माहिती जमवताना तसेच माहितीचे विश्लेषण करताना सर्वात जास्त उपयोग हा पूर्व साहित्याच्या शोधाचा होतो.

Khandare (2013) यांच्या संशोधनाची मुख्य उद्दिष्टे व्यवस्थापन संस्थांमध्ये व्यवस्थापन शिक्षणाची वाढ व विकास यांचा अभ्यास करणे, उपभोक्त्यांना व्यवस्थापकीय ग्रंथालयांमध्ये

उपलब्ध असलेल्या सुविधांविषयी जागरुकता जाणण्यासाठी त्यांच्या उपयोगितांचे मूल्यांकन करणे, माहिती स्त्रोताचा अभ्यास करणे, समस्या जाणून घेणे, इंटरनेट ई–संसाधनाचा माहिती शोधावर होणारा परिणाम ही होती. वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले आहे. त्यांनी असे अनुमान काढले की, आयसीटीचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने ग्रंथालयांची स्थिती सुधारतेय. ग्रंथालय व्यावसायिकांच्या कामाचे प्रमाण कमी होते आणि उपभोक्त्यांना चांगली सेवा प्रदान करण्यास मदत होते. आवश्यक संग्रह प्राप्त करण्यासाठी आणि गुणात्मक माहिती सेवा पुरविण्यात मदत करते. त्यांनी म्हटले आहे, भविष्यातील ग्रंथालये डिजिटल सामग्रीच्या जागी आहे आणि सर्व प्रकारच्या ग्रंथालयांना आव्हानांचा सामना करावा लागतो. भारताच्या संदर्भात विशेष ग्रंथालयांनी आणि विद्यापीठ ग्रंथालयांनी विलीन होण्यासाठी तंत्रज्ञान वापरून पुढाकार घेतला आहे. ग्रंथालयांना शिक्षणसंस्थेचे हृदय समजले जाते. संस्थेचा महत्त्वाचा घटक समजला जातो म्हणून शिक्षणसंस्थांना ग्रंथालयावर लक्ष केंद्रीत करावे लागते. त्यांनी अनुमानातून असे मांडले की, इलेक्ट्रॉनिक संसाधन व्यवस्थापन आणि डिजिटल स्त्रोतावर आधारित सेवा नवीन असू शकतात.

### 3.8 माहितीची साधने आणि माहिती शोध वर्तन :

ग्रंथपालांनी ग्रंथालयातील संसाधने कशा प्रकारे शोधली जातात, वापरली जातात याचा आणि संशोधकांनी उपभोक्त्यांच्या गरजा जाणून घेणे आवश्यक आहे. जेणेकरून उपलब्ध साधने व सेवा याबाबत त्याची समाधानाची पातळी निर्धारित करता येऊ शकते. Jackson (2007) यांच्या मते मुद्रित आणि ऑनलाइन संसाधने दोन्ही स्वरूपात माहितीची गरज सिद्ध करू शकतात. विधी ग्रंथपाल विधीशी निगडित शासकीय दस्तऐवज उपलब्ध करून देण्यासाठी फार तत्पर असतात. तरीही उपभोक्त्यांना ग्रंथालयातील साधने पूर्णपणे कशी वापरावीत याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. ती संसाधने वेळोवेळी वाढविणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. Wilkinson (2001) यांच्या मते वकील हे माहिती शोधण्यात व्यस्त नसून ते माहिती उत्पन्न करण्यात जास्त व्यस्त असतात. ते मुद्रित साधनांच्या तुलनेत माहिती तंत्रज्ञानाची साधने कमी वापरतात.

Makri, Blandford and Cox (2008) यांच्या मते, वकिलांसाठी माहिती संकलन अतिशय गरजेचे आहे. त्यांना अनेक समर्पित इलेक्ट्रॉनिक संसाधनांमार्फत माहिती शोधता येते. परंतु माहिती संकलनासाठी सहाय्य करण्यासाठी या संसाधनांची रचना सुधारित करण्यास मोठ्या प्रमाणात वाव आहे. ही रचना सुधारित करण्यासाठीचा एक मार्ग म्हणजे माहिती संकलनाचे नमुन्यांचा वापर सिद्धांतिक काचेचे भिंगाप्रमाणे करून सध्या अस्तित्वात असलेल्या प्रणालीसोबत उपभोक्त्यांच्या वर्तणुकीचे विश्लेषण करणे हा होय. परंतु यात असे नमुने समाविष्ट आहेत, जे शिकाऊ वकिलांनी सुचविलेले आहे. माहिती संकलन मूल्यमापन यासाठी उच्च स्तरावरील निष्कर्ष आणि फक्त  हेच व्यापक व्याप्ती रचना अंतरंग यात पुढाकार घेणार आहेत.

Srivastava (2002) अभ्यासकाने बनारस हिंदू विद्यापीठातील रसायनशास्त्र विषयातील माहिती वापर नमुन्याच्या संदर्भांचा अभ्यास केला. हा नमुना समजून घेण्यासाठी पीएच.डी. विभागातील 74 प्रबंधांच्या 18,364 संदर्भांचे विश्लेषण यात केले. या अभ्यासातून निदर्शनास आले की, संशोधक माहितीचे स्त्रोत म्हणून प्रामुख्याने विषयवार नियतकालिकांवर आणि त्याच्या संबंधित विषयांवर अवलंबून आहेत. बहुतांशी उद्‌धृत केलेली नियतकालिके आणि ग्रंथ ह्यामध्ये अमेरिका, इंग्लंड या परदेशातील इंग्रजी भाषेचा समावेश होता.

Reddy (2010) यांच्या मते, ग्रंथालये संसाधने, उपभोक्ते आणि माहिती व्यवस्थापक परस्परांशी माहितीपूर्ण ज्ञान प्रक्षेपण करतात. तेथे विधीविषयक माहिती अधिग्रहण करता येते, प्रक्रिया करता येते आणि ती विद्यापीठ ग्रंथालयातून वितरित करता येते. ते प्रकर्षाने मांडतात की, ग्रंथपालांना ग्रंथालय संसाधने कशा प्रकारे शोधली जातात, वापरली जातात आणि संशोधकांनी उपभोक्त्यांच्या गरजा जाणून घेणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून उपलब्ध साधने व सेवा याबाबत त्यांची समाधान पातळी निर्धारित करता येईल.

Onwudinjo et. al. (2014) यांनी जे विधीचे पदवीपूर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक आहेत ते विधी ग्रंथालय संग्रह कशा पद्धतीने वापरतात याची तपासणी करण्यात आली. नायजेरियन विद्यापीठात त्यांना निदर्शनास आले की, बहुतांश विधी विद्यार्थ्यांना (75.8 टक्के) ग्रंथालयाचे माहिती स्त्रोत हे अनुकूल असल्याचे उपभोक्त्यांनी निदर्शनास आणले.

Mead and Baird (2003) यांनी कॅन्सस विद्यापीठातील विधी ग्रंथालय संग्रहाचे कोणताही क्रम न ठरविता सर्वेक्षण केले. कॅन्सस येथील विद्यापीठ ग्रंथालयाची इतर विद्यापीठ ग्रंथालयाच्या परिस्थितीसोबत तुलना करण्यात आली. त्यान्वये सामान्य शैक्षणिक ग्रंथालयांप्रमाणेच विधी ग्रंथालयांत त्यांच्यासारखाच कागदाचा ठिसुळपणा आणि आम्लता, विद्रूपता आणि पुस्तक बांधणी स्थिती ढासळणे यात सुधारणा करण्याची गरज आहे किंवा नाही हे तपासले.

Jackson (2007) यांनी सध्या प्राप्त होणाऱ्या माहितीच्या स्त्रोताची ओळख होण्यासाठी हा अभ्यास केला आहे. माहिती शोध वर्तणूक माहितीची आवश्यकता आणि भविष्यात आरोग्याची आणि समाजाची काळजी घेण्यासाठी माहितीची फार आवश्यकता आहे. अभ्यासकाने यात असे गृहीत धरले की मुद्रित आणि ऑनलाइन संसाधने ही दोन्ही स्वरूपात माहितीची गरज सिद्ध करू शकतात.

Street (2010) यांनी त्यांच्या लेखात अधिक व्यवसायभिमुख विधी शिक्षणासाठी शैक्षणिक विधी ग्रंथालये आपली भूमिका कशाप्रकारे निभावू शकतात याचा अभ्यास केलेला आहे. शैक्षणिक आणि व्यावसायिक विधी ग्रंथालयांतील दुय्यम साधने संग्रहासाठीच्या व्यवस्थापन निर्णयाबाबतचा सध्याचा एकंदर कल याची तुलना केलेली आहे. त्यांच्या सर्वेक्षणाचे निकाल यात शैक्षणिक आणि व्यावसायिक विधी ग्रंथपाल हे दोघेही कशा प्रकारे एकत्रितपणे कार्य करून विधी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसायात लागणारे साहित्य कशा प्रकारे सर्वोत्तमरित्या पुरवू शकतात याबाबतच्या शिफारशी केलेल्या आहेत.

Oke - Samuel (2008) म्हणतात, कायद्यात माहिती हे अंत्यत महत्त्वाचे साधन आहे, स्त्रोत आहे, ज्याच्यामुळे वकील आपल्या पक्षकाराची केस कोणत्याही अधिकार क्षेत्रातील न्यायाधीशापुढे नीट मांडून, व्यक्तिवाद करून निर्णय घेण्यास मदत करतात. वकिली व्यवसायात कायद्याची माहिती हे अंत्यत महत्त्वाचे संसाधन आहे. यात विधी विद्यार्थ्यांचादेखील समावेश आहे कारण ते वकिली व्यवसायात पर्दापण करणार असतात. वकील हे समाजाचे अविभाज्य व महत्त्वाचे घटक आहेत. जे सामान्य माणसांना हाताळता येत नाहीत किंवा हाताळायला वेळ नसतो

अशा दैनंदिन विधीविषयक बाबींसाठी आवाज उठविणे, विधीविषयक मुद्द्यांवर विचार मांडणे अशी महत्त्वाची कार्ये वकील करतात. आपल्यालादेखील विधीविषयक कामकाज सांभाळण्यासाठी वकील अतिआवश्यक असतो. त्यामुळे आपण अनावश्यक डोकेदुखीपासून मुक्त राहू शकतो. वकिली व्यवसायाच्या कार्यात विधीविषयक सल्ला देणे हा देखील महत्त्वाचा भाग आहे व त्यासाठी त्यांना विधीविषयक माहिती कोठे उपलब्ध होईल हे जाणणे आवश्यक आहे.

Penttinato (2007) हे असे मांडतात की, शैक्षणिक विधी ग्रंथपाल विधीशी निगडित शासकीय दस्तावेज उपलब्ध करून देण्यासाठी फार तत्पर असतात. त्यामुळे ते समाजात महत्त्वाची भूमिका अदा करतात. ते आदर्श माहीतगार नागरिक घडविण्यासाठी आपले योगदान देत असतात.

Chikonza and Aina (2001) यांनी झिम्बाब्वे विद्यापीठातील पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा आणि ते कोणती माहितीची कोणती साधने वापरतात याचा अभ्यास केला. 120 विद्यार्थ्यांचे त्यांनी सर्वेक्षण केले. त्यांना निदर्शनास आले की, परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी लेखन करण्यासाठी माहिती जमविणे हे त्यांचे प्राथमिक काम असते. माहितीच्या गरजा भागविण्यासाठी ते ग्रंथ, व्हिडीओ, नोट्स आणि इंटरनेट, CD-ROM, डेटाबेस, नियतकालिके या साधनांचा वापर करतात. त्यांनी असा निष्कर्ष काढला की, विद्यार्थी फार कमी प्रमाणात प्रबंध, सूची आणि गोषवारा वापरतात. लेखकांने सुचविले की ग्रंथालयाने स्वयंप्रेरित दृष्टिकोन ठेवून अधिक कर्मचाऱ्यांना नेमून उपभोक्त्यांना ग्रंथालयातील साधने पूर्णपणे कशी वापरावीत यांचे शिक्षण देणे गरजेचे आहे.

Bhardwaj and Madhusudhan (2013) यांच्या लेखात भारतातील विधी समुदायात जी विविध विनामूल्य संसाधने (Open Access Resources) आहेत त्यांचा आढावा यात घेतला आहे. या अभ्यासात असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश प्रतिसादकांना खुली प्रवेश संसाधने माहित होती. ही संसाधने वापरण्यासाठीची प्रमुख कारणे म्हणजे केस लॉ (प्रकरणनिहाय कायदे) शोधणे हे होते. बहुतांश प्रतिसादकांनी असे स्पष्ट केले आहे की, विधीविषयक माहिती संसाधने जी खुल्या प्रवेश प्रणालीत उपलब्ध आहेत ती योग्यपणे ठेवली गेलेली नाहीत आणि त्यामुळे

त्यांच्या वापरात अडथळे येतात.

Das and Maharana (2013) यांनी त्यांच्या लेखात बेरहामपूर विद्यापीठ, बेरहामपूर, ओडिशा येथील विज्ञान संशोधन अध्येते यांच्या इलेक्ट्रॉनिक माहिती संसाधनांबद्दलची जागरूकता आणि त्यांचा वापर करताना भेडसावणाऱ्या समस्या या बाबींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जेणेकरून सर्वेक्षण संशोधन अध्येते यांचे इलेक्ट्रॉनिक माहिती संसाधने यांचे प्रती असलेला प्रभाव आणि वापर–अनुभव तपासता येईल. हा अभ्यास उपभोक्त्यांना भेडसावणाऱ्या समस्या ठळकपणे मांडू इच्छितो आणि त्यातील सुधारणेसाठी काही प्रतिबंधक उपचारात्मक उपाय सुचवितो. एक विशिष्टपणे संरचित प्रश्नावली पूर्णवेळ आणि अर्धवेळ विज्ञान संशोधन अध्येते यांना वितरित करण्यात आली. त्यापैकी अकरा पूर्णवेळ आणि अर्धवेळ संशोधन अध्येते यांनी या सर्वेक्षण कार्यक्रमास प्रतिसाद दिला. या अभ्यासात याची पुष्टी केलेली आहे की विज्ञान संशोधन अध्येते यांना ई–संसाधने त्यांचे प्रकार डेटाबेसेस (ई–लेखसंचय) आणि ई–नियतकालिक प्रकाशने याबाबत माहिती आहे. हा अभ्यास प्रवेश, सुविधा यात सुधारणा सुचवित आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या संशोधनाला साहाय्य करण्यासाठी वेब संसाधने वाढविली पाहिजे हे प्रकर्षाने मांडत आहे.

Singh (2012) या अभ्यासात संपूर्ण कृषी विज्ञान क्षेत्रात कृषी शास्त्रज्ञ वापरत असलेली माहिती साधने यांचे महत्त्व, वारंवारता आणि क्रम तपासला गेला. या अभ्यासात कृषी शास्त्रज्ञांनी वापरलेली प्रमुख साधने, त्यांचा वापर क्रमवारीनुसार पुढीलप्रमाणे होता – डेटाबेसेस, नियतकालिके प्रकाशने, पुस्तके, संशोधन अहवाल, मोनोग्राफ इत्यादी, सहकारी व विशेषज्ञ यांचेसोबत चर्चा–वार्तालाप आणि व्याख्यान, परिसंवाद, चर्चासत्रे ऐकणे व त्यात सहभाग घेणे इत्यादी. ही सुद्धा काही प्रमाणात उपयुक्त माहिती साधने आहेत असे कृषी शास्त्रज्ञ सांगतात. या अभ्यासात हे निदर्शनास आले आहे की, डेटाबेस हे सर्वात जास्त वापरलेले साधन होते. कृषी शास्त्रज्ञ यांना भेडसावणाऱ्या समस्यांसंदर्भात या अभ्यासांत असा तर्क काढलेला आहे की, ग्रंथालय संसाधने यांचा कमाल वापर करण्यासाठी उपभोक्त्यांसाठी नियमित माहिती साक्षरता कार्यक्रम राबविला गेला पाहिजे.

Mallik and Sen (2008) यांचा अभ्यास संसाधने निर्मितीसाठी उपलब्ध मूलभूत माहिती साधने आणि भारतीय शैक्षणिक विधी संस्थातील ग्रंथालये यांची भूमिका यांच्याशी निगडित आहे. छापील/मुद्रित संसाधने विशिष्ट आहेत हे निदर्शनास आले असले तरी ऑनलाइन माहिती साधने गतिशील आहेत, कारण ते अधिक विस्तृत, वैविध्यपूर्ण आणि सविस्तर विधीविषयक माहिती प्रदान करतात. भारतातील वीस शैक्षणिक विधी संस्थांच्या ग्रंथालयांचा वेब पेज आधारित अभ्यासात असे दिसून आले आहे की, निम्म्यापेक्षा जास्त भारतीय शैक्षणिक विधी संस्था यांच्या ऑनलाइन माहिती संसाधनाबाबत कोणतीही माहिती पुरवित नाहीत आणि म्हणूनच हे गृहीत धरले पाहिजे की त्यांच्याकडे कोणतीही ऑनलाइन माहिती संसाधने मुळीच नसावीत. भारतातील वीस शैक्षणिक विधी संस्थांपैकी आठ संस्थांकडील ग्रंथालयांनी ही संसाधने त्यांच्या वेब वर रीतसर परिभाषित केलेली आहेत आणि त्यात विविध ऑनलाइन संसाधने यादी दर्शविली आहे, ज्याला ग्रंथालयातील मुद्रित माहिती संसाधनांवरील अवलंबित्व आता अंकीकृत (डिजिटल) माहिती निर्मितीत बदलले आहे असे समजता येईल.

Dalvi (1989) यांच्या संशोधनाचे उद्दिष्ट माहिती साधनांविषयी उपभोक्त्यांची आवड आणि पसंती याचा शोध घेणे हे होते. माहिती संपादनाच्या प्रक्रियेतील इनव्हिजीबल कॉलेज या संकल्पनेच्या अस्तित्वाचा शोध तालिका आणि ग्रंथालयांतील सूचीसदृश इतर साधनांच्या उपयुक्ततेबद्दल उपभोक्त्याची प्रतिक्रिया जाणून घेणे, माहिती–संपादनात संशोधकांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर ते शोधात असलेले पर्याय संबंधित अभ्यासासाठी उद्धृत केलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती प्रश्नावली हे साधन वापरून मिळविण्यात आली. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण संख्यात्मक आहे. तिचे सादरीकरण गुणात्मक आणि संख्यात्मक असे दोन्ही प्रकारचे आहे.

Kapoor (1990) यांनी नियतकालिकांच्या वापर नमुन्याचा अभ्यास केला. दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिकमधील भूगोल विषयातील रिसर्च स्कॉलर्स या अभ्यासासाठी निवडले होते. पीएच.डी.चे 14 प्रबंध यात अभ्यासले. माहिती संकलनासाठी 18 प्रश्नावलींना प्रतिसाद मिळून त्याचे विश्लेषण केले.

Tilak (2005) यांनी भारतीय वनीकरण शास्त्रज्ञाचा माहिती वापर नमुन्याचा अभ्यास केला. बिब्लोग्राफिक्सची चर्चा करण्यात आली. इंडियन जर्नल फोरेस्टी सायटेशन नमुन्याची चर्चा यात केली आहे. यामध्ये नियतकालिकांचे 60 टक्के संदर्भ, ग्रंथांचे 28 टक्के व 5 टक्के मोनोग्राफचे संदर्भांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. फॉरेस्ट जर्नलचा क्रमांक हा त्यात असलेल्या संदर्भावर आधारित असतो हे जर्नल भारतात तसेच परदेशातही प्रकाशित होते.

Andrew C. (1993) यांनी मांडल्याप्रमाणे विधी साधनांची विभागणी प्रमुख आणि दुय्यम साधने अशी केलेली आहे. प्रमुख साधने म्हणजे कायदे निर्माण करणाऱ्या सक्षम मंडळाकडून निर्माण केलेल्या कायद्यांचे विश्वसनीय म्हणून स्वीकृत नोंदी होय. दुय्यम साधने कायद्यांशी संबंधित असतात. परंतु ते कायद्याचे विश्वसनीय म्हणून स्वीकृत नोंदी नसतात. ते औपचारिक कार्यालयीन प्रकाशन नसतात. इंग्लंड येथील कायद्यात ती प्रमुख साधने आहेत. संसद, न्यायालये आणि युरोपियन समुदाय संसदेने केलेल्या कायद्यांना संसदीय कायदे म्हणतात. कायदे ही माहितीची प्रभावी साधने असतात आणि इतर विधीविषयक साधनांपेक्षा ते श्रेष्ठ असतात. संसद अनेकदा इतर संस्थांना कायदे करण्यासंबंधातील अधिकार प्रदान करत असतात. हे अधिकार विधीविषयक नियम याप्रमाणे तयार केले जातात. दुय्यम कायद्यांचा प्रकार आणि ते साधारणपणे विधीविषयक साधने या अर्थाने प्रकाशित केली जात असतात. यासोबतच सार्वजनिक संस्थांच्या नियमनासाठी संसद मंत्रिस्तरावर अधिकार प्रदान करत असते. संसदीय कायद्यांचे प्रकाशन सार्वजनिक क्षेत्र माहिती कार्यालयाद्वारे केले जाते. सध्या लागू असलेले संसदीय कायदे संबंधातील प्रकाशनांची विस्तृत विषयनिहाय यादी पुरविणे हा त्यांचा हेतू असतो. वकिलांसाठी महत्त्वाचे दुय्यम साधन म्हणजे ग्रंथ, विधीविषयक नियतकालिक आणि समालोचनपर साहित्य हे होय. या अभ्यासात अनेक ठिकाणी आणि अनेक वेळा हॉलसबरी ऑफ इंग्लंड आणि वेल्सचे कायदे या सुप्रसिद्ध समालोचनपर साधनाचा उल्लेख केलेला आहे. वकिलांची माहितीवर आधारित वर्तणूक समजण्यासाठी या प्रकारच्या विधीविषयक साधनांचा अभ्यास करण्यात आला आहे.

Ossai (2011) यांनी त्याच्या अभ्यासात विधी शिकणारे विद्यार्थी माहिती संसाधने यांचा वापर विधी ग्रंथालयात कशा प्रकारे करतात हे तपासले आहे. त्यांनी असे सादर केलेले आहे की, बहुतांश विधी शिकणारे विद्यार्थी यांनी दावा केलेला आहे की, त्यांनी त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाअंतर्गत मोठ्या प्रमाणात ग्रंथालये संसाधने वापरली आहेत. परंतु ओसाई यांच्या अभ्यासाच्या निकालात हे उघड झालेले आहे की, बहुतांश विधी शिकणारे विद्यार्थी यांना प्रकरणनिहाय कायदे, विधिवत कायदे आणि नियतकालिके प्रकाशने याबाबत योग्य आणि अनुरूप ग्रंथालय माहिती साधने शोधणे आणि त्यांची ओळख करणे हे जरा जड जाते अर्थात ते त्यांच्यासाठी कठीण असते. ओसाई नमूद करतात की, विधीचे विद्यार्थी यांना ग्रंथालय सुविधा नियमितपणे आणि वारंवार वापरण्यासाठी मदत करायला हवी. तसेच या बाबीचे समर्थन करायला हवे की विधी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी वर्गात बसून व्याख्याने ऐकण्यापेक्षा जास्त वेळ ग्रंथालयात घालवायला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे ते ग्रंथालये माहिती सुसंवाद तंत्रज्ञाने (ICT) साधने आणि सेवा यांचा अधिकाधिक वापर सुनिश्चितपणे करू शकतील. त्यामुळे त्यांची माहिती सुसंवाद तंत्रज्ञाने (ICT) कौशल्ये सुदृढ होतील आणि ते शोधलेल्या माहितीचा प्रभावी वापर करू शकतील.

## 3.9 डिजिटल युगातील माहिती शोध वर्तन :

ग्रंथालय पारंपरिकरित्या विविध प्रकारचे स्रोत संकलित करीत आहे आणि उपभोक्त्यांना वापरासाठी तयार ठेवले जातात. ज्ञानाच्या परिस्फोटामुळे माहिती संकलनासाठी माहिती निर्मितीसाठी, हाताळण्यासाठी, वापरासाठी गुंतागुंती वाढल्या. आय.सी.टी.च्या प्रभावामुळे तंत्रज्ञान आणि डेटाबेसमधील तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी ग्रंथालयांना भाग पडले आहे. उपभोक्त्यांना सेवा देण्यासाठी प्रभावी तंत्रज्ञानाची गरज भासली आहे.

माहिती साधने इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अधिक आहेत व ती विद्यार्थी वापरतात. ही साधने वापरण्याचे मुख्य कारण ते साहित्य अगोदर लेखकांनी तपासलेले असते. त्यांची योग्यता हाताळलेली असते. इंटरनेट हे शिक्षणासाठी उत्तम साधन आहे. Reach (2000) यांच्या मते, डिजिटल ग्रंथालये दूरचा विचार जास्त करतात आणि वास्तविकतेत कमी असतात.

Thans (2010) त्यांच्या मते, विद्यार्थ्यांना ई–संसाधनाबाबत माहिती नाही. विद्यार्थी छापील माध्यमांपेक्षा इलेक्ट्रॉनिक विधी माहिती स्त्रोत मिळविण्यासाठी अधिक प्राधान्य देतात. त्यांच्या ई–संसाधने वापरण्यासाठीच्या माहिती कौशल्यात सुधारणा होण्यासाठी माहिती साक्षरेतेची गरज आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यास शिकविले जाते परंतु स्वतंत्र विचार करुन संशोधन व व्यावसायिक वकिलांसारखे लेखनाची प्रक्रिया त्यांना शिकविली जात नाही. विधी व्यवसाय करणारे अजूनही कागदी साधनांना प्राधान्य देतात व ते संगणक सेवांवर अविश्वास दाखवितात.

Owoeyes (2011) यांच्या अभ्यासात लागोस राज्यातील माहिती सुसंवाद तंत्रज्ञानाचा अवलंब आणि विविध विधी सल्ला देणाऱ्या संस्था प्रभावी, सुसंगत आणि जलद न्याय व्यवस्थापन यासाठी त्यांचा वापर याबाबतची समर्पकता तपासण्यात आली. येथे विधी व्यवसाय एक आव्हानात्मक बाब आहे. माहितीची जलद पोहोच आणि योग्य ती विधीविषयक माहिती पुन्हा संगणकावर शोधून काढणे यासाठी न्यायाधीश, वकील, संशोधनकर्ते इत्यादींना येणाऱ्या डिजिटल युगात ई–साधनांचा प्रभावी अवलंब करावा लागेल. विधी व्यवसाय संस्थांमध्ये माहिती सुसंवाद तंत्रज्ञानांचा वापर सुनिश्चितपणे करावा लागेल. या अभ्यासाच्या निष्कर्षात हे उघड होते की, लागोस राज्य येथील विधी व्यवसाय संस्थांनी माहिती सुसंवाद तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करण्यासाठी मानवी क्षमता निर्मिती करणे आणि उपभोक्त्यांसाठी शिक्षण कार्यक्रम राबविणे अशी शिफारस हा प्रबंध करतो. लागोस राज्यातील विधी व्यवसाय संस्थेचे प्रमुख यांच्याव्यतिरिक्त राज्याने सुद्धा माहिती सुसंवाद तंत्रज्ञान एकत्रीकरण यात आग्रही व मोलाचा सहभाग घेण्यासाठी आपली गुंतवणूक वाढायला हवी. येथे आय.सी.टी. तंत्राचा अवलंब आणि वापर मोठ्या प्रमाणात वाढविण्यासाठी, प्रोत्साहित करण्यासाठी फेडरल शासनाने पूरक असे प्रोत्साहक वातावरण निर्माण करावयास हवे. प्रभावी आणि स्थिर ऊर्जा (वीज) पुरवठा याव्यतिरिक्त समर्पक माहिती सुसंवाद तंत्रज्ञान धोरणे तयार करावीत.

Michelle's (2011) या अभ्यासात डिजिटल युगात माहिती गोळा करणे आणि जतन करणे या बाबींवर प्रकाश टाकला गेला. कमी अर्थसंकल्प, उपभोक्त्यांच्या वाढत्या गरजा आणि

ग्रंथालयांची मोठी जबाबदारी याबाबतची चेतावणी यामुळे भविष्यातील माहिती सुनिश्चित करतील. या चेतावणीमुळे इतर लोकांनी, जसे गुगलने आपल्या स्वत:च्या उपायांनी ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रथालयांनी जर त्यांना भविष्यातील आपला दर्जा दाखवून देण्यासाठी व त्यांनी डिजिटल संग्रह निर्मितीत सक्रियपणे सहभाग घ्यायला हवा. या लेखात संयुक्त डिजिटल शैक्षणिक विधी ग्रंथालये याबाबतचा दूरदृष्टिकोन असलेला आढावा सादर केलेला आहे. यामुळे उपभोक्ते यांची एकत्रित क्षमता हाताळता येईल. असे असले तरी त्यांना त्यांचा व्यक्तिगत संग्रह वृद्धिंगत करण्याची मोकळीक असेल. डिजिटल उपक्रम सभोवताली असलेल्या समस्या, ज्यात स्वामित्वाधिकार प्रकाशन हक्क समाविष्ट आहेत, यासारख्या ज्वलंत समस्येची ओळख आणि उत्तर शोधते. या सर्व समस्या सोडविल्या जातील असे हा उपक्रम गृहीत धरत नाही. परंतु ही एक एकत्रित कृती आहे. भविष्यातील विधी ग्रंथालयांवरील वायफळ चर्चा थांबवून वास्तवात त्याची निर्मिती सुरू करणे आवश्यक आहे.

Majid and Tan (2002) यांनी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा उपभोक्ता अभ्यास (User Study) करण्यात आला. माहितीच्या गरजा आणि संगणकाच्या साहाय्याने माहिती शोध वर्तन कसे करण्यात आले यासंबंधी नायग टेक्निकल युनिव्हर्सिटी, सिंगापूरमधील विद्यार्थ्यांचा हा अभ्यास करण्यात आला. माहितीची साधने ही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अधिक आहेत व ती विद्यार्थी वापरतात. ही साधने वापरण्याचे मुख्य कारण हे विद्यार्थी सांगतात की ते साहित्य अगोदर लेखकांनी तपासलेले असते, त्यांची योग्यता हाताळलेली असते हे आहे.

Wilson (2006) यांनी माहिती शोध वर्तणूक यासाठी डिजिटल माहितीच्या स्वरूपाचे परीक्षण केले. इलेक्ट्रॉनिक डेटाबेस आणि वर्ल्डवाइड वेब यासंबंधी संशोधकाने वर्तणुकीची रचना पाहिली. माहिती शोध वर्तणुकीसंबंधी विविध नमुन्यांचे सादरीकरण करण्यात आले आणि शोध प्रक्रियेतील अडचणींचा आढावा घेण्यात आला. अभ्यास इलेक्ट्रॉनिक प्रणालीमार्फत शोध वर्तनासंबंधी माहिती/ज्ञान पुरविलेले आहे.

Wiliams, P. (1999) यांनी आपल्या लेखात मांडले आहे की, इंटरनेट हे शिक्षणासाठी उत्तम साधन मानले जाते. त्यासाठी त्यांनी पायलट स्टडी केला. आपल्या लेखात त्यांनी लहान

मुलांचे इंटरनेटवरील शोध वर्तन तपासले. विद्यार्थी जेव्हा ग्रंथालयात इंटरनेटचा वापर करतात तेव्हा ते स्वत:साठी तर करतातच परंतु त्याचवेळी ते ग्रंथालयातील मजकूर आणि ग्राफिक माहितीही शोधतात.

Reach, Whelan and Flood (2003) यांनी डिजिटल ग्रंथालयांची सुसाध्यता आणि व्यवहार्यता यावर हा अभ्यास केला आहे. यासाठी त्यांनी विधी ग्रंथपाल, विधी प्रकाशक आणि वकील यांच्या सर्वेक्षणात प्राप्त झालेली माहिती वापरली. त्यांना खाजगी विधी सल्ला देणाऱ्या संस्था आहेत. त्यांची डिजिटल ग्रंथालयांच्या सध्याच्या स्थितीचा आढावा घेतला आहे. डिजिटल ग्रंथालयांची सुसाध्यता योग्य वाटत असली तरी सर्व तीन सर्वेक्षण गटातील वकील, विधी ग्रंथपाल आणि विधी प्रकाशक यांना हे माध्यम वापरण्यात अडथळे आहेत असे वाटते. विधी प्रकाशक यांचे मुद्रित उत्पादनांशी असलेले गाढ प्रेम प्रकट होते, विधी ग्रंथपालांना असे वाटते की डिजिटल सामुग्री महाग आहे आणि वकिलांना वाटते की ते हळुवारपणे शुल्कआधारित ऑनलाइन संशोधनाकडे वाटचाल करत आहेत. तरीही त्याचे मुद्रित संसाधनांबरोबर जवळचे नाते आहे. त्यांना ती आवडतात. विधीविषयक सल्ला देणाऱ्या संस्थांचे संग्रह येथे सांघिक प्रकरणनिहाय कायदे, कायदे आणि नियमावली हे संपूर्णपणे डिजिटल असू शकतात. परंतु व्यवसाय विशिष्ट संसाधने, राज्यासंबंधी संसाधने, आंतरराष्ट्रीय करार यांची डिजिटल विश्वात व्यवहार्यता आणण्यासाठी अजून प्रयत्नांची आवश्यकता आहे. डिजिटल ग्रंथालये दूरदृष्टीपर विचारात जास्त आणि वास्तविकतेत कमी अशी स्थिती आहे.

Bravy and Feather (2001) यांनी 'इंटरनेट आणि डिजिटल उत्पादने यांचा ग्रंथालयावर प्रभाव' या विषयावर विस्तृतपणे चर्चा केली आहे. परंतु काही अभ्यासात संख्यात्मक माहिती सादरीकरण केलेले आहे, जे दर्शविते की अशा उत्पादनांचा प्रभाव ग्रंथालय वापरपद्धतीवर आहे. प्रस्तुत अभ्यासकाने एका विधी ग्रंथालयातील गेल्या दहा वर्षाची पारंपरिक ग्रंथालय वापर माहिती यावर एक प्रकरण सादर केलेले आहे आणि सांख्यिकीचा प्रभाव परिणाम यावर चर्चा केलेली आहे.

Justiss (2003) यांनी त्यांच्या सर्वेक्षणात राज्यातील विधी महाविद्यालय ग्रंथालयात शुल्कआधारित वेब वर्गणी सदस्यत्वाची वाढती संख्या आणि त्याचा प्रभाव याबाबत वर्णन केलेले

आहे. या प्रकारच्या वर्गणी सदस्यतासाठीचे निकष विधी शाळा क्रमवारी आणि विधी आकार हे होते. त्यांनी निकालात स्पष्टपणे दर्शविलेले आहे की, वेब वर्गणी सदस्यता जरी सर्वव्यापी नाही तरी आता अनेक विधी महाविद्यालय ग्रंथालयांचा ती अतूट भाग आहेत. किमान सर्वेक्षणाला प्रतिसाद देणाऱ्या निम्म्या महाविद्यालयांनी बावन्न शीर्षकांपैकी पंधरा शीर्षकांचे वर्गणी सदस्यत्व घेतले होते आणि यादीवरील फक्त तीन शीर्षकांना कोणत्याही प्रकारे सदस्यत्व प्राप्त झाले नव्हते.

Santhi and Radhakrishnan (2014) यांनी अण्णा युनिव्हर्सिटीला संलग्न असलेल्या अभियांत्रिकी संस्थेतील संशोधन विद्‌वानांचा इलेक्ट्रॉनिक संसाधने वापरण्याचा शोध अभ्यास केला. माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करून संशोधन विद्वानांकडून माहितीचे संकलन करून विश्लेषणासाठी एस.पी.एस.एस. सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला व गृहीतके सिद्ध केली. सांथी व राधाकृष्णन यांच्या निदर्शनास आले की, विविध वयोगटांतील संशोधकांमध्ये इलेक्ट्रॉनिक संसाधनाचा वापर करताना फरक दिसून येतो. अभ्यासात निष्कर्ष काढण्यात आला की ग्रंथालय वेब पृष्ठांशी पाठ्यक्रम आधारित दुवा साधला जावा. त्यामुळे संसाधनाचा सहज आणि प्रभावीपणे वापर संशोधन विद्वानांना करता येईल.

Kumar and Kaur (2004) यांनी त्यांच्या लेखात शहीद भगत सिंग अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी यांचा इंटरनेट–वापर याचा अभ्यास केला. या अभ्यासात इंटरनेट वापराचे विविध पैलू जसे इंटरनेट वापर वारंवारता, इंटरनेट कौशल्य शिकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती, इंटरनेट वापराचे प्रयोजन, इंटरनेटवर माहिती वाचण्याच्या पद्धती इंटरनेटचे नकारात्मक आणि सकारात्मक पैलू उपभोक्त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि महाविद्यालयात पुरविली गेलेली इंटरनेट सुविधा याबाबत उपभोक्त्यांची समाधान पातळी या सर्व बाबींवर प्रकर्षाने लिखाण केलेले आहे. या लेखामध्ये अगदी प्रात्यक्षिक स्वरूपातील माहिती पुरविली आहे.

Devendra and Khaiser's (2014) यांच्या संशोधन अहवालात दक्षिण भारतातील विधी विद्यापीठ ग्रंथालयातील माहिती तंत्रज्ञानाचा वापर विस्तृतपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधनासाठी माहितीचा संग्रह करण्यासाठी सर्वेक्षण या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

सर्व सहा विधी विद्यापीठ ग्रंथालय यांना समाविष्ट करण्याचा मानस असल्यामुळे कोणतेही नमुने वाटप पद्धती वापरलेली नाही. अभ्यासात निदर्शनास आले आहे की, वाय फाय इंटरनेट सुविधा फक्त चार विधी विद्यापीठ ग्रंथालयात उपलब्ध होती – NISIU, KSLU, NUALS, NALSAR होय. सन 1996 च्या सुमारास LISIU ग्रंथालयाने आपला संग्रह सर्वात प्रथम संपूर्णपणे संगणकीकृत केला. त्यानंतर NALSAR (2005), NUALS (2009) व उर्वरित KSLU, TNALU, DSNLU या तीन विद्यापीठांनी संगणकीकरणाचे काम 2012 मध्ये पूर्ण केले. अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व ग्रंथालयात वितरण प्रणाली आणि ऑनलाइन सार्वजनिक प्रवेश याद्या कॅटलॉग (OPAC) शोध सुविधा उपलब्ध होती. तसेच वेब OPAC सुविधा फक्त चार ग्रंथालयांत उपलब्ध होती. ती ग्रंथालये KSLU, TNALU, NALSAR होय.

Ranganadham and Surenda Babu (2012) यांनी त्याच्या लेखामध्ये डिजिटल युगामध्ये माहिती आपली भूमिका कशा प्रकारे बजाविते याबाबत आढावा घेण्यात आला आहे. प्रगत तंत्रज्ञान आणि उपभोक्ते यांच्या बदलत्या माहितीच्या गरजा यामुळे हे शक्य झालेले आहे. तंत्रज्ञानाने मानवी कार्याच्या प्रत्येक क्षेत्रात आपला दबदबा कायम केलेला आहे. ग्रंथालये त्याला अपवाद नाहीत. नवीन संचय संग्रह माध्यम यांचा उगम झालेला आहे आणि त्यांनी आपली जागा आधुनिक ग्रंथालयात कायम केलेली आहे. माहिती संचय–संग्रह (Storage Media) आणि वितरण महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. सदर अभ्यासात उस्मानिया विद्यापीठ येथील विद्यार्थ्यांची जागरुकता आणि ग्रंथालये माहिती संसाधने आणि सेवांचा वापर याचा शोध घेण्यात आला आहे. या अभ्यासासाठी माहितीचे संकलन प्रश्नावलीतून करण्यात आले. अंतिम निकालात ग्रंथालये संसाधने यांची पुरेपूरता, ई–संसाधने विरुद्ध मुद्रित साधने याबाबत मते, ई–संसाधन वापरण्यासाठीची कारणे माहितीची साधने यासाठी तरतूद यावर उपभोक्त्यांचे समाधान यावरील बाबींवर प्रकाश टाकला आहे. सदर अभ्यासात शिफारशी केलेल्या आहेत की अहवाल, प्रबंधलेखन यांचा संग्रह सुधारित करावा आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. त्यांची मते मागवावी आणि विद्यापीठ ग्रंथालयात ई–संसाधने यांची उपलब्धता आणि वापर याबाबत जागरुकता निर्माण करायला हवी.

Rai (2013) यांच्या अभ्यासाचे प्रयोजन डिजिटल युगात शैक्षणिक विधी ग्रंथालय उपभोक्त्यांची माहिती शोध वर्तणूक तपासणे हे होते. विधी संशोधकांच्या मूलभूत संशोधन सवयी, डिजिटल विधी ग्रंथालये वापरताना येणाऱ्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. विधी संशोधक यांना अनेक वेळा विविध गुंतागुंतीचे दस्तावेज मसुदे तयार करावे लागतात. समुपदेशन करावे लागते, प्रतिनिधित्व करावे लागते आणि माहिती गरजा भागविण्यासाठी बऱ्याच प्रमाणात समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. अचूक माहिती वेळेत प्राप्त करणे हे संशोधकाच्या कामगिरीसाठी प्रमुख घटक असते. ग्रंथपालांची संशोधकाच्या विषयाची समज हा संग्रहनिर्मिती, संशोधन प्रशिक्षण आणि संदर्भ सेवा याद्वारे संशोधन अध्ययनासाठी सहाय्य करण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे. माहिती सुसंवाद तंत्रज्ञान यांचा संशोधन साधने म्हणून वापर केल्याने विधी साहित्य संकलन आणि संग्रहण करण्यासाठीच्या मूलभूत समस्या दूर झालेल्या आहेत.

Gopabandhu et. al. (2013) यांच्या अभ्यासात उत्कल विद्यापीठ आणि संभलपूर विद्यापीठ येथील संशोधन अध्येते यांनी वापरलेल्या ई–संसाधनांचा आढावा घेण्यात आला. ई–संसाधने वापर पातळी तसेच इतर घटक जे त्याच्या वापरासाठी योगदान देतात त्याबाबत मूलभूत माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने या सर्वेक्षणाची रचना केलेली आहे. एक विशिष्टपणे संरचित प्रश्नावली संशोधन अध्येते यांच्यासाठी वितरित करण्यात आली, जेणेकरून आवश्यक प्राथमिक माहिती संकलन करता येईल व यासाठी अभ्यासाचे ध्येय जोपासता येईल. त्या अभ्यासाचे निष्कर्ष स्पष्टपणे निर्देशित करतात की, दोन्ही विद्यापीठांतील 60 टक्के पेक्षा जास्त संशोधक आठवडा आधारावर संशोधन प्रयोजनार्थ ई–संसाधने वापरत आहेत. बहुतांश संशोधक त्यांच्या विभागीय प्रयोगशाळेत ई–संसाधने वापरत आहेत. संशोधन अध्येते ई–नियतकालिके प्रकाशने शोधण्यासाठी सूचक अर्धवट शब्द (की–वर्ड) शोध पद्धती अतिशय लोकप्रिय आहे. परंतु असे लक्षात आले आहे की, इंटरनेटची संथ गती ही एक प्रमुख समस्या आहे. ज्यामुळे उपभोक्ते ई–संसाधने वापर करताना हताश होत असतात.

Thanuskodi (2010) या अभ्यासामध्ये हे निदर्शनास आले की, माहिती शोध वर्तणूक यासाठी उपभोक्त्यांचे पुरेसे ज्ञान ग्रंथालय संग्रह, सेवा आणि सुविधा निर्मितीसाठी महत्त्वाचे आहे.

जेणेकरून त्यांच्या माहितीच्या गरजा प्रभावीपणे भागविल्या जाईल. या अभ्यासाचे प्रयोजन मद्रास उच्च न्यायालय येथील कनिष्ठ वकिलांच्या वापरातील माहिती माध्यमांचे परीक्षण करणे हे होते. माहितीचे संकलन करण्यासाठी एक प्रश्नावली मद्रास उच्च न्यायालय येथील 1000 वकिलांना वितरित करण्यात आली आणि 610 लोकांनी प्रश्नावलीला प्रतिसाद दिला. अर्थात प्रतिसाद दर 61 टक्के होता. असे लक्षात आलेले आहे की, बहुतांश कनिष्ठ वकील प्रतिसादक (40.60 टक्के) ग्रंथालयांना आठवड्यातून तीन वेळा भेट देतात. सर्व विधी माहिती नेटवर्क आणि शुल्क आधारित ई–संसाधने या बाबींवर कनिष्ठ वकील प्रतिसादकांचे एकंदरीत समाधान पाचव्या स्थानावर होते. कनिष्ठ वकील प्रतिसादक ई–संसाधने वापरताना येणाऱ्या एकंदरीत समस्या या बाबीवर प्रथम स्थानावर होते. लेखकाच्या सध्या चालू असलेल्या कार्याबाबत ज्यात जिल्हा न्यायालयातील विधी व्यावसायिक माहिती वापररचना, नमुने तपासणी समाविष्ठ आहे, याबाबत अभ्यासवर्णन करत आहे. या अभ्यासाचे निकाल असे दर्शवितात की, व्यावसायिक साधनांकरिता वकील आपल्या माहिती गरजा भागविण्यासाठी विविध प्रकारची माहिती साधने वापरत होते. इतर माहिती पुरवठादार साधने आणि संस्था यांचा वापर करण्यापूर्वी प्रतिसादक आपली व्यक्तिगत ग्रंथालये वापरत होते. तेव्हा माहिती शोध घेणे त्यांना अनेक वेळा कठीण जात होते. सध्याच्या अभ्यासात हे निदर्शनास आलेले आहे की, बहुतांश प्रतिसादकांना ई–संसाधनांबाबत माहिती नाही. एकंदरीत प्रतिसादकांना त्यांच्या माहिती गरजा प्रभावीपणे भागविण्यासाठी जिल्हा बार ग्रंथालये संग्रह सेवा आणि सुविधा पुरेशा वाटत होत्या.

Raza et. al. (2006) यांनी अलिगड मुस्लीम विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक जर्नल्सचा वापर संशोधक कसे करतात यांची तपासणी केली. लेखकांच्या अभ्यासाचा उद्देश सफल होण्यासाठी पुढील बाबींची पडताळणी केली – जसे, इलेक्ट्रॉनिक माहितीचा वापराचे ठिकाण, त्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, माहितीच्या कोणत्या स्त्रोतांना प्राधान्य दिले जाते तसेच ई–जर्नल्सची परिणामकारकता या बाबींचा अभ्यास करण्यात आला. 52 संशोधकांनी सर्वेक्षणाला प्रतिसाद दिला. या अभ्यासातून निदर्शनास आले की, संशोधक हे इलेक्ट्रॉनिक जर्नल्सचा वापर त्याच्या संशोधनाचा हेतू साध्य करण्यासाठी आणि त्याच्या ज्ञानात अद्ययावतता आणण्यासाठी

करतात. सदर अभ्यासातील संशोधक त्याच्या विषयातील इलेक्ट्रॉनिक जर्नल्सच्या उपलब्धतेविषयी समाधानी आहेत. त्यांनी स्पष्ट केले की इलेक्ट्रॉनिक जर्नल्स हे पारंपारिक प्रिंट स्वरूपातील जर्नल्सची जागा घेणार नाहीत.

Sharma (2008) यांनी एक सामाईक डिजिटल गेटवे पोर्टलच्या डिझाइनची कल्पना मांडली आहे. सर्वसामान्य डिजिटल गेटवे पोर्टलचा आराखडा एकत्रितरित्या तयार करून सर्वांनी त्याचा वापर करणे सर्वांसाठी बंधनकारक करणे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये आधुनिक ग्रंथालयामध्ये छापील ग्रंथ, नियतकालिके आणि इलेक्ट्रॉनिक संसाधनाचे खूप ढीग आहेत. संसाधनाचा संग्रह करून प्रतिप्राप्ती आणि वितरण उपभोक्त्यांना हवे तेव्हा करणे आवश्यक आहे.

Das and Jadab (2016) ढाका विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या डिजिटल युगामध्ये माहिती शोध वर्तनाचा अभ्यास हा संशोधनाचा उद्देश होता. डिजिटल युगातील माहिती साधने विद्यार्थ्यांना कशी प्रभावित करतात, याचे परीक्षण करणे हे देखील या अभ्यासाचे उद्दिष्ट होते. विधी माहिती इलेक्ट्रॉनिक माध्यमातून शोधताना त्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते. सर्वेक्षण पद्धतीतून प्रश्नावलीच्या माध्यमातून यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर माहिती गोळा करण्यासाठी केला होता. या सर्वेक्षणाचे निकष अधोरेखित करतात की, विद्यार्थी छापील माध्यमापेक्षा इलेक्ट्रॉनिक विधी माहिती स्त्रोतांना मिळविण्यासाठी अधिक प्राधान्य देतात. ई–संसाधने वापरताना त्यांना त्यासाठी माहितीचे कोणते घटक प्रभावी वाटतात, त्याची ओळख या अभ्यासात होते. इलेक्ट्रॉनिक विधी माहिती स्त्रोत आणि सेवासंबंधित महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या आहेत. बहुतांश विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक माहिती कौशल्यात सुधारणा होण्यासाठी माहिती साक्षरता प्रशिक्षणाची गरज असल्याचे नमूद केले आहे.

Oulanov and Pajarillo (2003) यांनी लेक्सिस नेक्सिसबाबत परीक्षण/आकलन अभ्यास केलेला आहे. त्यांनी रचनात्मक प्रश्नावलीचा वापर केला, जी न्यूयॉर्क शहरातील क्वीनस्बोरोध कम्युनिटी कॉलेजमधील आठ अभ्यासू ग्रंथपालांना पुरविली गेली होती. लेखकांनी प्रश्नावलीची प्रत पुरविली नव्हती तर त्यात तक्ते समाविष्ट केले होते. प्रश्नावली लाईकर्ट ग्रेडींग (Likert scale) मोजमापावरील पाच बिंदूंवर आधारित होती. साधनांच्या तीन बाबींबद्दल

ग्रंथपालांचे आकलन शोधण्याचा त्यांचा हेतू होता. लेक्सिस नेक्सिस प्रणालीच्या आतील भागात संग्रह वैशिष्ट्यांबाबत ग्रंथपालांना प्रश्न विचारले गेले, जेणेकरून साधनांचा अग्रक्रम ठरविला जाऊ शकतो. त्यात प्रणालीच्या आतील भागात संग्रहातून माहिती पुढे आणण्यासाठी बुलियन तंत्र, शंका यांचा समावेश आहे. लेक्सिस नेक्सिसच्या कार्यक्षमतेबाबत ग्रंथपालांना प्रश्न विचारून त्याबाबत समर्पकता, आठवण, आणि अचूकपणा जाणून घेतला आणि प्रयत्न याबाबत ग्रंथपालांना प्रश्न विचारून प्रणाली–वापरातील सोपेपणा, प्रणाली–अध्ययनातील सोपेपणा आणि प्रशिक्षणाची गरज याबाबत अग्रक्रम ठरविण्यासाठी सांगितले गेले. लेखकांनी असा निष्कर्ष काढला की, लेक्सिस नेक्सिस सर्व विचारलेल्या प्रश्नांवर खरी उतरली. परंतु प्रशिक्षणाची गरज या प्रश्नावर त्यांना अपवादात्मक कमी श्रेणी मिळाल्या (यातून असा संदर्भ निघतो की किती ग्रंथपाल यावर विश्वास ठेवतात की लेक्सिस नेक्सिस या साधनांच्या वापरासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे.) ओचुलानोव आणि पाजारो यांनी लेक्सिस नेक्सिस या प्रणालीबाबत प्रश्न विस्तृतपणे स्पष्ट केलेले नाहीत आणि फक्त आठ ग्रंथपाल या छोट्या नमुन्याचा त्यांनी अभ्यासासाठी वापर केला. त्याबरोबर असे पुढे येते की लेक्सिस नेक्सिसबाबत फक्त ग्रंथपालांना प्रश्न विचारून विश्वासपात्र निकाल मिळू शकेल असे होत नाही. कारण ग्रंथपालांकडे माहिती वापरण्याचे खूप कौशल्य असतात आणि इलेक्ट्रॉनिक साधनांच्या वापरासाठी त्यांनी विशिष्ट प्रशिक्षण घेतलेले असते. या अभ्यासाबाबत असे म्हणता येईल की अधिक खोलात जाऊन अभ्यास केलेला नाही.

Martchionini, Dwiggins, Katz and Lin (1993) यांनी इलेक्ट्रॉनिक विधी संशोधनाचे प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे अभ्यास केला त्यांनी त्या क्षेत्रातील ज्ञानाची भूमिका व शोध करण्याचे वैशिष्ट्य यांचा परस्परांशी असलेला संबंध पाहून पूर्णलिखित विधी सीडी–रॉम, डेटाबेसशी जोडला. त्यासाठी स्पष्ट बोलून दाखविलेल्या विचारांचे, मुलाखतींचे, निरीक्षणाचे, दस्तऐवजांचे व इतर स्रोत उपलब्ध करून देणाऱ्या माहितीचा आधार घेण्यात आला. त्यांच्या लक्षात आले की, कोणत्याही क्षेत्रातील विधी विशेषज्ञांचे ध्येय स्त्रोतांचा अभ्यास करणे, मजकूर व उत्तर शोधणे असा असतो. ते प्रश्न व त्याचे विधान यावर विचलित होत नाहीत. त्याउलट नाविन्याचा शोध घेणे हे त्यांचे ध्येय असते. त्यांचे लक्ष गृहीत गोष्टीच्या समावेश कृतीवर व तंत्रांवर केद्रिंत असते.

जेणेकरून प्रश्नांची उत्तरे मिळतील. त्यांना हे समजले की गृहीत गोष्टीच्या (database) मध्ये काल्पनिक व कृती या दोघांचाही समावेश आहे.

एक जीवनातील दिवस या गुणधर्मासंबंधी अभ्यास करणाऱ्या संशोधनात Thomson West Corporation (2007) च्या लक्षात आले की, विधी व्यावसायिक कार्यालयामध्ये नवीन सहकार्याला 80 टक्के वेळ हा संशोधनात कायद्याचे मसुदे तयार करण्यात, दस्तऐवज बनविण्यात घालवावा लागतो. त्याला जे अपेक्षित काम असते त्या कामाची विभागणी केल्यास 45 टक्के संशोधनात तर 35 टक्के वेळ त्याचा लेखनात जातो. याचा अर्थ नवीन सहकाऱ्यांना विधी विद्यालयात विधी मंडळांची (Bar) परीक्षा उत्तीर्ण होण्यास शिकविले जाते परंतु स्वतंत्र विचार करून संशोधन व व्यावसायिक वकिलांसारखे लेखनाची प्रक्रिया शिकवली जात नाही त्यामुळे त्यांना हे कार्य कठीण जाते.

वकिलांना उपलब्ध विधी संसाधने याबाबत मूलभूत माहितीचा अभ्यासससुद्धा महत्त्वाचा आहे. लेक्सिस नेक्सिस, बटरवर्थ आणि वेस्ट लॉ या सर्वोत्कृष्ट अशी ख्यातीप्राप्त आणि सर्वात मोठी दोन डिजिटल विधी ग्रंथालये आहेत. या दोन संसाधनात वेगवेगळ्या प्रकारची विधी साधने असली तरी Norman (2004) यांनी मांडल्याप्रमाणे लेक्सिस नेक्सिस आणि वेस्ट लॉ या दोहोंची मालकी बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे आहे आणि त्यामुळे एक दुसऱ्यांकडे असलेल्या हक्कांची साधने त्यांनी काढून टाकलेली आहेत. साधनांना वापरण्याचा अधिकार यामुळे कोणती साधने वापरायची त्यांचातसुद्धा या दोन्ही इलेक्ट्रॉनिक साधनात काहीसे मतभेद आहेत. लेक्सिस नेक्सिस वर्थस यांचेकडे वेस्ट लॉ यांचेपेक्षा जास्त असूचित युके प्रकरणांबाबत माहिती व माहितीचा वापर पाहायला मिळतो. साधारणपणे या दोन्ही संसाधनांकडे सारखे साहित्य आहे. दोन्ही साधनांची नवीन आवृत्ती जनतेसाठी खुली करण्यात आली. याशिवाय लेक्सिस नेक्सिस समूहाने लेक्सिस नेक्सिस प्रोफेशनल याला कालबाह्य म्हणून बंद करण्याचे काम हाती घेतले. परंतु दोन्ही अभ्यासासाठी आणि प्रात्यक्षिकासाठी वेगवेगळी व्यावसायिक दालने म्हणून उपलब्ध होती. तेथे अनेक छोट्या डिजिटल ग्रंथालयांच्या संख्या आहेत जसे जस्टीस, लॉटेलर अनेक विधी साधनांच्या वापरांसाठीची मुभा देतात. वकिलांसाठी इतर इलेक्ट्रॉनिक संसाधनेसुद्धा उपलब्ध आहेत आणि काही विशिष्ट हेतुंसाठी साहित्य उपलब्ध आहे. हीन ऑनलाइन डिजिटल ग्रंथालय

जुन्या काळातील नियतकालिकांच्या वापराची मुभा देते. जे कदाचित लेक्सिस नेक्सिस बटरवर्थस आणि वेस्टलॉ येथे उपलब्ध असतील आणि इतरत्र डिजिटल ग्रंथालये कायद्याच्या एखाद्या विशिष्ट भागासाठी सुविधा पुरवितात.

Marki (2006) यांनी माहिती वापर प्रणाली संशोधनाचे डिजिटल ग्रंथालयात व इलेक्ट्रॉनिक संसाधने कसे आधार देईल ते अभ्यासले. त्यांनी संशोधनाची प्रगती ही वातावारण व त्यात कौशल्याने संशोधन करण्याची प्रक्रिया ही एकमेकांवर अवलंबून आहे हे दर्शवले आहे. डिजिटल ग्रंथालयासंबंधी असणारी गरज पुढे जाऊन उपयोग करण्याचा उद्देश लक्षात घेऊनच त्यांची रचना केली जाईल आणि त्या कारणास्तव डिजिटल ग्रंथालयाचे सामर्थ्यही वाढेल. मार्की यांच्या हेही लक्षात आले की, विद्यार्थ्यांना लेक्सिस नेक्सिस व वेस्ट लॉ हे दोन्ही डेटाबेसेस वापरण्यास अडचणींना सामोरे जावे लागते. त्याचे कारण त्यांना संगणकाच्या मुख्य भूमिका व डेटाबेसेसची कल्पना नसते. विद्यार्थ्यांची ही प्रवृत्ती एका किंवा दुसऱ्या प्रणालीला प्राधान्य देण्याची होती व त्यांना सोयीस्कर वाटणाऱ्या प्रणालींचा ते उपयोग करीत होते.

Elliot and Kling (1996-1997) यांनी निरनिराळ्या संस्थांसाठी डिजिटल विधी ग्रंथालये प्रभावी आहेत, हे जाणून घेण्यासाठी 1990 च्या सुरुवातीला डिजिटल ग्रंथालयाचा उपयोग यावर वर्णनात्मक अभ्यास हाती घेतला. त्या काळात इलेक्ट्रॉनिक विधी साधनांचे महत्त्व नियमितपणे वाढत होते. त्यांनी कॅलिफोर्निया वरिष्ठ न्यायालय प्रणाली येथील एकूण 46 विधी क्षेत्रातील व्यावसायिकांच्या मुलाखती घेतल्या. त्यात न्यायाधीश, वकील, सरकारी वकील आणि गुन्हा बचाव वकील यांचा समावेश करण्यात आला होता. बहुतांश सहभागी मुलाखतदार लेक्सिस नेक्सिस किंवा वेस्ट लॉ अथवा दोन्ही साहित्य वापर होते. अरचनात्मक मुलाखतीत वकिलांची साधारण कामे, त्यांचा साधारण संगणक वापर, त्यांचा डिजिटल ग्रंथालयाचा वापर यासारख्या प्रश्नांचा समावेश होता. त्यांना त्यातून असे आढळले की, विविध स्तरांवरील विधी व्यावसायिक यांचे कार्य त्यांच्या डिजिटल ग्रंथालय प्रणालींचा वापर यामुळे प्रभावित होते. वरिष्ठ स्तरावरील न्यायाधीशांना केव्हाही लेक्सिस नेक्सिस वापराची मुभा होती, शिवाय ते आपल्या घरूनसुद्धा मोडेम वापरून संदर्भ तपासू शकत होते. इलियट आणि क्लिंग यांच्या असे निदर्शनास आले की,

काही विधी व्यावसायिक अजूनही कागदी साधनांना प्राधान्य देत होते. त्यातील काहींनी संगणकाच्या उपयोगाचे समर्थन केले तर काहींनी त्यावर अविश्वास दाखविला.

Kadli and Hanchinal (2015) यांनी मुंबई शहरातील दोन विधी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे माहिती शोध व शोध वर्तन अभ्यासले.त्यांना निदर्शनास आले की विद्यार्थी ऑनलाइन आणि ऑफलाइन विधी डेटाबेसच्या वापराबरोबरच मोठ्या प्रमाणावर ग्रंथांवर अवलंबून आहेत आणि या अवलंबित्वाचा दर उच्च आहे. असे निदर्शनास आले की, ई–मेल हे सर्वात जास्त लोकप्रिय इंटरनेट साधन आहे.तसेच विनामूल्य डेटाबेसबाबत माहिती त्यांना प्राध्यापक,सहकारी यांच्याकडून तसेच ग्रंथालयाची वेबसाइट, ग्रंथालय ब्लॉगवरून समजते. त्यासंबंधी ते जागरूक आहेत.

Marshal et. al. (2001) यांनी वार्षिक विधी विद्यालय विवाद्य न्यायालय स्पर्धेत (Law School Moot Court competition) स्पर्धकांचा अभ्यास केला. इलेक्ट्रॉनिक ग्रंथांच्या प्रणालीच्या उद्देशाने त्यांनी आढावा घेतला. रचनात्मक मुलाखती घेण्यात आल्या. विद्यार्थी व प्राध्यापकांचा एकमेकांशी संपर्क, संगणकाद्वारे भेट व प्रत्यक्ष लेखनासाठी व संशोधनासाठी भेट, वर्गातील उपस्थिती इत्यादी बाबींचा यात समावेश होता. मार्शल यांनी निरीक्षण हे सर्वसाधारणपणे स्पर्धकांच्या कार्यस्थळांत केले. त्यांना (Moot Court competition) स्पर्धकांच्या संशोधनात चार प्रवृत्ती आढळल्या. ग्रंथाचे अधिकारयुक्त महत्त्व, संशोधनाचे डावपेच कौशल्य जे एकमेकांवर आधारलेले आहे. इलेक्ट्रॉनिक संशोधनाचा उपयोग हा केसच्या मूल्यमापनासाठी अधिक गुणकारी वाटला व छापील माहिती स्त्रोतांचा व इलेक्ट्रॉनिक स्त्रोतांचा वापर आलटून–पालटून केलेला जाणवला. विद्यार्थ्यांमध्ये ही प्रवृत्ती दिसली की ते आधीच्या निर्णायक केसेसचा उल्लेख करीत होते ज्यात विषय सारखे होते. पूर्ण पुस्तकांचा संशोधन करून सारख्या केसचा संदर्भ कोठे गवसतो का ते पाहून त्यांना वेळ असल्यास सध्याच्या निर्णायक केसेसचा गोषवारा पाहात होते. विद्यार्थी छापील व ऑनलाइन संशोधनाचा वापर करतात. विद्यालयामध्ये, संस्थांमध्ये अशी संसाधने ठेवणे आवश्यक आहे. जसे प्रबंध, विधी ग्रंथ, मासिके विधी ग्रंथालयातून उपलब्ध करून द्यावीत अथवा विद्यार्थ्यांच्या संग्रहात अशा संसाधनाचा/संदर्भाचा समावेश असावा.

विद्यार्थ्यांनी स्पष्ट शब्दात त्यांच्या महत्त्वाच्या मुद्यांसंबंधीचे डावपेच सांगितले. या

महत्त्वाच्या मुद्द्यांवर भर देण्यामुळे व टिप्पणीमुळे विधीविषयक निकालात कोणत्या मुद्द्यांवर विधीविषयक विवेचन केले आहे व मुकदम्यांत कोणते मुद्दे उचलून धरले आहेत हे स्पष्ट होते. त्या निश्चयातून कायद्याचे काही पैलू स्पष्ट होतात. विद्यार्थी केव्हा केव्हा टीपा भाष्य लिहितात. त्यांत मुकदम्याची वैशिष्ट्ये असतात. पुढे आणखी साहित्य वाचून त्यात सुधारणा करतात/भर घालतात, टीका टिप्पणी करतात. त्यांना रंगाने निदर्शित करतात. वकिली व्यवसायात या पद्धतीचा सगळ्यात जास्त वापर केला जातो अशा रंगरेखाटनाच्या रचनात्मक विवेचनाला या व्यवसायात फार महत्त्व आहे.

Srivastav and Tiwari (2016) यांनी कायद्याच्या संस्थामध्ये उपभोक्त्यांना ग्रंथालय व्यावसायिकांना गुणात्मक माहिती प्रदान करण्यासाठी अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते याची चर्चा केली. या अभ्यासाचा उद्देश विधी ई–संसाधनांबाबत उपभोक्त्यांची जागरूकता तपासणे हा होता. डॉ. राम मनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी लखनौ येथील विद्यार्थ्यांचे माहिती तंत्रज्ञान कौशल्य तपासण्यात आले. या अभ्यासाने विधी विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा त्यांची त्याबद्दलची जागरूकता, माहिती शोधाचे धोरण, विधी डिजिटल संसाधनाचा वापर व आव्हाने, डिजिटल युगात संबंधित विधी विद्यार्थ्यांच्या समस्या यावर हा अभ्यास केला आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी 300 विद्यार्थ्यांना प्रश्नावली रँडमली वितरित केली. 246 विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलींना प्रतिसाद मिळाला. एम.एस. एक्सेलच्या माध्यमातून माहितीचे विश्लेषण केले गेले. यात असा निष्कर्ष काढण्यात आला की, विधी विद्यार्थ्यांची नवीन पिढी ही मुद्रित ग्रंथांचा वापर करतात. परंतु त्यांना डिजिटल संसाधनांपासून अपेक्षा आहे की, त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे अधिक सुलभ होईल. ग्रंथालयाना दर्जेदार सेवा जर प्रदान करावयाच्या असेल तर प्रथम ग्रंथालय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. तरच ते विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करू शकतील. या अभ्यासात ग्रंथालयाच्या सेवा, सुविधा सुधारण्याबाबत सूचित केले आहे.

Haraa kling (2002) ह्यांनी सरकारी वकिलांच्या कार्याचे समूह सरावाच्या (communities of practice) अनुषंगाने अभ्यास केला. त्यांच्या लक्षात आले की, प्रगत यांत्रिकी तंत्रज्ञानाचा प्रगत समूह सरावाशी काहीही परस्परसंबंध नाही. समूहाचा अभ्यास हा मुलाखती,

निरीक्षण व दस्तऐवजांच्या आधारे करण्यात आला. त्यांनी पाहिले की Listservs व IT चा वापर काही वकील करतात. विशेष करून वयाने लहान असलेले ते Listservs हे अनुभव व ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी वापर करतात. काही वकिलांच्या मते Listservs हे शिक्षणाचे साधन आहे. जेव्हा इतरांना काळजी वाटते की Listservs व E-mail हे तरुण वकिलांना स्वतःचे संशोधन करण्यापासून परावृत्त करतील. हॅरा व क्लिंग यांच्या मते, नि:शब्द ज्ञान, शब्दांची घट्ट पकड हे सर्व समूह सरावामध्ये वापरले जातात. त्याच्या लक्षात आले की, व्यवसायात व्यावहारिक ज्ञान, नि:शब्द किंवा कमी शब्द वापरणे अशा वागणुकीचे अनुकरण अनुभवी वकिलांचे निरीक्षण केल्यानेच करता येईल. अनौपचारिक रीतीने माहिती मिळविण्यासाठी मोठ्या विधी कार्यालयातून Listservs सारख्या गोष्टी वापरल्या जातात. हॅरा व क्लिंग यांनी असे मत व्यक्त केले की, Listservs हे काही प्रमाणात विषयाचे ज्ञान देते, परंतु सांस्कृतिक ज्ञान देत नाही म्हणून संगणकावर एकमेकांशी परस्पर वार्तालाप करणारा व्यावसायिक समाज आहे. सरकारी वकील (public defenders) काही प्रमाणात समक्ष होणाऱ्या समूह सरावाला सामावून घेतात. पण सर्वजणांना हे मान्य नाही. प्रतिवादी वकील हे सरकारी बचाव वकिलांचा (public defenders lawyer) चा वापर बऱ्याच कामासाठी करतात. एकमेकास जसे प्रश्न विचारण्यासाठी, ताजी माहिती देण्यासाठी बौद्धिक डावपेच न्यायालयात लढविण्यासाठी नवीन कायद्याच्या मुद्द्यांवर वादविवाद करण्यासाठी व वादविवादांपासून शिकण्यासाठी करतात. सरकारी बचाव वकिलाचे सराव समूहाशी साम्य आहे.

## 3.10 माहिती शोध वर्तनाच्या प्रतिकृती :

माहितीशास्त्र या विषयावर अभ्यास करताना अनेक प्रतिकृती समोर आल्या आहेत, ज्या आपल्याला उपभोक्त्याची माहिती शोध वर्तणूक समजण्यात मदत करतात. Marchionini (1995) ची प्रतिकृती यात माहिती शोध म्हणजे वेगवेगळ्या घडामोडींची श्रृंखला अशा प्रतिकृतीसुद्धा पुढे आलेल्या आहेत. Sutcliffe आणि Ennis (1998), Kuhlthau (1988) हे याला आकलन किंवा परिणामकारक प्रक्रिया मानतात. Ellis (1989), Ellis et.al. (1993), Ellis and Haugan (1997) हे माहिती या प्रक्रियेला एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या वर्तणुकीचा संच

मानतात. Wilson (1999) यांनी अन्य प्रतिकृती आणि कार्यपद्धती मांडल्या आहेत, ज्यामध्ये माहितीचा शोध अन्य मार्गाद्वारे घेण्याची संकल्पना दिलेली आहे. जसे समस्या सोडविण्यासाठी घडामोडी. Bates (1989) यांच्याप्रमाणे ही एक विकास प्रक्रिया आहे. Pirolli and Card (1999) यांच्या मते ही एक शोध प्रक्रिया आहे. Belkin (1980) हे याला ज्ञानातील भरून काढण्याजोगी तफावत मानतात. Dervin (1983, 1992) नुसार हा अर्थपूर्ण कार्यक्रम होय. या सर्व प्रतिकृती आणि कार्यपद्धती माहितीचा शोध समजून घेण्यासाठीचे निरनिराळे मार्ग दर्शवितात आणि प्रत्येक मार्गात वेगवेगळे अनुभव मिळण्याची शक्यता आहे.

Ingwersen and Jarvelin (2005) यांनी माहिती शोध प्रतिकृतीचा अर्थ लावण्याचा वेगळा मार्ग सांगितला आहे. ज्यामध्ये त्यांनी अनेक दृष्टिकोन आणि त्यांचे या प्रतिकृतीबाबतच्या दाव्यांचे विश्लेषण केले आहे.

१) विस्तृत विरुद्ध संकुचित व्याप्ती (म्हणजेच त्या प्रतिकृतीच्या व्याप्तीच्या कक्षा ज्यात वेगवेगळे विषय, वर्तणुकीच्या बाबी आणि कामाचे संदर्भ यांचा समावेश आहे.)

२) प्रक्रिया विरुद्ध स्थिर (म्हणजेच प्रतिकृतीची क्षमता जी वेगवेगळ्या टप्प्यांच्या संचावर अवलंबून आहे.)

३) सारांश विरुद्ध ठोस (Concrete) (म्हणजेच ती प्रतिकृती ज्या सारांशशास्त्रावर आधारभूत आहे त्याची कक्षा किंवा वर्तणुकीतील निरीक्षण विरुद्ध समजूती)

४) सार विरुद्ध पृथ्थकरणात्मक (म्हणजेच त्या प्रतिकृतीच्या कक्षा जे माहिती शोध प्रक्रियेत महत्त्वाच्या बाबी आणि त्यांचे नाते यांचा सार किंवा पृथःक्करण करण्याची क्षमता)

५) साधारण विरुद्ध विशिष्ट (म्हणजेच त्या प्रतिकृतीच्या कक्षा ज्या वेगवेगळ्या प्रायोगिक विषयांवर वापरल्या जाऊ शकतात किंवा त्याचा सर्वसाधारण वापर)

इंगवर्सेन आणि जार्वेलिन (2005) असे सुचवितात की, जेथे उच्च कक्षेतील प्रतिकृती वेगवेगळ्या दृष्टिकोनासोबत असतील तेथे ते प्रत्येक प्रतिकृतीला समीक्षेसाठी वर्गीकरण करत नाहीत. वर्गीकरणाच्या प्रक्रियेला सर्वसाधारणपणे काल्पनिक असे गृहीत धरले जाऊ शकते आणि त्याला वरील दृष्टिकोनातून अधिक किचकट केले जाऊ शकते. इंगवर्सेन आणि जार्वेलिन यांनी याला सुसंवाद आणि एकमेकांचा वारंवार उपयोग असे संबोधिले आहे.

**माहिती शोध वर्तणूक :**

माहिती शोध ही एक प्रक्रिया आहे, ज्यात मानव त्यांच्या ज्ञानाची पातळी वाढविण्यासाठी जाणीवपूर्वकपणे भाग घेतात ही प्रक्रिया सुसंवादी आहे कारण माहिती शोधकर्ते थेट लक्ष देतात, उत्तेजकांचा स्वीकार करतात आणि त्यांच्याशी जुळवून घेतात, प्रगती परावर्तित करतात. ही प्रक्रिया पूर्ववत ठेवण्यासाठी कार्यक्षमतेचे मूल्यमापन करतात. माहिती शोध, किंबहुना एक काटेकोरपणे मानवी प्रक्रिया आहे, ज्यात माहिती शोधकर्त्याच्या आंतर आणि बाह्य कृती यावर अनुकूल नियंत्रण आवश्यक आहे. या विषयांवर विविध दृष्टिकोनांतून संशोधन करण्यात आले आहे त्यावर कोणत्याही सामान्यपणे स्वीकृत व्याख्या नाहीत.

Marchiohini (1995) याच्या मते, माहिती शोध वर्तणूक म्हणजे समान उद्दिष्टाने समाधान करण्याची गरज असण्याच्या कारणास्तव माहिती शोधून काढणे.

Krikrlas (1983) माहिती शोध वर्तणूक म्हणजे ''कोणत्याही व्यक्तीचे असे कार्यक्रम जे संदेश ओळखण्यासाठी हाती घेतले जातात. ज्यामुळे आकलन केलेली गरज संपुष्टात येते.''

Girija Kumar (1990) माहिती शोध वर्तणूक ही प्रामुख्याने कोणाला गरज आहे, कोणत्या प्रकारच्या माहितीची गरज आहे, कोणत्या कारणांसाठी आहे, माहितीचे मूल्यमापन कशा प्रकारे केले जाते आणि माहितीचा वापर कशा प्रकारे केला जातो या बाबींशी निगडित आहे.''

King (1991) ''माहिती शोध वर्तणूक'' हा त्या माहिती वातावरण परिस्थितीच्या संदर्भात स्वतःचा वावर कशा प्रकारे करतो वावरतो त्या पद्धतीबाबत आहे. त्यामुळे त्याला आवश्यकपणे उपभोक्ता आणि उर्वरित माहिती प्रणाली यांचे दरम्यान परस्परसंवाद प्रक्रिया असे समजले होते. (Manda 1991)

Wilson (1999) माहिती वर्तणूक म्हणजे, ''जो कार्यक्रम एक व्यक्ती हाती घेते व त्यात सहभाग घेते, ज्यामुळे त्याला स्वतःला स्वतःच्या माहितीच्या गरजा काय आहेत हे माहीत करुन घ्यावयाचे आहे, त्या माहितीचा कोणत्याही प्रकारे शोध घ्यावयाचा आहे आणि त्या माहितीचा वापर करावयाचा आहे व हस्तांतरित करायची आहे''. वरील व्याख्येवरुन असे समजते की, माहितीचा शोध घेणे किंवा सुगावा घेणे म्हणजे माहिती संकलन असे म्हटले जाऊ शकते. अशा

प्रकारच्या कार्यक्रमांची सुरुवात अशावेळी होते जेव्हा उपभोक्त्याला वाटते की त्या क्षणातील काही समस्या सोडविण्यासाठी किंवा तिला सामोरे जाण्यासाठी उपभोक्त्याचे सध्याचे ज्ञान अपुरे आहे. तशी समज व आकलन संपताक्षणी माहिती संकलन प्रक्रिया संपुष्टात येते. माहितीसाठी सहज प्रवृत्ती विकसित करणे म्हणजे एक प्रकारची वागणूक होय आणि माहिती शोध घेण्याच्या प्रक्रियेला माहिती संकलन वागणूक असे समजले जाते.

**माहिती शोध वर्तन प्रतिकृती :**

जेव्हा आपण माहिती शोध वर्तनाकडे वळतो तेव्हा या प्रतिकृतींची संख्या भरघोस आहे व त्यापैकी सहा प्रतिकृती येथे विचारात घेतल्या गेलेल्या आहेत. त्याची यादी व वर्णन खालीलप्रमाणे आहे.

- Wilson's (1981) यांचा माहिती शोध वर्तन प्रतिकृती
- Dervin's (1983) यांचा अर्थ निर्माण सिद्धांत
- Ellis's (1989) व (1993) यांचा माहिती शोध धोरण वर्तन प्रतिकृती
- Kuhlthau's (1991) यांचा माहिती शोध वागणूक यातील टप्पे प्रतिकृती
- Wilson's (1996) यांचा नमुना ज्यात त्यांच्या 1981 सालच्या नमुन्याला विस्तारित केले गेले आहे आणि त्यासाठी माहितीशास्त्राव्यतिरिक्त क्षेत्रातील साहित्यलेखन सामुग्रीचे विश्लेषण केले गेलेले आहे.
- Leckie et. al (1996) व्यावसायिकांची प्रतिकृती

Wilson (1981) विल्सन यांचा 1981 चा नमुना प्रामुख्याने दोन प्रस्तावांवर आधारित आहे. प्रथम, माहितीची गरज ही प्राथमिक गरज नव्हे, परंतु दुय्यम गरज अधिक मूलभूत प्रकारच्या गरजांपासून उगम पावत असते, शोधकर्त्याला कदाचित विविध प्रकारचे अडथळे पार पाडावे लागतात. विल्सन असे प्रस्तावित करू इच्छितात की, मूलभूत गरजा याची व्याख्या शारीरिक आकलनविषयक किंवा भावनात्मक याप्रमाणे केल्या जाऊ शकते. ते पुढे असे नमूद करतात की, यापैकी कोणत्याही एक गरजेचा संदर्भ त्या व्यक्तीशी स्वतःशी असू शकतो. ते असे सुचवितात की, जे अडथळे माहिती शोध प्रक्रियेत आड येतात ते त्याच प्रकारच्या संदर्भांतून निर्माण होत असतात.

विल्सन याची प्रतिकृती स्पष्टपणे हे दर्शविते की, कशा प्रकारे माहितीच्या गरजा निर्माण होतात आणि वास्तविक माहिती संकलन प्रक्रियेत कोणत्या बाबी अडथळा निर्माण करू शकतात. हा नमुना परस्पर माहिती शोध याबाबतच्या गृहितकांचा संच ज्यांची कसोटी तपासली जाऊ शकते यांनासुद्धा मूर्त स्वरूप प्रदान करतो.

**आकृती क्र. 3.1 : Wilson's Information - Seeking Behaviour Model**




Dervin's (1983, 1996) यांचा अर्थ निर्माण सिद्धांत अनेक वर्षांच्या संशोधनानंतर विकसित करण्यात आलेला आहे. त्याला फक्त माहिती शोध वागणूक नमुना या निकषावर पाहिले जाऊ शकत नाही. त्याच्या म्हणण्याप्रमाणे 'एक गृहितकांचा संच, सैद्धांतिक दृष्टिकोन, पद्धतशीर आढावा, संशोधन पद्धतींचा संच आणि एक प्रत्यक्ष कृती' असा हा अभ्यास आहे. जो माहितीचे आकलन कशा प्रकारे केले जाते हे समजून घेण्यासाठी केला आहे. परंतु अर्थनिर्माणची अंमलबजावणी चार घटकात केली जाते. वेळ, जागा, परिस्थिती उद्‌भवतात ज्यामुळे माहिती समस्या कुठे व त्याचा संदर्भ परिभाषित करतात. एक अंतर जो संदर्भित परिस्थिती आणि इच्छित परिस्थिती यातील फरक ओळखतात.

डर्विन सादर करतात की हे घटक त्रिकोण स्वरूपातील परिस्थिती, अंतर आणि निष्कर्ष या प्रातिनिधिक स्वरूपात दर्शविता येतील.

**आकृती क्र. 3.2 : Dervin's Sense - Making Triangle**




डर्विन नमुन्याची जमेची बाजू म्हणजे नमुना अंशता त्याच्या पद्धतशीर क्रमात असतो. कारण माहिती वागणुकीच्या संदर्भात, प्रश्न विचारण्याच्या मार्गापर्यंत आणून सोडतो आणि त्यामुळे समस्यापूर्ण परिस्थितीचे स्वरूप उघड होऊ शकते.

**आकृती क्र. 3.3 : Dervin's Sense-making Model Re-drawn**




माहिती ज्या प्रमाणात अनिश्चितता, गोंधळ किंवा इतर काहीही यांच्यातील अंतर कापण्यात आणि माहितीचा वापर यापासून मिळणाऱ्या निष्कर्षाचे स्वरूप ठरविण्यात महत्त्वाचा

दुवा म्हणून कार्य करते याचा वापर सातत्याने सूक्ष्म हालचाल, या प्रकारच्या प्रश्नामुळे खरेखुरे अंतरंग प्राप्त होतात. जे माहिती सेवा रचना आणि प्रतिपूर्ती यावर प्रभाव पडतात.

Ellis's (1989) and Ellis , Cox & Hall, (1993) एल्लिस यांचे माहिती शोधात अंतर्भूत असलेल्या वेगवेगळ्या वागणूक याचा विस्तार म्हणजे एक आकृतिबंध नमुना म्हणून प्रस्तुत केलेला नसून आणि एल्लिस भिन्न वागणूक एक टप्प्यांचा एकच संच घटक आहे याबाबतीत कोणताही दावा करत नाही. 'वैशिष्ट्ये' ही संज्ञा यात वापरतात. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे नमूद केलेली आहेत.

अ) सुरुवात : माहिती संकलनास सुरूवात करण्यासाठी उपभोक्त्यांनी वापरलेली साधने उदा. एखाद्या जाणकार सहकाऱ्याला विचारणे.

ब) शृंखला बनविणे : ज्ञान सामग्रीतील तळटीपा आणि उध्दरणे यांचा पाठपुरावा करणे किंवा ज्ञात बाबीतील शृंखला पुढे पाठविणे अर्थात फॉर्वर्ड करणे व यासाठी उध्दरणे अनुक्रमणिकेचा वापर करणे.

क) ब्राऊजिंग : अर्ध दिशा निर्देशित किंवा अर्ध संरचित शोध.

ड) विभेदित करणे : माहित स्त्रोत यातील ज्ञात फरक या मार्गांचा अवलंब करुन प्राप्त माहितीतील काही अनावश्यक गाळणे अर्थात विभेदित करणे.

ई) देखरेख : अद्ययावत ठेवणे किंवा वर्तमान जागरुकता शोध.

फ) निष्कर्ष : माहिती स्त्रोत यातील निगडीत सामग्री निवडकपणे ओळखणे.

ग) पडताळणी : माहितीची अचूकता तपासणी

ह) समाप्ती : अंतिम शोध या माध्यमातून खुले बिंदू जोडणे 'या प्रकारे परिभाषित केल्या जाऊ शकते'.

**आकृती क्र. 3.4 : A Process Model based on Ellis's Characteristics**



Makri et. al. यांनी Ellis च्या प्रतिकृतीनुसार माहिती शोधण्याच्या वर्तणुकीचा सिद्धांतिक भिंगाने पारमध्ये विधी विद्यालयातील वकिलांचा माहिती शोध वर्तणुकीचा अभ्यास केला. संबंधित अभ्यासात त्यांनी असे व्यक्त केले की, काही प्रतिकृतीनुसार जसे लेक्की (1996) असे स्पष्ट होते की व्यावसायिक माहितीचे संशोधन हे बहुतेक उच्च काल्पनिक स्तरावरच चालते. ते पुढे असेही म्हणतात की, एल्लिसच्या नमुन्याप्रमाणे खालील स्तरावरील काल्पनिकदृष्ट्या चालणाऱ्या संकल्पना ह्या रुंद होऊ शकतात. त्यांच्या अंतर्यामी जाणण्याची शक्ती वाढू शकते. परस्परांवर क्रिया करण्याची पण रचना सुधारू शकते व गृहीत संचलित करण्याची माहिती प्रगल्भ होऊ शकते.

Kuhlthau's (1991) यांचे कार्ये एल्लिस यांच्या कार्याला पूरक ठरते व त्यांच्या कार्याची प्रशंसा करते आणि 'माहिती शोध प्रक्रिया' यातील टप्पे, निगडित भावना, विचार आणि कृती आणि योग्य ती माहिती कृती यांचा दुवा जोडते. या भावना, विचार आणि कृती यांच्या एकत्रीकरणामुळे कुहलथाऊ यांचा दृष्टिकोन आश्चर्यसूचक असा ओळखला जातो. आकलनविषयक ओळखला जात नाही. कुहलथाऊ यांच्या नमुन्यातील टप्पे म्हणजे सुरुवात, निवड, शोध, सूत्रीकरण, संचय आणि सादरीकरण हे आहेत. उदा. या प्रक्रियेतील सुरूवात या टप्प्याला अनिश्चिततेची भावना, समस्या भागाबाबत अस्पष्ट आणि सामान्य विचार आणि पार्श्वभूमी माहिती संकलन यांचेशी निगडित असते अशी त्याची वैशिष्ट्ये आहेत; यथायोग्य कृती म्हणजे माहितीची गरज काय आहे याची मान्यता देणे. उर्वरित यथायोग्य कृती म्हणजे जाणून घेणे. ओळख करुन घेणे. अर्थात, शोध यासाठी सामान्य विषय निश्चित करणे, तपास करणे, किंवा सामान्य विषय यावरील माहितीचा शोध घेणे. विषयाच्या आतील अधिक विशिष्ट भागावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी तयारी करणे, लक्ष केंद्रीत केलेल्या भागावर निगडित माहिती जमा करणे आणि माहिती शोध पूर्ण करुन समाप्ती करणे. कुहलथाऊ यांचा नमुना या प्रकारे एल्लिसपेक्षा जास्त सामान्य आहे आणि त्यात विविध टप्पे आणि कार्यक्रम यांचेशी निगडीत भावना यावर लक्ष केंद्रीत केले गेलेले आहे.

Wilson's (1996) यांचा नमुना 1981 च्या नमुन्याची प्रमुख उजळणी आहे. ज्यात माहितीशास्त्राव्यतिरिक्त विभिन्न क्षेत्रात संशोधन केले गेले. त्यात निर्णय घेणे, मानसशास्त्र, नावीन्य, आरोग्य, सुसंवाद आणि ग्राहक संशोधन या बाबी समाविष्ट होत्या.

1) 1981 सालच्या नमुन्याचा मूलभूत साचा आजही तसाच आहे. त्यात माहितीच्या गरजा यासाठी व्यक्ती हाच प्रमुख केंद्रस्थानी असतो. अडथळ्यांची मांडणी मध्यस्थांद्वारे केली जाते आणि माहिती संकलन वागणूक जाणून घेतली जाते. परंतु त्यात बदलसुद्धा आहेत. मध्यस्थ या शब्दाच्या वापरामुळे असे सूचित केले जाते की, माहिती वापर यासाठी त्यांचा प्रभाव कदाचित सहाय्यक असू शकतो तसेच प्रतिबंधात्मक सुद्धा माहिती प्रक्रिया आणि वापर प्रतिसाद वलयात आवश्यक भाग दाखविले गेले आहेत. माहितीच्या गरजा भागविण्यासाठी तीन निगडित सैद्धांतिक कल्पना सादर केलेल्या आहेत. ताण/तणाव/आघात यांना सामोरे जाण्याची सक्षमता सिद्धांत, ज्यात काही गरजांसाठी माहिती संकलन वागणूक गरज पडत नाही हे समजावून देण्यासाठी शक्यता प्रदान केली गेली आहे. जोखीम सिद्धांत ज्यात एखाद्या निर्दिष्ट व्यक्तीद्वारे माहितीचे कोणते स्रोत इतरांपेक्षा जास्त वापरले जात असतील हे समजावून देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. सामाजिक अध्ययन (शिक्षण) सिद्धांत ज्यात स्वयं–सामर्थ्य संकल्पना यावर महत्त्व दिले गेलेले आहे. अर्थात ही एक अशी कल्पना आहे, एक असा विश्वास की ज्यात व्यक्तीला पुरेपूर खात्री असते की तो यशस्वीपणे आवश्यक वागणूक निष्पांदित करु शकेल. जेणेकरून निष्पन्न तयार केले जाऊ शकतात म्हणजे मूर्त स्वरूपात आणल्या जाऊ शकतात.

2) Ingwersen : माहिती परत शोध, परस्परसंवाद याबाबतचा आकलनविषयक दृष्टिकोन, आकलनविषयक माहिती परतशोध सिद्धांत यांचे घटक, जर्नल ऑफ डॉक्युमेंटेशन (1996) नमुना हा बृहत–वागणूक यासाठीचा भाग असतो. परंतु त्यांचे विस्तारीकरण आणि वागणुकीचे इतर सैद्धांतिक नमुने यांचा अंतर्भाव यामुळे गृहीतकांचे स्रोत अधिक विपुल होत जातात.

या नमुन्याला इतर नमुन्यांशी जोडून पाहिले जाऊ शकता येईल. हे स्पष्ट होते की एल्लिस आणि कुहलथाऊ या दोघांचेही नमुने माहिती संकलन वागणूक याबाबत सक्रिय शोध पद्धती यांचेशी निगडित आहेत आणि परिणामस्वरूप ते विस्तारीकरण प्रदान करतात. डर्विन यांचा नमूना संपूर्णपणे भिन्न आहे कारण त्यांचा उद्देश माहिती वागणुकीची संपूर्णता शोध घेण्यासाठी एक सांचा आहे आणि त्यासाठी कोणत्या संदर्भात माहिती गरजा निर्मित झाल्यात याचा शोध घेतला जातो आणि त्यामुळे त्या भागविल्या जातात.

**आकृती क्र. 3.5 : A Comparison of Ellis's and Kuhlthau's Frameworks**




## व्यावसायिक नमुना :

Leckie et.al 1996 यांनी माहिती शोध नमुना प्रस्तावित केला. यात ते हा दावा करतात की, सर्व व्यावसायिक बाबींसाठी तो साधारण आणि सर्वसामान्य आहे. हा नमुना शोध साहित्याचा अभ्यास करून तयार केलेला होता आणि तो निरीक्षण अभ्यासावर करून तयार केलेला होता आणि तो निरीक्षण अभ्यासावर आधारित नव्हता. तो इंजिनिअर, आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक आणि आपल्या अभ्यासातील सर्वात महत्त्वाचे लोक वकिलांच्या माहिती शोधावरील साहित्यावर आधारित होता. लेक्की व इतर सर्व स्पष्टपणे मांडतात की, व्यावसायिक लोक कोणत्याही एका दिवशी अनेक वेगवेगळी कार्ये पूर्णत्वास नेत असतात. ते त्यांचे कौशल्यांशी, क्षेत्राशी, ज्ञानाशी निगडित असो वा नसो परंतु ते इतर अन्य साधारण कामे जसे व्यवस्थापन,

पर्यवेक्षण, मार्गदर्शन, नियोजन इत्यादी ही सुद्धा कामे करीत असतात. लेक्की व इतर सर्व यांच्या मते या कार्यामुळे वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम होत असतात. जे नंतर कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे यासाठी त्या माहितीला पुढे आणण्यासाठी आणि तिचा खराखुरा वापर यासाठी निर्णयकारक ठरतात. लेक्की व इतर सर्व हे साहित्यातून विधी व्यावसायिकाच्या चार भूमिकांची ओळख पटवितात.

१) वकिली : एखाद्याची खात्री पटविणे की कायदा कसा असावा. कोणता कायदा लावण्यात यावा किंवा कोणत्या प्रकारे वापरण्यात यावा. या कार्यात अनेक कृती समाविष्ट असतात. जसे, समान प्रकरणात आणि याअगोदरचे निर्णय निर्धारित करणे त्यामध्ये व्यावसायिक लोकांना प्राथमिक वा दुय्यम विधी साधनांचा शोध घ्यावा लागतो.

२) दस्तावेजीकरण : येथे दस्त आणि पत्रव्यवहार तयार केला जातो. यामुळे काही खालच्या दर्जाची कामे निर्माण होतात जसे फर्मने/कंपनीने याआधी अशाच प्रकरणांमध्ये दस्त तयार केलेले आहेत काय किंवा या विषयावर यापूर्वी संशोधन केलेले आहे काय हे पाहिले जाते.

३) समुपदेशन/मार्गदर्शन : यामध्ये आपल्या अशिलांना मार्गदर्शन करणे, मदत करणे. यात उपभोक्त्याची/ग्राहकाची मुलाखत घेतली जाते. फोनवरील प्रश्नांना उत्तरे देणे आणि अशिलांचे/ग्राहकांचे कोर्टात प्रतिनिधित्व करणे.

४) व्यवस्थापकीय फर्मच्या साधनांचे व्यवस्थापन करणे. यात फर्मची आर्थिक स्थिती नियंत्रणात ठेवणे, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे किंवा मदतनीस कर्मचारी सचिवांना कामाचे वाटप केले जाते.

लेक्की व सर्व हे त्यांच्या नमुन्याचा भाग म्हणून हे ठळकपणे मांडतात की, मध्यस्थी कारणांची संख्या सुद्धा व्यावसायिकांच्या माहितीच्या गरजा प्रभावित करतात. त्यात जागा, संदर्भ वारंवारिता, भविष्य वर्तविणे, महत्त्व आणि गुंतागुंत यांचा समावेश असतो.

**आकृती क्र. 3.6 : The Information-seeking of Professionals Model (Leckie)**




वर दर्शविलेल्या माहिती शोध प्रतिकृतीवरुन हे स्पष्ट होते की, एल्लिस आणि कुहलथाऊ या दोघांचेही नमुने माहिती संकलन वागणूक याबाबत सक्रिय शोध पद्धती यांच्याशी निगडित आहेत आणि ते विस्तारीकरण प्रदान करतात. डर्विन यांचा नमुना हा स्वभाववृत्तीत संपूर्णपणे भिन्न आहे. कारण त्यांचा उद्देश माहिती वागणुकीची संपूर्णता शोध घेण्यासाठी एक साचा आहे आणि त्यासाठी कोणत्या संदर्भात माहिती गरजा निर्माण झाल्या आहेत याचा शोध घेतला जातो. त्यामुळे गरजा भागविल्या जातात. लेक्की व इतर सर्व व्यावसायिकांच्या नमुन्यावर प्रकाश टाकतात. तर विल्सन यांचा नमुना कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी कोणत्या प्रकारचे घटक आवश्यक आहेत याबाबत विचारणा करण्यासाठी प्रेरणा देतो.

## समारोप :

सदर संशोधनासाठी संशोधकाने अनेक विधी महाविद्यालय ग्रंथालयांना विद्यापीठांना भेटी देऊन याअगोदर झालेल्या संशोधनपर लेखाचा संशोधन साहित्याचा आढावा घेतला आहे. त्याचे संशोधनपर दृष्टिकोनातून समालोचन करण्यात आले आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात सदर विषयावर झालेल्या संशोधनावर लेखाचा आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय

स्तरावरील अनेक साहित्याचा यामध्ये आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. सदर आढावा घेताना संशोधकाने संबंधित विषयात संशोधनपर लेख परिषदेमार्फत लिहिले आहेत. अनेक विधी विषयातील तज्ज्ञांचा यामध्ये आढावा घेण्यात आला आहे. या समालोचनामुळे संशोधनातील नेमकी पोकळी निदर्शनास येऊन संशोधकास निश्चित एक दिशा प्राप्त झाली. संशोधकाला निदर्शनास आले की, विधी विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनाचा अभ्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ व अभिमत विद्यापीठाला संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयांचा अभ्यास झालेला नाही, म्हणून सदर संशोधन हाती घेण्यात आले आहे.

## संदर्भ सूची :


1. Abbas, Z., MacFarlane, D. & Göker, A. (2014). Smartphones for Law Students –persuasive, pervasive and legal: A research Study. *Legal Information Management, 14,* 174-180. doi: https://doi.org/10.1017/S1472669614000413

2. Adedibu, L. O. and Adio, G. (1997). Information needs and information seeking patterns at medical students at lautech ,Ogbomoso. *Aslib Journal of Information Management*. *ASLIB Proceeding, 49* (9), 238-242. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/eb051471

3. Adegbore, A. M. (2010). Automation in two Nigerian University Libraries. *Library Philosopy and Practice, (e-journal),* (425). Retrieved from http://digitalcommons.unl.edu/libphilprac/425

4. Adekunmisi, S.O. (2005). The information needs and information seeking behaviour of academic staff in the college of Agricultural Sciences, Olabisi Onabanjo University. Ayetoro Ogunstate. *Journal of Library and information science*, *2* (6), 108-113.

5. Aforo, A. A. and Lamptey, R. B. (2012). Information needs and the information seeking of Law Lecturers in Kwame University of Science and Technology Kumasi. *Ghana International Research Journal at Arts and Social Sciences*, *1* (4), 75-80. Retrieved from http://www.interesjournals.org/full-articles/information-needs-and-the-information-seeking-behaviour-of-law-lecturers-in-kwame-nkrumah-university-of-science-and-technology-kumasi-ghana.pdf?view=inline

6. Agrawal, A. and Chakraborty, H. K. (1995*).* Information needs and use pattern of Eartha Science scholars of Banaras Hinadec University. *Indian Journal of Information library and society, 8* (3 & 4), 219-227.

7. American Association of Law Libraries (2002). Beyond the boundaries report of the special committee on the future of libraries in the digital age, Chicago. II, *American Association of Law Libraries*. Retrieved from http://archives.library.illinois.edu/erec/AALL_Archives/8501423a/--index.html

8. American Bar Association – Legal technology resource centre (2007). Legal technology survey report. Chicago, IL, *American Bar Association legal technology resource centre*: *Defending Liberty Pursuing Justice.* Retrieved from https://www.americanbar.org/groups/departments_offices/legal_technology_resources.html

9. Andrew, C. (1993). User perception of CALR (Unpublished M.Sc. thesis). city University London, UK.

10. Anyaugu, U. (2014). Postgraduate law students information needs and seeking behaviour: implication for improved provision of resources and services in Nigerian Institute of Advanced Library Studies library Lagos, Nigeria. *Library Philosophy and Practice, (e-journal),* 1-13 Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=2901&context=libphilprac

11. Balasubramanian, P. (2010). User studies: The creamy area of research in library and information science. *Library Progress, 30* (i), 111-117.

12. Baron, S. and Strout, D. A. (2001). Communicating with and empowering international students with library skills set. *Reference Services Review, 29* (4), 314-326. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/abs/10.1108/00907320110408447

13. Barton, K., Mckellar, P. and Maharg, P. (2007). Authentic fictions: Simulation, professionalism and legal learning. *Clinical Law Review*, *14* (1), 143-193. Retrieved from https://openresearch-repository.anu.edu.au/bitstream/1885/14249/2/Barton%20et%20al%20Authentic%20Fictions%202007.pdf

14. Bates, M. (1989). The design of browsing and bemypicking techniques for the online search lates face. O*nline Review*, *13* (5), 381-400. Retrieved from https://pages.gseis.ucla.edu/faculty/bates/berrypicking.html

15. Bates, M. J. (1996). Learning about the information seeking of inter-disciplinary scholars and students. *Library Trends, 42* (2), 155-164.

16. Beaulieu, M. (2003). User based studies in information seeking and retrieval: A sheffield prospective. *Journal of information Science, 29* (4), 239-248. Retrieved from http://journals.sagepub.com/doi/abs/10.1177/01655515030294002

17. Bebariya, N. A., Patel, M.G. and Alka, G. V. (2014). Information seeking Behaviour at library and information sciences professionals in India. *2* (1), 9-18. Retrieved from www.researchpublish.com/download.php?file=Information%20Seeking%20Behaviour%20of%20Library%20and%20Information%20Science%20Professionals%20in%20India-160.pdf&act=book

18. Bharadwaj, R.K. and Madhusudhan, M. (2013). Open access legal Information sources and their use by students of National Law University. *Annals of Library and Information studies*, *60* (4), 314-319. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/26275/4/ALIS%2060%284%29%20314-319.pdf

19. Bravy, G. J. and Feather, K. C. (2001). The impact of electronic access on basic library services: One academic law library's experience. *Law Library Journal*, *93* (2), 261-268. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj93&div=23&start_page=261&collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

20. Bruce, H. (2005). Personal anticipated information need. *Information Research, 10* (3), 232. Retrieved from http://www.informationr.net/ir/10-3/paper232.html

21. Buckland, M. K. (1991). Information as thing. *Journal of American Society of Information Science. 42* (5), 351. Retrieved from https://pdfs.semanticscholar.org/b3d4/d7980d6a628b503003ef4e7763a93544508e.pdf

22. Bystrom, K. and Jarvelin, K. (1995). Task complexity affects information seeking and use. *Information Processing & Management International Journal, 31*(2)191-213. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.20.3317&rep=rep1&type=pdf

23. Callister, P. D. (2003). Beyond training: Law librarianships quest of the pedagogy of legal research education. *Law Library Journal, 195* (1), 7 - 45. Retrieved from https://mospace.umsystem.edu/xmlui/bitstream/handle/10355/9050/CallisterBeyTraLaw.pdf?sequence=1

24. Carter, N. C. (2002). American Indians and law Libraries: Acknowledging the Third Sovereign. *Law Library Journal*, *94*(1), 7-26. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj94&div=11&start_page=7& collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

25. Cheatle, E. (1992). Information needs of solicitors. (Unpublished M. Sc. Thesis). City University London, UK. Retrieved from http://www.personal.psu.edu/rcr5122/ InformationBehavior.html

26. Chidinm, O. (2013). Exploring the information seeking behaviour of final year law students in Ekiti State University. *International journal of scientific and technology research*, *2* (5), 300-309. Retrieved from http://www.ijstr.org/final-print/may2013/Exploring-The-Information-Seeking-Behaviour-Of-Final-Year-Law-Students-In-Ekiti-State-University..pdf

27. Chikonzo, A.C. and Aina, L.O. (2001). Information needs and sources of information used by Veterinary Students at the University of Zimbabwe. *Quarterly Bulletin, 46* (1 & 2), 24-28.

28. Choukhande, V. G. (2004). Analytical study of information needs and use of patern of faculty members and research scholars of Amravati University. *ILA Bulletin*. *48* (3), 23-31.

29. Cohen, M. (1969). Research habits of lawyers. *Jurimetrics Journal*, *9* (4). 183-94. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/juraba9&div=6&g_sent=1&collection=journals

30. Dada, T. O. (2011). Law librarianship & legal research in the digital age. *Nigerian Institute of Advanced Legal Studies, 42-45.* Retrieved from http://nials-nigeria.org/pub/lawlibrary.pdf

31. Dalvi, V. S. (1989). Information seeking habits of the scientists at the National Chemical Laboratory (Unpublished M.Lib Thesis). University of Pune, Pune.

32. Das, P. and Maharana, R. K. (2013). Access, awareness and use of electronic information resources by research scholars of Berhampur University: A study. *American International Journal of Research in Humanities Arts and social sciences*, *3* (2). 254-259. Retrieved from http://iasir.net/AIJRHASSpapers/AIJRHASS13-271.pdf

33. Das, R. K. and Jadab, A. (2016). Information seeking behavior of law students in digital age: A user study at University of Dhaka. *International Research: Journal of Library and Information science*, *6* (3), 381 – 396. Retrieved from http://irjlis.com/wp-content/uploads/2016/11/1-IR-359-63.pdf

34. Dasgupta, N., Yadav, A. K. S. and Dasgupta, S. (2017). Information seeking behaviour of medical professionals in the digital age in Kolkata. *Journal of Electronic Resources in Medical Libraries*,*14*(1),1-16. Retrieved from http://www.tandfonline.com/doi/abs/10.1080/15424065.2016.1261383

35. Dervin, B. (1992). From the mind's eye of user: The sense making qualitative-quantitative methodology in Glaxiene, J. and Powel, R. (Eds.), *Qualitative Research in information Management Englewood Co. USA :Libraries Unlimited,* 61-84. Retrieved from https://www.ideals.illinois.edu/bitstream/handle/2142/2281/ Dervin1992a.htm

36. Dervin, B. (2003). Human studies and user studies: A call for methodological inter-disciplinarity. *Information Research. 9* (1), 166. Retrieved from http://www.informationr.net/ir/9-1/paper166.html

37. Dervin, B. (1983). An overview of sense making research: Concepts, methods and results to date. Paper presented at the annual meeting of the *International communication Association*, Dallsa TX USA, (on-line) 2-65. Retrieved from http://faculty.washington.edu/wpratt/MEBI598/Methods/An%20Overview%20of%20Sense-Making%20Research%201983a.htm

38. Dervin, B. and Dewdney, P. (1986*).* Neutral questioning: A new approach to the reference interview. *American Library Association, 25* (4), 506-513. Retrieved from http://www.jstor.org.elibrary.symlaw.ac.in:2048/stable/pdf/25827718.pdf?refreqid=excelsior:08a1205490b95b100c8b10dbf8fa376f

39. Devendra and khaiser, N. (2014). Information technology application in law University Libraries in South India: A study. *Pearl: A Journal of Library and Information Science*, *8* (1), 21-25. Retrieved from http://www.indianjournals.com/ijor.aspx?target=ijor:pjolis&volume=8&issue=1&article=004

40. Eisenschitz, T. S. and Walsh, R. L. (1995). Lawyers attitudes to information. *The Law Librarian*, *26*, 446-450.

41. Elliott, M. & Kling, R. (1997). Organizational usability of digital libraries: Case study of legal research in civil & criminal courts. *Journal of the American Society for Information Science*, *48* (11), 1023-1035. Retrieved from https://pdfs.semanticscholar.org/466d/932c9727a2d280f1fe007bc3aad729b7fd66.pdf

42. Ellis, D. (1989). A behavioral approach to information retrieval system. *Design Journal of Documentation*, *45* (3), 171-212. Retrieved from http://journals.sagepub.com/doi/pdf/10.1177/016555158901500406

43. Ellis, D. C. and Hall, K. (1993). A comparison of the information seeking patterns of researchers in the physical and social sciences. *Journal of Documentation*, *49*, 356-369. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/eb026919

44. Engestrom, Y. (1996). The tensions of judging: handling cases of driving under the influence of alcohol in Finland and California. In Engestro¨m, Y. and Middleton, D. (Eds.), Cognition and Communication at Work.Cambridge: Cambridge University press. Retrieved from https://books.google.co.in/books?hl=en&lr=&id=SUttM9DzfakC&oi=fnd&pg=PA199&dq=Engestrom+Y.(1996)+The+Tensions+of+judging+handling+cases+of+driving+under+the+influence+of+Alcohol&ots=FrGbWXgH6u&sig=nIG2rUPfWm1PRfm5UQnsaoSuFm0#v=onepage&q&f=false

45. Feliciano, M. (1984). Legal information sales services and needs of lawyers. *Journal of Philippine Librarianship*, *8* (12), 71-92.

46. Folorunsho, A. L. I. and Harun, Al. (2005). A survey of information needs and seeking behaviour of Kwara State hence of assembly legislators middle belt. *Journal of library and information science*, *5* (2), 52-60.

47. Fowler, S.G. (2007). Results of Participant observation in the fifth judicial district: customizing the country law library to meet the needs at small firm attorneys in rural Kansas. 1-14. Retrieved from http://www.eblip4.unc.edu/papers/fowler.pdf

48. Ganesan, S. and Kaliyaperumal, K. (2013). Awareness, access and use of digital resources among the dentistry academics of Sri Ramachandra University Medical Chennai. *7* (3), 175-185. Retrieved from http://www.indianjournals.com/ijor.aspx?target=ijor:pjolis&volume=7&issue=3&article=007

49. George, C. A., Brigh, T. A., Hurlbert, T., Linke, E. C., Clair,G.St., and Steine, J. (2006). Scholarly use of information graduates students information seeking

behavior. *Information research*, *13* (4), 272. Retrieved from http://informationR.net/ir/11-4/paper 272.html.

50. Gillian, K., Ronan, M. and Crystal, F. (2004). Information seeking and students are studying for professional careers: The cases of engineering and law students in Ireland. *Information research: An international journal, 10* (1), 1-12. Retrieved from http://arrow.dit.ie/cgi/viewcontent.cgi?article=1002&context=ittsupart

51. Girija, K. (1990). *Defining the concept of information needs.* In J. C. Binwal, et al (Eds.). Social Science Information: Problems and prospects, New Delhi: Vikas Publishing.

52. Gopabandhu, S. and Prangya, P. (2013). Use of electronic resources by research scholars: A case study of Utkal University. *International Journal of Information Library & Society,* 4 (1), 1-8. Retrieved from http://www.publishingindia.com/GetBrochure.aspx?query=UERGQnJvY2h1cmVzfC8xOTg4LnBkZnwvMTk4OC5wZGY=

53. Gray, N. J., Klein, J. D., Noyce, P. R., Sesselberg, T. S. and Cantrill, J. A. (2005). Health information seeking Behaviour in Adolescence: The place of internet. S*ocial science and Medicine. 60* (7), 1467-1478. Retrieved from http://www.sciencedirect.com/science/article/pii/S0277953604003934

54. Groatia, Z. (2012). Proceeding of the summer school in user studies*,* 11-14. Retrieved from http://ozk.unizd.hr/galerija/index.php/Summer-School-in-User-Studies-2012-Zadar/

55. Gurrad, P. (1999). Survival strategies in the learning age hybrid staff and hybrid libraries. *ASLIB proceeding, 51* (6), 187-194. Retrieved from http://web.b.ebscohost.com/ehost/detail/detail?vid=3&sid=f8f21a2e-c461-4d0d-bc7f-aabe148696b2%40sessionmgr101&bdata=JnNpdGU9ZWhvc3QtbGl2ZQ%3d%3d#AN=502823846&db=lls

56. Hainswarth, M. (1992). *Information seeking behaviour of judges of the Florida district courts of appeal*. (doctoral thesis). Florida State University United States. Retrieved from https://papers.ssrn.com/sol3/papers.cfm?abstract_id=1367308

57. Hara, N. & Kling, R. (2002). Communities of practice with and without Information Technology. *Proceedings of the American Society for Information Science and Technology, 39* (1), 338-349. Retrieved from http://onlinelibrary.wiley.com/doi/10.1002/meet.1450390137/full

58. Haruna, I. and Mabawanku, I. (2001). Information needs and seeking behaviour of legal practitioners and the challenges to law libraries in Lagos, Nigeria. *International information and Library Review*, *33* (1). 69-87. Retrieved from http://www.tandfonline.com/doi/abs/10.1080/ 10572317.2001.10762539

59. Harward, L. (2007). How to conduct on effective & valid literature search. *Nursing times*, *103* (43), 32-33. Retrieved from https://www.nursingtimes.net/roles/nurse-educators/how-to-conduct-an-effective-and-valid-literature-search/217252.article

60. Hicks, F. C. (1938). Technique of Legal Research for the Practicing Lawyer. *Law Library Journal*, *31* (1), 1-13. Retrieved from http:// digitalcommons.law.yale.edu/cgi/viewcontent.cgi?article=5726&context=fss_papers

61. Howard, S., Lehmann, J. and Rood, J. (2003). Information behaviour of three Lawyers: A comparison with two Earlier Studies. *Human aspects of Information systems*, 1-14. Retrieved from http://students.washington.edu/ aliss/silverfish/archive/Feb2004/MSIM_ROOD_lawyers.pdf

62. Howland, J. & Lewis, N. (1990). The effectiveness of law school legal research training programs. *Journal of legal education*, *40*, 381-391. Retrieved from http://www.jstor.org.elibrary.symlaw.ac.in:2048/stable/pdf/42893171.pdf?refreqid=excelsior:1aedfc1819067c76bc51c8635570b9b8

63. Igbeka J. U. And Atinmo, M. I. (2002). Information seeking behavior and information utilization of agricultural engineers in Nigeria based on their different places of work. Nigerian libraries. J*ournal of the Nigerian library Association, 36* (1), 9-72.

64. Igbeka, J.U. (1995). Information Needs of Agricultural Engineers: The case of Ibadan, Oyo State Capital. UNESCO, Africa. 99 – 108.

65. Ikoja-Odongo, R. and Mostert, J. (2006). Information seeking behaviour: A conceptual framework. *South Africa Journal Library and Information Science, 72* (3), 145-158. Retrieved from sajlis.journals.ac.za/pub/article/download/1112/1048

66. Jackson, P. A. (2005). Incoming International Students and the library: A survey. *Reference Service Reviews*, *33* (2), 197-209. Retrieved from https://doi.org/10.1108/00907320510597408

67. Jackson, R. (2007). The information requirements and information- seeking behaviours of health and social care professionals providing care to children with health care needs: A pilot study. *Helath infromation library Journal*, *24* (3), 95-105. Retrieved from http://onlinelibrary.wiley.com/doi/10.1111/j.1471-1842.2007.00700.x/full

68. Jamali, H. R. and Nicholas, D. (2008). Information seeking behaviour of physicists and astronomers. *Aslib Proceedings: New Information Perspectives, 60* (5), 444-462. Retrieved from http://eprints.rclis.org/13096/1/JAMALIi-FINAL-preprint.pdf

69. Blomberg, J., Suchman, L. and Trigg, R. H. (1996). Reflections on a work oriented design project. *Human - Computer Interaction, 11,* 237-265. Retrieved from http://www.lancaster.ac.uk/fass/doc_library/sociology/suchman_reflections_1996.pdf

70. Jeong, W. (2004). Unbreakable ethnic bonds: Information seeking behaviour of Korean graduate students in the United States. *Library and Information Science Research, 26(3).* 384-400. Retrieved from http://www.sciencedirect.com/science/article/pii/S0740818804000362

71. Jones, Y. (2006). Just the facts Ma'am A contextual Approach to the legal information use environment. (Unpublished doctoral thesis). Drexel University, Philadelphia, USA. Retrieved from https://idea.library.drexel.edu/islandora/object/idea%3A2837/datastream/OBJ/download/___Just_the_facts_Ma___am_____a_contextual_approach_to_the_legal_information_use_environment.pdf

72. Justiss, L. (2003). A survery of fee Based Web Subscriptions in Academic Law Libraries. *Law Library Journal, 95* (5), 383-409. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj95&div=35&g_sent=1&collection=journals

73. Kadli, J. H. and Hanchinal, V. B. (2015). Information seeking Behaviour of Law Students in the changing Digital Environment. *DESIDOC Journal of Library & Information Technology, 35* (1), 61-68. Retrieved from https://www.researchgate.net/profile/Veeresh_Hanchinal2/publication/271454104_Information_Seeking_Behaviour_of_Law_Students_in_the_Changing_Digital_Environment/links/54c891400cf22d626a39c23d.pdf

74. Kakai, M., Ikoja-Odongo, R. and Kigongo-Bukenya, I.M.N. (2004). A study of the information seeking behaviour of undergraduate of Makerere University, Uganda. *World Libraries, 14*(1), 544-564. Retrieved from https://www.google.co.in/url?sa=t&rct=j&q=&esrc=s&source=web&cd=1&ved=0ahUKEwjWp4-hi8XVAhUDro8KHbOQBUoQFggnMAA&url=http%3A%2F%2Fwww.dspace.mak.ac.ug%2Fbitstream%2Fhandle%2F10570%2F5499%2Fkakai-infoseeking-Uganda.pdf%3Fsequence%3D1&usg=AFQjCNHO5CPH-SuUBYzVaCKyTJh11MmJXA

75. Kanungo, N. T. (2007). Information use pattern of social scientists: An Analysis of citations of journal of Asian studies. *IASLIC Bulletin, 52* (2), 69-81. Retrieved from https://books.google.co.in/books?redir_esc=y&id=-vlLAQAAIAAJ&focus =searchwithinvolume&q=information+use+pattern+of+social+scientists

76. Kapoor, A. L. (1990). Use Pattern of periodicals and strategy of research scholars in geography. In J.C.Binwal (Eds.), *A case study of Delhi school of economics: In Social science Information. Problems and prospects.* (pp. 310 – 323). New Delhi: Vikas Publishing House.

77. Karisiddappa, C. R., Sangam, S. L. and Maheswarappa, B. S. (1989). Information needs and use pattern of Indian historians, *IASLIC Bulletin 34* (2). 47-50

78. Khan, G. and Bhatti, R. (2012). Information needs and seeking behaviour of Law Faculty members: A survey of the University of Peshawar and its affiliated law colleges. *Library Philosophy and Practice (e-journal),786*. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1899&context=libphilprac

79. Khan, S. A., Bhatti, R. and Khan, G. (2011). Information seeking behaviour of Law Practitioners: A survey of Bahawalpur City. *Library Philosophy and Practice.* 44-55.
Retrieved from https://www.webpages.uidaho.edu/~mbolin/khan-bhatti.pdf

80. Khandare, D. (2013). Information Seeking Behaviour of user of Management Institute Libraries in Pune. (Doctoral thesis). Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune. Retrieved from http://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/15812?mode=full

81. Kidd, D. (1978). *Legal information of solicitors in Private Practice.* (Unbulished Msc thesis). University of Edinburgh, UK.

82. Krilkelas, J. (1983). Information Seeking Behaviour: A Pattern and Concept. *Drexel Library Quarterly, 19* (2), 5-20. Retrieved from https://eric.ed.gov/?id=EJ298483

83. Kuhlthau, C. (1988). Developing a Model of the Library search Process: Cognitive and affective Aspeats. *American Library Association*, *28*(2), 232-242. Retrieved from https://www.jstor.org/stable/pdf/25828262.pdf?refreqid=excelsior%3Af606ce823b4e23901254af045e7e9774

84. Kuhlthau, C. and Tama, S. (2001). Information search Process of Lawyers: A call for 'just for me' information services. *Journal of Documentation, 57*(1), 25-43. Retrieved from http://tefkos.comminfo.rutgers.edu/Courses/612/Articles/KuhlthauTama.pdf

85. Kuhlthau, C.C. (1991). Inside the search process: information seeking from the user's perspective. *Journal of the American Society for Information Science*. *42*(5), 361-371. Retrieved from http://faculty.washington.edu/harryb/courses/INFO310/Kuhlthau.pdf

86. Kumar, R. and Kaur, A. (2004). Internet Use by Teachers and students in Engineering colleges of Punjab, Haryana, and Himachal Pradesh states of India: An Analysis. *Electronic Journal of Academic and Special Librarianship, 7* (1) Retrieved from http://southernlibrarianship.icaap.org/content/v07n01/kumar_r01.htm

87. Kumar, P. (2013). Information seeking Behaviour of faculty members at BPS Mahila Vishwavidyalaya Khanpur, Kalan (Sonipat) India. *Pearl; A Journal of Library and Information science, 7* (1), pp. 1-4. Retrieved from http://www.indianjournals.com/ijor.aspx?target=ijor:pjolis&volume=7&issue=1&article=001

88. Lawal, V. (2007). Legal Research and legal education in Africa: The challenge for information literacy. *Starr workshop papers. Paper 5* Retrieved from http://scholarship.law.cornell.edu/cgi/viewcontent.cgi?article=1004&context=sws_papers

89. Leckie, G., Pettigrew, K. & Sylvain C. (1996). Modeling the information Seeking of Professional A General Model Derived from Research on Engineers, Health care Professionals and lawyers, *The Library Quarterly : Information, Community, Policy, 66*(2), 161-193. Retrieved from http://www.jstor.org/stable/pdf/4309109.pdf?refreqid=excelsior:e1453b6d71c660eb89c41e6ac130ad55

90. Lee, S. H. (2008). Preserving our heritage: protecting Law Library Core Mission through updated library quality assessment standards. *Law Library Journal, 100*(1), 9-38. Retrieved from http://lsr.nellco.org/cgi/viewcontent.cgi?article=1171&context=nusl_faculty

91. Lenz, C. S. (2013). The public mission of the public law school library. *Law Library Journal, 105*(1), 31-55. Retrieved from https://poseidon01.ssrn.com/delivery.php?ID=182125067086112009113123112010000097041005024009051078099101093029009100065122076006019036021056062013003069068127116092080025104012021061022091010124078102028064058028062117070086122103017123087124026097082090123126085083029022125125122072087121024&EXT=pdf

92. Lihosit, J.(2008). In computer assisted Legal Research is No Threat to Librarians ; The History of American Legal Education Shows US why Paper presented at the 101 st Annual Conference of the American Association of Law Libraries, Partland, Oregori.

93. Lueg, C. (2000). Information seeking as socially situated activity. Retrieved from www.citeulike.org/user/adamMoore/article/562490

94. Mahajan, P. (2009). Information seeking behavior: A study of Punjab university. *Library Philosophy and Practices,* 1-6. Retrieved from http://www.webpages.uidaho.edu/~MBOLIN/mahajan4.htm

95. Mahapatra R.K., and Panda, K.S. (2001). State of information seeking and searching behaviour of working journalists in Orissa; A study. *Annals of Library and Information Studies, 48*(4), 133-138. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/17908/1/ALIS%2048(4)%20133-138.pdf

96. Majid, S. and Kassim, G. M. (2000). Information seeking behavoiur of International Islamic University of Malaysia Law Facility Members. *Malaysian Journal of Library and Information Science, 5*(2), 1-17. Retrieved from http://ejum.fsktm.um.edu.my/article/157.pdf

97. Majid, S. and Tan, A. T. (2002). Usage of Information Resources by computer. Engineering students: A case study of Nanyang Technological University, Singapore. *Online Information Review, 26* (5), 318-325. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/abs/10.1108/14684520210447886

98. Mallik, S. and Sen. B. K. (2008). Information sources in academic Law Libraries in India. *Annals of Library and Information Studies 55*(3), 196-203. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/2442/1/ALIS%2055%283%29%20196-203.pdf

99. Manda, P. (1991). Information Seeking Behaviours of Sociologists: A Case Study. *INCAE, 1,* 18-25.

100. Marcella, R. and Boxter, G. (1999). A National Survey of the citizenship information needs of the general public. *ASLIB Proceeding. 51* (4). 115-121 Retrieved from https://doi.org/10.1108/EUM0000000006970

101. Marchionini, G. (1995). Information – seeking in electronic Environments. *The Library Quarterly: Information, Community, Policy, 66*(4), 483 – 485 Retrieved from http://www.jstor.org/stable/pdf/4309167.pdf?refreqid=excelsior%3Aa893658d35de3a8719df14e43de7a092

102. Marchionini, G., Dwiggins, S., Katz, A. and Lin, X. (1993). Information seeking in full text end- user oriented search system: The roles of domain and search expertise. *Library and Information Science Research, 15* (1), 35-69. Retrieved from https://uncch.pure.elsevier.com/en/publications/information-seeking-in-full-text-end-user-oriented-search-systems

103. Margaret, E. and Kling, R. (1997). Organizational Usability of Digital Libraries: Case Study of Legal Research in Civil and Criminal Courts. *Journal of the American Society for Information Science, 48* (11). 1023 – 1035. Retrieved from https://pdfs.semanticscholar.org/466d/932c9727a2d280f1fe007bc3aad729b7fd66.pdf

104. Makri, S., Blandford, A. and Cox, A. L (2006). A study of legal information seeking behavior to inform the design of electronic legal research tools. Retrieved from https://www.researchgate.net/publication/32889054_A_Study_of_Legal_Information_Seeking_Behaviour_to_Inform_the_Design_of_Electronic_Legal_Research_Tools

105. Makri, S., Blandford, A. & Cox, A. L. (2008). Investigating the information seeking behavior of academic lawyers : Form Ellis's model to design. *Information Processing and Management: an International Journal, 44* (2), 613-634. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.384.2353&rep=rep1&type=pdf

106. Marshall, C. C., Price, M. N. Golovchinsky, G. and Schilit, B. N. (2001). Designing e-Books for Legal Work. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.28.5379&rep=rep1&type=pdf

107. Marvell, T. B. (1979). Appellate Courts and Lawyers : Information gathering in the Adversary system. *The journal of politics, 41*(4), 1239-1242. Retrieved from http://www.jstor.org/stable/pdf/2129755.pdf?refreqid=excelsior%3A327a6fcddc39748e735755a90fba0a9b

108. Mary, B. F. (1995). Information seeking patterns of social science study. *Reference Librarian, 49-50,* 83-93. Retrieved from www.ed,gov/ERICwebPortal/record/Detail?accno=EJ508697-20k

109. McCormack, N. (2012). Cancellation of Print Primary Sources in Canadian Academic. Law Libraries. *Law Library Journal, 104*(2), 263-284. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj104&div=26&start_page=263&collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

110. Mead, R. A. and Baird, B. J. (2003). Preservation concerns for Law Libraries: Results from the condition survey of the University of Kansas Law Library. *Law Library Journal 95* (1), 69-86. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj95&div=7&start_page=69&collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

111. Meho, L. I. and Tibbo. H. B. (2001). Modeling the information seeking behaviour of social scientists : Ellis study Revisited. *Journal of the American Society for Science and Technology 54* (6). 570-587. Retrieved from http://eprints.rclis.org/8364/1/meho-tibbo.pdf

112. Michelle, M. W. (2011). Building a collaborative Digital Collection: A Necessary Evolution in Libraries. *Law Library Journal, 103* (4), 527-551. Retrieved from http://scholarship.law.georgetown.edu/cgi/viewcontent.cgi?article=1698&context=facpub

113. Murari, D. and Nagarkar, S. (2013). Information requirements of women entrepreneurs in Pune City. IFLA WLIC Singapure. Retrieved from http://library.ifla.org/169/1/189-murari-en.pdf

114. Nikam, K. and Madhu, K. S. (2006). Expectations and perceptions of the users of the Naitonal Law School of India University Library (NLSIU): A Study. *SRELS Journal of Informaiton Management, 43* (1), 85-100. Retrieved from https://www.academia.edu/6124620/Expectations_and_Perceptions_of_the_Users_of_the_National_Law_School_of_India_University_Library_A_study

115. Nikoi, S. (2008). Information needs of NGOs : A case study of NGO development workers in the Northern Region of Ghana. *Information Development.* *24*(1), 44-52. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.1024.888&rep=rep1&type=pdf

116. Norman, P. (2004). The Big Match-Lexis V Westlaw. *Legal information Management, 4(2),* 90-97. Retrieved from http://sas-space.sas.ac.uk/298/1/LIM%20Big%20Match.pdf

117. Obga, C. O. (2013). Information seeking behaviour of final year Law Students in south western Nigerian Universities. *Information and Knowledge Management, 3*(5), pp. 1-27.

118. Odusanya, K. O. and Amusa, I. O. (2003). Information needs and Information seeking habits of Science lectures at Olabisi Onabanjo University. *Journal of Library and Information Science,* 1(2), 50-55.

119. Oke – Samuel, O. (2008). Clinical legal education in Nigeria: developments and challenges. *Griffith law review 17* (1), 139-150 Retrieved from http://www.tandfonline.com/doi/abs/10.1080/10383441.2008.10854605

120. Olorunfemi, D. Y. (2009). Family work conflict information use and social competence of the married post graduate students in the faculty of education university of Inadan, Nigeria. *Library Philosophy and Practice,* 235. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1237&context=libphilprac

121. Olorunfemi, D. Y. and Mostert, J. (2012). Information seeking behavior of law students in a developing country: A Literature review. 1 - 20. Retrieved from http://www.lis.uzulu.ac.za/research/2012/Yemisi%20and%20Mostert%20SCECSAL,%20UZ,%207.pdf

122. Onwudinjo, O. T., Nwosu, C. O. and Ugwu, C. I. (2014). Accreditation issues in Faculty of Law of Nigerian Universities: Imperatives for law libraries, laws and statutes. *Library Philosophy and Practice,* 1172. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=3037&context=libphilprac

123. Opeke R. (1993) The role of information management for councilors and local Government Administrator Workshop of Information Management for councilors and local Government Administrator.

124. Ossai, N.B. (2011) How Law students utilise information resources: A case study of the University of Benin, Benin city. *International Journal of Library and Inforamtion Science, 3* (1), 1-14. Retrieved from http://www.academicjournals.org/article/article1379510973_Ossai.pdf

125. Otike, J. (1999) The information needs and seeking Habits of Lawyers in Englad: A Pilot study. *International Information and Library Review, 31* (1), pp 19-39. Retrieved from http://dx.doi.org/10.1080/10572317.1999.10762486

126. Otike, J. and Matthews, G. (2000). Legal information needs of lawyers in Kenya: A case study. *Library Management, 21*(5), 241 – 252. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/01435120010324842

127. Oulanov, A. and Pajarillo, E. (2003). Academic Librarians Perception of LexisNexis. *The Electronic Library, 21* (2), 123 – 129. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/02640470310470499

128. Owoeye, J. (2011). Information communication Technology (ICT) Use as a predictor of Lawyers' Productivity. *Lirbrary Philosophy and Practice,* 662. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1736&context=libphilprac

129. Panda, K. C. and K, Swain Dilip. (1997). Information seeking behaviour and reading habits of creative writers: a case study of an Indian state. In R.G. Prasher. (Eds.), *Librarjv and Information Science Parameters and Perspectives Essays in Honour of Prof.P.B. Mangla*. (pp. 545-555) New Delhi: Concept.

130. Patil, M.S. (2014). *Information Gathering and use habits of Users of Law Libraries with Special reference to Law Colleges Formerly and Presently Affiliated to the Karnatak University. (doctoral thesis). Karnatak University. Dharwad.* Retrieved from http://shodhganga.inflibnet.ac.in/handle/10603/98726

131. Patitungkho, K. and Deshpande, N. (2005). Information seeking behaviour of faculty members of Rajabhat Universities in Bangkok. *Webology, 2*(4) Retrieved from http://www.webology.org/2005/v2n4/a20.html

132. Penttinato, J. R. (2007). Legal information, the informed citizen and the FDLP: The Role of Academic Law Librarians in promoting democracy. *Law Library Journal 99* (4), 695-716 Retrieved from http://www.lexisnexis.com/lnacui2api/results/docview/docview.do?docLinkInd=true&risb=21_T26388671768&format=GNBFI&sort=RELEVANCE&startDocNo=1&resultsUrlKey=29_T26388671772&cisb=22_T26388671771&treeMax=true&treeWidth=0&selRCNodeID=3&nodeStateId=411en_US,1,2&docsInCategory=3&csi=145277&docNo=1

133. Pirolli, P. & Card, S. (1999). Information foraging. *Psychological Review, 106*(4), 643-675. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.129.3140&rep=rep1&type=pdf

134. Prasad, H.N., and Tripathi, M. (1998). Information seeking behaviour of physical scientists: A report. *Annals of Library Science and Documentation, 45* (2), 41-48. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/27504/1/ALIS%2045%282%29%2041-48.pdf

135. Purnima and Vikas, C. (2005) information needs in higher education : a study of college faculties in Manipur. *ILA Bulletin, 41*(2), 16-19.

136. Qureshi, T. M., Iqbal, J. and Khan, M. B. (2008). Information needs and intermation seeking behaviour of students in universities of Pakistan. *Journal of Applied sciences Research 4*(1), 40-47.

137. Rai, P (2013) Information Seeking Behaviour of Legal Researcher towards use of Electronic legal Resource. A study 9th International CALIBER- INFLIBNET, centre Gandhinagar, Gujarat, pp 62-73.

138. Ramesh, D. B. and Sahoo, S. K. (2012). Information seeking behaviour of faculty members of ICFAI business school, Hyderabad. *International Journal of Information Dissemination and Technology, 1*(4), 223-227. Retrieved from http://www.ijidt.com/index.php/ijidt/article/viewFile/39/39

139. Ranganadham, S. and Surendra Babu, K. (2012). Awareness and use of Library. Information Resources and services in osmania University, Hyderabad. *International Journal of Library and Information Studies, 2* (3), 42-54. Retrieved from http://www.ijlis.org/img/2012_Vol_2_Issue_3/42-54.pdf

140. Rao, B. M. and Rao, P. S. (2012). Impact of Library Information services in Law institutional Libraries in India. *International journal of Multidisciplinary Educational Research, 1*(4), 140-150. Retrieved from http://ijmer.in/pdf/volume1-issue4-2012/140-150.pdf

141. Raza, M. M. and Upadhyay, A. K. (2006). Usage of e-journals by researchers in Aligrh Muslim University: A study. *The International Information and Library Review, 38,* 170-179. Retrieved from https://www.researchgate.net/profile/Ashok_Upadhyay2/publication/248577712_Usage_of_E-journals_by_researchers_in_Aligarh_Muslim_University_ A_study/links/5715c2e408ae16479d8ad4d3.pdf

142. Reach, C. S., Whelan, D., and Flood, M. (2003). Feasibility and viability of the Digital Library in Private Law Firm. *Law Library journal, 95* (3), 369-381. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj95&div=34 &start_page=369&collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

143. Reddy, S. (2010). Use of Information sources by research scholars: A case study of Gulbarga University. *Library Philosophy and Practice*, 317. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1322& context=libphilprac

144. Reddy, H. K. S. and Karisiddappa, C. R. (1997). Information seeking behaviour of the professional in the field of disabilities with special reference to mental handicapped in India. *Annals of Library Science and Documentation, 44*(2), 54-64. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/27517/1/ ALIS%2044%282%29%2054-64.pdf

145. Robert, R. (2011). The use of Non-MARC Metadata in AALL Libraries : A Baseline Study. *Law Library Journal, 103*(4), 631-658. Retrieved from https://www.researchgate.net/profile/Robert_Jr3/publication/228205034_The_u se_of_Non-MARC_Metadata_in_AALL_libraries_A_baseline_study/links/ 0046352cc8f93c399c000000/The-use-of-Non-MARC-Metadata-in-AALL-libraries-A-baseline-study.pdf?origin=publication_detail

146. Rolinson, J., Al-Shanbari, H., and Meadows, A. (1995). Information usage by Biological Researchers. *Journal of information sciences, 22(*1), 47-53. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi= 10.1.1.946.3291&rep=rep1&type=pdf

147. Santhi, L. and Radhakrishnan, N. (2014). Usage pattern of Electronic Resources among the Research scholars in Anna University of Technology, coimbotore and its Affiliated colleges. *IOSR Journal of Humanities and Social Science, 19* (7), *23 – 26.* Retrieved from https://www.researchgate.net/publication/272715967_

Usage_Pattern_of_Electronic_Resources_among_the_Research_Scholars_in_ Anna_University_of_Technology_Coimbatore_and_Its_Affiliated_Colleges

148. Saraf,V. (1990). Information Seeking Behaviour of Research Scholars in North Eastern Hill University,In J.C.,Chandel, A.S. & Saraf,V.(Eds.),*'Sociologists' in Social Science Information: Problems and Prospects*, (pp.354-359). New Delhi:Vikas Publishing House.

149. Sethi, A. R. (1987). Information seeking behaviour of Area specialists. *ILA Bulletin XXLL* (3-4), 153-155.

150. Sharma, H. P. (2008). Moving beyond Library automation: Role of E-Resources in academic Libraries. *University News, 46* (34), 6-10.

151. Shrivastava, R. K. (2008). Law Librarianship in India with Special Reference to the Judicial Library System. *International Journal of Legal Information, 36* (2), 275-299. Retrieved from http://scholarship.law.cornell.edu/cgi/viewcontent.cgi?article= 1139&context=ijli

152. Singh, K. P. (2012). Inforamtion Use, satisfaction and Difficulties: A case study of Agricultural scientists in India. *Library Philosophy and Practice,* 703. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article= 1777&context=libphilprac

153. Singh, K.P. (2007). Information seeking behaviour of Agriculture scientists working in the institutions in Delhi, and the Punjab Agricultural university, Ludhiana: A study. *Library Herald, 45* (4). 370-381. Retrieved from http://people.du.ac.in/~kpsingh/wp-content/uploads/2014/National/Library%20Herald/Information%20Seeking%20Behaviour%202007.pdf

154. Singh, N. and Mann, A. S. (2015). Information seeking behaviour of lawyers of the High Court of Punjab and Haryana: A case study. *International Research :*

*Journal of Library & Information Science, 5*(2), 224 – 238. Retrieved from http://irjlis.com/wp-content/uploads/2015/08/4-1R-277\52.pdf

155. Skelton, B. (1973) Scientists and social scientists as information users : A comparision of results of science user studies with the investigation into information requirements of the social science. *Journal of Librarianship and Information Science*, 5(2), 138-156. Retrieved from http://journals.sagepub.com/doi/abs/10.1177/ 096100067300500205

156. Solomon, P. (2002). Discovering information in context. *Annual Review of Information Science and Technology*, 36, 229-264. Retrieved from https://works.bepress.com/paul_solomon/29/download/

157. Girija Kumar (1990). Defining the concept of information needs. In J. C. Binwal, et. al. (Eds.). Social Science Information: Problems and prospects, New Delhi: Vikas.Publishing.

158. Srivastava, R. (2002). Information use pattern of Research in Chemistry: A citation study. *IASLIC Bulletin, 47* (4), 185-192. Retrieved from https://books.google.co.in/books?redir_esc=y&id=csfgAAAAMAAJ&focus=searchwithinvolume&q=Information+use+pattern+of+Research+in+Chemistry

159. Srivastava, V. and Tiwari, V. (2016). Information seeking behavior of the students of National Law University, Uttar Pradesh. *International Journal of Academic Research and Developemnt, 1* (11), 38-43. Retrieved from http://www.academicsjournal.com/archives/2016/vol1/issue11/1-12-11

160. Safahieh, H. and Singh, D. (2006). Information needs of international Students at a Malaysian University. *Asia Pacific Conference on Library and Information Education and Practice,* 479-485. Retrieved from http://arizona.openrepository.com/ arizona/bitstream/10150/105363/1/68.Hajar_Safahieh_pp479-485_.pdf

161. Makri, S., Blandford, A. & Cox, A. L. (2008). Investigating the information-seeking behaviour of academic lawyers: From Ellis's model to design. *Information Processing and Management, 44*(2), 613-634. Retrieved from http://openaccess.city.ac.uk/2353/1/Investigating%20the%20informationseeking%20behaviour%20of%20academic%20lawyers.pdf

162. Street, L. A. and Runyon, A. M. (2010). Finding the Middle Grand in collection Development; flow Academic Law Libraries can shape. Their collection in Response to the call for More practice- oriented Legal Education. *Law Library Journal, 102* (3), 399-439. Retrieved from http://scholarship.law.georgetown.edu/cgi/viewcontent.cgi?article=1304&context=facpub

163. Siddiqui, S. (2011). Information seeking Behaviour at B Tech. and M.B.B.S students in Lucknow: A Comparative study. *International Research: Journal of Library and Information Science, 1* (1), 55-69. Retrieved from http://irjlis.com/wp-content/uploads/2011/11/IR016.pdf

164. SudhaRani, Y. (2014). News Paper Reading Habits of Vikrama Simhapuri University Students : A Study. *Journal of Advances in Library and Information Science,* 3(2), 116-120. Retrieved from http://jalis.in/pdf/3-2/Sudharani.pdf

165. Summer, F. G. et. al. (1984). Information needs in local authority social services departments: preliminary review. *Journal of librarianship and information science,10* (1).

166. Suriya, M., Sangeetha, G. and Nambi, M. A. (2004), Information-Seeking Behaviour of Faculty Members from Government Arts Colleges in Cuddalore District. *Library and information Networking (NACLIN 2004),* 285-292.

167. Sutcliffe, A. and Ennis, M. (1998). Towards a Cognitive theory of information Retrieval. *Interacting with Computer. 10,* 321-351. Retrieved from https://www.researchgate.net/publication/259703580_Towards_a_cognitive_theory_of_IR

168. Tackie, S. N. and Adams, M. (2007). Information, Needs and seeking Behavioural of Engineer in Ghana; A care study of the volta River. *Authority African Journal of Library, Archival and Information Science*, *17* (2), 69-78

169. Taylor, R. S. (1991). Information use environment In B. Dervin (Ed.) Progress in Communication Sciences, *10*. 217-225 Norwood, NJ: Ablex. Retrieved from http://hib510week9.pbworks.com/w/page/36541079/Taylor%20-%20Information%20Use%20Environments

170. Tenopir, C., and King, D. W. (2009). Electronic journals and changes in scholarly article seeking and reading patterns. *D-Lib Magazine, 14,* (11/12). Retrieved from http://www.dlib.org/dlib/november08/tenopir/11tenopir.html

171. Thanuskodi, S. (2009). Information seeking Behaviour of Law faculty at central Law College Salem. *Library Philosophy and Practice, 282.* Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1285&context=libphilprac

172. Thanuskodi, S. (2010). Effective use of e-resource materials among practicing lawyers of Madras high court. *International Journal of Library and Information Science, 2* (4), 72-82. Retrieved from http://cileseerx.ist.psu.edu/viewdoc/download/doi=10.1.1.948.1943andrep=rep1&type=pdf.

173. Thanuskodi, S. (2012). The information needs and seeking behaviour of the Tamil Nadu Dr. Ambedkar Law University faculty members. *International Journal of Information Science, 2*(4), 42-46. Retrieved from http://article.sapub.org/pdf/10.5923.j.ijis.20120204.03.pdf

174. Thomson West Corporation (2007). *Research skills for Lawyers and Law students- A whitepaper.1-12* Retrieved from http://nsulaw.typepad.com/novalawcity/files/town_hall_legal_research_white_paper1_2.pdf

175. Tilak, H. (2005). Information use pattern of Indian forestry scientists: A bibliographic study. *Annals of Library and Information Studies, 52* (2), 68-75. Retrieved from http://nopr.niscair.res.in/bitstream/123456789/3988/1/ALIS%2052(2)%2068-75.pdf

176. Tuhumwire, I. and Obura, C. O. (2010). Assessment of legal information needs and access problems of lawyers in Uganda. *Library Philosophy and Practice,* 382. Retrieved from http://digitalcommons.unl.edu/cgi/viewcontent.cgi?article=1394&context=libphilprac

177. Tung, G. B. (2013). Academic Law Libraries and the Crisis in Legal Education. *Law Library Journal, 105* (3), 275-303. Retrieved from https://rucore.libraries.rutgers.edu/rutgers-lib/49213/PDF/1/play/

178. Vale, M. F. (1988). *Information structure and information seeking behaviour of the Lawyers.* (Unpublished Ph.D. Dissertation). Stanford University, USA.

179. Vyas, S. D. (2010). Role of Academic Law Libraries with Special Reference to NALSAR (National Academy of Legal Studies and Research) University of Law Library, Hyderabad. *Library Herald, 48*(1), 12-24. Retrieved from Available at : http://www.indianjournals.com/ijor.aspx?target=ijor:lh&volume=48&issue=1&article=002

180. Walker, D. C. (2013). A Third place for the Law Library integrating Library services with academic support programmes. *Law Library Journal, 105*(3), 353-368. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj105&div=25&start_page=353&collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

181. Wang, I. and Frank, D. (2002). Cross cultural communication: implication for effective information services in academic libraries. *Portal: Libraries & The Academy, 2* (2), 207-216. Retrieved from http://pdxscholar.library.pdx.edu/cgi/viewcontent.cgi?article=1063&context=ulib_fac

182. Whiteman, M. (2014). Book burning in the twenty first century: ABA standard 606 and the future of Academic Law Libraries at the smok clear. *Law Library Journal, 106* (1), 11 - 46. Retrieved from http://heinonline.org/HOL/Page?handle=hein.journals/llj106&div=6&start_page=11&collection=journals&set_as_cursor=0&men_tab=srchresults

183. Wilkinson, M. A. (2001). Information sources used by lawyers in problem solving: An empirical exploration. *Law Publications, 23*, 257 – 276. Retrieved from http://ir.lib.uwo.ca/cgi/viewcontent.cgi?article=1056&context=lawpub

184. Willioms, P. (1999). The net generation: The experiences, attitudes and behaviour of children using the internet for their own purposes. *ASLIB Proceding, 51* (9), 315-322. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/abs/10.1108/ EUM0000000006991

185. Wilson, T. D. (1981). On user studies and information needs. *Journal of Documentation, 37*(1), 3-15. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/eb026702

186. Wilson, T. D. (1997). Information behaviour : An interdisciplinary perspective. *Information Processing Management*, 33(4),551-572. Retrieved from http://www.informationr.net/tdw/publ/papers/1997IP&M.pdf

187. Wilson, T. (1999). Models of Information Behavior Research. *Journal of Documentation, 55*(3). 249-270. Retrieved from http://www.emeraldinsight.com/doi/pdfplus/10.1108/EUM0000000007145

188. Wilson, T. D (2006). A re-examination of information seeking behavior in the context of activity theory. *Information Research, 11* (4), 11-14. Retrieved from http://www.informationr.net/ir/11-4/paper260.html

189. Wilson, T. D. (2006). Information seeking behaviour and the digital information world. *Information Research: An International Electronic Journal, 30* (3). Retrieved from http://www.informationr.net/tdw/publ/papers/2004ISBandDigitalInfo.html

190. www.shodhganga.inflibnet.ac.in

191. Yadamsuren, B. (2007). *Report of the study on information needs of Mangolian Scholars*.USA:School of Information Science and Learning Technologies University of Missouri-Columbia,1-23. Retrieved from http://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/ download?doi=10.1.1.520.4267&rep=rep1&type=pdf

192. Yemisi, O. D., Janneke, M. B. and Ochalla, D. N., (2012). Information seeking behaviour of law students in developing country: A literature review. SCESAL *XXth conference hosted by KLA*. 41-52. Retrieved from http://www.lis.uzulu.ac.za/ research/2012/Yemisi%20and%20Mostert%20SCECSAL,%20UZ,%207.pdf

193. Yuvan, W. (1997). End user searching behavior in information retrieval : A longitudinal study. *Journal of the American Society for Information Science and Technology, 48* (3), 218 - 234. Retrieved from http://onlinelibrary.wiley.com/doi/10.1002/(SICI)1097-4571(199703)48:3%3C218::AID-ASI4%3E3.0.CO;2-%23/abstract

**Books :**


1. Borah, M. N. (1990). Social Science information Needs of Extension Education Scientists and students of Agricultural University. In J.C. Binwad., V. Sarat., and A. S. Chandel (Eds.), *Social science information: Problem and prospects.* New Delhi: Vikas Publishing House.

2. Kumar, P.S.G. (2002). Student's Manual of Library and Information Science. New Delhi : B. R. Publishing Corporation.

3. Mersky, R. L. and Dunn, D. J. (2002). Fundamentals of Legal Research. New York: Foundation Press.


❑❑

# प्रकरण चौथे

# माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

## 4.1 प्रस्तावना :

शिक्षणक्षेत्रामध्ये, विधी शिक्षणक्षेत्राला एक महत्त्वाचे स्थान आहे आणि विधी शिक्षणक्षेत्रात माहिती हा महत्त्वाचा घटक मानला जातो. या कारणास्तव इतर व्यवसायापेक्षा विधी शिक्षणाचा माहितीवर अधिक भर आहे आणि म्हणून विधी ग्रंथपालांनी उपभोक्ते कोणत्या प्रकारची माहिती मागवितात याबद्दल जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यांच्या विविध गरजांप्रमाणे ती माहिती त्यांना कशी मिळविता येईल त्या माहितीचे प्रसारण जास्तीतजास्त कसे करता येईल याकडे लक्ष केंद्रीत करणे निकडीचे आहे म्हणून ग्रंथालय–उपभोक्त्यांच्या माहितीच्या गरजा आणि माहिती शोध वर्तन हे सध्याचे अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

विधी विद्यार्थी आणि इतर वाचकांनी ग्रंथालयाचा पुरेपूर वापर करणे अपेक्षित आहे. उपभोक्त्यांना प्रत्यक्ष संग्रह हाताळताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते कारण माहिती वापरण्यासाठीची साक्षरता त्यांच्याकडे नसू शकते, संसाधनांची पुरेशी माहिती नसते अशा समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय शोधण्यासाठी त्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

संशोधन कार्यांमध्ये माहितीचे विश्लेषण हा एक महत्त्वाचा भाग गणला जातो. सदर संशोधनात विधी विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तणुकीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. अभ्यासासाठी (पाच वर्षाचा अभ्यासक्रमा असणारी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत येणारी सर्व विधी महाविद्यालये, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीअंतर्गत येणारी विधी महाविद्यालये व अभिमत विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या विधी महाविद्यालयांचा समावेश करण्यात आला आहे.

माहितीचे संकलन करून त्याचे विश्लेषण सदर प्रकरणामध्ये करण्यात आले आहे. सामाजिक शास्त्रात वापरले जाणारे सांख्यिकीय सॉफ्टवेअर (SPSS) माहितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात आले आहे. यामध्ये उपभोक्त्यांची सर्वसाधारण माहिती अंतर्भूत करण्यात

आली आहे. माहिती शोध वर्तणूक, माहितीचा वापर, माहिती मिळविण्यातील समस्या, उपभोक्त्यांचे ग्रंथालयासंदर्भात मत, माहिती संप्रेषण तंत्राचा, तंत्रज्ञानांचा माहिती शोध वर्तणुकीवर पडणारा प्रभाव या बाबीसंदर्भात अभ्यास करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी प्रतिसादक निवडण्यासाठी सेन्सेस नमुना निवड पद्धती वापरण्यात आली. एकूण तिन्ही विद्यापीठाअंतर्गत विधी महाविद्यालयांतील अंतिम सत्राच्या (पाच वर्षाचे विद्यार्थी)1681 विद्यार्थ्यांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले. त्यापैकी 1455 प्रश्नावलींना प्रतिसाद प्राप्त झाला. एकूण प्रतिसाद दर 86.55% आहे.

संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण या प्रकरणातील पुढील भागांमध्ये खाली निर्देशित केल्याप्रमाणे मांडण्यात आले आहे.

विभाग अ :– विद्यार्थ्याची सर्वसामान्य माहिती

विभाग ब :– ग्रंथालयाच्या सेवा आणि वापर

विभाग क :– उपभोक्त्याची माहितीची गरज

विभाग ड :– माहिती शोध वर्तणूक

विभाग इ :– माहिती शोध वर्तनावर माहिती तंत्रज्ञानाचा पडणारा प्रभाव.

वर प्रस्तुत केलेल्या पाच शीर्षकांनुसार संबंधित माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केलेले आहे.

## 4.2 विभाग अ : विद्यार्थ्यांची सर्वसामान्य माहिती :

### सर्वसाधारण माहिती :

संशोधनाला सुरुवात करीत असताना अभ्यासकाला आपल्या संशोधनाचे उपभोक्त्यांबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. प्रस्तुत अभ्यासामध्ये सर्वसाधारण माहिती संदर्भात, संबंधित विद्यार्थ्याचे नाव, ज्या महाविद्यालयामध्ये ते शिक्षण घेत आहेत त्या महाविद्यालयाचे नाव, उपभोक्त्यांचे वय, लिंगभेद इत्यादी प्रश्नांची विचारणा अभ्यासासंदर्भात करण्यात आली.

हे प्रश्न विचारण्यामागचा उद्देश असा की, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या दोन्ही समूहाला सदर अभ्यासात स्थान देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक 4.1**

**सर्वसाधारण माहिती**

| **लिंग** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| विद्यार्थिनी | 625 | 43% |
| विद्यार्थी | 830 | 57% |
| **एकूण** | **1455** | **100%** |

वरील तक्ता क्र. 4.1 वरून निदर्शनास येते की, तिन्ही विद्यापीठांशी संलग्न विधी महाविद्यालयांमध्ये पाचव्या वर्षाच्या अभ्यासक्रमास 625 (43%) विद्यार्थिनी तर 830 (57%) विद्यार्थी शिकत आहेत.

**तक्ता क्रमांक 4.2**

**अंतिम वर्षाची वयोमर्यादा**

| **वय वर्षे** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| 23, 24 वर्षे | 1236 | 85% |
| 25 वर्षे | 219 | 15% |
| **एकूण** | **1455** | **100%** |

सर्वसाधारण विधी अभ्यास करणारे उपभोक्ते कोणत्या वर्षी विधी अभ्यास पूर्ण करतात हे माहीत करून घेण्याच्या उत्सुकतेने विद्यार्थ्यांचे वय विचारण्यात आले होते. विधी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासंबंधी वयोमर्यादा ( 20 वर्षापर्यंत ) बार कौन्सिल ऑफ इंडियाने निश्चित केल्याने विधी अभ्यासक्रम पूर्ण होण्याची वयोमर्यादा 23 ते 24 वर्षे आहे, हे निदर्शनास आले.

वरील तक्ता क्र. 4.2 वरून निदर्शनास आले की, 23, 24 वर्षे वय असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 1236 (85%) असून, 25 वर्षे वय असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 219 (15%) आहे.

## 4.3 विभाग ब : ग्रंथालयाच्या सेवा आणि वापर :

**प्रतिसादकांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह :**

सदर अभ्यास करीत असताना प्रतिसादकांना विचारण्यात आले की, त्यांच्याकडे स्वतःचा ग्रंथसंग्रह, नियतकालिके आहेत की नाही. स्वतःचा संग्रह असणे ही बाब त्याची अभ्यासाबद्दलची चिकित्सा, जिज्ञासा दर्शविते. संबंधित प्रश्नाचा प्रतिसाद आलेख क्रमांक 4.1 मध्ये दिला आहे.




वरील आलेख क्र. 4.1 मधील माहितीवरून लक्षात येते की, मोठ्या प्रमाणात प्रतिसादकांकडे स्वतःचा ग्रंथसंग्रह नाही. 1455 प्रतिसादकांपैकी केवळ 484 (33.3%) कडे स्वतःचा संग्रह आहे तर 971 (66.7%) प्रतिसादकांकडे स्वतःचा खाजगी स्वरूपातील संग्रह उपलब्ध नाही. याचा अर्थ असा आहे की, उपभोक्ते मोठ्या प्रमाणावर महाविद्यालयीन ग्रंथालयावर अवलंबून आहेत. त्यामुळे महाविद्यालय ग्रंथालयाला विद्यार्थी आणि ग्रंथालय संग्रह यांचा मेळ निश्चित करणे आवश्यक आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाने (2016) आपल्या पुस्तिकेत महाविद्यालयाकडे/विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांच्या प्रमाणात संग्रह असणे आवश्यक आहे असे नमूद करून प्रत्येक विद्यार्थ्यास किती ग्रंथसंग्रह वापरण्यास मिळणे आवश्यक आहे हे अधोरेखित करून दिले आहे.

प्रतिसादकांकडे त्यांचा स्वतःचा संग्रह उपलब्ध आहे तो 484 (33.3%) असल्याचे निर्धारित केले आहे. परंतु प्रत्यक्षात प्रत्येकाकडे अगदीच तुटपुंजे म्हणजे 5 ते 10 ग्रंथ असल्याचे नमूद केले आहे. यावरून विधी अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षाचा अभ्यास करणाऱ्या प्रतिसादकांकडे स्वतःचा ग्रंथसंग्रह अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते.

प्रतिसादकांकडे स्वतःचा ग्रंथ संग्रह नसण्याची अनेक कारणे असू शकतात. ग्रंथांच्या किंमती हे त्यामागील एक कारण असू शकते. इतर सामाजिक शास्त्राच्या तुलनेत विधी ग्रंथ सामान्यपणे महाग असतात. ते विकत घेणे प्रत्येक प्रतिसादकास परवडण्यासारखे नाही. ते त्यांच्या आवाक्याबाहेर असू शकते. तसेच असेही असू शकते की, ग्रंथखरेदीवर पैसे खर्च करण्याची विद्यार्थ्यांची मनोवृत्ती नसावी. अशा पार्श्वभूमीवर विधी महाविद्यालय/विद्यापीठ ग्रंथालयांनी पुरेसा ग्रंथसंग्रह संकलित करणे अपेक्षित आहे.

**विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेटीची वारंवारिता :**

विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी पारंपारिक तसेच ई–ग्रंथालयाला किती वेळा भेट देतात हे माहिती करून घेणे फार आवश्यक आहे. विधी ग्रंथालयाला नियमितपणे नवनवीन वाचन साहित्याचा ग्रंथालयात अंतर्भाव करावा लागतो. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाला नियमितपणे भेट देऊन आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे निकडीचे आहे. त्यांच्या ग्रंथालय भेटीमुळे त्यांचा विकास होण्यास मदत होते.

काही माहितीची साधने ही फक्त ग्रंथालयातच उपलब्ध असतात. कारण ग्रंथालयाने ती वेळोवेळी खरेदी केलेली असतात. इंटरनेटवर त्यांची उपलब्धता नसते. ग्रंथालयात आल्याशिवाय विद्यार्थ्यांना त्यातील प्रचलित माहिती मिळू शकत नाही. या कारणास्तव विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेटीची वारंवारिता माहीत करून घेण्यासाठी प्रस्तुत प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. त्याला मिळालेला प्रतिसाद आलेख क्रमांक 4.2 मध्ये दिला आहे.

आलेख क्र. 4.2

विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेटीची वारंवारिता




वरील आलेख क्र. 4.2 वरुन निदर्शनास येते की, 757(52.03%) विद्यार्थी ग्रंथालयात दररोज येतात. त्यानंतर 203(13.95%) विद्यार्थी आठवड्यातून एकापेक्षा जास्त वेळा ग्रंथालयाला भेट देतात. तिसऱ्या स्थानावर प्रासंगिक ग्रंथालयाला भेट देण्याऱ्याचे प्रमाण 142 (9.76%) आहे.

विधी शाखेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास विधी ग्रंथालय उपभोक्त्यासाठी एक प्रयोगशाळाच असते. विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर ग्रंथालय साहित्यावरच अवलंबून असतात. विधी अभ्यासक्रम पूर्णतः व्यावसायिक आहे आणि व्यावसायिक अभ्यासासाठी वरील तक्त्यात दर्शविलेली आकडेवारी संशोधकाला समाधानकारक वाटत नाही. यावरुन सिद्ध होते विधी ग्रंथालयातील उपभोक्ते व्यावसायिक अभ्यासासाठी पारंपारिक ग्रंथालयाचा हवा तितका वापर करीत नाही, त्यांचे वापराचे प्रमाण अल्प दिसते.

ई–ग्रंथालयाच्या आकडेवारीवरुन असेही निदर्शनास येते की, आठवड्यातून एकापेक्षा जास्त वेळा ई–ग्रंथालयाला भेट देण्याचे प्रमाण सर्वात जास्त 707 (48.59%) आहे. याचे कारण असू शकते की छापील संग्रहातून माहितीची उपलब्धता नसल्यास विद्यार्थी ई–ग्रंथालयाला भेट देत असावेत. प्रासंगिक ई–ग्रंथालयात येणाऱ्याचे प्रमाण 71 (4.88%) अत्यंत अल्प असल्याचे

कारण असू शकते की प्रतिसादकांना ई–ग्रंथालय कौशल्याची कमतरता प्रशिक्षणाचा अभाव असू शकतो. अशा विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयाने ई–उपक्रमाद्वारे वेळोवेळी सराव करुन घ्यावा. त्यामुळे त्यांच्या कौशल्यात भर पडून ई–ग्रंथालयाचा वापर वाढू शकतो.

वरील विश्लेषणावरुन निदर्शनास येते की, एकूण 1455 विद्यार्थ्यांपैकी केवळ 127 (8.73%) उपभोक्ते ई–ग्रंथालयाला रोज भेट देतात. 90% पेक्षा जास्त उपभोक्ते ग्रंथालयाचा वापर दररोज करीत नाही.

या संदर्भात ग्रंथालयाने अनेक उपभोक्ता प्रशिक्षणाचे आयोजन वेळोवेळी करुन उपभोक्त्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना ई–ग्रंथालय वापरण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे. सदर प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.3 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.3**

**पारंपारिक आणि ई–ग्रंथालयांना भेट देणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या**

| वारंवारिता | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| दररोज | 101 | 6.94 |
| आठवड्यातून एकदा | 12 | 0.82 |
| आठवड्यातून एकापेक्षा जास्त वेळा | 0 | 0 |
| पंधरा दिवसातून एकदा | 08 | 0.55 |
| महिन्यातून एकदा | 11 | 0.76 |
| प्रासंगिक | 05 | 0.34 |
| **एकूण** | **137** | **9.42** |

वरील तक्ता क्र. 4.3 वरून असे निदर्शनास येते की, 1455 प्रतिसादकांपैकी 137 (9.42%) उपभोक्ते पारंपारिक आणि ई–ग्रंथालय या दोन्हींनाही भेटी देतात. दररोज दोन्ही ग्रंथालयांना भेट देण्याचे प्रमाण 101(6.94%) आहे. आठवड्यातून एकदा 12 (0.82%) प्रतिसादक दोन्ही ग्रंथालयांना भेटी देतात. तर आठवड्याला एकापेक्षा जास्त वेळा भेटण्यासाठी संशोधकाला कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

विधी शिक्षणक्रमाचे माहितीचे काही प्रतिसादक जरी दोन्ही ग्रंथालयांना एकाचवेळी भेट

देत असले तरी त्यांच्या भेटीचे प्रमाण हे अतिशय अल्प असल्याचे संशोधकास निदर्शनास येते. पारंपारिक ग्रंथालयाला आणि ई–ग्रंथालयाला स्वतंत्र भेट देणाऱ्या प्रतिसादकांचे मिळालेले प्रतिसाद आलेख क्रमांक 4.3 मध्ये दिला आहे.

**ग्रंथालयांना (पारंपारिक तसेच ई–ग्रंथालय )दररोज भेट देणारे विद्यार्थी :**

पारंपारिक ग्रंथालय व ई–ग्रंथालय वापरण्यासाठी विद्यार्थी दररोज सरासरी किती वेळ देतात हे माहित करून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता. विधी ग्रंथालयात संग्रह विकास सातत्याने होत असतो त्यामध्ये फार बदल होत असतात. बदलाचे स्वरूप माहित करून घेण्यासाठी ग्रंथालयात जाणे निकडीची बाब आहे हा दृष्टीकोन ठेवून सदर प्रश्नाची विचारणा केली. एकूण 1455 विद्यार्थ्यांपैकी 757 (52.03%) विद्यार्थी पारंपारिक ग्रंथालयाला रोज भेट देतात. 127 (8.83%) ई–ग्रंथालयाला भेट देतात. या दोन्ही प्रकारच्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थी दररोज किती वेळ व्यतीत करतात याचे विश्लेषण आलेख क्रमांक 4.3 मध्ये येईल.




वरील आलेख क्र. 4.3 वरून निदर्शनास येते की, बहुतांश प्रमाणात उपभोक्ते 351(24.12%) एक ते दोन तास ग्रंथालयात व्यतीत करतात. त्याखालोखाल पाच व त्यापेक्षा जास्त तास व्यतीत करण्याच्या विद्यार्थ्यांचा 144(9.90%) क्रम लागतो. तीन ते चार तास ग्रंथालयात व्यतीत

करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 125(8.59%) आहे. ग्रंथालयात अर्धा तासापेक्षा कमी वेळ व्यतीत करणारे विद्यार्थी अतिशय अल्प 48(3.30%) आहेत.

ग्रंथालयात दररोज एक ते दोन तास व्यतीत करणाऱ्या विद्यार्थ्यांची सर्वाधिक 24.12% आहे. त्याची कारणमीमांसा करावयाची झाल्यास विद्यार्थ्यांना संशोधनपर लेख लिहावे लागतात. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावयाचा असतो, स्वतः अभ्यास करावयाचा असतो, तसेच त्यांना प्लेसमेंटला सामोरे जावे लागते. या कारणास्तव ते ग्रंथालयात इतर पर्यायांपेक्षा अधिक वेळ व्यतीत करतात.

अर्धा तास ते एक तास वेळ ग्रंथालयात व्यतीत करण्याचे विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प 3.30% ते 6.12% दिसून येते. त्याचे कारण असू शकते की, त्यांचे वेळाप्रत्रक हे अगदी काठोकाठ असू शकते. त्यातून वेळ काढणे शक्य होत नसावे. संशोधनातील विद्यार्थी शेवटच्या वर्षाला असल्याने प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून Internship करीत असतात. त्यांना दोन्हीकडचे वेळापत्रक सांभाळावे लागत असते. त्यामुळे ग्रंथालयाचा ते हवा तितका वापर करू शकत नाही. असेही असू शकते की त्याचे राहण्याचे ठिकाण आणि ग्रंथालयाचे ठिकाण हे फार दूरवर असू शकते, असेही असू शकते की, त्यांना ग्रंथालयाचा वापर करताना अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने त्याचा परिणाम ग्रंथालय न वापरण्यावर होऊ शकतो. अशी ही शक्यता असू शकते की, विद्यार्थ्यांच्या क्लासेसचा आणि ग्रंथालयाचा वेळ हा सारखाच असल्याने ते ग्रंथालयाचा वापर अत्यंत अल्प प्रमाणात करीत असावेत.

ई–ग्रंथालय अर्धा तास ते एक तास वापरण्याचे प्रमाण जास्त 3.85% आहे. त्याखालोखाल एक ते दोन तास 2.89% विद्यार्थी सरासरी वेळ ग्रंथालयात दररोज व्यतीत करतात. इतर पर्यायांना विद्यार्थ्यांनी अतिशय अल्प प्रतिसाद दिला आहे.

त्याची कारणमीमांसा करावयाची झाल्यास असे असू शकते की, विद्यार्थ्यांना ई–ग्रंथालय वापराचे प्रशिक्षण अवगत नसल्याकारणाने ते ई–ग्रंथालयाचा वापर करण्याकडे दुर्लक्ष करीत असावेत अथवा ग्रंथालयात ई–ग्रंथालय वापराच्या पायाभूत सुविधांचा अभाव असावा. यावरून हे सिद्ध होते की,विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ई-ग्रंथालयाचा अर्धा ते एक तास वापर पुरेसा होतो.

**ग्रंथालयाला भेट देण्याचा हेतू :**

जीवनामध्ये प्रत्येक कार्य पार पाडण्यामागे काहींना काही हेतू असतो. हेतुशिवाय कोणतेही कार्य पूर्णत्वास नेता येत नाही अन्यथा कार्य अपुरे राहते व कार्याची पूर्णता होत नाही. विधी ग्रंथालयाचे उपभोक्तेही याला अपवाद नाहीत ते विधी महाविद्यालय ग्रंथालयाला भेटी देतात. त्या भेटीचा हेतू समजणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या भेटीचा हेतू माहीत करून घेण्यासाठी प्रस्तुत प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. ग्रंथालय वापरासंबंधी मुख्य कारणांची मीमांसा करण्यासाठी प्रतिसादकांना एकापेक्षा जास्त हेतू अधोरेखित करण्याची विनंती करण्यात आली. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्रमांक 4.4**

**ग्रंथालय भेटीचा हेतू**

| क्र. | हेतू | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | माहितीचे संकलन करण्यासाठी | 483 | 33.19% |
| 2. | अभ्यास करण्यासाठी | 762 | 52.37% |
| 3. | ग्रंथांचा वापर करण्यासाठी | 1035 | 71.13% |
| 4. | नियतकालिके/मासिके वापरण्यासाठी | 380 | 26.11% |
| 5. | अहवाल/प्रोसिडिंग्ज वापरण्यासाठी | 466 | 32.02% |
| 6. | प्रबंध वापरण्यासाठी | 188 | 12.92% |
| 7. | बातम्या,नवीन ग्रंथ,ग्रंथाच्या नवीन आवृत्या माहीत करून घेण्यासाठी | 882 | 60.61% |
| 8. | ग्रंथाची देवघेव/नूतनीकरण करण्यासाठी | 983 | 67.56% |
| 9. | सामान्य ज्ञान अद्ययावत करण्यासाठी | 230 | 15.80% |

वरील तक्ता क्र. 4.4 वरून असे निदर्शनास येते की, सर्वात जास्त 1035 (71.13%) प्रतिसादक ग्रंथाचा वापर करण्यासाठी ग्रंथालयाला भेट देतात. विधी ग्रंथालयाचा उपभोक्ता हा पूर्णतः ग्रंथालयातील ग्रंथांवर अवलंबून असतो. वेळोवेळी त्यांना जे गृहपाठ दिले जातात त्यासाठी ग्रंथांची आवश्यकता भासत असते तसेच केसेसचे निकाल मूटकोर्ट स्पर्धेची तयारी यासाठी, संशोधन करण्यासाठी, संशोधनपर लेख लिहिण्यासाठी नविन कायद्यातील सुधारीत आवृत्ती पाहण्यासाठी कायद्यातील बदलांची माहिती करून घेण्यासाठी विद्यार्थी ग्रंथांचा सर्वात जास्त वापर

करीत आहेत. ग्रंथाची देवघेव आणि त्यांचे नूतनीकरण करण्याच्या उद्देशाने 983 (67.56%) प्रतिसादकांचा प्रतिसाद प्राप्त झाला तर तिसरा प्रतिसाद प्रचलित बातम्या नवीन ग्रंथाचे आगमन व नवीन ग्रंथांच्या आवृत्ती पाहण्यासाठी प्रतिसादक ग्रंथालयांना भेटी देतात. प्रबंधाचा वापर करण्यासाठी 188 (12.92%) प्रतिसाद मिळाला हा प्रतिसाद अल्प आहे. विधी अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षात शिकणारे प्रतिसादकांना प्रासंगिक प्रबंधाची गरज भासते. संशोधनपर लेख लिहीण्यासाठी तसेच साहित्याची अनउपलब्धता असल्यास प्रबंधाच्या साहाय्याने माहिती मिळवितात. उदा. सरोगसी या विषयावर फारच कमी प्रमाणात साहित्य प्रकाशित झाले आहे. परंतु त्याविषयावरील साहित्याचा वापर प्रबंधांच्या माध्यमातून केला जातो. प्रतिसादक प्रबंधाचा वापर कमी प्रमाणात केल्याचे आढळते. विधी महाविद्यालयीन ग्रंथालयाकडे बहुदा प्रबंध उपलब्ध नसतात हेही त्याचे कारण असू शकते.

वरील आकडेवारीतून निदर्शनास येते विधी ग्रंथालयातील उपभोक्ते नियतकालिके आणि मासिकांचा वापर करण्याच्या हेतूने अल्प प्रमाणात 380 (26.11%) ग्रंथालयाला भेट देतात. विधी शाखेचा अभ्यास हा व्यावसायिक अभ्यास आहे. व्यावसायिक अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना नियतकालिके आणि मासिके या साधनांमधून प्रचलित संशोधनपर माहिती वेळोवेळी उपलब्ध होत असते. विधी ग्रंथालयाचे उपभोक्ते या साधनांकडे दुर्लक्ष करीत आहेत असे वाटते.

नियतकालिके आणि मासिके यांचा योग्य वापर होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयाने योग्य पाऊल उचलणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी वर्गामध्ये संशोधनपर लेख, केसेस, अहवाल या संदर्भात चर्चा केल्यास, विद्यार्थी नियतकालिके वापरण्यासाठी अधिक प्रमाणात ग्रंथालयात येतील.

वरील तक्यावरून असे लक्षात येते की, सुमारे 52% विद्यार्थी अभ्यासासाठी ग्रंथालयात येतात, ही बाब स्वागतार्ह आहे. ग्रंथालये त्यांना समाधानकारक अभ्यासिकेची सोय उपलब्ध करून देत असल्यामुळेच अधिक संख्येने विद्यार्थी अभ्यासिकेचा वापर करताना दिसून येते.

शिवाय सुमारे 61% विद्यार्थी बातम्या आणि नवीन ग्रंथ माहीत करून घेण्यासाठी ग्रंथालयास भेट देतात. याचा अर्थ, स्वतःला माहितीबाबत अद्ययावत ठेवण्यासाठी विधी ग्रंथालये उपयुक्त ठरतात, असा विश्वास विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वाटतो.

**संगणक आधारित सेवा वापरण्याचे हेतू :**

ग्रंथालय पुरवित असलेल्या संगणक आधारित सेवा वापरण्याचा हेतु उपभोक्त्यांना स्पष्ट करण्यास सांगण्यात आले होते. विद्यार्थी संगणक आधारित सेवांचा आधार घेतात की नाही आणि घेत असल्यास कोणत्या सेवांचा आधार घेतला जातो; कोणत्या सेवांकडे दुर्लक्ष केले जाते अथवा वापरल्या जात नाहीत हे माहीत करून घेण्याच्या हेतुने सदर प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.5 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.5**

**संगणक आधारित सेवा वापरण्याचे हेतू**

| क्र. | संगणक आधारी सेवा वापरण्याचा हेतू | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | ओपॅक वापरण्यासाठी | 584 | 40.13% |
| 2. | डेटाबेस खेरीज ई–जर्नल्स वापरण्यासाठी | 562 | 38.62% |
| 3. | दस्तऐवजाचे स्कॅन /प्रिंट मिळविण्यासाठी | 561 | 38.55% |
| 4. | ई–बुक्स वापरण्यासाठी | 533 | 36.63% |
| 5. | डेटाबेसमध्ये वाचन साहित्य शोधण्यासाठी | 710 | 48.79% |
| 6. | ई–मेलची सुविधा वापरण्यासाठी | 701 | 48.17% |
| 7. | इंटरनेट वापरण्यासाठी | 819 | 56.28% |
| 8. | इतर | 19 | 1.30% |

तक्ता क्र. 4.5 वरून स्पष्ट होते की, इंटरनेट हे माध्यम नवीन माहितीचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. या माध्यमाच्या साहाय्याने जलद माहितीचे प्रसारण करण्यात येते. अल्पावधीत बहुसंख्य लोकांपर्यंत प्रचलित माहिती पोहचली जाते. विधी ग्रंथालयातील उपभोक्ते सर्वात अधिक प्रमाणात (56.28%) इंटरनेट सेवेचा लाभ घेतात. (48.79%) विद्यार्थ्यांचा डेटाबेस वापरण्याचा कल निदर्शनास येतो तर ई–मेल या संगणक आधारित सेवेला तिसऱ्या स्थानावर (48.17%) उपभोक्त्यांनी पसंती दर्शविली आहे. एकूण (38.62%) उपभोक्त्यांकडून ई–जर्नल्सचा वापर केला जातो. याचा अर्थ निम्म्यापेक्षा अधिक उपभोक्ते ई–जर्नलसमधील नवीन माहिती संदर्भात दुर्लक्षित असतात, ते यातून प्राप्त होणाऱ्या ज्ञानापासून वंचित राहतात.

विधी ग्रंथालयातील ओपॅकचा 584 (40.13%) उपभोक्त्यांकडून वापर केला जातो. इतर विद्यार्थी ग्रंथ शोधण्यासाठी ब्राउजिंग (प्रत्यक्ष कपाटावर ग्रंथ शोधणे) करत असतील किंवा ग्रंथ शोधण्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहण्याची शक्यता आहे.

**इतर ग्रंथालयांचा वापर :**

ग्रंथालय आकाराने लहान असो अथवा मोठे उपभोक्त्यांच्या सर्वच्या सर्व गरजा आणि आवश्यकता अनेक कारणांनी पूर्ण करू शकत नाही. त्यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे आर्थिक कारण होय. त्यामुळे ग्रंथालयावर फार मर्यादा येतात. विधी ग्रंथालये याला अपवाद नाहीत. आर्थिक कारणांमुळे विधी ग्रंथालये काही वेळा आवश्यक ते सर्व वाचन साहित्य, उपभोक्यांना उपलब्ध करून देऊ शकत नाहीत.

बहुतेक वेळा विधी ग्रंथालये विधी विषयाव्यतिरिक्त इतर वाचन साहित्य खरेदी करण्यास इच्छुक नसतात. परंतु विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मात्र असे वाचन साहित्य गरजेचे असू शकते. म्हणून विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, काही वेळा इतर ग्रंथालयाचा आधार घेतात. कदाचित इतर ग्रंथालये त्याची जास्तीची गरज भागवू शकतात. एकंदरीत, विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाशिवाय इतर ग्रंथालयांचा वापर करतात की नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती.

**तक्ता क्रमांक 4.6**

**इतर ग्रंथालयांना भेट**

| प्रतिसाद | प्रतिसादांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | 649 | 44.60% |
| नाही | 806 | 55.40% |
| **एकूण** | **1455** | **100%** |

वरील तक्ता क्र. 4.6 वरून असे निदर्शनास येते की (806) 55.40% विद्यार्थी आपल्या ग्रंथालयाव्यतिरिक्त इतर ग्रंथालयाचा वापर करत नाहीत. यावरून स्पष्ट होते की, विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयाच्या/विद्यापीठाच्या ग्रंथालयावर जास्त प्रमाणात अवलंबून असतात. याचे कारण असे असू शकते की, त्यांच्या महाविद्यालयाची/विद्यापीठांची

ग्रंथालये त्यांची माहितीची/वाचन साहित्याची गरज बऱ्यापैकी पूर्ण करतात. परंतु वरील तक्त्यातील आकडेवारीमधून हे ही लक्षात येते की, 649 (44.60%) विद्यार्थी इतर ग्रंथालयांचा वापर करतात. ही बाब विचारात घेता विधी ग्रंथालयांनी ग्रंथालय सहकार आंतरग्रंथालयीन देवघेव या सेवांचा अधिक वापर केला पाहिजे.




वरील आलेख क्र. 4.4 वरून हे लक्षात येते की, ग्रंथालयाचे उपभोक्ते, आपल्या अभ्यासाचे प्रतिसादक, कोणत्याही एका विशिष्ठ ग्रंथालयाचा वापर करीत नाही. त्यांच्या गरजा आणि आवश्यकतेप्रमाणे आणि सोयीनुसार ते वेगवेगळ्या ग्रंथालयांचा वापर करतात. इतर ग्रंथालयांमध्ये 250 (17.18%) उपभोक्ते सर्वात जास्त वापर सार्वजनिक ग्रंथालयाचा करीत असल्याचे दिसून येते. तर 32 (2.19%) उपभोक्त्यांनी ते इतर ग्रंथालयांचा वापर करीत असल्याचे नमूद केले.

**विद्यार्थ्यांची ग्रंथसंग्रहाबाबतची मते :**

विधी महाविद्यालय ग्रंथालयाने विधी शिक्षणाचा दूरदृष्टिकोन ठेवून आवश्यक महत्त्वाची माहिती, माहितीची साधने, स्त्रोत, ग्रंथालयात जास्तीत जास्त सामावून घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. विधी ग्रंथालय संग्रह असा असावा की त्यामुळे उपभोक्त्यांची गरज भागेल व

त्याचे समाधान होईल. छापील साहित्याबरोबर ई–स्वरूपातील साहित्यांचा ग्रंथालयात अंतर्भाव असला पाहिजे.

छापील व ई–स्वरूपातील साहित्याचा ग्रंथालय संग्रहातील समावेशामुळे ग्रंथालय साहित्य संग्रहाचे स्वरूप बदललेले आहे, असा मिश्र स्वरूपातील संग्रह ग्रंथालयात उपभोक्त्यांच्या गरजा निश्चित पूर्ण करतो. वरील दृष्टिकोन विचारात घेऊन प्रतिसादकांचे त्यांच्या ग्रंथालय संग्रहाविषयी मत विचारण्यात आले.

आलेख क्र. 4.5
ग्रंथसंग्रहाविषयी मत




वरील आलेख क्र. 4.5 वरून हे लक्षात येते की, एकूण 752 (51.68%) प्रतिसादकांना त्यांचा ग्रंथसंग्रह चांगला वाटतो. सर्वात जास्त प्रतिसादकांचा कल हा संग्रह चांगल्या प्रतीचा असल्याचे दिसून येते, तर 600 (41.24%) प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले आहे की त्यांचा संग्रह खूप चांगला आहे. खूप चांगला (41.24%) आणि चांगला (51.68%) या दोन्ही मतांचे एकत्रीकरण केले तर लक्षात येते की (92.92%) विद्यार्थी त्यांचा ग्रंथालयाकडील वाचन साहित्य संग्रहाबाबत समाधानी आहेत. म्हणजेच विधी महाविद्यालये आणि विद्यापीठ ग्रंथालयांकडील वाचन साहित्य संग्रह विद्यार्थ्यांच्या दृष्टीने समृद्ध आहे. वरील नमूद केलेल्या विश्लेषणावरून संशोधकाच्या लक्षात येते की गृहितक क्रमांक एक (अभ्यासलेल्या विधी ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह समृद्ध आहे ) हे गृहितक सिद्ध झाले.

**ग्रंथालय सेवांची माहिती आणि वापर :**

उपभोक्त्यांना ग्रंथालयाकडे आकर्षित करण्याचे कार्य ग्रंथालय सेवांमार्फत होते. विशेषतः सभोवतालच्या परिस्थितीला अनुसरून ग्रंथालये आपल्या उपभोक्त्यांना संदर्भ सेवा, प्रचलित जागरूकता सेवा, ग्रंथालय देवघेव सेवा, झेरॉक्स इत्यादी सेवा पुरवितात. विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी त्यांच्या ग्रंथालयांच्या सेवांबाबत जागरूक आहेत का? त्यांना त्यांच्या ग्रंथालयाच्या सेवा माहित आहेत का? त्या सेवा ते वापरतात का? इत्यादी माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता. मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.7 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.7**

**ग्रंथालय सेवांची माहिती आणि वापर**

| सेवा | सेवांची माहिती | | | | सेवांचा वापर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | | नाही | | होय | | नाही | |
| संदर्भ सेवा | 1124 | 77.25% | 106 | 7.28% | 797 | 54.77% | 99 | 6.80% |
| इंटरनेट वापर सेवा | 1034 | 71.06% | 120 | 8.24% | 795 | 54.63% | 100 | 6.87% |
| नियतकालिक अनुक्रमणिका सेवा | 609 | 41.85% | 304 | 20.89% | 368 | 25.29% | 249 | 17.11% |
| आंतरग्रंथालयीन सेवा | 378 | 25.97% | 489 | 33.60% | 207 | 14.22% | 361 | 24.81% |
| नवीन ग्रंथांबाबत माहिती देणारी सेवा | 670 | 46.04% | 236 | 16.21% | 463 | 31.82% | 197 | 13.53% |
| ग्रंथ प्रदर्शन | 528 | 36.28% | 293 | 20.13% | 329 | 22.61% | 246 | 16.90% |
| ऑनलाइन नियतकालिक सेवा | 716 | 49.20% | 285 | 19.58% | 510 | 35.05% | 193 | 13.26% |
| डेटाबेस शोध सेवा | 736 | 50.58% | 192 | 13.19% | 682 | 46.87% | 160 | 10.99% |
| प्रतिलिपी सेवा | 725 | 49.82% | 211 | 14.50% | 739 | 50.79% | 170 | 11.68% |
| प्रिंटिंग (मुद्रण) सेवा | 662 | 45.49% | 210 | 14.43% | 662 | 45.49% | 169 | 11.61% |

वरील तक्ता क्र. 4.7 च्या निरीक्षणावरून लक्षात येते की, 1124 (77.25%) विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये संदर्भ सेवा उपलब्ध असल्याची माहिती आहे व 797 (54.77%) विद्यार्थी या सेवेचा लाभ घेतात. ही परिस्थिती निश्चितच समाधानकारक आहे. परंतु 106 (7.28%) विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील संदर्भसेवेच्या उपलब्धतेबाबत माहिती नाही व पर्यायाने 99 (6.80%)

विद्यार्थी या सेवेचा लाभ घेत नाहीत. विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना संदर्भ सेवा खात्रीने अधिक उपयुक्त ठरते म्हणून या सेवेबाबतची जागरूकता आणि वापर वाढविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

इंटरनेट वापराची सेवा 1034 (71.06%) उपभोक्त्यांना ग्रंथालयात उपलब्ध असल्याची माहिती आहे आणि 795 (54.63%) उपभोक्ते या सेवेचा लाभ घेतात. काही विद्यार्थी त्यांच्या सोयीनुसार ग्रंथालयाच्या बाहेरील इंटरनेट सुविधेचा लाभ घेत असणार. बहुतांश विधी महाविद्यालये त्याच्याकडील नियतकालिकाच्या नवीन अंकातील अनुक्रमणिकांची पृष्ठे स्कॅन करून वा इतर मार्गांनी विधी अभ्यासक्रमांच्या पाचव्या वर्षाच्या खूप थोडया म्हणजे 378 (25.97%) विद्यार्थ्यांना आंतरग्रंथालयीन देवघेव सेवेच्या उपलब्धतेबाबत माहीती आहे. व पयार्याने केवळ 207 (14.22%) विद्यार्थी या सेवेचा लाभ घेतात.

या सेवेची उपयुक्तता विचारात घेता या सेवेबाबतची जागरूकता आणि वापर वाढविण्यासाठी निश्चित गरज आहे. ग्रंथालयांनी खरेदी केलेल्या नवीन ग्रंथांची माहिती ग्रंथालये विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या डिस्प्ले मार्गाचा वापर करून देत असतात. ग्रंथालये या सेवेची 670 (46.04%) विद्यार्थ्यांना माहिती आहे व 463 (31.82%) विद्यार्थी या सेवेचा लाभ घेत आहेत. नवीन ग्रंथांचा/नियतकालिकांचा वापर वाढण्यासाठी या सेवेची माहिती अधिक विद्यार्थ्यांना दिली पाहीजे.

ग्रंथालये वेळोवेळी ग्रंथ प्रदर्शने भरवित असतात. परंतु याबाबत केवळ 528 (36.28%) विद्यार्थ्यांनाच माहिती आहे. थोडयाच विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील ग्रंथ प्रदर्शनाची माहिती असल्यामुळे केवळ 329 (22.61%) विद्यार्थी या प्रदर्शनाचा लाभ घेतात. ग्रंथांचा वापर वाढण्यासाठी विद्यार्थ्यांची ग्रंथ प्रदर्शनाबाबतची जागरूकता वाढणे आवश्यक आहे.

एकूण 716 (49.20%) विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे ऑनलाइन नियतकालिके उपलब्ध आहेत याची माहिती आहे व 510 (35.05%) विद्यार्थी या नियतकालिकांचा लाभ घेतात. एकूण सुमारे 50% विद्यार्थ्यांना ई–जर्नल्स च्या ग्रंथालयातील उपलब्धतेबाबत माहित आहे ही बाब समाधानकारक आहे. परंतु राहिलेल्या 50% विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे ई–जर्नल्स आहेत हे

माहित नाही ही बाब चिंताजनक आहे. कारण त्यामुळे केवळ 35% विद्यार्थी या सेवेचा लाभ घेत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांमधील ई–जर्नल्सच्या ग्रंथालयातील उपलब्धतेबाबतची जागरूकता वाढविणे गरजेचे आहे.

डेटाबेस शोध सेवा ग्रंथालयांकडे उपलब्ध असल्याची माहिती 736 (50.58%) विद्यार्थ्यांना आहे व त्यामुळे 682 (46.87%) विद्यार्थी ही सेवा वापरतात. विद्यार्थ्यांनी या सेवेचा वापर करावा यासाठी प्रयत्न गरजेचे आहेत.

प्रतिलिपी सेवा ग्रंथालयामार्फत पुरविली जाते याची माहिती 725 (49.82%) विद्यार्थ्यांना जाणीव आहे व 739 (50.79%) विद्यार्थी या सेवेचा लाभ वेळोवेळी घेतात. त्याचप्रमाणे प्रिंटींग सेवा ग्रंथालयामार्फत पुरविली जाते याबद्दल 662 (45.49%) विद्यार्थ्यांना माहिती आहे व हे सर्वच विद्यार्थी ही सेवा वापरतात.

वरील दहा सेवांच्या माहिती असण्याचा टक्केवारीची सरासरी 49.35% म्हणजेच सुमारे 50% टक्के येते. याचा अर्थ जवळपास सर्वच ग्रंथालयीन सेवांबाबत विधी अभ्यासक्रमाच्या 50% विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आहे. त्यांना माहिती, अध्ययन पद्धती, गृहपाठाचे स्वरूप व प्रमाण, यांसारख्या बाबींचा ग्रंथालयीन सेवाबाबत विद्यार्थ्यांच्या जागरूकतेवर परिणाम होतो. शिवाय ग्रंथालयांकडून राबविण्यात येणाऱ्या ग्रंथालय परिचय (Library Orientation) आणि माहिती साक्षरता (Information Literacy) उपक्रम राबविण्याचे स्वरूप आणि प्रमाणे याचाही विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयीन सेवांच्या जागरूकतेवर परिणाम होतो. ही बाब विचारात घेऊन विधी ग्रंथालयांनी विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालय सेवांबाबतची जागरूकता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आकडेवारीच्या माध्यमातून हे सिद्ध होते की, ग्रंथालयात अनेक सेवांचे कार्यक्रमांचे आयोजन केले तरी उपभोक्ते त्या सेवांचा, कार्यक्रमांचा हवा तसा उपभोग घेत नाही. ग्रंथालयात सेवा असून त्या उपभोक्त्यांपर्यंत पोहोचत नसल्यास त्या सेवांचा काहीही उपयोग होत नाही फक्त नावाला त्यांची गनती होते अशा सेवा उपभोक्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी ग्रंथालयांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहेत अन्यथा ही बाब फार गंभीर स्वरूप धारण करू शकते.

संदर्भ सेवा आणि इंटरनेटचा ग्रंथालयात वापराव्यतिरिक्त उपभोक्ते यांनी कोणत्याही

सेवेला मोठ्या प्रमाणावर आपला कल दिला नाही. याचाच अर्थ वाचकांना त्या सेवा ग्रंथालयात उपलब्ध आहेत याची कोणतीही माहिती नाही. ग्रंथालयांनी ही माहिती उपभोक्त्यांकडे पोहचविणे आवश्यक आहे. उपभोक्त्यांना माहितीची उपलब्धतेची जाणीव नसल्यास उपभोक्त्यांकडून त्या सेवा वापरण्याचे स्वप्न भंग होते. जेथे माहितीची उपलब्धता नाही तेथे त्यांच्या लाभाचा प्रश्नच उद्‌भवत नाही, याच कारणासाठी ग्रंथालयाने उपभोक्ताभिमुख होणे आवश्यक आहे. चार भिंतींपलीकडे जाऊन आपल्या सेवांची ओळख करावी स्वग्रंथालयाचे मार्केटींग करणे नित्यांची बाब झाली अन्यथा ग्रंथसंग्रह अद्ययावत ठेवून तसेच सेवा ही अद्ययावत ठेवून त्यांचा लाभ, लाभार्थींना मिळू शकत नसल्यास त्या ग्रंथालयाला काही अर्थ प्राप्त होणार नाही.

ग्रंथालयाने ग्रंथालय टूर, ग्रंथालय ओरियन्टेशन, डेटाबेस वापरांचे प्रशिक्षण, विधी ग्रंथालयातील अनेक साधनांमधून माहिती कशी शोधावी याचे प्रशिक्षण ग्रंथालय लाभार्थींना देणे काळाची गरज आहे. ए.आय.आर., हॅलसब्री लॉ ऑफ इंडिया/इंग्लंड, कॉमनवेल्थ रिपोर्ट, फॉर्म्स अँड प्रेसिडन्टस इत्यादी माहिती साधनामधून माहिती शोधणे अनेक विद्यार्थ्यांना अत्यंत किचकट व क्लिष्ट वाटते.

ग्रंथालयाद्वारे प्रदान केलेली सेवा उपभोक्त्यांनी वापरली पाहिजे तरच केवळ अशा सेवांच्या अस्तित्वाचा हेतू सफल होईल.

**नवीन वाचन साहित्य माहीत होण्याची साधने/मार्ग :**

विधी ग्रंथालयात ग्रंथ, बिल्स्, दुरूस्त्या (amendment) केसेस यांचे ग्रंथोपार्जन सतत चालू असते. ग्रंथालय हे वर्धिष्णु संस्था आहे व ग्रंथोपार्जन ही सतत चालू असलेली प्रक्रिया आहे. यातून नवीन वाचन साहित्य उपार्जित केले जाते. विद्यार्थ्यांना ती संसाधने ग्रंथालयात उपलब्ध असल्याची माहिती असणे आवश्यक आहे. नमूद केलेली नवीन संसाधने ग्रंथालयात सामावल्याचे माहित होण्यासाठी कोणत्या साधनाचा किंवा मार्गाचा उपयोग होतो हे माहित करून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद आलेख 4.6 मध्ये दिला आहे.




वरील आलेख 4.6 मधील माहितीच्या विश्लेषणावरून निदर्शनास येते की, बहुतांश 1000 (68.72%) प्रतिसादकांना त्यांच्या अध्यापकांमार्फत ग्रंथालयात नवीन संसाधने आल्याचे माहीत होते तर 787 (54.08%) विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्ग मित्राकडून/सहकार्यांकडून ग्रंथालयामध्ये नवीन संसाधने आल्याची चाहूल लागते व 480 (32.98%) विद्यार्थ्यांना ग्रंथालय कर्मचाऱ्यांकरवी नवीन उपाजर्नाबाबत माहिती मिळते.

यावरून असे नमूद करू शकतो की विधी महाविद्यालय ग्रंथालयात नविन संसाधने आगमन झाल्याची माहिती अध्यापकांकडून समजते. उपभोक्त्यांना ग्रंथालयामध्ये ग्रंथ, बिल्स, अमेंडमेंट, केसेस नविन आल्याची माहिती त्वरीत कळणे आवश्यक असते, कारण विधी शाखेची माहिती सारखी बदलत असते अशी नाविन्यपूर्ण माहिती उपभोक्त्यांपर्यंत न पोहोचल्यास विलंब झाल्यास ते जुन्या माहितीच्या आधारेच आपली कामे करतील. त्यांना अल्पावधित नविन साहित्याची माहिती कळविण्याची जबाबदारी ग्रंथालयाची आहे.

अध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्क येतो. म्हणून नवीन ग्रंथालयीन वाचन साहित्याची माहिती विद्यार्थ्यांमार्फत पोहोचविण्यासाठी या मार्गाचा अधिकाधिक वापर करणे संयुक्तिक ठरेल.

**ग्रंथालय तालिकेचा वापर :**

तालिकेला ग्रंथालयात महत्त्वाचे स्थान आहे. ग्रंथालय तालिका हे त्या ग्रंथालयाचा आणि ग्रंथ संग्रहाचा आरसा असतो. ग्रंथालयाच्या तालिकेशिवाय ग्रंथसंग्रह अद्ययावत असल्याचे समजण्यास वाव नसतो. ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या चौथ्या तत्त्वानुसार वाचकांचा वेळ वाचविण्यासाठी तालिका हे एक आवश्यक साधन आहे. उपभोक्ते ग्रंथालयाच्या तालिकेचा किती वारंवार वापर करतात हे समजण्याच्या दृष्टीने सदर प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. मिळालेला प्रतिसाद आलेख क्रमांक 4.7 मध्ये दिला आहे.

आलेख क्र. 4.7

ग्रंथालय तालिकेचा वापर




वरील आलेख क्र. 4.7 वरून असे निदर्शनास येते की, ग्रंथालयामध्ये उपभोक्त्याचा वेळ वाचविण्यासाठी नेमके वाचन साहित्य शोधण्यासाठी तालिका उपलब्ध करण्यात येत असली तरीही विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी या सुविधेचा वापर  हवा तितका का करत नाहीत (49.90%) तालिकेच्या उपलब्धतेबाबत आणि उपयुक्ततेबाबत विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेचा अभाव दिसून येतो. अर्थात नेहमी आणि कधीकधी तालिका वापरणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण सुमारे 50% आहे. याचा अर्थ निम्या विद्यार्थ्यांमध्ये तालिकेच्या उपयुक्ततेबाबत जागरूकता आहे. राहिलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालय परिचय उपक्रमाद्वारे तालिकेबाबत माहिती दिली पाहिजे.

**ग्रंथालयातील ग्रंथ शोधण्यासाठी वापरले जाणारे तालिकेशिवायचे पर्याय :**

ग्रंथालयातील ग्रंथ शोधण्यासाठी/माहीत करून घेण्यासाठी तालिकेशिवाय इतरही काही साधने/मार्ग उपलब्ध आहेत. अशा साधनांपैकी/मार्गांपैकी विद्यार्थी कोणत्या साधनांचा/मार्गांचा वापर करतात हे माहीत करून घेण्यासाठी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.8 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.8**

**ग्रंथालय तालिकेचे पर्यायी मार्ग**

| क्र. | ग्रंथ शोधण्यासाठीचे मार्ग | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | थेट कपाटामध्ये शोध | 872 | 59.93% |
| 2. | ग्रंथालय सेवकांना विचारणे | 1124 | 77.24% |
| 3. | वरिष्ठ विद्यार्थ्यांना विचारणे | 431 | 29.62% |
| 4. | अध्यापकांना विचारणे | 482 | 33.12% |
| 5. | विधी व्यावसायिकांची मदत घेणे | 162 | 11.13% |

वरील तक्त्यावरून लक्षात येते की, जास्तीत जास्त 77.24% विद्यार्थी ग्रंथालयातील ग्रंथ शोधण्यासाठी ग्रंथालय सेवकांची मदत घेतात. हे चित्र ग्रंथालय व्यवसायाच्या दृष्टीने सकारात्मक आहे. कारण विधी अभ्यासक्रमाच्या 77% विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवकाच्या 'ग्रंथ विषयक ज्ञानावर' विश्वास आहे असे या प्रतिसादावरून लक्षात येते. थेट कपाटावरून ग्रंथ शोधणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही समाधानकारक (59.93%) आहे. ग्रंथालयातील मुक्तव्दार सुविधा आणि ग्रंथालय परिचय उपक्रमामुळे हे शक्य होत असणार.

**वाचन साहित्य मिळविण्याचे ग्रंथालयांव्यतिरिक्त मार्ग :**

विधीविषयक माहिती वेळोवेळी बदलत असते. त्याप्रमाणे ग्रंथालयातील माहिती संग्रह अद्ययावत ठेवणे गरजेचे असते माहितीतील मोठ्या बदलांमुळे उपभोक्त्यांना काही वेळा आवश्यक माहिती प्रदान करणे ग्रंथालयांना कठीण होते. कोणतेही ग्रंथालय उपभोक्त्यांच्या सर्व गरजा भागवू शकत नाही. अशा परिस्थितीत उपभोक्ते आपल्या गरजा भागविण्यासाठी कोणत्या मार्गाचा

अवलंब करतात हे जाणून घेणे आवश्यक होते म्हणून विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला होता. त्याचे प्रतिसाद खालील तक्ता क्रमांक 4.9 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.9**

**वाचन साहित्य मिळविण्यासाठीचे ग्रंथालयाव्यतिरिक्तचे मार्ग**

| क्र. | पर्यायी मार्ग | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | इतर ग्रंथालयाला भेट देणे | 448 | 30.79% |
| 2. | बाजारातून वाचन साहित्य खरेदी करणे | 504 | 34.63% |
| 3. | वर्गमित्रांकडून घेणे | 657 | 45.15% |
| 4. | इंटरनेटवर शोधणे | 794 | 54.57% |
| 5. | इतर | 17 | 1.16% |

वरील तक्त्याच्या निरीक्षणावरून हे सिद्ध होते की, संबंधित ग्रंथालयातून माहितीची गरज न भागविली गेल्यास बहुतांश इंटरनेटची सहज उपलब्धता आणि इंटरनेटवरील माहितीचे प्रमाण आणि विविधता हे यामागील कारण असू शकते. (54.57%) विद्यार्थी इंटरनेटचा वापर करतात. वर्गसहकार्यांकडून (45.15%) विद्यार्थी माहिती मिळवितात. याचेही कारण माहिती मिळविण्यातील सुलभता हे असू शकते. तर केवळ 34.63% विद्यार्थी बाजारातून आवश्यक वाचन साहित्य खरेदी करतात. विद्यार्थ्यांकडील मर्यादित आर्थिक साधने हे यामागील कारण असू शकते. आलेख क्रमांक (4.2) नुसार संशोधकाच्या निदर्शनास आले ई–ग्रंथालयाचा दररोज वापर विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी अंत्यत अल्प (8.83%) प्रमाणात करतात मात्र इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर (57%) केला जाते. विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी शैक्षणिक माहितीसाठी,मनोरंजनाचे साधन म्हणून इंटरनेटचा वापर करतात. त्यासाठी त्यांना ई–ग्रंथालयासारखी वार्षिक वर्गणी भरावी लागत नाही कदाचित ई–ग्रंथालये त्यांना वापरण्यास किचकट आणि गुंतागुंतीची वाटत असावीत ई–ग्रंथालयाचा वापर जास्त वेळेसाठी ते करू शकत नसावेत, इंटरनेटमध्ये सर्वांगीण विषयांना सामावून घेतल्याने विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी इंटरनेटचा वापर जास्त प्रमाणात करीत आहेत मात्र ई–ग्रंथालय वापरण्याचे प्रमाण उदासीन दिसते.

**ग्रंथालय सेवकांचे सहकार्यांचे हेतू :**

ग्रंथालय सेवक ही ग्रंथालयांची संपत्ती असते. विधी ग्रंथालयातील सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवांचा पुरेसा परिचय झालेला नसतो म्हणून त्यांना ग्रंथालय सेवकांचे सहकार्य आवश्यक असते. कोणकोणत्या हेतुसाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवकांच्या सहकार्याची अपेक्षा असते हे जाणून घेण्यासाठी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला होता. त्यांचा प्रतिसाद आलेख क्रमांक 4.8 मध्ये दिला आहे.




वरील आलेख क्र. 4.8 मधील माहितीवरून निदर्शनास येते की, बहुतांश 988 (67.90%) प्रतिसादक विधी ग्रंथालयातील क्रमिक ग्रंथांचा शोध घेण्यासाठी ग्रंथालय सेवकांकडून सहकार्याची अपेक्षा करतात. ग्रंथालयीन सेवक ग्रंथालयातील ग्रंथव्यवस्थेबाबत माहीतगार असतात म्हणून विद्यार्थ्यांची ही अपेक्षा रास्त आहे. त्या खालोखाल 779 (53.53%) ग्रंथालय सेवकांचे सहकार्य विद्यार्थी संदर्भ ग्रंथाचा शोध घेण्यासाठी अपेक्षितात काही ग्रंथालयामध्ये संदर्भ ग्रंथ त्याला विषयांच्या ग्रंथाबरोबर ठेवलेले असतात. तर काही ग्रंथालयांमध्ये काही संदर्भग्रंथ स्वतंत्र विभागामध्ये ठेवलेले असतात. अशावेळेस संदर्भ ग्रंथ शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवकांची मदत लागत असते. ई-ग्रंथालयातून नेमकी माहिती शोधून काढण्यासाठी 640

(43.98%) विद्यार्थी ग्रंथालय सेवकांचे सहकार्य घेतात. कारण ई–साधनांमधून नेमकी माहिती शोधण्यासाठी योग्य संज्ञा आणि योग्य माहिती शोध व्यूहरचना वापरता येणे गरजेचे असते. ग्रंथालय सेवकामध्ये तज्ञ असतात. परंतु विद्यार्थ्यांना याबाबत पुरेशी माहिती नसते म्हणून त्यांना ग्रंथालय सेवकांचे सहकार्य अपेक्षित असते.

## 4.4 विभाग क : उपभोक्त्यांची माहितीची गरज :

### विधी विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजांची वर्गवारी आणि प्राधान्यक्रम :

विधी विद्यार्थ्यांची माहितीची गरज भागविण्यासाठी ग्रंथालयात विविध साधनांचा अंतर्भाव केलेला असतो. प्रत्येक विद्यार्थ्याची माहितीची गरज ही वेगळी असते. विधी विद्यार्थांना प्राधान्याने कोणत्या प्रकारची माहिती आवश्यक असते, तिचा प्राधान्यक्रम काय असतो हे जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्र.4.10 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.10**

**माहितीच्या गरजांची वर्गवारी आणि प्राधान्य क्रम**

| क्र. | | प्राधान्य क्र.1 | | प्राधान्य क्र.2 | | प्राधान्य क्र.3 | | प्राधान्य क्र.4 | | प्राधान्य क्र.5 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के |
| 1 | अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती | 703 | 48.31 | 156 | 10.72 | 99 | 6.8 | 82 | 5.63 | 181 | 12.44 |
| 2 | प्रकल्प / संशोधन संबंधित माहिती | 181 | 12.44 | 430 | 29.55 | 133 | 9.14 | 155 | 10.65 | 121 | 8.31 |
| 3 | नोकरी संबंधित माहिती | 92 | 6.32 | 214 | 14.7 | 272 | 18.69 | 140 | 9.62 | 90 | 6.18 |
| 4 | विधीतील पुढील अभ्यासासाठी माहिती | 103 | 7.07 | 205 | 14.08 | 225 | 15.46 | 280 | 19.24 | 115 | 7.90 |
| 5 | कायदेशीर व्यक्तींशी संबंधित माहिती | 84 | 5.77 | 102 | 7.01 | 189 | 12.98 | 141 | 9.69 | 190 | 13.05 |
| 6 | नवीन कायद्यासंबंधी माहिती | 72 | 4.94 | 119 | 8.17 | 195 | 13.4 | 200 | 13.74 | 202 | 13.88 |

| क्र. | | प्राधान्य क्र.1 | | प्राधान्य क्र.2 | | प्राधान्य क्र.3 | | प्राधान्य क्र.4 | | प्राधान्य क्र.5 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के |
| 7 | अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारीत माहिती | 54 | 3.71 | 105 | 7.21 | 162 | 11.13 | 168 | 11.54 | 138 | 9.48 |
| 8 | एखाद्या विषयावर नवीन लेजिसलेशन | 91 | 6.25 | 71 | 4.87 | 80 | 5.49 | 194 | 13.33 | 131 | 9.00 |
| 9 | एखाद्या विषयावर होणाऱ्या वादविवाद स्पर्धेसाठी किंवा अन्य स्पर्धेसाठी लागणारी माहिती | 57 | 3.91 | 64 | 4.39 | 69 | 4.74 | 72 | 4.94 | 197 | 13.53 |
| 10 | विधी विषयावर होणाऱ्या स्पर्धेसाठी संबंधित माहिती (मूट, मॉक–ट्रायल, ए. डि. आर. जे.) | 104 | 7.14 | 76 | 5.22 | 90 | 6.18 | 90 | 6.18 | 170 | 11.68 |

वरील तक्ता क्र. 4.10 वरून निदर्शनास येते की, जास्तीत जास्त 703 (48.31%) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांशी संबंधीत माहितीची गरज असते, म्हणून या गरजेला विद्यार्थांनी प्रथम प्राधान्यक्रम दिला आहे. कारण अभ्यासक्रम चांगल्या श्रेणीमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी त्यांना अभ्यासक्रमाबाबतची माहिती हवी असते. परीक्षेत यश मिळविण्यासाठी, अभ्यासासाठीचे सर्व माहिती साधणे वापरणे त्यांना गरजेचे असते. सतत नवनवीन आवृत्त्या, कायदे, लेजिसलेशन, क्रमिक ग्रंथ यांची भर अभ्यासात पडत असते. त्यामुळे प्रतिसादकांनी आपला प्रथम क्रमांक अभ्यासक्रमाशी संबंधित माहितीच्या गरजेला दिला आहे. पूर्वानुभव येण्यासाठी इंटर्नशीप करावी लागते. मूटकोर्टला जावे लागते. त्यासाठी त्यांना अभ्यासात उपयुक्त साधने वेळोवेळी हाताळावी लागतात.

430 (29.55%) विद्यार्थ्यांना संशोधनासंबधित माहितीची गरज असते. त्यासाठी या गरजेला विद्यार्थ्यांनी द्वितीय प्राधान्य क्रम दिला आहे. कारण विधी अभ्यासक्रमच्या विद्यार्थ्यांना संशोधन केल्याशिवाय चर्चासत्रांमध्ये, मूटकोर्ट स्पर्धा, मॉक ट्रायल, तंटामुक्ती केंद्रात भाग घेता येत नाही. त्यासाठी त्यांना यापुर्वीच्या तशाच प्रकारच्या केसेससाठी कोर्टाने काय निकाल दिला होता. पुढच्या कोर्टात त्या निकालात काही सुधारणा झाल्याचे/नसल्याचे विधी विद्यार्थ्यांना संशोधनाच्या माध्यमातून समजते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मूटकोर्टाची तयारी करण्यासाठी त्यांना अनेक संशोधनपर लेख, केसेसची पडताळणी करून तयारी करावी लागते या कारणास्तव विधी विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्पासाठी गरजेला द्वितीय क्रमांक दिला आहे.

272 (18.69%) विद्यार्थ्यांना नोकरीशी संबधित माहितीची गरज असते म्हणून या गरजेला त्रितीय स्थानी प्राधान्यक्रम दिला आहे. विद्यार्थ्याचे 5 व्या वर्षाचा शिक्षणक्रमाचा कालावधी संपुष्टात येणार असतो. अभ्यासपूर्ण झाल्यानंतर त्यांना विधीशी संबंधित वेगवेगळ्या क्षेत्रात काम करावयाचे असते. ज्या क्षेत्रांमध्ये नोकरी करण्याचा त्याचा कल असतो. त्या क्षेत्रासंबंधिचे वाचन करण्यासाठी व्यक्तीला माहितीच्या जागरूकतेसाठी विद्यार्थ्यांना माहितीची गरज असते म्हणून त्यांनी त्रितीय प्राधान्यक्रम दिला आहे.

280 (19.24%) विद्यार्थ्यांना विधीतील पुढील अभ्यासासाठी माहितीची गरज असते. म्हणून या गरजेला चतुर्थ अर्थात चौथे प्राधान्यक्रम दिला आहे. विधी विद्यार्थ्यांना पाच वर्ष पूर्ण केल्यानंतर देश–विदेशात पदव्युत्तर अभ्यास करावयाचा असतो यासाठी त्यांना शिष्यवृत्तीसाठी प्रयत्न करावयाचा असतो. यासाठी त्यांना शिष्यवृत्तीसाठी प्रयत्न करावयाचे असतात, व्यावसायिक होण्यासाठी (वकीली करण्यासाठी) नावाजलेल्या वकीलांची माहती प्राप्त करण्यासाठी, ज्युडिशिअरी परीक्षेची तयारी करण्यासाठी माहितीची गरज असते, म्हणून विधी विद्यार्थ्यांना त्याला चतुर्थ प्राधान्यक्रम दिला आहे.

197 (13.53 %) विद्यार्थ्यांना एखाद्या विषयावर होणाऱ्या वादविवाद स्पर्धेसाठी किंवा गैरकायदेशीर, स्पर्धेसाठी माहितीची गरज असते. यासाठी या गरजेला विद्यार्थ्यांनी पाचवा, प्राधान्यक्रम दिला आहे. एखाद्या विषयातील महत्त्वाच्या केसचा निकाल लागल्यास विधी महाविद्यालय त्या केससंदर्भात वादविवाद घडवून आणते, तसेच तशा स्पर्धेचे आयोजन करते यासाठी विधी विद्यार्थ्यांना माहितीची गरज असते. यासाठी त्यांनी त्याला पाचवे प्राधान्य दिले आहे.

वरील विश्लेषणातून निदर्शनास येते विद्यार्थ्यांनी जरी एक ते पाच प्राधान्यक्रम दिले असले तरीही विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सर्वात जास्त अभ्यासक्रमाशी संबधित माहितीलाच बहुतांश प्रमाणात प्राधान्य देतात. तसेच इतर सर्वच कारणांसाठी त्यांना ग्रंथालयाची आवश्यकता भासते.

**माहितीची गरज भागविण्यासाठी वापरली जाणारी साधने व त्यांचा प्राधान्यक्रमः**

विधी विद्यार्थ्यांची माहितीची गरज भागविण्यासाठी ग्रंथालयात विविध साधनांचा अंतर्भाव केलेला असतो. प्रत्येक विद्यार्थ्याची माहितीची गरज ही वेगळी असते. विधी विद्यार्थांना प्राधान्याने ते पूर्णत: माहितीच्या साधनांवर अवलंबून असतात, साधनांशिवाय अध्यायन करणे, संशोधनपर लेख लिहिणे, कोणत्याही स्पर्धेमध्ये भाग घेणे ही असाध्य बाब आहे विधीसंबंधित अनेक साधने/ साहित्य ग्रंथालयात ग्रंथलयाबाहेर उपलब्ध असतात. अशा अनेक साधनांपैकी/साहित्यापैकी माहितीचे उपभोक्ते कोणत्या साहित्याला आपला पसंतीक्रम दर्शवितात आणि मोठ्या प्रमाणावर ती साधने वापरतात हे प्रदर्शित करण्याच्या दृष्टीने संदर्भित प्रश्न विचारण्यात आला. माहितीच्या उपभोक्त्यांना एकापेक्षा अधिक साधनांना पसंतिक्रम देण्याची विनंती सदर प्रश्नामध्ये करण्यात आली.

**तक्ता क्रमांक 4.11**

**वापरण्यात येणाऱ्या साधनांचा प्राधान्यक्रम**

| क्र. | | प्राधान्य क्र.1 | | प्राधान्य क्र.2 | | प्राधान्य क्र.3 | | प्राधान्य क्र.4 | | प्राधान्य क्र.5 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के |
| 1 | विधी अहवाल | 261 | 17.93 | 134 | 9.20 | 119 | 8.17 | 208 | 14.29 | 288 | 19.79 |
| 2 | विधी नियतकालिके | 93 | 6.39 | 150 | 10.3 | 137 | 9.41 | 150 | 10.3 | 146 | 10.03 |
| 3 | कायदा आणि नियम | 94 | 6.46 | 146 | 10.3 | 222 | 15.25 | 192 | 13.19 | 185 | 12.71 |
| 4 | विधी ग्रंथ | 884 | 60.75 | 175 | 12.02 | 178 | 12.23 | 191 | 13.12 | 126 | 8.65 |
| 5 | संदर्भ सामुग्री | 143 | 9.82 | 439 | 30.17 | 218 | 14.98 | 149 | 10.24 | 172 | 11.82 |
| 6 | विधी डेटाबेसेस | 116 | 7.97 | 137 | 9.41 | 376 | 25.83 | 153 | 10.51 | 141 | 9.69 |
| 7 | इंडेक्सेस आणि ॲबस्ट्रॅक्टस | 55 | 3.78 | 94 | 6.46 | 103 | 7.07 | 71 | 4.87 | 56 | 3.84 |
| 8 | डायजेस्टस | 54 | 3.71 | 112 | 7.69 | 76 | 5.22 | 88 | 6.04 | 73 | 5.01 |
| 9 | न्यायालयाचे निर्णय | 144 | 9.89 | 151 | 10.37 | 174 | 11.95 | 178 | 12.23 | 139 | 9.55 |
| 10 | केस स्टडी | 133 | 9.14 | 99 | 6.8 | 104 | 7.14 | 126 | 8.65 | 165 | 11.34 |

वरील तक्ता क्रमांक 4.11 वरून निदर्शनास येते, विधी अहवाल वापरण्यासाठी प्रतिसादकांनी आपला पसंतीक्रम (19.79%) दिला आहे. नियतकालिकासंदर्भात माहितीची गरज भागविण्याचा प्राधन्यक्रम (10.3%) दर्शविण्यात आला आहे.

बिल्स्, ॲकट्स, रूल्स संदर्भात विधीविषयक जे नियम असतात त्याचा प्राधान्यक्रम (13.19%) दर्शविला आहे. विधी ग्रंथाचा वापर करण्याचा प्राध्यान्यक्रमासाठी (60.75%) प्रतिसादकांनी आपला पसंतीक्रम दर्शविला आहे. संदर्भ साहित्यासाठी (30.17%) इतका प्रतिसाद प्राप्त झाला. विधी डेटाबेसेस वापरण्यासाठी 376 (25.83%) प्रतिसाद प्राप्त झाला इंडेक्स आणि ॲबस्ट्रॅक्टस्साठी प्रतिसादकांनी (7.07%) प्रतिसाद दर्शविला आहे. डायजेस्टस वापरासाठी (7.69%) प्रतिसाद प्राप्त झाला. न्यायालयाचे निकाल (12.23%) प्रतिसाद मिळाला आहे तर केस स्टडीज् वापर करण्यासाठी (11.34%) प्रतिसाद प्रतिसादकांनी निर्देशित केला आहे. अभ्यासावरून असे निदर्शनास येते मोठया प्रमाणात (60.75%) प्रतिसादकांनी विधीविषयक ग्रंथांना प्रतिसाद देऊन प्रथम प्राधान्यक्रम दर्शविला आहे. द्वितीय स्थानांवर संदर्भ साहित्याला (30.17%) स्थान प्राप्त झाले आहे. तृतीय स्थानावर विधी डेटाबेसेस वापरण्याला (25.83%) स्थान दिले आहे. चौथ्या स्थानावर कायदा आणि नियम (13.19%) वापरण्याला प्राध्यान्य दिले आहे तर पाचव्या स्थानावर कायदयाचे वेळोवेळी प्रकाशित होणाऱ्या अहवालाला (17.93%) प्रतिसाद मिळाला आहे.

वरील आकडेवारीवरून असे सिद्ध होते की, विधी महाविद्यालय ग्रंथालयामध्ये सर्वांत मोठया प्रमाणावर (60.75%) विधी ग्रंथांना माहितीच्या मोठ्या प्रमाणावरील गरजा पूर्ण करण्यासाठी उपभोक्ते प्राधान्यक्रम देतात याला अनेककारणे असू शकतात.

परीक्षेची तयारी करण्यासाठी, कुतुहल म्हणून, जिज्ञासा म्हणून चाळून पाहण्यासाठी, तसेच विधीचा अभ्यास ग्रंथाशिवाय करता येऊच शकत नाही अनेक केसेसचा वर्गामध्ये आढावा घेण्यासाठी, मूट कोर्ट स्पर्धेची तयारी करण्यासाठी द्वितीय साधनांच्या वापराबरोबर प्राथमिक साधनेही वापरली जातात त्यातून प्रासंगिक माहिती जमविली जाते असेही असू शकते काही ग्रंथालयाचे उपभोक्ते विधी ग्रंथांवरच अधिक भर देतात. त्याचाच वापर त्याकडून जास्त होत असतो.

ग्रंथालयामध्ये अनेक साधने/साहित्याचा अंतर्भाव असला तरी उपभोक्ते विधी ग्रंथालयात मोठ्या प्रमाणावर विधीच्या क्रमिक ग्रंथांना प्रथम प्राध्यान्यक्रम देतात. क्रमिक ग्रंथाचा वापर उपभोक्त्यांकडून मोठया प्रमाणात होत असल्यास त्यांना सखोल ज्ञान मिळणार नाही. प्राथमिक माहितीचा वापर ते करतात. विधी शाखेतील उपभोक्ते व्यावसायिक अभ्यासक्रम करताना त्यांनी प्राथमिक साधनांबरोबर जोडीला द्वितीय आणि तृतीय साधनाचा तितकाच वापर करणे आवश्यक आहे त्यांनी फक्त अभ्यास करून पास होणे योग्य नव्हे तर आपल्या क्षेत्रात निष्णात होण्यासाठी संदर्भग्रंथ, नियतकालिके, बेअर ॲक्टस्, विधी डेटाबेससेसचा, लॉ रिपोर्टचा योग्य प्रमाणावर वापर करणे आवश्यक असते. संशोधकाला निदर्शनास आले. विधी ग्रंथालयातील विद्यार्थी माहितीच्या गरजा भागविण्यासाठी अनेक साधने वापरतात.

विधी नियतकालिके व्यावसायिक प्रकाशक, बार असोसिएशन, अनेक विधी महाविद्यालये प्रकाशित करीत असतात. त्यात अलिकडील काळातील न्यायालयाच्या निर्णयावर टीका असते. निकाल असतात. नियतकालिकांमध्ये सादर केलेले लेख सामान्यतः ग्रंथापेक्षा लवकर प्रकाशित होतात. संशोधनाचे निष्कर्ष न्यायालयाचे निकाल त्वरीत वितरीत करण्याचे एक महत्वाचे साधन नियतकालिके आहेत.

विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून माहितीची गरज भागविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनामध्ये नियतकालिकांना अल्प (10.8%) प्रतिसाद प्राप्त झाला. यावरून असे म्हणता येईल प्रचलित माहिती पुरविणाऱ्या या माहिती साधनाचा विद्यार्थी पुरेसा वापर करत नाहीत.

**माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाची क्षमता :**

सर्वसाधारणपणे विधीविषयक माहितीसाठी ग्रंथालयाला सर्वाधिक प्रबळ साधने उपलब्ध करून देणारे स्त्रोत मानले जाते. ग्रंथालयातील साधने जेवढ्या प्रमाणात सक्षम तेवढ्या प्रमाणात तेथिल उपभोक्ते ज्ञानांनी सक्षम होतील, ज्ञानी उपभोक्ते देशाचा ठेवा असतो. त्यांच्यामुळे आर्थिक, राजकीय, बौद्धिक, स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विकास होतो. उपभोक्त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जोरावर देशातील विधीव्यवस्थेत सक्षमता येते. या दृष्टीने संबंधित विधी ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यास सज्ज आहे वा नाही हे तपासण्याच्या

दृष्टीने प्रस्तुत प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. प्रतिसादानुसार 1292 (88.80%) विद्यार्थी स्पष्ट करतात की त्यांचे ग्रंथालय त्यांची माहितीची गरज भागविण्यास सक्षम आहे. ही बाब खूपच समाधानकारक आहे.

केवळ 163 (11.20%) विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार त्यांचे ग्रंथालय त्यांच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम नाही. ग्रंथालये त्यांच्या माहितीच्या गरजांची पूर्तता करत नाहीत असे मत असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण प्रतिसादकांच्या तुलनेत नगण्य आहे.

ज्या उपभोक्त्यांना वाटते की आपले ग्रंथालय आपल्या माहितीच्या गरजांची पूर्तता करण्यास सक्षम नाहीत त्यांना तसे का वाटते असे विचारले होते. त्यांचा प्रतिसाद आलेख क्रमांक 4.9 मध्ये दिला आहे.




वरील आलेख क्र. 4.9 मधील माहितीनुसार ग्रंथालय त्यांच्या माहितीच्या गरजांची पूर्तता करत नाही असे म्हणणाऱ्यांपैकी 103 (7.07%) विद्यार्थी स्पष्ट करतात की ग्रंथालयाकडे आवश्यक माहितीसाधने उपलब्ध नाहीत. कोणतेही ग्रंथालय आवश्यक असणारी सर्व माहिती साधने उपर्जित करू शकत नाही. शिवाय विद्यार्थ्यांना त्यांच्या ग्रंथालयाच्या संग्रहाबद्दल अपुरी माहिती असू शकते म्हणून त्यांनी वरील प्रतिसाद दिलेला असू शकतो.

**माहितीच्या गरजा आणि त्यांच्या पूर्तीची माध्यमे :**

विधी ग्रंथालयाचे विद्यार्थी त्यांच्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी कोणत्या माध्यमांचा वापर करतात विशेषतः मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमापैकी अभ्यासातील कोणत्या माहितीच्या गरजा भागविण्यासाठी वापर करतात. हे माहीत करून घेण्याच्या दृष्टीने सदर प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.12 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.12**

**माहितीच्या गरजा आणि त्यांच्या पूर्तीची माध्यमे**

| क्र. | माहितीचा शोध | माध्यम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुद्रित | | इलेक्ट्रॉनिक | |
| | | प्रतिसाद | टक्केवारी | प्रतिसाद | टक्केवारी |
| 1. | नोट्स तयार करण्यासाठी | 1252 | 86.04% | 531 | 36.49% |
| 2. | संशोधन/प्रकल्प तयार करण्यासाठी | 770 | 52.92% | 757 | 52.02% |
| 3. | विशिष्ट प्रश्नांचे उत्तर तयार करण्यासाठी | 886 | 60.89% | 550 | 37.80% |
| 4. | पेपर लिहिण्यासाठी आणि प्रेझेन्टेशन करण्यासाठी | 721 | 49.55% | 709 | 48.72% |
| 5. | सर्वसाधरण जागरूकतेसाठी | 525 | 36.08% | 781 | 53.67% |
| 6. | मनोरंजनासाठी | 332 | 22.81% | 773 | 52.12% |
| 7. | इतर | 69 | 4.94% | 72 | 4.94% |

वरील तक्ता क्र. 4.12 वरून निदर्शनास येते की, विधी अभ्यासक्रमाचे खूप (86.04%) विद्यार्थी मुद्रित साहित्याच्या नोट्स तयार करण्यासाठी वापर करतात. या उलट इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर कमी प्रमाणात (36.49%) केला जातो. इलेक्ट्रॉनिक साधनांपेक्षा विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मुद्रित साधनांचा नोट्स तयार करण्यासाठी अधिक वापर करतात.

नोट्स तयार करणे हे विधी अभ्यासक्रमाचा भागच असतो, विद्यार्थ्यांना अभ्यासात प्रबळ होण्यासाठी कोणत्याही एका ग्रंथावर विसंबून राहणे योग्य नसते. कारण कायद्याची अंमलबजावणी

ही प्रत्येक राज्यामध्ये वेगवेगळ्या स्तरावर केली जाते. प्रत्येक लेखकांची मते वेगळी असतात. चार वेगवेगळी मते विद्यार्थ्यांनी अभ्यासली. त्यांच्या नोट्स काढल्या तर त्या नोट्स त्यांना सहज संदर्भ म्हणून केव्हाही वापरता येऊ शकतात. अशा नोट्सचा वापर ते अभ्यासासाठी, संशोधनासाठी, मूटकोर्ट स्पर्धेच्या वेळी करू शकतात. विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक साधनांपेक्षा मुद्रित साधनांचा/साहित्याचा वापर अधिक करण्याचे कारण असू शकते की त्यांना इलेक्ट्रॉनिक साधनाबाबतचे अपुरे ज्ञान असेल, अथवा संबंधित ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये वाचन साहित्य कदाचित त्यांच्या ग्रंथालयात उपलब्ध नसावे.

संशोधनाचे कार्य करण्यासाठी विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक अशा दोन्ही माध्यमांचा जवळजवळ सारख्याच (प्रत्येकी 52%) प्रमाणात वापर करतात. विधी महाविद्यालयामध्ये संशोधनाचे कार्य हे कायम चालत असते. हे कार्य सतत चालू राहण्यासाठी जास्त ग्रंथ, संदर्भ ग्रंथ नियतकालिके, डेटाबेसेसचा वापर केला जातो. उपभोक्त्यांला प्रचलित माहिती वेळोवेळी पुरवावी लागते.

युनिव्हर्सिटी ग्रँड कमिशननेही 12 व्या योजनेत उल्लेख केला आहे की सध्याचे शिक्षण हे संशोधनप्रवृत्त असले पाहिजे संशोधनावर अधिक भर देऊन शिक्षणात सुधारणा होणे आवश्यक आहे म्हणून विधी विद्यार्थ्यांना आपले संशोधनाचे कार्य करण्यासाठी योग्य साधनांची, संसाधनाची, जागेची निवड करणे आवश्यक आहे.

विशिष्ट प्रश्नाची उत्तरे लिहिण्यासाठी 60% विद्यार्थी मुद्रित साधनाचा वापर करतात. इलेक्ट्रॉनिक साधनांचा अगदी कमी प्रमाणात वापर केला जातो. विधी विद्यार्थ्यांना प्रश्नाची उत्तरे लिहिण्यासाठी ग्रंथालयावर अवलंबून राहावे लागते. त्याचे कारण असे सांगता येईल की अशी उत्तरे लिहिण्यासाठी अनेक नवीन साधनांचा एकावेळी वापर करावा लागतो. अशी साधने एकत्रितपणे ग्रंथालयात मिळतात. संशोधकाला असेही निदर्शनास आले, इलेक्ट्रॉनिक साधनाचा अभ्यासापेक्षा अधिक वापर विद्यार्थी मनोरंजनासाठी करतात.

वरील तक्ता क्रमांक 4.21 वरून स्पष्ट होते की, ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक साधनाचा वापर जरी होत असला तरी मुद्रित साधने ही मोठ्या प्रमाणावर वापरली जातात.

## 4.5 विभाग ड : माहिती शोध वर्तणूक

### माहिती संकलनासाठी आठवड्याला खर्च होणारा वेळ :

विधी ग्रंथालयाची बहुतांशी साधने ग्रंथालयात उपलब्ध असतात. त्या साधनांचा उपभोग घेणे हे संपूर्णतः उपभोक्त्यांवर अवलंबून असते. सदर अभ्यासातील विद्यार्थी ग्रंथालयातील विधी साधने वापरण्यासाठी किती वेळ व्यतीत करतात यावर प्रकाश टाकण्याचे उद्देशाने प्रस्तुत प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. सदर प्रश्नांचा प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.13 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.13**

**माहिती संकलित करण्यासाठी आठवड्याला खर्च होणारा वेळ**

| क्र. | माहिती संकलन कृती आणि साधने | 1 तासापर्यंत | | 2 ते4 तासापर्यंत | | 4 ते6 तासापर्यंत | | 6 ते8 तासापर्यंत | | 8 तासापेक्षा अधिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के |
| 1. | छापील ग्रंथ शोधण्यासाठी | 982 | 67.48 | 407 | 27.97 | 102 | 7.01 | 27 | 1.85 | 22 | 1.51 |
| 2. | छापील जनरल/ मॅगझिन्स् शोधण्यासाठी | 661 | 45.42 | 462 | 31.75 | 101 | 6.04 | 21 | 1.44 | 8 | 0.54 |
| 3. | ई–जर्नल्सचा वापर करण्यासाठी | 521 | 35.80 | 387 | 26.59 | 200 | 13.74 | 35 | 2.40 | 22 | 1.51 |
| 4. | ई–बुक्स वापरण्यासाठी | 502 | 34.50 | 363 | 24.94 | 201 | 13.81 | 54 | 3.71 | 31 | 2.13 |
| 5. | ऑन लाइन डेटाबेसचा वापर करण्यासाठी | 782 | 53.74 | 563 | 38.70 | 229 | 15.73 | 69 | 4.72 | 31 | 2.17 |
| 6. | इंटरनेट वापरासाठी | 478 | 32.85 | 437 | 30.03 | 192 | 13.19 | 86 | 5.91 | 115 | 7.90 |

वरील तक्त्यावरून लक्षात येते की, साधारणपणे 32.85% ते 67.48% विद्यार्थी विविध माहिती साधनांमधून संकलनासाठी आठवड्याला एक तास वेळ देतात. एवढा वेळ त्यांना पुरतो. याचा अर्थ ग्रंथालयातील माहिती/ग्रंथशोध सुविधा चांगली आहे. परंतु त्याचबरोबर आठवड्याला 2 ते 4 तास माहिती संकलनासाठी/ग्रंथ शोधण्यासाठी/ई–जर्नल्स, इंटरनेट ब्राउजिंगसाठी खर्च करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही 24.94% ते 38.70% पर्यंत आहे याचा अर्थ एकतर ते ग्रंथ/नियतकालिके शोधणे, ई–बुक्स, ई–जर्नल्स, इंटरनेट ब्राऊजिंगसाठी पुरेसा वेळ देतात आणि कदाचित यासाठी त्यांना जास्त वेळ लागण्याचे कारण यातून माहिती शोधण्याचे तंत्र त्यांना

पुरेशा प्रमाणात माहिती नसेल आठवड्याला याच कृतींसाठी 4 ते 8 तास देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खूप कमी आहे. सर्वसाधारण असे निदर्शनास येते की, आठवड्याला बहुतांश विद्यार्थ्यांना माहिती संकलनासाठी 1 ते 4 तास पुरेसे होतात.

**माहिती शोधवर्तनावर परिणाम करणारे घटक :**

ग्रंथालयातील सोयी–सुविधा, सेवा तसेच शिक्षकांची अध्ययन पद्धती, अभ्यासक्रमाचे स्वरूप इत्यादींचा विद्यार्थ्यांच्या माहिती शोधवर्तनावर परिणाम होत असतो. यापैकी कोणत्या घटकांचा विद्यार्थ्यांच्या माहिती शोधवर्तनावर परिणाम होतो हे माहित करून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.14 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.14**

**माहिती शोधवर्तनावर परिणाम करणारे घटक**

| क्र. | घटक | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | अध्यापकांनी विचारलेले प्रश्न | 815 | 56.01% |
| 2. | अध्यापकांनी दिलेल्या अतिरिक्त कार्य करण्यासाठी | 554 | 38.07% |
| 3. | ग्रंथालयामध्ये विकसित केलेल्या विविध प्रकारच्या सेवा | 352 | 24.19% |
| 4. | वारंवार बदलणारे कायदे, अभ्यासक्रम | 951 | 65.36% |
| 5. | माहिती संप्रेषण तंत्रज्ञानातील बदल | 451 | 30.99% |

वरील तक्ता क्र. 4.14 च्या निरीक्षणावरून निदर्शनास येते की, बहुतांश (65.36%) विद्यार्थ्यांच्या माहिती शोधवर्तनावर वारंवार बदलणारे कायदे, अभ्यासक्रम यांचा मोठ्या प्रमाणावर परिणाम होता. त्याचबरोबर अध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांमुळेही बऱ्याच (56.01%) विद्यार्थ्यांच्या माहिती शोधवर्तनावर परिणाम होतो.

ग्रंथालयीन सेवांचा मात्र केवळ (24.19%) विद्यार्थ्यांच्या माहिती शोधवर्तनावर परिणाम होतो. वरील वक्त्यावरून लक्षात येते की अध्यापन  आणि अभ्यासक्रम म्हणजेच ग्रंथालय सेवा नाही तर शैक्षणिक बाबींचा (अध्यापन पद्धती, अभ्यासक्रम इत्यादी) विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनावर परिणाम होतो. ही बाब विचारात घेऊन ग्रंथालयांनी त्याप्रमाणे आपल्या सेवांची व्यूहरचना केली पाहीजे.

**अनौपचारिक माहिती साधने वापरण्याची कारणे :**

माहितीचा शोध घेताना विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी औपचारिक साधनांचा वापर करतातच. परंतु त्याच बरोबर अनौपचारिक साधनाद्वारे माहिती शोधतात असे या आधीच्या परिच्छेदात लक्षात आले. अनौपचारिक साधनाद्वारे माहितीचा शोध घेण्याचे काय कारण असू शकते, यावर प्रकाश टाकण्यासाठी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यांच्या प्रतिसादाचे विश्लेषण तक्ता क्रमांक 4.15 मध्ये दिले आहे.

**तक्ता क्रमांक 4.15**

**अनौपचारिक माहिती साधने वापरण्याची कारणे**

| क्र. | कारणे | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | सहज उपलब्ध | 1080 | 74.22% |
| 2. | वापरण्यास सोपे | 859 | 59.03% |
| 3. | अतिशय अधिकृत | 294 | 20.20% |
| 4. | मोठ्या प्रमाणावर माहितीची विविधता | 406 | 27.90% |
| 5. | औपचारिक साधनांबद्दल असलेले अज्ञान | 333 | 22.78% |
| 6. | औपचारिक साधने मिळण्यातील बंधने | 181 | 12.43% |

सदर अभ्यासामध्ये निदर्शनास येते की, अनौपचारिक माहितीची साधने सहज उपलब्ध असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर (74.22%) विद्यार्थी त्यांचा वापर करतात. जसे की शिक्षक, ग्रंथपाल, विद्यार्थ्यांचे वरिष्ठ वर्गमित्र हे माहिती मिळविण्यासाठी सहज उपलब्ध असतात. दरवेळेस अर्ज करा, आयकार्ड दाखवा, नोंदी करून घ्या अशा कृती अनौपचारिक साधने वापरताना विद्यार्थ्यांना कराव्या लागत नाहीत.

सुमारे 59% विद्यार्थ्यांच्या मतानुसार अनौपचारिक साधने/मार्ग वापरण्यास सुलभ आहेत म्हणून ते यांचा वापर करतात. इंटरनेट, तालिका, डेटाबेसेस या यंत्रणा शिक्षकांकडून माहिती मिळविण्याएवढ्या सुलभ आहेत असे विद्यार्थ्यांना वाटत नाही.

यावरून हे सिद्ध होते की, विधी ग्रंथालयातील माहितीची साधने उपभोक्त्यांना सहज उपलब्ध होतील त्याप्रमाणे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. तसेच वापरण्यास अनुकूल असा संग्रह विकासाचे धोरण ठरविणे आवश्यक आहे. संग्रह विकासाचे धोरण ठरविल्यास मोठ्या प्रमाणावर माहितीची उपलब्धता ग्रंथालयामध्ये होऊ शकते.

विविधता आणि अधिकृतता ही कारणेही अनुक्रमे 27.90% आणि 20.20% विद्यार्थ्यांना अनौपचारिक माहिती साधने वापरण्यासाठी प्रोत्साहित करतात. विशेषतः माहितीचे मौखिक पद्धतीने, विविध उदाहरणांद्वारे केलेले सादरीकरण यामध्ये समाविष्ट होते. शिवाय अध्यापकांवरील आदरयुक्त विश्वासामुळे त्यांनी दिलेली माहिती विद्यार्थ्यांना अधिकृत वाटत असणार.

सुमारे 23% विद्यार्थी औपचारिक माहिती नसल्यामुळे अनौपचारिक माहिती साधने वापरतात. याचा अर्थ या विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा योग्य परिचय झालेला नाही आणि ते पुरेसे माहिती साक्षर नाहीत.

औपचारिक माहिती साधने वापरण्यासाठी किमान सदस्यत्व असावे लागते. ही साधने सहज उपलब्ध नसतात (Lack of access). परंतु वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून माहिती मिळविण्यासाठी सदस्यत्व, वेळ, ठिकाण यासारखी बंधने नसतात. म्हणून 12.43% विद्यार्थी अनौपचारिक माहिती साधने वापरतात.

अनौपचारिक साधनांमधून माहितीची सहज उपलब्धता होत असली तरी त्या माहितीची सत्यता (authenticity) कितपत आहे हे सांगता येणे शक्य नाही. विधी साधनांचा सत्यतेशिवाय वापर करणे म्हणजे अयोग्य कायद्याची अंमलबजावणी करणे होय. अनौपचारिक साधने वापरण्यास सोपे म्हणून प्रतिसादक मोठ्या प्रमाणावर वापरतात, विधी ग्रंथालयाचा वापर करणे प्रतिसादकांनी अगदी सुरुवातीपासून प्रशिक्षण दिल्यास त्यांना औपचारिक साधने वापरणे सोयीस्कर जाऊ शकते. विविध विषयांवर माहितीची उपलब्धता असणे विधी ग्रंथालयात आवश्यक असते. उपभोक्त्यांना निकडीचा संग्रह उपलब्ध करून दिल्यास उपभोक्ते अनौपचारिक साधने वापरण्यापासून परावृत्त होऊ शकतील.

**अनौपचारिक माहिती साधनाचा वापर :**

माहितीचे उपभोक्ते औपचारिक साधनांच्या जोडीला अनौपचारिक साधनांचा वैयक्तिक वापर करतात. ही साधने निवडताना उपभोक्ते त्यांचे वैयक्तिक ज्ञान, अनुभव आणि धारणा यावर त्यांची निवड अवलंबून असते. ही साधने प्रतिसादक कोणत्या परिस्थितीत वापरतात, त्याची वारंवारता यावर प्रकाश टाकण्यासाठी प्रस्तुत प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.16 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.16**

**अनौपचारिक माहिती साधनाचा वापर**

| क्र. | साधने | नेहमी | | वारंवार | | कधी कधी | | क्वचित | | कधीही नाही | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अध्यापकांसोबत चर्चा | 658 | 45.22 | 405 | 27.83 | 216 | 14.84 | 77 | 5.29 | 25 | 1.71 |
| 2 | ग्रंथपालांबरोबर चर्चा | 251 | 17.25 | 423 | 29.07 | 281 | 19.31 | 215 | 14.77 | 131 | 9.00 |
| 3 | वरिष्ठांसोबत चर्चा | 378 | 25.97 | 400 | 27.49 | 377 | 25.91 | 116 | 7.97 | 52 | 3.57 |
| 4 | विधी तज्ज्ञांसोबत चर्चा | 269 | 18.48 | 293 | 20.13 | 341 | 23.43 | 269 | 18.48 | 71 | 4.87 |

वरील तक्त्यातील प्रतिसाद नेहमी आणि वारंवार असा एकत्रितपणे विचारात घेतला तर काही एक निष्कर्ष समोर येतो. तसेच क्वचित आणि कधीही नाही याचा प्रतिसाद एकत्रितपणे विचारात घेतला तर चित्र अधिक स्पष्ट होते. एकंदरीत नेहमी आणि वारंवार अनौपचारिक साधनांचा माहिती संकलनासाठी वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण क्वचित आणि कधीही नाही यापेक्षा खूप अधिक आहे.

जसे की, अध्यापकाबरोबर चर्चा करून (नेहमी 45.22% आणि वारंवार 27.83%) 73.05% विद्यार्थी माहिती मिळवितात. सुमारे 38.61% (18.48% + 20.13%) विद्यार्थी विधी तज्ज्ञांकडून अनौपचारिक चर्चेद्वारे माहिती मिळवितात.

वरील स्पष्टीकरणाच्या साहाय्याने निदर्शनास येते की, विधी ग्रंथालयातील प्रतिसादक अनौपचारिक साधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात.

ग्रंथपालांबरोबर नेहमी आणि वारंवार (17.25% + 29.07%) चर्चा करून माहिती

मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही लक्षणीय (46.32%) आहे. ग्रंथपालांचे विधी माहिती साधनांबद्दलचे ज्ञान याला कारणीभूत असू शकते.

**माहिती शोधण्यातील समस्या :**

इतर कोणत्याही अभ्यासक्रमाप्रमाणे विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनाही अनेक प्रकारची माहिती हवी असते. ही माहिती शोधत असताना, मिळवित असताना विधी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते. हे जाणून घेण्याचा प्रयत्न करून त्यासाठी एकापेक्षा अधिक पर्यायांना मत प्रदर्शित करण्यास सांगण्यात आले. त्या समस्यावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने सदर प्रश्नाची विचारणा करून या प्रश्नाचा प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.17 मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक 4.17**

**माहिती शोधण्यातील समस्या**

| क्र. | समस्या | नेहमीच | | अनेकदा | | काही वेळा | | क्वचित | | कधीच नाही | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के |
| 1 | आवश्यक माहिती ग्रंथालयामध्ये उपलब्ध नसते. | 234 | 16.08 | 142 | 9.75 | 423 | 29.07 | 324 | 22.26 | 239 | 16.42 |
| 2 | ग्रंथालय सेवकाची मदत करण्याची इच्छा नसते | 115 | 7.90 | 148 | 10.17 | 160 | 10.99 | 317 | 21.78 | 445 | 30.58 |
| 3 | अपूर्ण माहिती | 119 | 8.17 | 145 | 9.96 | 307 | 21.09 | 307 | 21.09 | 253 | 17.38 |
| 4 | असंबंधीत माहिती | 103 | 7.07 | 161 | 11.06 | 247 | 16.97 | 274 | 18.83 | 255 | 17.52 |
| 5 | ओपॅक वापरण्या–बाबतचे अज्ञान | 163 | 11.20 | 163 | 11.20 | 280 | 19.24 | 291 | 20.00 | 298 | 20.48 |
| 6 | माहिती अनेक ठिकाणी विखुरलेली असते. | 130 | 8.93 | 289 | 19.86 | 293 | 20.13 | 186 | 12.78 | 146 | 10.03 |
| 7 | ई–संसाधना बाबतचे अज्ञान | 126 | 8.65 | 155 | 10.65 | 244 | 16.76 | 269 | 18.48 | 322 | 22.13 |
| 8 | इंटरनेटवरील माहितीचे प्रचंड प्रमाण | 222 | 15.25 | 257 | 17.66 | 284 | 19.51 | 182 | 12.50 | 169 | 11.61 |
| 9 | माहिती शोधाच्या कौशल्यांचा अभाव | 129 | 8.86 | 152 | 10.44 | 253 | 17.38 | 266 | 18.28 | 265 | 18.21 |

| क्र. | समस्या | नेहमीच | | अनेकदा | | काही वेळा | | क्वचित | | कधीच नाही | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के | प्रतिसाद | टक्के |
| 10 | इंटरनेटचा कमी वेग | 193 | 13.26 | 209 | 14.36 | 330 | 22.68 | 288 | 19.79 | 201 | 13.81 |
| 11 | माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधाचा अभाव | 156 | 10.72 | 159 | 10.92 | 233 | 16.01 | 241 | 16.56 | 256 | 17.59 |

वरील तक्यावरून निदर्शनास येते की, ही माहिती शोधत असताना, मिळवित असताना आवश्यक माहिती ग्रंथालयात उपलब्ध नसते, असे विधी विद्यार्थ्यांना वाटत नाही. कारण ही समस्या क्वचित (22.26%) आणि कधीच नाही (16.42%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण 38.67% आहे. याउलट ही समस्या नेहमीच (16.08%) आणि अनेकदा (9.75%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (25.83%) आहे. याचाच अर्थ विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये आवश्यक ती माहिती मिळते.

ग्रंथालय सेवकांची मदत करण्याची इच्छा नसते, असे विधी विद्यार्थ्यांना वाटत नाही. कारण ही समस्या क्वचित (27.78%) आणि कधीच नाही (30.58%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (52.36%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (7.90%) आणि अनेकदा (10.17%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (18.07%) आहे. याचाच अर्थ विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालय सेवकांची मदत करण्याची इच्छा असते व ते मदत करतात.

विधी ग्रंथालयात अपूर्ण माहिती असते असे विद्यार्थ्यांना वाटत नाही. कारण ही समस्या क्वचित (21.09%) आणि कधीच नाही (17.38%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (38.47%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (8.17%) आणि अनेकदा (9.96%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (18.13%) आहे. याचाच अर्थ, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयात आवश्यक असलेली संपूर्ण माहिती मिळते.

विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयात असंबंधित माहिती असते असे वाटत नाही, कारण ही समस्या क्वचित (18.38%) आणि कधीच नाही (17.52%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित

प्रमाण (36.35%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (7.07%) आणि अनेकदा (11.06%) असे म्हणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (18.13%) आहे. याचाच अर्थ विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयात असंबंधित माहितीला सामोरे जावे लागत नाही. विधी ग्रंथालये त्यांना हवी असणारीच माहिती संग्रहित करतात; उपलब्ध करतात.

ओपॅक वापरण्याबाबत त्यांचे स्वतःचे अज्ञान असते असे विधी विद्यार्थ्यांना वाटत नाही कारण ही समस्या क्वचित (20.00%) आणि कधीच नाही (20.48%) असे म्हणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (40.48%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (11.20%) आणि अनेकदा (11.20%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (22.40%) आहे. याचाच अर्थ विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयात ओपॅक वापरण्याबाबत ज्ञानी आहेत; माहिती साक्षर आहेत.

विधी ग्रंथालयातील माहिती अनेक ठिकाणी विखुरलेली असते असे विधी विद्यार्थ्यांना वाटते. कारण ही समस्या नेहमीच (8.93%) आणि अनेकदा (19.86%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (28.79%) आहे. याउलट ही समस्या क्वचित (12.78%) आणि कधीच नाही (10.03%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (22.81%) आहे. याचाच अर्थ, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये माहिती अनेक ठिकाणी विखुरलेली मिळते. ही त्यांना समस्या वाटते. परंतु ग्रंथालये वाचन साहित्यप्रकारानुसार संग्रहाची रचना करतात. जसे की, ग्रंथ एका ठिकाणी, नियतकालिके दुसऱ्या ठिकाणी, संदर्भ तिसऱ्या ठिकाणी तर इंटरनेटची सुविधा अन्य ठिकाणी आणि हीच रचना समाधानकारक आहे. जरी ती विद्यार्थ्यांना सोयीची वाटत नसली तरीसुद्धा.

ई–संसाधनाबाबत त्यांचे स्वतःचे अज्ञान नसते असे विधी विद्यार्थ्यांना वाटते. कारण ही समस्या क्वचित (18.48%) आणि कधीच नाही (22.13%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (40.61%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (8.65%) आणि अनेकदा (10.65%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (19.13%) आहे. याचाच अर्थ विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी ई–संसाधनाबाबत साक्षर आहेत, ज्ञानी आहेत.

इंटरनेटवरील माहितीचे प्रचंड प्रमाण ही विधी विद्यार्थ्यांना समस्या वाटते. कारण ही समस्या नेहमीच (15.25%) आणि अनेकदा (17.66%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (32.91%) आहे. याउलट ही समस्या क्वचित (12.50%) आणि कधीच नाही (11.61%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (24.12%) आहे. याचाच अर्थ, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील माहितीच्या प्रचंड प्रमाणाला सामोरे जावे लागते; हे प्रचंड प्रमाण ही विद्यार्थ्यांना समस्या वाटते.

माहिती शोधाच्या कौशल्यांचा त्यांच्याकडे अभाव आहे असे विधी विद्यार्थ्यांना वाटत नाही. कारण ही समस्या क्वचित (18.28%) आणि कधीच नाही (18.21%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (36.49%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (8.86%) आणि अनेकदा (10.44%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (19.3%) आहे. याचाच अर्थ,विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडे ग्रंथालयामध्ये माहिती शोधण्यासाठीची कौशल्ये आहेत.

इंटरनेटचा कमी वेग नसतो असे विधी विद्यार्थ्यांना वाटत नाही. कारण ही समस्या क्वचित (19.79%) आणि कधीच नाही (13.18%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (33.6%) आहे. याउलट ही समस्या नेहमी (13.26%) आणि अनेकदा (14.36%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (27.62%) आहे.

याचाच अर्थ, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये इंटरनेट वेगाची अडचण येत नाही. माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांचा अभाव आहे असे विधी विद्यार्थ्यांना वाटत नाही. कारण ही समस्या क्वचित (16.56%) आणि कधीच नाही (17.59%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण (34.15%) आहे. याउलट ही समस्या नेहमीच (10.72%) आणि अनेकदा (10.92%) असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांची एकत्रित टक्केवारी (21.64%) आहे. याचाच अर्थ, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा मिळतात.

वरील नमूद विश्लेषणावरून असे म्हणता येऊ शकते की, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून माहिती शोधण्यामध्ये अडथळे आणणारे प्रमुख घटक नाहीत.

वरील नमूद केलेल्या विश्लेषणावरून संशोधकाच्या लक्षात येते की, गृहितक क्र. २ (एल.एल.बी.च्या अंतिम सत्रात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती शोधण्यामध्ये अडचणी येत नाहीत) हे सिद्ध झाले.

## 4.6 विभाग इ : माहिती शोध वर्तनावर माहिती तंत्रज्ञानाचा पडणारा प्रभाव :

### माहिती शोधण्याचे प्रशिक्षण :

ग्रंथालयांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून तसेच इंटरनेटवरून माहिती शोधण्याचे प्रशिक्षण दिल्यास हे कौशल्य विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरेल. माहिती कशी शोधावी किंवा कशी शोधली जाऊ शकते या प्रकारचे प्रशिक्षण ग्रंथालयाने आयोजित करणे आवश्यक आहे.

उपभोक्त्याचे स्वतःचे ग्रंथालय त्यांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारे कार्यक्रम राबविते अथवा नाही यासाठी प्रस्तुत प्रश्नांचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नाच्या प्रतिसादावरून निदर्शनास येते की, 542 (37.25%) विद्यार्थ्यांनी माहितीचा शोध घेण्याचे प्रशिक्षण मिळत असल्याचे नमूद केले आहे. तर 913 (62.75%) विद्यार्थ्यांनी माहितीचा शोध घेण्यासाठी त्यांना प्रशिक्षण मिळत नाही असे नमूद केले आहे.

यावरून असे निरीक्षणास येते की, अतिशय अल्प प्रमाणात विधी ग्रंथालये विद्यार्थ्यांना माहिती शोधाचे तसेच माहिती संप्रेषण तंत्रज्ञानांविषयी प्रशिक्षण देतात. अधिक प्रमाणातील (62.75%) विद्यार्थ्यांना माहिती शोध प्रशिक्षणाचे आयोजन केले जात नाही. त्याचे कारण असे असू शकते की, ग्रंथलयात माहिती तंत्रज्ञानाची साधने ग्रंथालयाकडे उपलब्ध नसावीत; ग्रंथालय अधिकारी वर्गाची प्रशिक्षणासाठी उदासीनता असू शकते किंवा विद्यार्थी प्रशिक्षणासाठी प्रतिसाद देत नसावेत; ग्रंथालयाला वाचक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता वाटत नसावी; शिवाय विधी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षातील उपभोक्त्यांना प्रशिक्षण घेणे कमी दर्जाचे वाटत असावे.

### माहिती संकलन करण्यासाठी कौशल्याची/प्रशिक्षणाची गरज :

माहितीच्या परिस्फोटाबरोबरच माहिती संप्रेषण तंत्रज्ञानात फार झपाट्याने प्रगती होत आहे. त्यामुळे माहितीची उपलब्धता प्रत्येक क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात होऊ लागली हेही मान्य करावे लागेल. विधी क्षेत्रही या बाबतीत मागे नाही. या क्षेत्रातही माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध

होऊ लागली. विशाल माहिती संग्रहातून नेमकी माहिती शोधण्यासाठी पुरेसे प्रशिक्षण असणे आवश्यक आहे असे विद्यार्थ्यांना वाटते का? या संदर्भात त्यांचा कल विचारात घेण्यात आला. यासंबंधीचा त्यांचा प्रतिसाद आलेख क्रमांक 4.10 मध्ये दिला आहे.




आलेख 4.10 च्या निरीक्षणावरून समजते की, माहिती शोधण्याबाबतच्या कौशल्यांची आणि प्रशिक्षणाची गरज आहे. याबाबत 501 (34.43%) विद्यार्थी पूर्ण सहमत आहे व सहमती असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 817 (56.16%) आहे. या दोन्ही प्रमाणाची एकत्रित टक्केवारी (90.59%) होते. हे प्रमाण विचारात घेता विधी अभ्यासक्रमाच्या जवळजवळ सर्वच विद्यार्थ्यांना माहिती शोध प्रशिक्षणाची गरज जाणवते. या प्रशिक्षणातून मिळणारी माहिती शोधण्याचे कौशल्य त्यांना योग्य माहिती शोधण्यासाठी उपयुक्त ठरेल असा त्यांचा विश्वास दिसतो.

माहिती परिस्फोटामुळे माहितीत मोठ्या प्रमाणात भर पडत असली तरी उपभोक्त्यांना योग्य प्रशिक्षण, कौशल्य प्राप्त झाल्यास नेमकी माहिती नेमक्या वेळी मिळू शकते. बहुतांश प्रतिसादकांना माहिती तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासंदर्भात योग्य प्रतिसाद काय द्यावा हे माहीत नाही, असहमत आहेत यांचे कारण असू शकते. ते माहिती संप्रेषण तंत्रज्ञानसंदर्भात जागरूक नाहीत, त्यांना त्यांचे महत्त्व अजूनही माहीत नसावे अथवा त्यांचा कल पारंपारिक साधने वापरण्याकडे अजूनही असू शकतो.

**इंटरनेटचा वापर करण्याची वारंवारिता :**

पारंपारिक ग्रंथालयांची जागा हायब्रिड ग्रंथालये, ऑनलाइन ग्रंथालये व ई–ग्रंथालये घेत आहेत. त्याचबरोबर इंटरनेटवरील साधनांचा उपभोक्त्यांवर फार प्रभाव पडू लागला व ते इंटरनेट या माहिती साधनाचा अधिकाधिक वापर करू लागले आहेत. त्यांची इंटरनेट वापराची वारंवारता समजण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तुत प्रश्नाची विचारणा करण्यात आली होती. मिळालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण आलेख क्रमांक 4.11 मध्ये दिले आहे.




वरील आलेख क्र. 4.11 वरून हे दिसून येते की, इंटरनेट हे माहितीचे जलद प्रसारण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. विधीविषयक माहितीचे जलद प्रसारण आणि वितरण झाल्यास विद्यार्थ्यांना प्रचलित माहिती मिळू शकते. वरील तक्त्यातील माहितीवरून लक्षात येते की, बहुतांश विद्यार्थी (86.94%) इंटरनेटचा दररोज वापर करतात. इंटरनेटची स्वस्त उपलब्धता, सहज उपलब्धता, अद्ययावत माहितीची उपलब्धता, केव्हाही कोठेही उपलब्धता दृक–श्राव्य साधनांची उपलब्धता या वैशिष्ट्यांमुळे सुमारे 87% विद्यार्थी या साधनांच्याद्वारे माहिती मिळविण्यासाठी दररोज वापर करतात.

**इंटरनेट वापराचे हेतू :**

प्रतिसादक इंटरनेटचा वापर कोणत्या बाबींसाठी करतात, ती बाब प्रकाशात येण्यासाठी संबंधित प्रश्नाची विचारणा करण्यात आली. प्रतिसादकांना उत्तर देण्यासाठी एकापेक्षा अधिक

बाबींना प्रतिसाद देण्याची विनंती करून आलेख क्र. 4.12 मध्ये प्रतिसाद नमूद करण्यात आले.




वरील आलेख क्र. 4.12 मधील पाचही हेतूंसाठी विधी अभ्यासक्रमाचे 50% आणि त्यापेक्षा जास्त विद्यार्थी इंटरनेटचा वापर करतात. विशेषकरून या संशोधनातील प्रतिसादक विद्यार्थी असल्यामुळे सर्वाधिक म्हणजे 89.48% विद्यार्थी शैक्षणिक हेतूसाठी इंटरनेट वापरतात. शिवाय 60.54% विद्यार्थी विधीविषयक माहिती मिळविण्यासाठी इंटरनेट वापरतात. हेही या संशोधनातील प्रतिसादकाचे स्वरूप लक्षात घेता संयुक्तिक आहे.

यावरून सिद्ध होते की, माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये विधी शिक्षणक्रमाचे विद्यार्थी शिक्षण साध्य करण्याच्या हेतूसाठी अधिक अध्ययन करण्याच्या उद्देशाने इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षणासाठी करणे हा हेतू त्याची अभ्यासू जागरूकता दर्शविते.

**इंटरनेट सुविधेच्या उपयोगाचे ठिकाण :**

इंटरनेट सुविधेचा लाभ उपभोक्ते कोठून करतात कोणत्या स्थानांवरून या संदर्भात त्यांना ही सुविधा कोठून पुरविली जाते. या संदर्भात माहिती पुरविण्याची प्रतिसादकांना विचारणा करण्यात आली. या संबंधीचा त्यांचा प्रतिसाद आलेख क्रमांक4.13 मध्ये दिला आहे.




वरील आलेख क्र. 4.13 मधील माहितीवरून लक्षात येते की, विधी अभ्यासक्रमाचे बहुतांश 67.69% विद्यार्थी ग्रंथालयातील इंटरनेटची सुविधा वापरतात. याचा अर्थ विधी ग्रंथालयांकडे ही सुविधा समाधानकारकपणे उपलब्ध आहे. याचा अर्थ शुल्क, वेळ, वेग, मार्गदर्शन इत्यादी बाबतीत ग्रंथालयीन इंटरनेट सेवा योग्य आहे. महाविद्यालयातील/ विद्यापीठातील इंटरनेट सुविधा वापरणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही 43.23% आहे. याचा अर्थ येथिल सुविधा देखील समाधानकारक आहे. सुमारे 62% (61.99) विद्यार्थी इंटरनेटची सुविधा घरी वापरतात. याचा अर्थ ते महाविद्यालय/विद्यापीठ वेळे व्यतिरिक्त ही सेवा वापरत असतील.

**इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबद्दलची जागरूकता :**

मुद्रित साहित्याबरोबर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये विधी क्षेत्रातील वाचन साहित्य भरपूर प्रमाणात उपलब्ध होत आहे. इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांचा प्रभावी वापर केल्यास विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विशेष फायदा होऊ शकतो. अर्थात त्यासाठी त्यांना ही साधने माहीत असली पाहिजेत, जागरूक असली पाहिजेत. विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची इलेक्ट्रॉनिक माहिती साधनाबद्दलच्या स्वतःच्या जागरूकतेबाबतची मते जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला मिळालेल्या प्रतिसादाचे विश्लेषण तक्ता क्रमांक 4.18 मध्ये सादर केले आहे.

**तक्ता क्रमांक 4.18**

**इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबद्दलची जागरूकता**

| क्र. | जागरूकतेचे प्रमाण | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | खूप चांगली | 516 | 35.46% |
| 2. | चांगली | 796 | 54.71% |
| 3. | माहीत नाही | 70 | 4.82% |
| 4. | कमी | 54 | 3.71% |
| 5. | खूप कमी | 19 | 1.30% |

वरील तक्ता क्र. 4.18 मधील प्रतिसाद स्पष्ट करतो की, 796 (54.71%) विद्यार्थ्यांची इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबद्दल जागरूकता चांगली आहे. तर खूप चांगली जागरूकता असणाऱ्या विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 516 (35.46%) आहे. हे प्रमाण नक्कीच समाधानक आहे. शिवाय 'चांगली जागरूकता' आणि 'खूप चांगली जागरूकता' यांच्या टक्केवारीचे एकत्रिकरण (90.17%) एवढे होते. याचाच अर्थ एकूण प्रतिसादकांपैकी 90% विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक माहिती साधनाबद्दल जागरूक आहेत. त्यांना त्याबद्दल माहिती आहे. असे असले तरी या साधनांचा वापर मात्र तुलनेने सध्या कमी होतो. तो वाढविण्यासाठी योग्य ते प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांची उपयुक्तता वाढविणारी वैशिष्ट्ये :**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांचा बहुतांश वेळा विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून वापर होत असतो. विद्यार्थी या वाचन साहित्याकडे का आकर्षित होतात; ते आकर्षित होण्याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे म्हणून इलेक्ट्रॉनिक माहिती साधनाची कोणती वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांना ही साधने वापरण्यास सोपी वाटतात याची विचारणा केली होती. या प्रश्नांची प्रतिसादकाची मते तक्ता क्रमांक 4.19 मध्ये दिली आहेत.

**तक्ता क्रमांक 4.19**

**इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांची उपयुक्तता वाढविणारी वैशिष्ट्ये**

| क्र. | वैशिष्ट्ये | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | झटपट शोध सुविधा (Quick Search) | 1201 | 82.54% |
| 2. | अद्ययावत माहिती | 752 | 51.68% |
| 3. | विनामूल्य उपलब्धता | 701 | 48.17% |
| 4. | पूर्ण लेख (Full text) शोधण्याची सुविधा | 418 | 28.72% |
| 5. | संबंधित इतर साधनांकडे निर्देश करणारी सुविधा (Hyperlinks) | 366 | 25.15% |
| 6. | माहितीच्या वर्गीकरणाची सुविधा<br>जसे की : – | | |
| | वर्षाप्रमाणे | 778 | 53.47% |
| | निकालाप्रमाणे | 637 | 43.78% |
| | कोर्टाप्रमाणे | 425 | 29.20% |
| 7. | इतर | 25 | 1.71% |

सध्याचे जग वेगाचे जग आहे. क्लिक केलेली माहिती मिळावी अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे आणि म्हणून सुमारे 1201 (82.54%) विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक माहिती साधने वापरणे पसंत करतात. कारण या साधनांमधून माहिती चटकन शोधता येते. ग्रंथालयीन सेवाचा वापर वाढविण्यासाठी त्याही वेगवान झाल्या पाहिजेत.

इलेक्ट्रॉनिक माहिती साधने नियमितपणे अद्ययावत करणे शक्य असते व ती अद्ययावत केलेही जातात आणि म्हणनूच 752 (51.68%) विद्यार्थी अद्ययावत माहितीच्या वैशिष्ट्यांमुळे इलेक्ट्रॉनिक माहिती साधने वापरणे पसंत करतात.

इलेक्ट्रॉनिक माहिती मोफत उपलब्ध असल्याचे प्रमाणही खूप मोठे आहे. ही बाब विचारात घेऊन 701 (48.17%) विद्यार्थी या माहिती साधनांच्या वापरास प्राधान्य देताना दिसतात.

यावरून हे स्पष्ट होते की, प्रतिसादकांना माहितीची झटपट उपलब्धता मिळत असल्याने त्यांना इलेक्ट्रॉनिक माहिती साधने मोठ्या प्रमाणात वापरण्यास सोपे वाटत असावे. त्याचप्रमाणे विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विधी विषयांशी संबंधित अद्ययावत माहिती साधने हवी असतात, त्यांची अद्ययावत माहिती मिळविण्याची भूक इलेक्ट्रॉनिक माहिती साधने मोठ्या प्रमाणात पूर्ण करतात. ही साधने बऱ्यापैकी मोफत उपलब्ध असल्यानेही विद्यार्थ्यांचा कल त्या दिशेने झुकलेला निदर्शनास येतो.

**न्यायालयीन निकाल किंवा विधीविषयक लेख शोधण्यासाठी विधीविषयक डेटाबेसचा वापर :**

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना न्यायालयाचे निकाल शोधण्यासाठी तसेच विविध विषयांवरील संशोधनपर लेख शोधण्यासाठी; मूटकोर्ट स्पर्धेची तयारी करण्यासाठी अद्ययावत माहिती हवी असते. ही माहिती त्यांना विधीविषयक डेटाबेसमध्ये मिळते त्यासाठी या विद्यार्थ्यांनी विधीविषयक डेटाबेसेस वापरले पाहिजेत. सदर संशोधनातील विद्यार्थी विधीविषयक डेटाबेसेस वापरतात की नाही हे माहीत करून घेण्यासाठी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाच्या प्रतिसादावरून लक्षात येते की, 1282 (88.11%) विद्यार्थी न्यायालयीन निकाल अथवा लेख शोधण्यासाठी विधीविषयक डेटाबेसेसचा वापर करतात.

या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी विधीविषयक डेटाबेसेसचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. आजच्या डिजिटल युगामध्ये ग्रंथालयांसाठी ही खूप सकारात्मक बाब आहे.

डेटाबेसेसचा वापर करणारे विद्यार्थी कोणते डेटाबेसेस वापरतात याबाबत डेटाबेसेसची यादी देऊन प्रश्न विचारला होता. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद तक्ता क्रमांक 4.20 मध्ये दिला आहे.

**तक्ता क्रमांक 4.20**

**विधी डेटाबेसचा प्राधान्यक्रम**

| क्र. | प्राधान्यक्रम डेटाबेसचे नाव | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | एस्.सी.सी. ऑनलाइन | 883 | 60.06% |
| 2 | मनुपात्रा | 839 | 57.06% |
| 3 | ए.आय.आर. ऑनलाइन इन्स्टिट्युशनल व्हर्जन | 801 | 55.05% |
| 4 | वेस्ट लॉ | 502 | 34.50% |
| 5 | लेक्सिस नेक्सिस इंडिया | 498 | 34.22% |
| 6 | टॅक्समन | 461 | 31.68% |
| 7 | जेस्टोर | 435 | 29.89% |
| 8 | लेक्सिस नेक्सिस ॲकॅडमिक | 416 | 28.59% |
| 9 | हीन ऑनलाइन | 360 | 24.74% |
| 10 | ऑक्सफर्ड कॉन्स्टिट्यूशन ऑफ द वर्ल्ड | 301 | 20.68% |
| 11 | एब्स्को | 256 | 17.59% |
| 12 | सी.एल.ए. ऑनलाइन | 254 | 17.45% |
| 13 | ज्युडीस | 233 | 16.01% |
| 14 | इंडेक्स टू लीगल पिरिऑडिक्ल्स् | 221 | 15.18% |
| 15 | ईमराल्ड् | 217 | 14.91% |
| 16 | क्लूअर अर्बिट्रेशन | 198 | 13.60% |
| 17 | क्लूअर कॉम्पिटिशन | 157 | 10.79% |
| 18 | क्लूअर पेटंट | 133 | 9.14% |
| 19 | इतर | 7 | 0.48% |

तक्ता क्र. 4.20 वरून असे दिसून येते की, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा विधीविषयक डेटाबेस वापरण्यासाठीचा प्राध्यानक्रम विचारून त्यांचे मत व्यक्त करण्यास सांगितले असता त्याच्याकडून सर्वात अधिक 883 (60.6%) पसंती सुप्रीम कोर्ट केसेस

ऑनलाइन या डेटाबेसला मिळाली आहे. दुसऱ्या स्थानावर 839 (57.6%) मनुपत्रा या डेटाबेसला प्रतिसाद मिळाला आहे. प्रतिसादकांनी तिसऱ्या क्रमांकावर 801 (55.05%) एआयआर ऑनलाइन डेटाबेसला आपला पसंतीक्रम दर्शविण्यात आला.

एस.सी.सी. ऑनलाईन हा डेटाबेस सर्वात जास्त विधीचा अभ्यास करणारे विद्यार्थी वापरतात. क्लूअर अर्बिट्रेशन, क्लूअर कॉम्पिटिशन, क्लुवर पेटंट हे कमी प्रमाणात विद्यार्थ्यांकडून वापरले जातात. असे असू शकते की, हा विषय फार कमी विधी महाविद्यालयामध्ये शिकविला जात असावा अथवा या विषयाची कमी विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी निवड केलेली असावी.

वरील आकडेवारीच्या माध्यमातून निदर्शनास येते की, विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर सुप्रीम कोर्ट केसेस ऑनलाइन, मनुपात्रा आणि ए.आय.आर या तीन डेटाबेसेसला प्राधान्य देतात व त्यावर अवलंबून आहेत.

याचे कारण हे तीनही डेटाबेसेस प्रामुख्याने भारतीय माहितीची पूर्तता करतात; तसेच यातून केसेस, निकाल, सायटेशन काढणे विद्यार्थ्यांना खूप सोयीचे वाटत असावे, त्यातील माहिती अद्ययावत असते. तसेच बेअर ॲक्ट मध्ये दुरूस्त्या झाल्यास त्यांची जलद उपलब्धता होते ही या डेटाबेसेस वापरण्या मागील कारणे असू शकतात. अर्थात यादीतील इतर डेटाबेसेसचाही कमी प्रमाणात का होईना विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वापर करतात.

संशोधकाला निरिक्षणाअंती असे निदर्शनास आले की, काही मोजक्याच महाविद्यालयामध्येच या यादीत नमूद केलेले मोजकेच ऑनलाइन डेटाबेसेस उपलब्ध आहेत. बहुतांश महाविद्यालयांमध्ये फक्त एस.सी.सी. ऑनलाइन, मनुपात्रा, ए.आय.आर. हे तीन ऑनलाइन डेटाबेसेस आहेत ते उपलब्ध असण्यामागील कारण पाहता लक्षात येते. बार कॉन्सिल ऑफ इंडियाने हे तिन्ही ऑनलाइन डेटाबेसेस प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथालयांना घेणे बंधनकारक केले असल्याने विद्यार्थ्यांना किमान हे डेटाबेसेस त्यांच्या ग्रंथालयातून वापरता येतात. इतर डेटाबेसेसला प्राधान्यक्रम न मिळण्याचे कारण संबंधित महाविद्यालयीन ग्रंथालयांकडे हे डेटाबेसेस उपलब्ध नसू शकतात.

**तंत्रज्ञानधिष्ठित ग्रंथालयाच्या सेवांबाबतचे मत :**

सध्याची महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय ग्रंथालये हायब्रीड स्वरूपाची आहेत. ही ग्रंथालये कमी–जास्त प्रमाणात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे या ग्रंथालयांच्या सेवांमध्ये सुधारणा होत आहे. अशा परिस्थितीत विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना त्यांची ग्रंथालये अधिक चांगल्या सेवा पुरवितात की नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारला होता. एकूण 1455 विद्यार्थ्यांपैकी 1309 (89.97%) विद्यार्थ्यांना वाटते की, त्यांची तंत्रज्ञानाधिष्ठित ग्रंथालये त्यांना अधिक चांगल्या सेवा पुरवित आहेत. केवळ दहा टक्के विद्यार्थ्यांना मात्र तसे वाटत नाही. कदाचित या विद्यार्थ्यांनी अद्याप त्यांच्या तंत्रज्ञानाधिष्ठित ग्रंथालयाचा पुरेसा वापर केलेला नसेल.

❑❑

# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष आणि शिफारशी

## 5.1 प्रस्तावना :

सदर संशोधनात विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या महिती शोध वर्तनाचा अभ्यास केला आहे. यामध्ये तीन विद्यापीठांना (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ) संलग्न असणाऱ्या विधी महाविद्यालयांतील पाचव्या वर्षात अभ्यास करणारे विद्यार्थी अभ्यासासाठी निवडण्यात आले. 24 विधी महाविद्यालयांतील मिळून 1455 विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांचा समावेश सदर संशोधनात केला आहे.

संशोधनातील उद्दिष्टाला अनुसरून तयार केलेल्या प्रश्नावली व निरीक्षण तंत्राचा वापर करुन तसेच प्राथमिक दुय्यम माहिती स्रोताचा उपयोग करुन माहितीचे संकलन संशोधकाने प्रकल्पात केले. त्याचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून त्याआधारे याप्रकरणात संशोधनासंबंधी निष्कर्ष मांडले. निष्कर्षाच्या आधारे विधी ग्रंथालयात सुधारणा होऊन त्यांचा आणखीन विकास होण्यासाठी शिफारशी मांडून संशोधनाचा भविष्यवेध घेतला आहे.

## 5.2 निष्कर्ष :

1) विधी ग्रंथालयातील बहुतांश (66.7%) विद्यार्थ्यांकडे त्यांचा स्वतःचा कोणताही खाजगी स्वरूपातील वाचनसाहित्य संग्रह अभ्यासासाठी उपलब्ध नाही. त्यामुळे विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर ग्रंथालयावर अवलंबून असतात. विधी महाविद्यालयातील ग्रंथालयावर विद्यार्थ्यांचा विश्वास मोठ्या प्रमाणावर आहे.
2) विधी अभ्यासक्रमाचे (52.03%) विद्यार्थी पारंपरिक ग्रंथालयाला दररोज भेट देतात. ई–ग्रंथालयाला दररोज भेट देणाऱ्या विधी विद्यार्थ्यांचे प्रमाण अतिशय अल्प (8.83%) आहे.

- आठवड्यातून एकापेक्षा जास्त वेळा विधी ग्रंथालयाला भेट देण्याचे प्रमाण (48.59%) आहे. यावरून सिद्ध होते की, विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पारंपरिक ग्रंथालयाचा दररोज वापर इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयापेक्षा मोठ्या प्रमाणात करतात.
- विधी शिक्षणक्रमाचे विद्यार्थी पारंपरिक आणि ई–ग्रंथालय या दोन्ही ग्रंथालयांचा एकत्रित वापर करण्याचे प्रमाण (9.42%) आहे. अगदी अल्प प्रमाणात उपभोक्ते एकाच वेळी दोन्ही ग्रंथालयांना भेट देतात.

3) विधी ग्रंथालयाचे उपभोक्त्यांचे वेळापत्रक फारच व्यस्त असल्याने त्यांना ग्रंथालयामध्ये अधिक वेळ व्यतीत करणे जिकीरीचे जाते. पारंपरिक ग्रंथालयात अर्धा ते एक तास व्यतीत करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण (9.42%) आहे. हेच प्रमाण ई–ग्रंथालयात व्यतीत करण्याचे प्रमाण (4.54%) आहे. पारंपरिक ग्रंथालयात ते चार तास व्यतीत करणाऱ्यांचे प्रमाण (33.7%) आहे, तर ई–ग्रंथालयातील प्रमाण (3.65%) आहे.

यावरून लक्षात येते की, पारंपरिक ग्रंथालयामध्ये 1 ते 4 तास व्यतीत करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक (33.7%) आहे. ते ई–ग्रंथालयाचा वापर तुलनेने विधी ग्रंथालयाचे विद्यार्थी अल्प प्रमाणात करतात.

4) विधी ग्रंथालयाचे बहुतांश (71.13%) विद्यार्थी ग्रंथांचा वापर करण्यासाठी ग्रंथालयाला भेट देतात. विधी अभ्यासक्रमाचे उपभोक्ते हे पूर्णतः ग्रंथालयावर अवलंबून असतात. ग्रंथांची देवघेव करण्यासाठी, ग्रंथ परत करण्याची तारीख वाढविण्यासाठी (67.56%) विद्यार्थी ग्रंथालयाला भेट देतात. विधी ग्रंथालयातील अल्प (26.11%) उपभोक्ते नियतकालिकांचा वापर करतात. याचाच अर्थ, विधी ग्रंथालयाचे विद्यार्थी नियतकालिक या साधनांकडे दुर्लक्ष करीत आहेत.

5) इंटरनेट हे माध्यम प्रचलित माहितीचे जलद प्रसारण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. माहिती तात्काळ मिळविण्यासाठी विधी ग्रंथालयाचे विद्यार्थी इंटरनेटचा बऱ्यापैकी वापर करतात. इंटरनेट वापरणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण (57.28%) आहे. डेटाबेसमधून लेख

शोधण्यासाठी (48.79%) विद्यार्थी ग्रंथालयातील संगणक आधारित सेवेचा लाभ घेतात. बहुतांशी (38.62%) उपभोक्त्यांकडून ई–जर्नल्स्चा वापर अल्प प्रमाणात होतो.

6) विधी अभ्यासक्रमाचे 44.60% विद्यार्थी इतर ग्रंथालयांचा वापर करीत असले तरी (55.40%) विद्यार्थी त्यांच्या संस्थेतील विधी ग्रंथालयाचाच वापर करतात.

7) विधी ग्रंथालयाचा वाचनसाहित्य संग्रह खूप चांगला आहे असे मत (41.24%) विद्यार्थ्यांनी आणि चांगला आहे असे मत (51.68%) विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे. म्हणजेच एकत्रितपणे (92%) पेक्षा जास्त विद्यार्थी विधी ग्रंथालयाच्या वाचन साहित्य संग्रहासंबंधी समाधानी आहेत. याचा अर्थ अभ्यासलेल्या विधी ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह समृद्ध आहे.

8) अ) विधी महाविद्यालयातील बहुतांश (77.25%) विद्यार्थ्यांना संदर्भ सेवा उपलब्ध असल्याची माहिती आहे व (54.77%) विद्यार्थी त्याचा वापर करतात.

ब) विधी महाविद्यालयातील बहुतांश (71.06%) विद्यार्थ्यांना इंटरनेट सेवा ग्रंथालयात उपलब्ध असल्याची माहिती आहे व (54.63%) विद्यार्थी या सेवेचा वापर करीत आहेत.

क) बहुतांश (50.58%) विद्यार्थ्यांना डेटाबेस शोध सेवा ग्रंथालयात उपलब्ध असल्याची माहिती आहे व त्याचा लाभ (46.87%) उपभोक्ते घेतात.

ड) नियतकालिकांचा अनुक्रमणिका सेवा (करंट कन्टेन्ट सेवा) (41.85%) आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा (25.97%) नवीन ग्रंथांच्या आवृत्ती सेवा (46.04%) ग्रंथप्रदर्शन (36.28%) ऑनलाइन नियतकालिकांची सेवा (49.20%) प्रतिलिपी प्रिंटींग सेवा (45.49%) या सेवांबाबत विधी अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षाचे विद्यार्थ्यांना पुरेशी माहिती नाही व त्यांचा वापर हवा तितक्या प्रमाणात केला जात नाही.

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची ग्रंथालयीन सेवेबाबतची जागरुकता आणि विविध सेवांचा प्रत्यक्षातील वापर यात अंतर आहे.

9) विधी महाविद्यालयातील ग्रंथालयात नवीन वाचनसाहित्य उपार्जित केल्याची माहिती (68.72%) विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्यापकांकडून मिळते. तर (54.08%) उपभोक्त्यांना नवीन वाचनसाहित्याची माहिती त्यांच्या वर्गमित्रांकडून मिळते.

10) सुमारे (50%) विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी ग्रंथालय तालिकेचा वापर करीत नाहीत. तालिकेचा नेहमी वापर करणाऱ्या उपभोक्त्यांचे प्रमाण अल्प (24.05%) आहे.

11) विधी महाविद्यालयाचे एकूण (77.24%) विद्यार्थी ग्रंथ ग्रंथालयामधून शोधण्यासाठी तालिकेऐवजी ग्रंथालय सेवकांची मदत घेतात. तर (59.93%) विद्यार्थी स्वतः थेट कपाटातून ग्रंथ शोधतात. याचा अर्थ विधी अभ्यासक्रमाच्या (77.24%) विद्यार्थ्यांचा ग्रंथालय सेवकांच्या 'ग्रंथपालनविषयक ज्ञानावर' विश्वास आहे.

12) वाचन साहित्य मिळविण्यासाठी स्वतःच्या ग्रंथालयाव्यतिरिक्त (54.57%) विधी ग्रंथालयाचे उपभोक्ते इंटरनेटचा वापर करतात. बाजारातून आवश्यक वाचनसाहित्य खरेदी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प (34.65%) आहे. विधी महाविद्यालय विद्यार्थी माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर अधिक करतात.

13) विधी अभ्यासक्रमाच्या (67.90%) विद्यार्थ्यांच्या मतानुसार विधी ग्रंथालयातील सेवक क्रमिक ग्रंथ मिळवून देण्यासाठी त्यांना मदत करतात. तर (53.53%) विद्यार्थ्यांच्या मतानुसार ग्रंथालयीन सेवक संदर्भ ग्रंथ शोधण्यासाठी मदत करतात.

यावरून लक्षात येते की, एकंदरीत सरासरी (60%) विद्यार्थी ग्रंथालय सेवकांच्या ग्रंथालयातील ग्रंथ शोधून/मिळवून देण्याच्या सेवेबाबत समाधानी आहेत. सेवकांवर अवलंबून राहण्याचा विद्यार्थ्यांचा कल दिसतो, मानसिकता दिसते.

14) अ) विधी शिक्षणक्रमाचे विद्यार्थी माहितीच्या गरजा भागविण्यासाठी अभ्यासक्रमांशी संबंधित माहितीला (48.31%) प्रथम प्राधान्यक्रम देतात.

ब) विधी विषयांवर होणाऱ्या मूटकोर्ट, मॉक ट्रायल, ए.डी. आरजे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी माहितीला (35%) विद्यार्थ्यांचा द्वितीय स्थानी प्राधान्यक्रम आहे.

क) विधी अभ्यासक्रमाचे (29.55%) विद्यार्थी संशोधनपर लेख लिहिण्यासाठी,संशोधन करण्यासाठी ग्रंथालयातील माहितीला तृतीय प्राधान्यक्रम देतात.

ड) कायद्याच्या पुढील अभ्यास करण्यासाठी लागणाऱ्या माहितीला (19.24%) उपभोक्त्यांनी चौथे स्थान दिले आहे.

ई) विधी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या नोकरी संदर्भातील माहितीला (18.69%) विद्यार्थ्यांनी पाचवे स्थान दिले आहे.

15) विधी अभ्यासक्रमाचे (60.75%) विद्यार्थी विधीविषयक ग्रंथांना प्रथम प्राधान्यक्रम देतात. विधी शिक्षणक्रमाच्या पाचव्या वर्षामध्ये अभ्यास करणारे विद्यार्थी विधीविषयक ग्रंथ बहुतांश प्रमाणात वापरतात आणि क्रमिक ग्रंथाना फार महत्त्व देतात. द्वितीय स्थानांवर (30.17%) संदर्भ साहित्याला प्राधान्यक्रम दिला आहे. तर तृतीय स्थानावर विधी डेटाबेस वापरण्यासाठी (25.83%) विधी विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रम दिला आहे.

16) माहितीच्या गरजांची पूर्तता करण्यास त्यांचे ग्रंथालय सज्ज असल्याचे मत (88.80%) विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे. अत्यंत अल्प प्रमाणातील उपभोक्त्यांनी (10.20%) त्याचे ग्रंथालय माहितीच्या गरजांची पूर्तता करीत नाही असे मत व्यक्त केले आहे.

यावरुन लक्षात येते की, सुमारे (90%) विद्यार्थ्यांना त्यांचे विधी ग्रंथालय त्यांची माहितीची गरज भागविण्यासाठी सक्षम आहे असे वाटते. त्याबाबत विद्यार्थी समाधानी असल्याचा कल दिसतो.

17) विधी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून नोट्स तयार करण्यासाठी (86.04%) विद्यार्थी मुद्रित साहित्याचा वापर करतात. मुद्रित साधनाच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर कमी प्रमाणात (36.49%) होतो असे आढळते. विशिष्ट प्रश्नाचे उत्तर तयार करण्यासाठी मुद्रित साहित्याचा (60.89%) विद्यार्थ्यांकडून वापर केला जातो.

18) 67.48% विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आठवड्याला एका तासापर्यंत छापील ग्रंथ शोधण्यासाठी देतात. 38.70% विद्यार्थी डेटाबेसचा वापर करण्यासाठी 2 ते 4 तास देतात.

यावरून सिद्ध होते की, विधी अभ्यासक्रमाचे बहुतांश विद्यार्थी ग्रंथालयातून माहिती शोधण्यासाठी सरासरी 1 तासापासून ते 4 तासापर्यंत वेळ देतात.

19) वारंवार बदलणारे कायदे आणि अभ्यासक्रम यांचा (65.36%) उपभोक्त्यांच्या माहिती शोध वर्तनावर परिणाम होतो. माहिती संप्रेषण तंत्रातील बदलाचा (30.99%) उपभोक्त्यांच्या माहिती शोध वर्तनावर परिणाम होतो. तर अध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांचा बहुतांश (56.01%) विद्यार्थ्यांच्या माहिती शोध वर्तनावर परिणाम होतो.

20) विधी शिक्षणक्रमातील विद्यार्थ्यांना अनौपचारिक माहितीची साधने सहज उपलब्ध असल्याने (74.22%) उपभोक्ते त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. अनौपचारिक माहितीची साधने वापरण्यास सोपे आहेत असे (59%) उपभोक्त्यांना वाटते तर अनौपचारिक माहितीची साधने विविधता आणि अधिकृतता या कारणांमुळे अनुक्रमे (27.90%) आणि (20.20%) विद्यार्थ्यांना उपयोगाची वाटतात.

21) बहुतांश विद्यार्थी (73.05%) अध्यापकांबरोबर नेहमी व वारंवार अनौपचारिक चर्चा करून माहिती मिळवितात तर (38.61%) उपभोक्ते विधी तज्ज्ञांकडून वारंवार व नेहमी माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतात.

विधी ग्रंथालयातील (46.32%) विद्यार्थी विधी ग्रंथपालांबरोबर वारंवार व नेहमी चर्चा करतात व माहिती मिळवितात.

यावरून असे लक्षात येते की, विधी ग्रंथालयाचे ग्रंथपाल आपल्या व्यवसायात पारंगत आहेत व ते आपली जबाबदारी पूर्ण करतात व विद्यार्थ्यांना त्यांच्याशी चर्चा करणे महत्त्वाचे वाटते.

22) विधी अभ्यासक्रमाच्या (38.68%) विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती शोधताना ती उपलब्ध होते. माहिती शोधताना विद्यार्थ्यांना कोणत्याही समस्येला सामोरे जावे लागत नाही. तर (25.83%) विद्यार्थ्यांना माहितीचा शोध घेताना ग्रंथालयामध्ये माहिती उपलब्ध नसण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. यावरून सिद्ध होते की, विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना माहिती शोध घेताना ग्रंथालयामध्ये माहितीची उपलब्धता असते. माहितीचा शोध घेताना

(53.36%) विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयाचा सेवक वर्गाची मदत करण्याची इच्छा असते. ते विद्यार्थ्यांना मदत करतात तर (18.07%) विधी विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयात सेवक वर्ग मदत करीत नसल्याचे दिसते.

यावरून सिद्ध होते की, माहितीचा शोध घेताना विधी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना विधी ग्रंथालयातील सेवकांना मदत करण्याची इच्छा असते व ते मदत करतात.

23) माहितीचा शोध घेण्यासाठी त्यांना कोणतेही प्रशिक्षण मिळत नाही असे मत (62.75%) विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे. तर (37.75%) विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयातून माहिती शोधण्याचे प्रशिक्षण मिळत असल्याचे मत व्यक्त केले.

यावरून सिद्ध होते की, मोठ्या प्रमाणातील विधी विद्यार्थ्यांना विधी महाविद्यालयातून माहिती शोधण्याचे प्रशिक्षण मिळत नाही.

24) (90.59%) विद्यार्थ्यांनी माहिती शोधण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे असे मत व्यक्त केले आहे. अत्यंत अल्प प्रमाणातील (9%) विधी विद्यार्थ्यांना अशा प्रशिक्षणाची गरज वाटत नाही.

यावरून सिद्ध होते की, बहुतांश विधी विद्यार्थ्यांना माहिती शोध प्रशिक्षणाची गरज जाणवते.

25) विधी अभ्यासक्रमाचे बहुतांश विद्यार्थी (86.94%) इंटरनेटचा वापर माहिती मिळविण्यासाठी दररोज करतात. पंधरवड्यातून व क्वचित इंटरनेटचा वापर करण्याचे प्रमाण अत्यंत अल्प (0.41%) व (1.72%) आहे. म्हणजेच (87%) विधी विद्यार्थी इंटरनेटचा दररोज वापर करतात.

26) विधी ग्रंथालयातील सर्वाधिक (89.48%) विद्यार्थी शैक्षणिक हेतूसाठी इंटरनेटचा वापर करतात. तसेच (60.54%) विद्यार्थी कायदेविषयक माहितीसाठी इंटरनेट वापरतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रचलित जागरुकतेच्या उद्देशाने विधी शिक्षणक्रमाचे बहुसंख्य विद्यार्थी इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात.

27) इंटरनेट सेवेचा वापर विधी ग्रंथालयातील उपभोक्ते बहुतांश प्रमाणात (67.69%) महाविद्यालयातून तसेच घरातून (61.99%) करीत असतात.

28) इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबाबत उपभोक्त्यांची जागरुकता चांगली आणि खूप चांगली या प्रतिसादाचे एकत्रित प्रमाण (90%) आहे.

यावरून हे सिद्ध होते की, विधी ग्रंथालयातील उपभोक्ते इलेक्ट्रॉनिक माहिती साधनांबाबत जागरुक आहेत. ते माहिती तंत्रज्ञानातील साधनाचा वापर करीत आहेत.

29) इलेक्ट्रॉनिक साधनातून झटपट शोध (82.54%), अद्ययावत माहिती (51.68%) तर विनामूल्य उपलब्धता (48.17%) या वैशिष्ट्यांमुळे विधी ग्रंथालयातील उपभोक्त्यास इलेक्ट्रॉनिक साधने वापरणे सहज सोपे वाटते. माहितीची उपलब्धता तात्काळ व अद्ययावत माहिती मिळत असल्याने विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी इलेक्ट्रॉनिक साधने वापरतात.

30) विधी अभ्यासक्रमाचे (88.11%) विद्यार्थी न्यायालयाचे निकाल किंवा विधीविषयक लेख शोधण्यासाठी विधी डेटाबेसेसचा वापर करतात. विधी शिक्षणक्रमामध्ये डेटाबेसेस ही ग्रंथालयाची महत्त्वाची साधने आहेत. विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सुप्रीम कोर्ट केसेस डेटाबेस (66.6%) वापरतात. त्याखालोखाल मनुपत्रा डेटाबेसचा (57.77%) उपभोक्ते विद्यार्थी वापर करतात. ए. आय. आर. हा डेटाबेस (55.05%) उपभोक्त्यांकडून वापरला जातो. यावरून लक्षात येते सुप्रीम कोर्ट केसेस डेटाबेसचा वापर सर्वात अधिक प्रमाणात विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी करतात त्यानंतर मनुपत्रा डेटाबेसला उपभोक्त्यांकडून प्रतिसाद प्राप्त झाला. तिसऱ्या क्रमांकावर ए.आय.आर. डेटाबेसचा वापर केला जातो.

वरील तीन डेटाबेसव्यतिरिक्त इतर डेटाबेसेसचा वापर करण्यास विधी विद्यार्थ्यांचा अल्प प्रमाणात प्रतिसाद प्राप्त झाला. यावरून सिद्ध होते की, विधी ग्रंथालयातील उपभोक्ते मोठ्या प्रमाणावर सुप्रीम कोर्ट केसेस, मनुपत्रा व ए.आय.आर. या डेटाबेसेसचा वापर करतात.

31) डेटाबेसेस ही विधी ग्रंथालयाची महत्त्वाची साधने आहेत. विधी शिक्षणक्रमाच्या (66.6%) विद्यार्थ्यांनी सुप्रीम कोर्ट केसेस या डेटाबेसला प्रथम प्राधान्य दिले आहे. तर द्वितीय प्राधान्य मनुपत्रा डेटाबेसला (57.6%) दिले आहे. तृतीय स्थान उपभोक्त्यांनी (55.05%) ए.आय.आर. या डेटाबेसला दिले आहे.

या तीन डेटाबेसेस व्यतिरिक्त इतर डेटाबेस वापरण्यास अल्प प्रमाणात प्रतिसाद प्राप्त झाला आहे. यावरुन सिद्ध होते की, विधी ग्रंथालयातील उपभोक्ते मोठ्या प्रमाणावर सुप्रीम कोर्ट केसेस, मनुपत्रा, ए.आय.आर. या डेटाबेसेसचा वापर करतात.

32) विधी शिक्षणक्रमाच्या (89.97%) विद्यार्थ्यांना वाटते की, त्यांची ग्रंथालये त्यांना तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा पुरवित आहे. त्यांचे ग्रंथालय आधुनिक तंत्रज्ञान साधनाला सामोरे जाण्यास सक्षम आहे.

## 5.3 शिफारशी :

विधी अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षांच्या विद्यार्थ्यांच्या माहिती शोधवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी या ग्रंथालयाच्या उपभोक्त्यांकडून माहिती संकलित केली. उपभोक्त्यांनी दिलेले प्रतिसाद, सूचना, मते, अभिप्राय याआधारे निष्कर्ष काढले व ते या आधीच्या भागामध्ये दिले आहेत. त्या निष्कर्षांवर आधारित शिफारशी खाली दिलेल्या आहेत.

1) विधी ग्रंथालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर ग्रंथालयावर अवलंबून असल्याकारणाने ग्रंथालयाने आपला संग्रह अद्ययावत, सर्वसमावेशक ठेवावा. विधी ग्रंथालयांनी विधी अभ्यासक्रमाचे ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, कायदे, नियम, जर्नल्स् यांच्या नवीन आवृत्त्यांचा संग्रह ग्रंथालयात करणे आवश्यक आहे. कारण कायदा वारंवार बदलत असतो. त्या बदलाला अनुसरुन वाचनसंग्रह अद्ययावत ठेवणे ग्रंथालयाला आवश्यक आहे. ग्रंथालयात योग्य ग्रंथसंग्रह विकसित करण्यासाठी त्यांची योग्य प्रकारे ग्रंथनिवड करावी. पारंपारिक साधनांबरोबर इलेक्ट्रॉनिक साधनांचाही ग्रंथालयात आंतर्भाव करावा.

2) विधी ग्रंथालयातील विद्यार्थ्यासाठी ई–ग्रंथालयाचा वापर वाढविण्यासाठी ग्रंथालयात पोषक वातावरण तयार करणे आवश्यक आहे. ई–ग्रंथालयाला लागणाऱ्या पायाभूत

सुविधांची ग्रंथालयाने पूर्तता करावी. ई–ग्रंथालयाचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना ई–ग्रंथालयासंदर्भात असणारे दडपण, भय याचे निर्वाहन करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करावा. ग्रंथालयात अंतर्भूत असणाऱ्या ई–संशोधनपर साहित्याचे अध्यापकांनी विद्यार्थ्यांना गृहपाठाच्या माध्यमातून समालोचन करण्यास सांगावे. यामुळे ई–ग्रंथालयाचा वापर वाढविण्यासाठी मदत होईल.

3) पारंपारिक ग्रंथालयाचा व ई–ग्रंथालयाचा वापर वाढविण्यासाठी ग्रंथालयांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयाची वेळ विद्यार्थ्यांचे वर्ग भरण्याअगोदर व वर्ग सुटल्यानंतर अशी करुन घ्यावी, जेणेकरून त्यांच्या व्यस्त दिनक्रमामुळे त्यांनी वर्ग भरण्याच्या अगोदर व वर्ग सुटल्यानंतरही ग्रंथालयाचा वापर करता येईल, अशी लवचिक ग्रंथालयाची वेळ असावी.

3.1) विधी विद्यार्थ्यांना ई–ग्रंथालयातील संसाधने वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला ई–ग्रंथालय कोठूनही वापरण्यासाठी रिमोट एक्सेस सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

3.2) विधी ग्रंथालयाचा वापर अधिकाधिक भावी विद्यार्थ्यांकडून सतत आणि निरंतर होण्यासाठी विधी महाविद्यालयांनी ग्रंथालयाचे तास त्यांच्या दैनंदिन वेळापत्रकामध्ये आयोजित करावेत.

3.3) विधी विद्यार्थ्यांचा ग्रंथालय वापर अधिक करण्यासाठी विधी विद्यार्थ्यांची वाचनवृद्धी वाढविण्यासाठी त्यांना अध्यापकांकडून, ग्रंथालयांकडून वाचन साहित्यांचे महत्त्व, आवड निर्माण करण्यासाठी पाऊल उचलून जागरूक करण्यात यावे व जागरुकता निर्माण करावी.

4) विधी ग्रंथालय हे विधीविषयक संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत असते. ग्रंथालयाचा प्रयत्न कायम विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती देणे असतो. सदर संशोधनात दिसून येते की, विधी ग्रंथालयातील विद्यार्थी अल्प प्रमाणात, नियतकालिकांचा वापर करतात. विधी ग्रंथालय हे संशोधनपर ग्रंथालय आहे. त्या

ग्रंथालयातील विद्यार्थ्यांनी केवळ ग्रंथावर विसंबून राहून चालणार नाही. त्यांनी द्वितीय साधनांबरोबर प्राथमिक साधनांचाही वापर करणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांना वेळोवेळी परिषदा, चर्चासत्र, संशोधनपर विविध लेख, स्पर्धा, (Moot, Alternative Dispute Resolution) इन्टर्नशीपला जावे लागते. विद्यार्थ्यांनी फक्त ग्रंथावर अवलंबून राहिल्यास ते संशोधनपर माहितीला मुकतील म्हणून विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी नियतकालिकांचा वापर करावा व ग्रंथालयांनी त्याचा वापर वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहेत जसे (नियतकालिकांच्या अनुक्रमणिका, त्यातील लेख त्या लेखांचे सारांश) विद्यार्थ्यांना वेळोवळी यादीच्या अथवा ई–माध्यमातून पाठवून त्यांना या वाचन साहित्याचे महत्त्व स्पष्ट करावे.

4.1) विधी ग्रंथालयानी विधी नियतकालिकाचा वापर विद्यार्थ्यांनी अधिक करण्यासाठी नवीन नियतकालिकाच्या प्रती विद्यार्थ्यांच्या दृष्टीस पडतील अशा ठेवाव्यात.

4.2) अध्यापकांनी विधी विद्यार्थ्यांना नियतकालिकांची माहिती देऊन त्यातील लेखांची समीक्षा करण्यासाठी विधी विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

4.3) नियतकालिकातील लेख लिहिणाऱ्या विधीतज्ज्ञ लेखकांची ग्रंथालयामध्ये चर्चा घडवून आणावी.

4.4) अध्यापकांनी त्यांच्या संबंधित विषयातील तासाला वर्गामध्ये नियतकालिकातील लेख विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावे.

5) विधी ग्रंथालयातील विद्यार्थ्यांनी ई–जर्नलसचा वापर करण्यासाठी त्यांना ग्रंथालयाच्या माध्यमातून प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना याबाबत अडचणी असल्यास ग्रंथालय सेवकांनी त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. त्याच्याकडे स्वतःहून जाऊन त्यांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते का याबद्दल विचारणा करावी व तसे होत असल्यास त्यांना ग्रंथालयाच्या/प्रकाशकाच्या माध्यमातून प्रशिक्षण देऊन ई–नियतकालिकाचा वापर वाढविण्यात यावा.

6) विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याची ग्रंथालयीन सेवेबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी ग्रंथालयांनी ग्रंथालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील सेवेबाबत माहिती मिळू शकेल. विद्यार्थ्यांचा वेळ वाचविण्यासाठी ग्रंथपालांनी ग्रंथालय प्रशिक्षण, टूर अगदी वर्षाच्या सुरुवातीलाच आयोजित कराव्यात. प्रशिक्षण कार्यक्रम वर्षातून दोन वेळा राबविण्यात यावे प्रशिक्षणात दृक–श्राव्य माध्यमाचा वापर करावा. इंटरनेटवरील यू ट्युबद्वारे विधी ग्रंथालयाचे महत्त्व स्पष्ट करावे व ग्रंथालयांच्या विविध सेवांची माहिती देऊन त्या सेवांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे.

6.1) कोणतेही ग्रंथालय अनेक कारणांमुळे वाचकाच्या सर्व गरजा पूर्ण करू शकत नाही. तसेच प्रत्येक ग्रंथालयाची, संग्रहाची विशेषता असते. विधी ग्रंथालयातील विद्यार्थ्यांना अनेक साधनांचा लाभ घेण्यासाठी इतर ग्रंथालयांची माहिती त्यांच्यापर्यंत ग्रंथालयांनी पोहोचवावी.

6.2) विधी विद्यार्थ्यांना अनेक विधी स्पर्धेतील केसेसची सोडवणूक करण्यासाठी लागणारी माहिती संशोधनपर साहित्यातून घ्यावी लागते त्यासाठी विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनसाहित्य वापरण्यासाठी ग्रंथपालांनी प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

6.3) विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी इतर ग्रंथालयाचा वापर करून त्यांना मिळणाऱ्या सेवांचा लाभ करून घ्यावा. (जसे ILI, NLS) खाजगी विधी महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांना अनेक सुविधांचा लाभ घेता येत नाही. त्यांच्या ग्रंथालयांनी इतर ग्रंथालयाचे सभासदत्त्व प्राप्त करून विद्यार्थ्यांची गरज भागविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सेवांची उपलब्धता करून विद्यार्थ्यांना त्या वापरण्यास ग्रंथालयाने प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

7) करंट कन्टेन्ट सेवेविषयी विधी विद्यार्थ्यांना साक्षर करून या सेवेची माहिती विद्यार्थ्यांना करून देऊन ग्रंथालयांनी या सेवेचा वापर अधिक वाढविण्यासाठी विधी विद्यार्थ्यांना करंट

कन्टेन्ट सेवा पृष्ठाचे स्कॅनिंग करुन ग्रूप ई–मेलच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना पाठवावे. अध्यापकांनी त्याला जोड म्हणून वर्गातून त्या सेवेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे व दैनंदिन अध्यापनात त्याचा वापर कसा करता येईल याची जागरूकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी.

8) विधी महाविद्यालयातील ग्रंथालयात नवीन वाचनसाहित्य उपार्जित केल्याची माहिती ग्रंथालयामार्फत पुरवायची असल्यास ग्रंथालयांनी ई–अलर्ट सुविधेचा वापर करावा व ई–मेल, एसएमएस इत्यादीद्वारे त्यांना नवीन ग्रंथांची माहिती द्यावी. तसेच विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेईल अशा ठिकाणी ग्रंथालयात उपार्जित केलेल्या नवीन ग्रंथाच्या याद्या प्रदर्शित कराव्यात. तसेच उपार्जित ग्रंथ, शोकेसमध्ये विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येतील अशा ठिकाणी ठेवून त्यांना ते ग्रंथ वाचण्याची इच्छा प्रगट होईल या पद्धतीने ग्रंथांची माहिती प्रदर्शित करावी.

9) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सेवांबाबतची जागरुकता व प्रत्यक्षातील वापर यातील अंतर कमी करण्यासाठी त्या सेवांबद्दल विशेष आकर्षण निर्माण करण्याचा प्रयत्न करुन सेवांबाबत त्याची जिज्ञासा वाढविण्याचा प्रयत्न ग्रंथालयांनी करणे आवश्यक आहे. ग्रंथालय तालिका ग्रंथालयाचा आरसा असतो. या साधनाद्वारेच ग्रंथालयात कोणता ग्रंथसंग्रह उपलब्ध आहे हे उपभोक्त्यांना जाणून घेण्यास मदत होते. त्यामुळे उपभोक्त्यांना ग्रंथ शोधण्यास मदत होते आणि त्यांचा खूप वेळ वाचण्यास मदत होते. सदर अभ्यासातून आढळून आले की, अभ्यासलेल्या विधी ग्रंथालयातील बहुतांश उपभोक्ते ग्रंथालय तालिकेचा वापर करीत नाहीत. त्यांचा तालिकेच्या उपयोगाशी परिचय नाही. तालिकेचा प्रभावी वापर करता येण्यासाठी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयांनी तालिका वापरण्याचे प्रशिक्षण द्यावे. ग्रंथालय परिचय उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना तालिकेचा परिचय करुन देता येईल. तालिका वापरासंबधी एखादे ऑनलाइन मॉडेलही विकसित करता येईल.

10) विधी अभ्यासक्रमाच्या पाचव्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घ्यावयाचे असल्यास अथवा व्यावसायिक क्षेत्राकडे जायचे असल्यास वेळोवेळी ग्रंथांची आवश्यकता भासते. विद्यार्थ्यांना वारंवार लागणारे ग्रंथसाहित्य आपल्या स्वतःच्या ग्रंथालयात खरेदी करण्याच्या सवयी लावून त्यांना स्वतःचे लहान स्वरूपातील ग्रंथालय प्रस्थापीत कर ण्यासाठी पुढील ध्येय गाठण्यासाठी त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करावी.

11) विधी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी मूटकोर्ट स्पर्धेत सहभाग घेणे विद्यार्थ्यांना आवश्यक असते. त्यासाठी त्यांना माहितीची गरज वेळोवेळी लागते. बरीचशी साधने वापरणे अनिवार्य असते. विधी ग्रंथालयांनी अभ्यासक्रमाशी संबंधित सर्व समावेशक साधनांचा ग्रंथालयात अंतर्भाव करण्यात यावा. तसेच मूटकोर्ट, मॉक ट्रायल व इतर स्पर्धांना तोंड देण्यासाठी त्यांना अनुसरून ग्रंथालयाचा संग्रह अद्यावत ठेवून विधी विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजांची पूर्तता करण्यात यावी.

12) विधी ग्रंथालयातील बहुतांश उपभोक्ते क्रमिक आणि संदर्भ ग्रंथांना पसंती देतात म्हणून हे ग्रंथ पुरेशा संख्येने उपलब्ध करावेत.

13) मुद्रित साधनांच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर अधिक होण्यासाठी ग्रंथालयांनी इलेक्ट्रॉनिक संसाधनांच्या माध्यमांची अधिकृतता आणि स्वीकृतता विधी विद्यार्थ्यांना पटविण्याचा प्रयत्न करावा व इलेक्ट्रॉनिक संसाधनांबाबतची साक्षरता वाढवावी.

14) विधी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून रहावे लागते. माहितीचा शोध घेण्यासाठी ग्रंथालयानी आपल्या ग्रंथालयात प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून, ग्रंथसंग्रहातून माहिती कशी शोधावी जसे, ए.आय.आर., सिरीयल पब्लिकेशन, हॉल्सबरी लॉ ऑफ इंग्लंड, इंडिया, कॉमनवेल्थ रिपोर्ट, फॉर्म्स अँड प्रेसिडन्टस, ऑनलाइन डेटाबेसेस या साधनांमधून माहितीची उपलब्धता कशी करावी या कार्यक्रमांचे आयोजन ग्रंथपालांनी करावे. कारण विधी ग्रंथालयाची साधने वापरण्यासाठी विशेष कौशल्याची गरज असते

असे कौशल्य सर्व विधी विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यासाठी ग्रंथालयांनी प्रात्यक्षिक पुस्तिका प्रसिद्ध करुन / ग्रंथालय उपक्रमातून ग्रंथालयातील वाचन साहित्याची ओळख करुन देणे आवश्यक आहे. तसेच दर सहा महिन्यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी ग्रंथालय फीडबॅक फॉर्म्स विद्यार्थ्याकडून भरून घेऊन विद्यार्थ्यांच्या अडचणींवर ग्रंथालयांनी मात करणे आवश्यक आहे.

14.1) विधी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांचा ई–बुक्सचा वापर जास्त प्रमाणात करण्यासाठी ई–बुक्सची आकर्षणे, आशय विद्यार्थ्यांपर्यंत ग्रंथालयांनी पोहचविण्याचा प्रयत्न करावा.

15) बदल हा विधी अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा घटक आहे. अगदी अल्पशा बदलाचा विधी उपभोक्त्यांच्या माहिती शोध वर्तनावर परिणाम होतो म्हणून ग्रंथालयांनी प्रचलित दृष्टीकोन ठेवून बदलांना अनुसरून विद्यार्थ्यांना माहिती संप्रेषण तंत्रज्ञानात (ICT) सक्षम करून विधी ग्रंथालयात पायाभूत सूविधा उपलब्ध करून दयाव्यात.

16) ग्रंथालयांनी औपचारिक माहिती साधने उपभोक्त्यांस सहजपणे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. औपचारिक माहिती साधानांच्या मुद्रित / इलेक्ट्रॉनिक वापरातील क्लिष्टता / गुंतागुंत कमी करून ती साधने उपभोक्त्यांस वापरण्यासाठी काही नियम शिथिल करून ग्रंथालयांनी उपभोक्त्यांना सहकार्य करावे. विधी शिक्षणक्रमाच्या महाविद्यालयीन विधी विद्यार्थ्यांनी अधिकृत साधनांचा वापर करण्यासाठी त्यांच्यात जागरुकता निर्माण करण्यात यावी. विद्यार्थ्यांना अधिकृत साहित्याची चांगल्या प्रकारे ओळख विशेषतः करुन देण्यात यावी, अधिकृत साधनांची यादी महाविद्यालयांच्या पोर्टलवर प्रदर्शित करण्यात यावी. जेणे करुन विद्यार्थ्यांचा कल अधिकृत साहित्याकडे झुकला जाईल.

17) विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा अधिक वापर अनेक संशोधनपर साहित्याच्या वापरासाठी करावा. ते फक्त मनोरंजनाचे साधन नसून विधी संशोधन साहित्याचा त्यातून लाभ घ्यावा. यासाठी ग्रंथपालांनी ग्रंथालय परिचय उपक्रमांमध्ये माहिती द्यावी.

18) विधी महाविद्यालयांनी ग्रंथालयासाठी माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक आहे. पारंपारिक ग्रंथालयाला जोड म्हणून ई–ग्रंथालये अस्तित्वात आली आहेत. पारंपरिक साधने वापरताना त्याचबरोबर ई–संसाधने वापरण्याचे प्रशिक्षण कौशल्य ग्रंथालयांनी विद्यार्थ्यांना देणे बंधनकारक करणे आवश्यक आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाने ई–संसाधने ग्रंथालयात घेणे बंधनकारक केले आहे. परंतु ग्रंथालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना (ICT) माहिती सप्रेषण तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण न दिल्यास विद्यार्थी अनेक साधनांपासून वंचित राहतील व त्यातील ज्ञानाचा, माहितीचा त्यांना उपयोग होणार नाही. त्यातील ज्ञानाला ते पारखे होतील म्हणून विधी महाविद्यालयातील प्रत्येक ग्रंथालयाने आपल्या विद्यार्थ्यासाठी ICT चे प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्त होईपर्यंत घेणे आवश्यक आहे.

19) विधी ग्रंथालयाचे विद्यार्थी मनुपत्रा, एस.सी.सी. ऑनलाइन, ए.आय.आर. या तीन डेटाबेसव्यतिरिक्त इतर डेटाबेस पुरेसे वापरत नाहीत. संशोधकांच्या निदर्शनास येते की, हे तिन्ही डेटाबेसेस भारतीय आहेत. यातून भारतीय केसेसची माहिती विद्यार्थ्यांना मिळू शकते. त्याव्यतिरिक्त त्यांना माहिती मिळत नाही. यासाठी ग्रंथालयानी इतर ऑनलाइन डेटाबेसेस ग्रंथालयात जास्तीतजास्त घेण्याचा प्रयत्न करावा. आपल्या अर्थसंकल्पामध्ये तशी तजवीज करावी. कारण विधी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भारतीय केसेसबरोबर आंतरराष्ट्रीय नियमांची बाबींची माहिती, ज्ञान असणे आवश्यक असते. अनेक स्पर्धांना तोड देण्यासाठी त्यांना आंतरराष्ट्रीय माहितीची आवश्यकता असते. फक्त भारतीय डेटाबेसेस वापरल्यास आंतरराष्ट्रीय ज्ञानाला ते पारखे होतील संशोधनाचा आंतरराष्ट्रीय विकास कळण्यास त्यांना अटकाव होईल म्हणून विधी अभ्यासक्रमाच्या ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथालयात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ऑनलाइन डेटाबेसेस खरेदी करुन ते कसे वापरावे याचे आपल्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण द्यावे.

विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची वाचन साहित्याची आणि माहितीची गरज अधिक समाधनकारक करता यावी यासाठी पुढील प्रकारच्या प्रलेखन केंद्राची, राज्यपातळीवरील विधी ग्रंथालयाची तसेच नॅशनल लॉ लायब्ररीची स्थापना करण्यात यावी.

20) प्रलेखन केंद्र –

केंद्रीय पातळीवर देशभरातील ग्रंथपालांनी एकत्र येऊन संसदेत तसा प्रस्ताव देऊन तो ठरावाच्या स्वरुपात पास करुन युनिव्हर्सिटी ग्रँड कमिशनच्या साहाय्याने राष्ट्रीय स्तरावर विधी क्षेत्रासाठी प्रलेखन केंद्राची स्थापना इतर क्षेत्रातील प्रलेखन केंद्राप्रमाणे भारतात स्थापन करण्यासाठी तत्परतेने काम करण्याची आवश्यकता आहे.

21) राज्यपातळीवरील विधी ग्रंथालय –

प्रत्येक राज्यामध्ये एक विधी ग्रंथालय स्थापन करण्यात यावे. राज्याचे विधी प्राधिकरण राज्य पातळीवरील विधी ग्रंथालयासाठी उचित तरतुदी करेल राज्य सरकार व युजीसीला प्रशासकीय नियम बनविण्याचे अधिकार असावेत. राज्यपातळीवरील सर्व साधनांचा त्यामध्ये आंतर्भाव करावा.

22) नॅशनल लॉ लायब्ररी –

